REGISTERED No.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........रु१ ०१
दुसरे खेपेस .... ....  ....०१

advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY I AUGUST 1904 NO 30

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३०

## कवीची स्फूर्ति

### निसर्ग

समविषमांचा साठा पुरवी निसर्ग सृष्टीला,
परि उभयांचें नच सम्मेलन येई दृष्टीला १
वायु मिळेना जळीं, न केव्हां तेज तमीं मिसळें
सत्य असत्यीं, दोषीं गुण, नच आत्मभूत झाले २
लावण्याची कुरूपतेची मिळणी होईना
जरठ युवति संगमास सम्मत निसर्ग मानी ना ३
अहि-नकुलांचा हरि-हरिणांचा मेळ कधीं न पडे
जीत-हार भावांचा प्रेमळ एकोपा न घडे ४
समास सम, विषमास विषम, तें भेटाया उसळें
वायू नभीं वायूंत मिळे, जळ निर्धे जळीं मिसळें ५
उदित-बालरवि पाहुनि मुख नवमृणालिनी उमली
घूक तमीं संचरे, उदधि शशिबिंबाला कवळी ६
दर्दुर कर्दम सेवी, भोगी आमोदा भ्रमर
मनोहारिणी रसज्ञ रमणी वांच्छी नर चतुर ७
छिद्रान्वेषी जन जो त्याला छिद्र मिळे हातीं
गुणग्राहकां गुण मिळती, जगा हंसाला मोती ८

-----

### सुप्तांगना

राहे सत्काविकल्पनेंत, अथवा श्रीसूर्यनारायणीं
तें संपूर्ण पवित्र तेज विलसें जीच्या प्रसन्नेक्षणीं,
हो शय्यारत संप्रति श्रमुनि ती सौंदर्य-सौदामिनी,
वांटे शुद्ध निरभ्र शुभ्र गगनीं नक्षत्र हे कामिनी. १
पों। पाहुनिया मला सतत जें सक्रोध संकेचन,
तें निर्द्रित मुखारविंद भिरवी मंदस्मितें मोचन*
स्वच्छंदें झिडकारितां मज नवा उत्कर्ष ये ज्या करीं
झाले हात मृणालनालसम तो; सत्कार माझा करी २
त्यां केलेंस मदावहेलन कठोरत्वें समस्तांपरी,
पश्चात्ताप तुला असेल घडला निभ्रांत त्याचा परी
बोलाया स्फुट ओष्ठसंपुट दिसे उद्युक्त माझ्यासवें
निद्रा ही अभिसारिकेसम झटे माझ्या हितीं उत्सवें ३
माझी मूर्ति असेल चिंतनबळें हृन्मंदिरीं स्थापिली,
लीलाभावसमर्थनें कठिणता मागील प्रक्षाळिली.
झाले सस्मित आस्य, नेत्र उघडे किंचित्, कपोलीं कर
रामा मंगलदेवता पहुडली ही श्रांत शय्येवर ४
वाहे जों सरिदोघ, जोंवरि असें भूवरी भूधर,
नक्षत्रासह चंद्रसूर्य असती व्यापूनि जों अंबर,
राहो तोंवरि ही अशीच निजली वज्रांतरा मानिनी,
निष्ठापूर्वक भीहि तिष्ठत असा राहीन आराधनीं ५

-----

१ * आपली मुक्तता

-----

### नोटीस

नोटीस वेशमी— दुलीलाल नानचंद साहू दुकान अमळनेर तालुके मजकूर जि० खानदेश यांस नोटीस देणार रामचंद्र मार्तंड गुप्ते वकील राहणार आकोले प्रांत वऱ्हाड कारणे नोटीस देण्यांत येते कीं, आमचे पक्षकार रा० रा० हरकचंद गुलाबचंद गुजराथी साहु दुकान तेल्हारें ता० आकोट जि० अकोले यांचे दुकानचे घेणें नानचंद अनुपसा दुकान अमळनेर यानकडेस आजपर्यंत बरेच घेणें निघत आहे. सदर्हू दुकान संबंधी देव घेव सदर्हू दुकानेच मालक आपले वडील नानचंद अनुपसा व आपले वडील बंधू त्रिपरुसा नानचंद यांनीं केली आहे हल्लीं ते मयत असल्यामुळें त्या दुकानचें काम तुह्मी स्वतः पाहात असून तुह्मास अनेक वेळा आमचे पक्षकार रा० रा० हरकचंद गुलाबचंद यांहीं मागणें केले असतां आपण रक्कम देणें कबूल असून उलगडा आजपर्यंत केला नाहीं. आपली बरेच दिवस निकाल करण्याची वाट पाहून फिर्यादी करितां आमचे येथें त्यांचें वहिखाते येऊन पडलें आहे. एवंदर हिशेब पाहतां आपले कडेस बरीच मोठी रक्कम निघत आहे. एवढ्या मोठ्या रकमेचा आकडा अशा प्रकारच्या जाहीर नोटिशींत प्रसिद्ध करणें आह्मांस इष्ट वाटलें नाहीं ह्मणून तो मुद्दाम दाखल केला नाहीं; व एकदम दिवाणीचा मार्ग धरिला तर आपलेवर बरेच मोठे खर्चाचे रकमेचा बोजा बसेल तो आपली इच्छा असल्यास टाळितां यावा या हेतूनें आह्मी एकदम ही फिर्याद दाखल न करितां आपल्यास ही नोटीस दिली आहे करितां ही नोटीस पोंहोचल्या पासून १५ दिवसांचे आंत आपण निकाल करावा नाहींपेक्षां आह्मास पुढील मार्गास नाइलाजानें लागणे भाग पडेल. आप्तसंबंधांत असा प्रकार होणें चांगले नाहीं व आपल्यास नडीचे वेळीं हजारो रुपये कर्जाऊ देणार इसमास कोर्टाची पायरी चढविण्यास लाविणें व ते व तुह्मी वादी व प्रतिवादी या नात्यानें कोर्टांत उभे राहणें हे आपले सारखेस सुज्ञास व सावकार ह्मणविणारे इसमास शोभत नाहीं. आमचे मते शेकडो रुपये तंटे बखेड्यांत खर्च करून ते आपल्या आंगावर चढवुन घेण्यापेक्षां तुह्मी आपसांत रक्कम देण्याची सोय कराल तर त्यांत तुमचा फायदाच होईल हे मी आपले सारख्यास कळविलेच पाहिजे असें नाहीं; तथापि आप्तसंबंधांत अशा थरावर गोष्ट येणें मला स्वतःस बरोबर वाटत नसल्यामुळें कांहीं दिवस फिर्याद दाखल करणें तहकूब ठेवून ही नोटीस आपल्यास दिली आहे. करितां एकंदर गोष्टींचा विचार करून व पुढें होणारे परिणामाकडे लक्ष देऊन आपण वरील मुदतींत निकाल कराल अशी आशा आहे. सदर्हू वरील मुदतींत आपले कडून जबाब न आल्यास जी काय व्यवस्था करणें ती करणे भाग होईल. ह्मणून ही नोटीस दिली कळावें. तारीख २७।७।०४ इसवी.

सही

R. M. GUPTE
Pleader
Akola
(Berars).

-----

### जाहिरात.

खाली सही करणार यानकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं भवूतपुरी गुरु दवलत पुरी गोसावी राहणार दादगांव ता० खामगांव यानें तारीख २९।९।०३ चे रजिस्टर झालेले लेखावरून खाली लिहिलेले जिनगीचा ह्मणजे दादगांव येथील

सर्वे नं. ७२ एकर गुंठे ९०३४ आ. १५
सर्वे नं. २३ एकर गुंठे १८०१ आ. ४४
सर्वे नं. ५९ एकर गुंठे १६०३ आ. ४२
सर्वे नं. ७१ एकर गुंठे ११०१२ आ. १३
सर्वे नं. ६३ एकर गुंठे २८०३३ आ. ४८

यांतील ०५०४ पांच आणे चार पैचा हिस्सा. मठ चव दिवाली व याचे अंतील. मकाने २, जंगम माल, बैल ६, ह्मैस १, गाय १, जवाहीर वगैरे अशा मिळकतीचे केलेले व्यवस्था पत्रावरून मी जिनगीची व्यवस्था करीत असतां सदरहू बुवांनीं कुबुद्धी मनांत आणून माझे हक्कास व कृत्यास व्यत्यय यावा या हेतूनें निकारणीक सदरहू जिनगीचे संबंधाची विल्हेवाट करण्याचा विचार मनांत आणून कोणास गहाण, खरेदी किंवा अन्यरितीनें देण्याविषयीं उद्गार निघत आहे. यासाठीं या द्वारें कळविलें जातें कीं वरील जिनगी पैकी कोणी कांहीं कोणतेही रितीनें घेऊ नये घेतल्यास ते रद्द आहे असे समजावे ह्मणून ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे याची एक नक्कल भवूतपुरी यानकडे आणि जानमहमद वल्लद गुलमहमद जमादार रा० दादगांव आणि पाचपोर दुकान माटरगांव यांचे कडेही पाठविली आहे. कळावें. तारीख २९।७।०४ इसवी.

सही

सहीची निशाणी कलरामपुरी
गुरु नथूपुरी राहणार
दादगांव ता. खामगांव
याची.

-----

### नोटीस.

रा. रावजी तुळजाराम गुजर पेठ करमाळे. पोष्ट– करमाळे तालुके मजकूर जिल्हे सोलापूर यांस:—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमचे अडतींत तुमचा कोठा भाड्यानें घेऊन त्या कोठ्यांत जवारीची पोतें १४५ संवत १९५९ चे वैशाख मासी ठेविले. ही पोतें तुमचे पाशी आमचे अनामत असून आह्मी तुमचे दुकानची उचल २०० रुपये घेतली होती तरी तुमचे सदर्हू २०० दोनशें रुपये आणि कोठ्याचें भाडें असे आह्मी संवत १९६० चे कार्तीक मासी देण्यास आलों असतां प्लेगामुळें तुह्मी दुकान सोडून बाहेर गांवीं गेल्यामुळें नाउपाय झाला हल्लीं तुह्मास कळवितों कीं कोठ्याचे भाड्यासुद्धां आह्मी किती दिवसांत रुपये पाठवित यावद्दल उत्तर पाठवावे ह्मणजे त्या मुदतींत आह्मी तुमचे रुपये आणून देऊन आह्मी आमची जवारीची पोतीं १४५ भरलेली घेऊन जाऊं असे तुमचे कडून एक महिन्यांचे आंत उत्तर न आल्यास रीती प्रमाणें कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां तेजी मंदीसह तुमचे पासून रुपये वजा वाटा करून घेतले जातील. आमचा पत्ता कंझारे तालुके मुर्तीजापूर जिल्हा उमरावती. कळावे. तारीख २९।७।१९०४ इसवी०

सही

देवचंद नथुराम मारवाडी चापडगांवकर हल्लीं मुक्काम आकोला
दस्तुर खुद.

-----

### अलभ्यलाभ

आह्मा तेल्हारेकरास एक मोठाच अलभ्य लाभ प्राप्त झाला यांत शंका नाहीं. रा. रा. नरसिंह चिंतामन केळकर बी. ए. एल. एल. बी. एडिटर मराठा, हे आमचे येथील लोकप्रिय वकील तात्यासाहेब कोल्हटकर यांचे घरीं आले होते त्यांस येथील मंडळींनीं विनंती केल्यावरून त्यांनीं गेल्या १७ वे तारखेस एक उत्कृष्ट लेक्चर दिलें. हा सुयोग येथील लायब्ररींत घडून आला अध्यक्षस्थानीं रा. रा. टिपनीस वकील असून गावांतील सर्व मंडळी मुद्दाम आली होती.

प्रथमतः येथील सुप्रसिद्ध वकील काका साहेब भागवत यांनीं रा० केळकर यांची सर्वांना ओळख करून दिली, केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें आपलीं कामें कशीं बजावतात याबद्दल थोडक्यांत सांगितलें. त्याचप्रमाणें सदर्हू पत्रांचे मूळ कर्ते कोण, व त्यांनीं हा उद्योग कां आरंभिला. व तेंच व्रत रा० केळकरानीं कसें चालविलें आहे यांचेंही थोडक्यांत चांगल्या रीतीनें दिग्दर्शन केलें.

नंतर रा. रा. केळकर यांचें भाषण "आपल्या देशाचें काय होईल" या विषयावर खालील आशयाचें झालें:—

आह्मी शहर सोडून रेल्वेच्या आड मार्गीनें असलेल्या खेड्यांशीं आलों ह्मणून कांहीं विशेष गोष्ट झाली असें नाहीं; कारण आमचें कर्तव्य खेडोंपाडीं हिंडून [ वर्तमान पत्रद्वारा आमचे जे विचार प्रसिद्ध होतात त्यावर ] लोक काय बोलतात हें पाहणें हें होय. स्वतिकटुख भोगण्याप शहरापेक्षां खेडेगांवच चांगलें. खेड्यांत विद्वान कमी असतात व त्यांतल्या त्यांत जो एखादा असतो त्यास लोकप्रीति संपादण्यास कठीण पडत नाहीं. कारण तेथील लोक समाजाचे विचार अल्प असतात. तरी शहरांतील विचारांची व खेड्यांतील

विचारांची तुलना केली असतां त्यांचें स्थूल स्वरूप खेड्यांत व शहरांत एकच. व तें 'आपल्या देशाचें किंवा समाजाचें काय होईल' या शब्दांनीं व्यक्त होतें. प्रश्न मोठा व बिकट खरा, परंतु कोणत्याही संमजस मनुष्याच्या डोक्यापुढें २४ तासांपैकीं एक तास तरी हा प्रश्न येतः अतः काय? या प्रश्नाचें उत्तर समाधानकारक देतां येणार नाहीं. या बद्दल पूर्वीच्या लोकांनीं विचार केला आहे. सध्यांचे लोक करीत आहेत. व पुढेंहि करतील. सर्वांचें एकमत नाहीं हरी या बद्दल आपणाला कांहीं सुचतें कीं नाहीं हें पहाणें आहे. या गोष्टीस दान तऱ्हेचीं उत्तरें लक्षांत येतात. एक सतवादी दुसरें असतवादी किंवा आशावादी व निराशावादी. जे मनाचे मोठ व कोणत्याहि गोष्टी बद्दल विशेष काळजी न वाहणारे व आपणाला चांगला काळ खचित येईल असें ज्यांचें मत ते सतवादी समजावे. तसेंच आपल्या देशाची कांहीं घडगत नाहीं. कधीं चांगला काळ येणार नाहीं अशा दृष्टीनें विचार करणारे असतवादी होत. स्थलाबद्दल विचार केला तर गुजराथ, बंगाल, पंजाब वगैरे देशांत निरनिराळ्या जातीचे व धर्माचे लोक असल्यामुळें त्यांचे आचारविचार वेगळे, त्यांच्या मनाच्या प्रवृती वेगळ्या. अशा प्रकार असल्यामुळें सरसकट प्रगति घडून आणणें कठीण आहे. काळा बद्दल पाहिलें तर पूर्वींचा तसा होता, आतां असा आहे, पुढें अशा प्रकारचा होईल असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रत्येक व्यक्तीस बुद्धी आणि इच्छा हीं असतात, त्यांपैकीं बुद्धी फिरवितां येत नाहीं परंतु इच्छेची तशी स्थिति नाहीं वाटेल तिकडे ती वळूं शकते. मनुष्याच्या पुढील जन्माची कथा कोणी पत्रिकेवरून, हातावरून, शिक्षणावरून, जातीवरून, आईबापावरून सांगतात. परंतु तें कितपत खरें ठरतें या बद्दल वानवाच आहे. कारण जीं मुलें शाळेंत अवदांड असतात तीं मोठेपणीं चांगलीं तीव्र निपजतात व जीं प्रथमतः चांगलीं तरतरीत असतात तीं मंद व जड निपजतात. यावरून एका व्यक्ती संबंधानें निश्चयात्मक मत ठरविणें जर कठीण आहे तर सर्व राष्ट्राबद्दल पुढील भाकीत करणें फारच कठीण. कारण निरनिराळ्या प्रांतांतील वेगवेगळ्या जातींतील लोकांच्या मनप्रवृत्ती वेगळ्या, त्याच प्रमाणें आपल्या राज्यकर्त्यांचे आचारविचार, मनप्रवृत्ती व गुणधर्म वेगळे, परिस्थिति वेगळी असें असूनही आह्मांस सर्वांबद्दल प्रश्न सोडावयाचा आहे. जर आपण सर्वजण एका गुणधर्मानें वागलों असतों, आपला देश लहान असतां, त्यांतील जाती आचारविचार मनाची प्रवृती साधारणपणें एकाच धर्तीवर असती, तसेंच निरनिराळ्या प्रदेशांतील पूर्वींचे इतिहास अगर शौर्याच्या कृत्यांची यादी असती, तर आपली स्थिति खात्रीनें सुधारली असती; परंतु बंगालचा पूर्व उज्वळ इतिहास नाहीं, पंजाबच्या इतिहासाचा आमच्या ह्या राष्ट्रांशीं कांहीं संबंध नाहीं, रजपुतांचा इतिहास एक काळी व मुसलमान आणि हिंदु हे तर एकमेकांचे कट्टे दुस्मान इतक्या भानगडी बुजवून आपणांस पुढें पाऊल टाकणें आहे. आज सिरीस आपणांवर यहच्छेनें सत्ता चालवि-णाऱ्या आंग्ल राष्ट्राची आजपर्यंतची स्थिती पाहूं गेलें असतां तें राष्ट्र आपल्या पेक्षां लहान, इतिहास लहान व आचारविचार एकाच धर्तीवर असल्यामुळें तें राष्ट्र एकजीव होऊन बसलें आहे; परंतु आपलें सर्व त्यांच्या उलट असल्यामुळें आपली प्रगती तितक्या झपाट्यानें होणें अशक्य आहे.

प्रत्येक मनुष्याची बुद्धि आणि इच्छा हीं भावी सौख्याचे घटक होत. प्रत्येकानें आपल्या मनाच्या विशेष कला प्रमाणें राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे गोष्टींकडे लक्ष्य पुरवून आपला देश सुधारला पाहिजे. मनुष्यानें प्रयत्न केल्यावर कोणची गोष्ट साध्य होणार नाहीं? राष्ट्राच्या खेड्यांतील माणसें ह्मणजे कांहीं कमी कर्तृत्ववान असतात असें कोणी समजूं नये. खेड्यांतील व मोठ्या शहरांतील काय प्रत्येक व्यक्तीनें राष्ट्रकार्यास हात लावल्यावर आपल्या देशाचा उर्जित काळ दूर नाहीं हें सर्वांनीं पक्कें ध्यानांत धरावें.

---

# वऱ्हाडसमाचार

---

मिती आषाढ वद्य ५ शके १८२६

---

## औद्योगिक मंडळी

बंगाल्यांत कलाकौशल्य प्रवर्तक मंडळी निघाली आहे. तिचा हेतु सांप्रतच्या शिक्षणक्रमाला औद्योगिक दृष्टीनें निराळें वळण द्यावयाचा आहे. देशी विद्यार्थी कलाकौशल्य शिकण्यासाठीं परराष्ट्रीं पाठवावेत, ते स्वदेशीं परत आल्यानंतर त्यांच्यासाठीं निरनिराळे कारखाने घालून द्यावेत, तसेंच देशांतल्या देशांतच कलाहुन्नरांचें शिक्षण देण्याच्या योजना करून द्याव्यात इत्यादि गोष्टी करण्याचा या मंडळीचा विचार आहे. या मंडळीमध्यें तिकडील सर्व प्रमुख प्रमुख गृहस्थ खटपट करीत आहेत. या मंडळीचे सभासद मुख्य मुख्य शहरीं जाहिर सभा भरवितात, लोकांस सांपत्तिक उन्नतीचे मार्ग दाखवितात आणि या मार्गाचें अवलंबन यथायोग्य होण्यासाठीं राष्ट्रीय फंड उभारणाकडे लोकांचीं मनें उद्युक्त करीत असतात. या कार्यांत या मंडळीला चांगलें यश येत चाललें आहे. कांहीं महिन्यांच्या अनुभवानें असें सांगता येतें कीं, बंगाल्यांतील लोकांची प्रवृती या कामाकडे चांगली वळली आहे. आजच कलकत्त्यास एक टोलेजंग जाहिर सभा भरावयाची आहे. अध्यक्षस्थानीं नामदार न्यायमूर्ती स्टीफन्स हे विराजमान होणार आहेत. दरमहा शंभर शंभर रुपये अशा दोन स्कालरशिपा दुर्भंगाचे महाराज बहादूर आणि सर ज्योतींद्र मोहन टागोर यांनी अगोदरच उदार बुद्धीनें दिलेल्या आहेत. आज सायंकाळीं जी जाहिर सभा भरणार आहे तिची महती आह्मी मोठी समजतो. या सभेमुळें बंगाल्यांतील औद्योगिक चळवळीला चांगलें रंगरूप येईल असा सुमार आहे.

बंगाल्यांत ज्या चळवळीला प्रारंभ झाला आहे तीच सर्व राष्ट्रभर प्रसृत झाली पाहिजे. आमच्या देशाची जीवनकला भावी सांपत्तिक स्थितीवर अवलंबून आहे. पण ही सांपत्तिक स्थिती राज्यकर्त्यांच्या वर्तमान राजधोरणानें सुधारण्या सारखी नाहीं. आमचा व्यापार व उद्योग परकीयांच्या हातांत गेला आहे आणि हीच गोष्ट आमच्या सांप्रतच्या ऱ्हासाचें मुख्य कारण आहे. ज्या कारणानें ऱ्हास झाला तें कारण दूर सारल्या शिवाय आमचा देश कालत्रयीं सुधारणार नाहीं. पण या कामीं सरकारी राजाश्रय मिळण्याची आशाच नाहीं. अशा निराशेच्या स्थितींत आपण आपल्याच पायावर उभें राहण्यास शिकलें पाहिजे. भावी औद्योगिक मजल मारण्याचें काम फार अवघड आहे. त्यांत जीं संकटें व विघ्नें येतील त्यांस आपण हार जातां कामा नये. हीं संकटें ह्मणजे आमच्या पुढील यशसंपदेचा सोपानपंथच होय. आपल्या अंगांत आपलेपणा चांगला बाणला पाहिजे; आणि जोंपर्यंत आपणामध्यें खरा स्वाभिमान नाहीं, खरा देशाभिमान नाहीं, आणि त्याच्या बरोबरच अंगांत रसरसणारा एका प्रकारचा तिर्यक कडवेपणा नाहीं तोंपर्यंत आह्मी आमच्या देशाचे खरे शत्रूच आहोंत. आणि हा देशद्रोह नाहींसा होईपर्यंत आमची राजनिष्ठा देखील संकुचितपणाचीच राहील आणि आह्मी असेंच दास्यत्वाला पात्र व योग्य राहूं.

पुष्कळदां अनुभव असा येतो कीं, वरील गोष्टी चांगल्या कळतात पण तसें वर्तन ठेवण्याची मोठीच अडचण येते. बंगाल्यांतल्या सारख्या पुष्कळ औद्योगिक मंडळ्या नवीन उत्पन्न होतात परंतु त्यांच्या मध्यें अंतस्थ स्फुरण व प्रेरणाशक्ती नसल्यामुळें त्या अस्तास जातात. याचें कारण आमच्या लोकांची गतीच चोहोंकडून खुंटल्या सारखी झाली आहे हें होय. तथापि अशा प्रयत्नांत विराम उपयोगाचा नाहीं; ते सतत चालूंच राहिले पाहिजेत आणि जेव्हां सर्वांच्या प्रयत्नांची मनोवृत्ति एकच दिशा होईल तेव्हां जी गोष्ट सध्यां कठीण वाटत आहे तीच चांगली सुसाध्य वाटेल.

आमच्या मार्गांत विघ्नेंहि फार आहेत. त्यांचा एक मासला ध्यानांत धरण्या सारखा आहे. आमच्या प्रांतांत व्हिक्टोरिया स्मारक-फंडाची वर्गणी मोठी आहे. तिचा विनियोग औद्योगिक शिक्षणाकडे करावा असा मुख्य उद्देश आहे. स्थानिक सरकारची अनुकूलता मिळेल अशी मोठी आशा होती पण ती निष्फळ झाली. सरकारी आश्रय कांहींच मिळणार नाहीं असा रोकडा जबाब देण्यांत आला आहे. इतकेंच नाहीं तर या फंडाचा उपयोग कलकत्यास जो भव्य व रमणीय स्मारक-बंगला व्हावयाचा आहे त्याच्या खर्चाकडे होईल अशीही मोठी दहशत आहे. वर्गणीचा पैसा आमच्या प्रांतांतला खरा पण तिच्यावर लोकांची सत्ता फारशी नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. आमच्या लोकांची खरी स्थिती ह्मटली ह्मणजे परकीयांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची आहे. विचाराच्या अतीं असें वाटतें कीं जर आपण असेंच कांहीं काळ राहिलों तर आपली गुलामगिरी निकृष्टतेला पोंचेल.

राज्यकर्त्यांच्या चुक्या पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांची औद्योगिक उन्नती ह्मणजे आमची बुडगूक होय. हा विरोध जेथें जेथें येतो तेथें तेथें आपण विलायतवाल्यांशीं लढण्याला तयार असलें पाहिजे. ही लढाई अशी कीं स्वदेशीं व्यापारधंद्यापुढें त्यांचें कांहीं चालूं देतां कामा नये. अशी लढाई देण्याचें सामर्थ्य नाहीं ह्मणून आपण कूर्मवृत्ति स्वीकारली पाहिजे. आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत. स्वदेशी अन्नवस्त्रावरच आपण आपला दिवस ढकलला पाहिजे. अशाच वर्तनानें आपल्या अंगीं त्यागबुद्धि बाणेल व आपलेपणासाठीं किती जरी गोष्टी सोडाव्या लागल्या तरी आपण त्या आनंदानें सोडूं. जेव्हां परकीयांस असा बोध होईल कीं त्यांच्या वांचून आमचें सर्व कांहीं सुरळीत चालतें तेव्हांच ते आपणा विषयीं आदरभाव दाखवूं लागतील व आपलें पाऊल अधिकाधीक पुढें पडेल. वरील कूर्मवृत्ती आपल्या राष्ट्रानें अवश्य शिकली पाहिजे आणि तीच मनोभावना सर्वत्र जागृत होईल तर आमच्या भावी प्रगतीला चांगला जोर येईल.

---

## शेतकरी

आमच्या प्रांतांत शेतकरी शब्दानें सर्वच जनसमूह संबोधला जाण्यासारखा आहे. शेती शिवाय मोठासा कोणताच उद्योग येथें चालत नाहीं; आणि त्या कारणानें 'शेतकरी' वर्गाखालींच सर्व लोक मोडतात असें आह्मी ह्मटलें आहे. अशा शेतीच्या प्रांतांत जर लोक सुखी नसतील, ते दरिद्री असतील, दुष्काळामध्यें भराभर गिट्टी फोडण्याच्या सरकारी कामावर जमा होतील आणि दुष्काळाच्या अखेरीला पटापट मृत्युमुखीं पडतील तर त्यांची सांपत्तिक स्थिती अत्यंत शोचनीय आहे हें उघड होय. शेतीच्या मालाला किंमत पूर्वीपेक्षां चांगली येते. कापूस पुष्कळ पिकतो आणि प्रांतांतील जमीन चांगली सुपीक आहे तर रयत गरीब व दरिद्री असण्याचीं कारणें इतरत्र शोधलीं पाहिजेत. लोकांच्या अंगीं चाकर नाहीं व त्यांच्या जवळ नीटसा धान्यसंग्रहहि नाहीं. या दोन्ही गोष्टी सांगतात कीं शेतीचा धंदा जसा फायदेशीर व लाभकारक व्हावयाला पाहिजे तसा तो होत नाहीं. चार पांच वर्षांची सरासरी घेतली तर असें आढळेल कीं लोकांस शेतीचा धंदा किफायतवार होत नाहीं. तो धंदा करून शेतकरी जितका श्रीमान व सुखसंपन्न राहावा तितका तो राहत नाहीं. त्याच्या पाठीवर दारिद्र्याची मोट बांधलेलीच असते. जमीन सर्व सरकाराची आहे आणि सरकाराला आपली जमीन वहित करणारा शेतकरी इतका हतभागी असावा हें शोभत नाहीं. शेत-

कऱ्यांचा दैनी सरकार ओळखत नाहीं। असें मात्र नाहीं! शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठीं सरकारी प्रयत्न चालू आहेत. शेतकऱ्यासाठीं सहकारी मंडळ्या काढण्याचा संकल्प पूर्वीच ठरलेला आहे. शेतकऱ्यांनीं आपआपसांत सावकारी मांडल उभारावें असा सहकारी-मंडळ्यांचा उद्देश आहे. पंजाबांत शेतकऱ्याला जमीन विकतां येऊं नये असा कायदा केला आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं शेतीरूपी कामधेनू शेतकऱ्याच्या जवळून कोणी घेऊं नये. या गोष्टी सर्व चांगल्या आहेत पण सरकार आपल्या साऱ्याच्या द्वारानें रयतेची नागवणूक करिते याला कांहीं उपाय सरकार काढील तर बरें! शेतीच्या धंद्यांतली सर्व मलई साऱ्याच्या रकमेनें सरकारी खजिन्यांत जाते. धारा वाढविल्या पासून शेतकऱ्याला कांहीं ह्मणण्या सारखा फायदा राहत नाहीं. शेतकरी सुखी होण्याला सरकारानें आपला सारा कमी केला पाहिजे; पण हल्लीं तो कमी करण्याच्या ऐवजीं वाढविण्यांत आलेला आहे. ही गोष्ट सरकारी डायरेक्टर—जनरल सर ओकोनेर यांनीहि कबूल केली आहे. सर-रोमेशचंद्र दत्त यांनींही आपल्या नवीन ग्रंथांत हीच गोष्ट पुनः पुनः प्रतिपादित केलेली आहे. सरकारी सारा शेंकडा २५ किंवा ३० या प्रमाणानें कमी होईल तर शेतकऱ्याला खरोखरच मदत होईल. पण हा विचार सरकाराला पटणारा नाहीं. इतकेंच नाहीं तर दरसाल बजेटाच्या वेळीं इंडियन राष्ट्र श्रीमान व संपत्तिमान होत चाललें आहे असा शुष्कवाद चाललेला असतो. अशा वादानें खरा मुद्दा सुटतो आणि डोळस सरकारानें डोळे मिटोरे व अंधपणा पतकरावा असा प्रकार दृष्टीस पडतो.

## युद्धाची खबरबात

रुसो-जपानी युद्धासंबंधानें ह्या गेल्या १५ दिवसांत मनोरंजक अशी बातमी नाहीं, या वरून लढाई बरीच मंदावली असून पावसाळ्याचे चार महिने संपेपर्यंत लढाई विशेष तेजीवर येईल असें दिसत नाहीं. मुकडेन शहराजवळ दोन्ही सैन्यांचे तळ पडले आहेत. परंतु कोणीच आपण होऊन शत्रूच्या अंगावर चाल करून जाण्याचें धाडस करीत नाहीं. जपानी लोक आजपर्यंत शत्रूस हटवीत हटवीत पुढें पुढें एक एक पाऊल टाकीत होते, पण आतां जास्त पुढें जाऊन आपणांस धोक्यांत घालून घेण्याचा त्यांचा विचार नाहीं. पोर्टआरथरच्या वेढ्यासंबंधानें पाहतां असें दिसतें कीं, रशियन लोकांनीं ह्या किल्ल्याचें रक्षण मोठ्या शिताफीनें चालविलें आहे. जपानी लोक हा किल्ला लवकरच सर करितील असा जो पूर्वीचा अंदाजा होता तो बराच चुकला आहे. पोर्टआरथर अद्यापहि सर झालें नाहीं व तें काबीज करण्यास आणखी बराच कालावधी लागेल असा रंग दिसतो. व्लाडिव्होस्टाक येथील रशियन आरमारानें जपानच्या योको हामा शहराला नुकताच वेढा दिला आहे. या युक्तीनें पोर्टआरथरकडील जपानचा जोर साहजिकच कमी होईल. पण दुसरीकडे म्यांचुरिआमध्यें जपानी लोकांनीं रशियाशीं १४ तास लढून ताशिचिओ येथें रशियाचा मोठा पराभव केला, त्यांस मागें हटविलें आणि न्यूचांग हस्तगत केलें आहे. या लढाईच्या प्रसंगीं जपानी लोकांची जशी एकदिली दिसून येते त्याच्या उलट प्रकार रशिया संबंधानें आहे. रशियांत खुनी व बंडखोर लोक फार आहेत व ते रशियाच्या वाईटावर टपून बसले आहेत. या प्रमाणें रशियाच्या अंतर्व्यवस्थेंत बंडाळी आहे. शिवाय रशियानें दुसऱ्या राष्ट्रांचीं जहाजें अडवून त्यांचीं मनें दुखविलीं आहेत येणें प्रमाणें रशिया हा आज बऱ्याच थोरल्या संकटांत सांपडला आहे.

तिबेटकडे गेलेले इंग्रज लोक ल्हासाकडे दर कूच दर मजल करीत चालले आहेत. तिबेटी लोक शरण येऊन इंग्रज लोक ह्मणतात तसा तह करीत नाहींत व उलटे लढाईस उभे राहतात व इंग्रजास अडवितात ह्मणून इंग्रजांचा नाइलाज होऊन त्यांस वाटेंत लहानशा चकमकी झाडणें भाग पडत आहे. ईश्वर गरीब बिचाऱ्या तिबेटी लोकांस शरण जाण्याची लौकर सद्बुद्धि देवो!

जगाचा असा नियमच आहे कीं, निर्जीव अशक्त व गरीब अशांना सर्व लोक तुच्छ लेखतात. जोंपर्यंत दुसरा आपणांस मारील अशी खात्री आपणांस पटली नाहीं तोंपर्यंत आपण त्यांस मुळींच जुमानीत नाहीं. जपान आपणांस मारील असें आतां युरोपियन राष्ट्रांस वाटूं लागलें आहे. आशिआंतील लोकांची पादाक्रांती करण्याचा आपणा युरोपियनांस ईश्वरी हक्कच आहे अशी जी दोनशें वर्षांपासून झालेली त्यांची समजूत ती आतां दूरावली आहे. इतकीं वर्षें युरोपियन राष्ट्रांनीं आशिआंतील राष्ट्रांवर मनसोक्त वर्चस्व गाजविलें. युरोपियन राष्ट्रांपैकीं जीं महाबलवान राष्ट्रें आशियावर येऊन पडलीं तीं इंग्लड व रशिया हीं होत. यांनींच बहुतेक आशिआ आपल्या सत्ते खालीं सध्यां घातला आहे. परंतु जपानच्या विजयाच्या वार्ता कानीं पडतांच ही आपली मिराशीची सत्ता ढासळते कीं काय ह्मणून त्यास फार भीति पडली आहे. ही भीति वाटणें साहजिक आहे. कारण आशिआनें पुरातन काळीं युरोपियन राष्ट्रें जिंकिलीं होतीं. यूरोपपेक्षां आशिआ हा फार विस्तीर्ण देश असून याची लोकसंख्याहि मोठी आहे. येथेंच सुधारणेचा उदय झाला; येथेंच कलाकौशल्य शास्त्रें व धर्मनीति यांची प्रथम संस्थापना झाली; व याच खंडांत पूर्वी मोठमोठे शककर्ते, तत्ववेत्ते व शूर असे पुरुष निपजले. अशा खंडा । अनुकूल काल प्राप्त झाला असतां आपलें साम्राज्य सर्वत्र करण्यास त्यास फारसें जड जाणार नाहीं. शिवाय जपान हें राष्ट्र जमिनीवर तसेंच समुद्रावरहि बलिष्ठ आहे. आणि अशा राष्ट्राचा जय होणें ह्मणजे युरोपियन राष्ट्रांस एक महास्पर्धीच उत्पन्न होणें होय. जपानी लोकांच्याहि अंगीं इतरा प्रमाणेंच महत्वाकांक्षा भरली आहे. आणि "आशिआंतील लोकांकरितांच आशिआ" आहे ह्या एकाच मंत्रानें ते एकदम सर्व ठिकाणीं स्वातंत्र्यदीप उजळून देतील. आणि हीच भीति युरोपियन राष्ट्रांचीं अंतःकरणें जाळीत आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—पाऊस बिलकूल नाहीं ह्मणून मोठी काळजी पडली आहे. ढग वारंवार जमतात, वारा पश्चिमेकडील असून थंडसा असतो व इतर लक्षणेंही अनुकूल आहेत या वरून पाऊस लवकरच दोन चार दिवसांत पुनः पडूं लागेल असा अंदाजा आहे.

रोगराई—तेल्हाऱ्यास प्लेगाचा आजार सुरूं आहे. जळगांवाला व आकोल्याला या रोगाच्या उद्भवा विषयीं संशय येतो. गोरेगांवांत आणि कोठें कोठें पटकीचा रोग तुरळक आढळतो. एकंदरीनें सार्वजनिक आरोग्य फार डळमळीत आहे.

लेफ्टेनंट कर्नल वारन हेस्टींगस यांनीं गेल्या शुक्रवारा पासून तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली.

आणि त्यांच्या जागीं रा. रा. गाडवीन आस्टीन हे कामशनर होऊन उमरावतीच्या डिपुटी कमिशनरीच्या जागीं क्यप्टन मारिस हे रुजूं झाले.

रा. रा. शेख मुनीर तहशिलदार हे रजेवरून परत कामावर रुजूं होण्यासाठीं बदलीच्या जागीं ह्मणजे इलिचपूरास गेले.

रा. रा. कृष्णराव मल्हार पैठणकर डिपुटी इनस्पेक्टर, बुलढाणा यांस दोन महिन्यांची रजा मिळाली. आणि त्या रजेंत रा. रा. शंकर नारायण डांगे बी. ए. असिस्टंट शिक्षक, आकोला हायस्कूल यांची नेमणूक डिपुटी इनस्पेक्टरच्या जागीं झाली हें कळविण्यास आनंद वाटतो.

यंदा या प्रांतातील वकिलीची परीक्षा उमरावती येथें तारीख ५ सप्टेंबर रोजीं होणार असून त्या परीक्षेला बसण्याची परवानगी ४० उमेदवारांस देण्यांत आली आहे.

जेलचा कंट्राक्टर विठ्ठलदास भाटे याजवर सरकारी चोरीची नीळ मुंबईला विकावयास पाठविली असा आरोप आहे. त्या खटल्यांत गेल्या शनिवारीं सरकारी बारिस्टर राजश्री वाल्श आणि आरोपीचे वकील राजश्री खापर्डे यांनीं आपआपल्या बाजूचा उपसंहार करितांना चांगलीं सुरस भाषणें केलीं. येत्या शुक्रवारीं निकाल सांगण्यांत येईल. जेलाच्या मोठ्या प्रकरणांतील ही अल्पशी अभिशला होय.

तुरुंगांतील कागदपत्र जाळल्या संबंधाचा खटलाही शेवटाला येत चालला आहे. त्या नंतर सर्व पुरावा लक्ष्यांत घेऊन सेशन कोर्टीकडे हा खटला पाठवावा किंवा पाठवूं नये या विषयीं न्यायाधीश रा. रा. गोपाळ वामन बापट हे आपला अभिप्राय देतील.

हल्लीं रा. रा. बापट साहेब यांच्या कोर्टाकडे निंभोरा येथील शेतीच्या प्रकरणांत झालेल्या सदोष मनुष्यवधाचा खटला चौकशी साठीं देण्यांत आला आहे. १३ इसम आरोपी असून शुक्रवारापासून हा खटला चालूं आहे.

रा. रा. जी. मुन्नायलू नायडू एक्स्ट्रा असि. कमिशनर यवतमाळ यांस ५ वे आगस्ट. पासून सहा महिन्यांची रजा देण्यांत आली.

रा. रा. रतनजी आरदेसर तहशिलदार जळगांव यांस दोन महिन्यांची रजा मिळाली असून त्या रजेंत रा. रा. शेख महमद इशाक हे तहशिलदारीचें काम पाहतील.

मेजर माडवी साहेब डिपुटी कमिशनर हे बाळापुरास गेल्या शुक्रवारी गेले होते आणि तेथें टोल मारण्याच्या उपसाहित्यांची माहिती करून देण्याचा त्यांचा विचार होता.

पिंजराहून एक मेजक कळविते कीं येथें श्री [illegible] रंगाची यात्रा फार मोठी भरली होती हजारों [illegible] लोक पंढरपूर क्षेत्राप्रमाणें येथें जमले होते इतक्या समुदायाला उतरण्याची सोय नाहीं, [illegible] व्यवस्थाहि नीट नसतात, आणि त्यामुळें यात्रेकरूंस फार त्रास होतो. एक धर्मशाळा अवश्य पाहिजे. देवळाचा दरवाजा मोठा होईल तर दर्शनाची सोय चांगली होईल.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४= |
| सोनें २४।= | चांदी ७१॥ |
| ज्वारी ५२-५५ | कापूस ८६ |
| गहूं काठे ७६। | बनशी ९९ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १०॥ रु. मण |
| तेल | ४।= रु. मण. |

## नोटीस

रा० रा० त्रिंबक जयराम ब्राह्मण राहणार आकोला, मंगळवारा, यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, आह्मी आपणांस तारीख १४ आक्टोबर १८९९ सालीं कुलमुखत्यार नेमिलें होतें. त्या प्रमाणें आपण आजपर्यंत काम करीत होता. परंतु आतां यापुढें तुह्मी आमच्या दुकानाची चाकरी करूं इच्छित नाहीं त्याअर्थी आज तारखेपासून आपलें मुखत्यारपत्र या जाहीर लेखानें रद्द केलें आहे. या पुढें आमच्या संबंधीं आपण कांहींच व्यवहार करूं नये आणि आजपर्यंतच्या कामाचा हिशोब समजावून देऊन सर्व कागदपत्र आमच्या हवाली करावे. कळावें, तारीख ३१ जुलै सन १९०४ इसवी.

सही.

बिहारीलाल भगूलाल साहू
राहणार आकोला
दस्तुर खुद्द.

## जाहिरात.

या जाहीर लेखानें सर्व लोकांस कळविलें जातें कीं आज तारखेपासून रा. रा. त्र्यंबक जयराम ब्राह्मण राहणार आकोलें हे आमचे मुखत्यार नाहींत तर त्यांज बरोबर आमच्या दुकाना संबंधी कोणी देवघेव करील तर त्याची जोखीम ज्याची त्याच्यावर राहील. कळावें तारीख ३१ माहे जुलै १९०४ इसवी

सही

बिहारीलाल भगूलाल साहू राहणार
आकोला दस्तुर खुद्द

**काडी वांचून शिलगणारे सिगारेट**—एका आस्ट्रियनानें एक प्रकारचे सिगारेट तयार केले आहेत, ते कशावर तरी ओढलें कीं आगकाडी सारखे पेटतात. ही मोठी उत्तम सोय झाली.

**एकदम १६ मुलें**—बोहेमिया प्रांतांतील एका गांवीं एका चांभारणीस एकाच खेपेस १६ मुलें झालीं व पुन्हा दुसरे खेपेस ४ मुलें झालीं ! कोण विलक्षण गोष्ट ही !

**मनुष्यास निर्जरा करण्याचा प्रयत्न**—मनुष्य म्हातारा होतो त्याचें कारण एका प्रकारचे जंतू त्याच्या शरिरांत फार होऊन त्याची शक्ति हरण करितात. तर हे जंतू मारून मनुष्य कधींच म्हातारा होऊं नये असें औषध शोधून काढण्याचा प्रयत्न प्रोफेसर करीत आहेत. मनुष्य जरा रहित झाले तर बरें कां वाटेल ?

**खरें कारण** - दरिद्री प्रपंच; पोटासाठीं करावे लागणारे व्यवसाय; कर्जानें व्याप्त जिणें; लोकांची ताबेदारी; खुशामती स्वभाव; गप्पा ठोकण्याची प्रबळ लालसा, आणि धर्म व देव-लंडपणा इत्यादि कारणांपासून असल्या कडे माणसाची प्रवृत्ति होते.

**साहेबी टोपीवर अरिष्ट**—साहेबी टोप्या ह्या प्राचीन काळच्या शिरस्त्राणाच्या अवशिष्ट भागापैकीं असून त्या घातल्यानें केसांच्या वाढीस फार अडथळा होतो. घरांत किंवा कचेरींत तर त्या केव्हांही डोकीवर ठेवूं नयेत आणि बाहेर सुद्धां बराच पाऊस पडत असेल तेव्हां अथवा पुष्कळसें ऊन असेल तर मात्र लहानशी टोपी घालावी अशा प्रकारचें मत युरोपांत निघालें असून तिकडे पुष्कळांनीं आमच्या बंगाली बंधूचें अनुकरण चालविलें आहे. साहेब लोक व बंगाली बाबू हे असे उघड्या डोक्यानें राहतात तसें राहणें चांगलें काय ?

**भाविक कुत्रा**—पानगांवास गेनु नारकरी नांवाचा एक मिरच्यांचा व्यापारी असून त्याचा एक पिवळट रंगाचा कुत्रा आहे. तो तेथें पूर्वी सरदार पानशे यांनीं जें मुरलीधराचें सुंदर देवालय बांधलें आहे त्या देवालयांत दररोज पहाटेस काकडआरतीच्या प्रसंगीं मंडळीमध्यें बसून देवाच्या मूर्तीचें ध्यान करितो आणि मंडळी भजनास उभी राहिल्यापासून, त्यांचें भजन संपेपर्यंत आपल्या वाणीनें त्यांजबरोबर देवाचें भजन करितो. त्याचा हा नियम कधींही चुकत नाहीं असें तेथें हजर असणारे लोक सांगतात. एकादशीच्या रात्रीं तर हा कुत्रा अलोचन जाग्रण करितो असेंही म्हणतात.

**वाघाची शिकार करा**—भंडारा जिल्ह्यांत वाघांचा फारच उपद्रव झाला आहे. दयाळू सरकारांनीं हत्यारें हिसकावल्यामुळें चालून आलेल्या वाघास मान देणेंच भाग पडल्यामुळें पुष्कळ लोक वाघांस बळी पडत आहेत. तेथील कमिशनरसाहेबांनीं वाघ मारून आणील त्यास १५० रु. बक्षीस देण्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे असें म्हणतात; परंतु साहेबांनीं हत्यारांचे परवाने कांहीं अधिक सोडले आहेत काय ?

**नवी युक्ती**—वादळांत अगर धुक्यांत गलबतें एकमेकांवर आदळून फुटतात. तसें न व्हावें व दुरूनच गलबतांस बातमी पोंचावी अशी युक्ती निघाली आहे. या युक्तीच्या योगानें पाण्यांतून ध्वनिवाहक यंत्राच्या साह्यानें ४८ ते ६० मैल पर्यंत बातमी पोंचवितां येते.

**लक्ष्मी भांडार**— प्रसिद्ध देशाभिमानी व विदुषी बंगाली स्त्री कुमारी सरळादेवी घोसळ यांची त्रोटक माहिती आम्हीं पूर्वीच दिलेली आहे. आतां यांनीं नुकतेंच एक 'लक्ष्मीभांडार' नांवाचें मोठें दुकान काढून त्यांत त्यांनीं फक्त देशी वस्तू विक्रीस ठेविल्या आहेत; दुकानांत फक्त स्त्रियांनाच येण्याची परवानगी आहे. गरीब स्त्रियांनीं तयार केलेले कशिद्याचे वगैरे जिन्नस तेथें विक्रीस ठेवण्याचीही त्यांनीं सोय केली आहे. अशी ही लक्ष्मी भांडाराची टूम स्त्रियांनीं स्त्रियांसाठींच काढलेली पहिलीच होय.

**एका विंचवाचा प्रताप**—कानडाकडील एका मनुष्यास एका खळग्यांत पुष्कळ विंचू दिसले तेव्हां त्यानें त्याच्यावर एक दगड ठेविला. त्या वेळीं विंचवांनीं त्या दगडावर खूप जोरानें नांग्या मारल्या परंतु दगड मुळींच हालेना हें पाहून एका मोठ्या निळ्या विंचवानें आपल्या तोंडांतून कांहीं पाण्यासारखा पदार्थ त्या दगडावर टाकिला. आणि एक दोन थेंब पडल्याबरोबर तो दगड जळून भस्म झाला.

**जलदीचें पोष्ट**—पारिस व बर्लिन या दोन शहरांमध्यें ७०० मैलांचें अंतर आहे. पण या दोन शहरांमध्यें एक प्रकारची हवेची नळी ( Phenamatic tubes ) जोडलेली आहे, त्यामुळें त्यामधील टपाल फक्त ३५ मिनिटांमध्यें जाऊन पोचतें.

**निष्काळजी स्त्री**—कलकत्ता येथें कोणी स्त्री आपल्या लहान मुलास जवळ घेऊन पलंगावर निजली होती. झोपेंत लोळून मुलाचे अंगावर आल्यानें पोर दाबलें जाऊन मेलें. निष्काळजीचा हा भयंकर परिणाम सकाळीं जागी होईपर्यंत तिला समजला नाहीं. इकडील लहान लेकरांच्या आयांनीं ही गोष्ट आपले ध्यानांत ठेवावी.

**रौप्यतुला**—गेल्या २८ जून रोजीं जामनगरच्या राजानें आपली रौप्यतुला केली. महाराजांचें वजन साडेपांच मण भरलें. रुपये सुमारें ६,००० लागले असावेत इतके रुपयांचा आतां धर्म होईलच.

**तंतूचा गालिचा**— सुपारीच्या झाडाच्या तंतूपासून उत्तम गालीचा तयार करण्याचा नवीन शोध त्रिवेंद्रम येथील आर्ट स्कूलच्या सुपरिंटेंडेंट साहेबांनीं काढला आहे. या शोधाप्रमाणें त्यांनीं एक गालीचा तयार करून तो त्रिवेंद्रमच्या दिवाण साहेबांस पाहण्याकरितां पाठविला आहे.

**नष्टचर्य**— सध्या हैदाबाद संस्थानांत एकंदर तट सात असून एकमेकांचा पाडाव करण्यासाठीं त्यांचे भगीरथ प्रयत्न चालले आहेत. असा बोभाटा आहे. १ दक्षिणी मुसलमान, २ पारशी, ३ मद्रासी मुसलमान. ४ हिंदुस्थानी मुसलमान. ५ हैद्राबाद कांटिजेंटचे वंशज. ६ फिरस्ते हिंदुस्थानी मुसलमान. आणि ७ संस्थानची प्रजा. अशा सात तटांची कारस्थानें अगदीं जारीनें चालू आहेत ! हे निजामशाहीचें दुर्दैव होय !

**योग्य बक्षिस**—त्रावणकोरच्या माजी दिवाणसाहेबांनीं हुद्यावर असतांना संस्थानची कामगिरी योग्य प्रकारें बजाविली असल्यामुळें त्यांस त्रावणकोरच्या महाराज साहेबांनीं चोवीस हजार रुपये बक्षीस दिले आहेत. एखादा कोरडा किताब देण्याची सल्ला कोणी कशी दिली नाहीं कोणजाणे!

**शिक्षणाची जंगी तयारी** - मिरजमळा संस्थानचे अधिपती यांच्या अल्पवयस्क कुटुंबाचें शिक्षण राहणी वगैरे मे. पो. एजंट साहेब यांच्या देखरेखीखालीं व्हावी म्हणून त्यांस कोल्हापूर येथें एक बंगला घेऊन त्यांत आणून ठेवणार असें कळतें. या बाईसाहेबांचें वय अवघे नऊ वर्षांचें आहे. जवळ माहेरचे किंवा जिव्हाळ्याचें कोणी नाहीं. शिक्षण देण्याकरितां २५० रुपये पगाराची युरोपियन बाई आहे. शिवाय अलीकडे प्रो. कर्वे यांच्या अनाथ विधवा गृहांत शिकून तयार झालेली एक विधवा बाई त्यांस सांसारिक शिक्षण देण्याकरितां ३० रुपये दरमहावर नेमून किरकोळ पूजा वगैरे धार्मिक शिक्षण देण्यासाठीं ८ रुपये दरमहावर एक वृद्ध ब्राह्मण नेवणार असें म्हणतात.

**साक्षात्कार**—कलकत्त्याकडील हरिनव नांवाच्या गांवांतील एका वृद्ध ब्राह्मणाचे डोळे एकाएकीं गेले. तें पाहून त्याच्या भाविक साध्वी पत्नीनें तारकेश्वरीं जाऊन तेथें महादेवाची उपासना आरंभिली. तीन दिवस व रात्र एकसारखी उपोषित राहून ती त्या परमेश्वराचें अनन्यभावें आळवीत असतां तिला डोळा लागला व स्वप्नांत तिला त्रिशूलधारी ईश्वरानें दर्शन देऊन तिला सांगितलें कीं तीर्थोदक घेऊन तें तूं आपल्या पतीच्या डोळ्यास लाव म्हणजे त्याचे डोळे येतील. इतकें सांगून तो गुप्त झाला. पुढें तिनें दृष्टांत झाल्या प्रमाणें केलें व तिच्या पतीचे डोळे पहिल्या सारखे झाले. तेथील सर्व लोकांस त्या गोष्टीचा फारच विस्मय वाटला. या वरून ईश्वरासंबंधी ओळख नास्तिक लोकांस पटेल काय !

**राक्षसी अवतार**—सुंदरबन येथील रानांत एक राक्षसी मनुष्य मारण्यांत आला. त्याचे डोळे वाघाच्या डोळ्याप्रमाणें लाल भडक होते व याच्या नुसत्या डोक्याचें वजन दोन मण भरलें म्हणतात. खरोखर हा राक्षसीच मनुष्य म्हणावयाचा !

**दिर्घायु**—हरणपुर येथें फुलजन बीबी नांवाची एक वृद्ध स्त्री आहे. तिचें वय १४५ वर्षांचें आहे. तिची प्रकृति बरी आहे. व ती अजून बरींच वर्षें वांचेल. गाराडोबा येथें असालत मंडल नांवाचा एक मुसलमान गृहस्थ आहे. त्याची एक बायको वारली तेव्हां त्याचें वय १३७ वर्षांचें होतें. पुनः आणखी लग्न करण्याचा त्या बहादराचा इरादा आहे.

**जंटलमेन कुत्रे**—पारीस वगैरे कांहीं मंडळींनीं कुत्र्यांस सभ्य रीतिभाती शिकविण्याची एक शाळा काढली आहे. या शाळेंत कोणी पाहुणा आल्यास, उडी मारून, शेंपूट हालवून व गुरगुरून त्याचा आदर सत्कार करण्यास कुत्र्यांस शिकविण्यांत येतें. जेव्हां शाळेंत आलेला पाहुणा परत जाऊं लागतो तेव्हां एक कुत्रा त्यास पोंचविण्याकरितां शाळेच्या दारापर्यंत येतो व तेथें आपलें डोकें जमिनीपर्यंत लववून त्यास आदबीनें रजा देतो त्याचप्रमाणें कोणाचा हातरुमाल, पंखा, पुस्तक वगैरे गळून पडल्यास ते उचलून मालकाच्या स्वाधीन करण्यास कुत्र्यांस शिकविलेलें असतें. या शिवाय आपल्या धनिणीबरोबर जातांना थाटानें पावलें टाकीत चालण्यास त्यास शिकविलें जातें.

**गाणारे किडे**—जपानामधील अनेक चमत्कारांपैकीं एक असा चमत्कार आहे कीं तेथें एक प्रकारचे गाणारे किडे सांपडतात. यां पैकीं 'सुमुसुशी' यानांवाचे जे किडे आहेत ते रुपेरी घंटेप्रमाणें अत्यंत मधुर व नाजूक असा आवाज काढितात.

रशियन लष्करी ऑफिसरांना उर्दू भाषा शिकविण्यासाठीं रशियन सरकारानें ताशकंद येथें एक शाळा काढली असून भोपाळांतील 'अल रिआज' नांवाच्या उर्दू पत्राच्या संपदकाचा भाऊ खलील उद्दीन यांस तेथें शिक्षक नेमलें आहे.

जर्मनी इतकीं वर्तमानपत्रें कोठेंही नाहींत. तेथें ही संख्या ५५०० असून त्यांपैकीं ८०० दैनिक आहेत. इंग्लंडांत ३ हजार व फ्रान्सांत २८०० असून त्यांपैकीं इंग्लंडांत दैनिक ८०९, आहेत; व फ्रान्सांत दैनिक, द्विसाप्ताहिक व त्रिसाप्ताहिक अशी ४०० आहेत.


**नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.**

आम्ही येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां ताबडतोब चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनंताचा दलाल
कंपॉझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

## नोटीस

जनरल कमिटी ठराव नंबर ३ तारीख ४ जुलै सन १९०४ वरून खालील नियम करण्यांत आला आहे. तो असा:—

' म्युनिसिपाल कमिटीच्या हद्दींतील कोणत्याही विहिरीवर, कोणीही पहारे त्यानें आंघोळ करूं नये, कपडे धुवूं नयेत, अथवा विहिरीचें पाणी काढून नेऊं नये. तसेंच नदीचे दोन्ही अतिकडचे मध्यें कोठेंही वरील गोष्टी कोणी करूं नयेत.'

सदरहू नियमा विरुद्ध वागणेबद्दल कोणास कांही कारण असल्यास त्यांनीं त्या बद्दल २० आगष्ट १९०४ चे आंत खालीं सही करणार कडे लेखी लिहून कळवावें. कळावें. तारीख २६।७।१९०४ इ०

W. L. Chiplonkar

सेक्रेटरी.

म्युनिसिपल कमिटी आकोला

---

## नोटीस.

मे. सयद गफूर, सयद गव्हर, सयद निजामी व सयद दुगानी वल्द मीर समन सर्वत्र राहणार हिवरखेड रूपराव तालुका आकोट यांस:—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मी शेख इमाम वल्द शेख चांद राहणार हिवरखेड यांजपासून सुमारें एक वर्ष झालें घर विकत घेतलें त्या घराचे आवाराची भिंत मी बांधत असतां त्या भिंतीशीं तुमचा कांहींच संबंध नसतां ती तुम्ही बांधू देत नाहीं. मी दोन तीन वेळां बांधण्यास सुरवात केली असतां तुम्ही दंडेफसादीवर येतां. कारण विचारलें असतां " आम्ही बांधू देत नाहीं " इतकेंच बोलतां तर तुमचा व या घराचा कांहीं संबंध असल्यास तो कोर्ट मार्फत शाबीत करावा. अगर मला लेखी जबाब द्यावा. मी तोंडी तक्रार ऐकणार नाहीं. नोटीस पावतांच आठ दिवसांत अंमल न केल्यास मी तुमची कोणतेंच प्रकारची तक्रार ऐकणार नाहीं. व मला भिंत बांधण्यास अडथळा केल्यास तुम्हांवर फौजदारींत फिर्याद करीन. या नोटिशीच्या खर्ची सुद्धा सर्व प्रकारची नुकसानी तुमचे पासून भरून घेतली जाईल. कळावें. तारीख २६।७।०४ इ.

सही

सयद आशकर वल्द मीर कादूर राहणार हिवरखेड रूपराव नि. खुद्द हातची

---

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमचा व्यापार कमी करणें व आपल्या नांवाचा माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं बेयान सुरू केल्या त्यापैकीं झीनाभाई वेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यानीं आमच्या नांवाचा खोटी लेबलें लाविलेल्या मालावर लावून आपले नांवानें माल विक्री करून बरेच दिवस आपला उदरनिर्वाह केला. परंतु आम्ही त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वी मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. या कामांत त्याला कैद व दंड याप्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हा तसेंच खोटें काम गेल्या कार्तिक महिन्यापासून सुरूं करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हां आम्ही मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यांत त्यास तारीख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्तमजूरी व २०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरी अशीं खोटीं कामें करून माल विक्री करणारांनीं व आपल्या नांवाचा खोटा माल घेणारांनीं सावध रहावें. तरी आमचे नांवाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ घेणारे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलया द० खु०

सही— गुंडाप्पा नरसाप्पा दस्तुर येलप्पा नरसप्पा

शुक्रवारपेठ कामाठ पुरा,—पुणे सिटी.

---

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे आमच्या कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेवलनें माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या लौकीका अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा

ठिकाणा— कॉटन मार्केट समोर कच्ची बाजार, आकोला.

---

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा ! वाचा ! !

एम्. एम्. ॲंड सन्स

फोटोग्राफर रबर स्टांप मेकर वॉचरीपेर आणि स्टेशनरी मर्चंट आकोला [वऱ्हाड]

आज पर्यंत कोणत्याही कंपनीनीं इमीटेशन गसकोप अथवा याचा याचा थोड्या किंमतींत विकली नसेल ती आम्ही रुपये ६ मध्यें ग्यारंटी वर्षे ६ ची देतो आहे. तर खरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, क्यान, पेटी आणि याचे बरोबर घड्याळें घेणाराचे नांवाचे रबरी पेनपेनसील स्टांप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारास व्ही. पी. खर्च माफ. व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतले तर पुनः १० वर्षे पर्यंत घ्याव्यास नको. आणि दुसरे हर एक जातीचें घड्याळ किंवा हर एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरानें व सचोटीनें खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप नांवाचे हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचे टिकीट पाठवावें म्हणजे नमुना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आम्हांस बोलवावें. म्हणजे आम्ही येऊं. आणि २५ रुपया पैसा जास्त माल घेणारास दर रुपयास ८॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय कांहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें म्हणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें म्हणजे समजेल. आणि कोणास बायसिकलवर बसायाला शिकणें असेल त्यानी यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल. रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कांहींशा भरपूर मिळेल या सर्व कामाची व सामानाची मागणी करावी म्हणजे खात्री होईल.

एम्. एम्. ॲंड सन्स आकोला.

---

### श्रीनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खऱ्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याने आरोग्यार्थ जाणख्यी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

### गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नमेह व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरुज, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व अन्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटे मिळाली व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ४६ आणि पडेल. अनुपान सर्वी सोबत गोळीनें किंवा व्ही. पी. नें खालील दरावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| १३१ गों० | १ रु० | ७६ गों० | २ रु० |
| २२१ गों० | ३ रु० | १६१ गों० | ४ रु० |
| ७१ गों० | ६ रु० | ५१० गों० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोकीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—— अलिकडे २।३ वर्षे आमचे वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब नक्कल करून ते ग्राहकाचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, त्यांत खरी शास्त्रोक्त औषधें घेणे असेल त्यांनीं आमचीच औषधें खालील पत्तेवर बिनचूक सही त्रयादरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी

## आर्यौषधालय

आमच्या औषधालयांत ( दवाखान्यांत ) नाडी परीक्षा वगैरे अष्टविध परीक्षेनें रोगाचें निदान करून औषध योजना केली जाते. बाहेर गांवच्या रोग्यांनीं खुलासेवार प्रकृतिमान कळविल्यास त्यावरूनही अनुभवशीर गुणकारक औषधें पाठवूं. सर्व रोगांवर खात्रीचीं औषधें तयार आहेत; त्यां पैकीं मुख्य खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सार्सापरिला— रक्तशुद्धि करणाऱ्या देशी व विलायती वनस्पतीं पासून हें औषध तयार केलेलें आहे. गरमी ( उपदंश ) पासून सर्वांगावर पुरळ उठणें किंवा काळे डाग पडणें, पारे रसायन अंगावर फुटणें किंवा त्यापासून सांधे दुखणें, सुजणें यावर हें अगदीं खात्रीचें औषध आहे. गरमी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणानें रक्त बिघडणें, कोरडी खरूज, पंडू, पुरळ, गळवाऱ्या वगैरे गाठीं सुजणें, संधिवात, ( सांधे दुखणें व सुजणें ) शरीराचा कोणताहि भाग दुखणें व जुना खोकला, गंडमाळा यांवरही ह्याचा उत्तम उपयोग होतो. कि० लहान बाटली १। रु. मोठी बाटली २॥ रु. पास्टेज अनुक्रमें ।= व ॥·

धातुवर्धकगुटि—कामोद्दीपक गोळ्यांपेक्षां ह्या गुटिका गुणांनीं फारच श्रेष्ठ आहेत; कारण कामोद्दीपक गोळ्यांनीं सप्त धातु न वाढतां विषय वासना मात्र वाढते; व त्यामुळें धातुचा फाजील व्यय होऊन त्या पासून धातु क्षीणता, धातुपातळ होणें वगैरे वाईट परिणाम होतात तसे ह्या गुटिकांनीं न होता सप्त धातु वाढून कामोद्दीपन ( विषयवासना ) होते. कोणत्याहि कारणानें आलेलें नपुंसकत्व, अशक्तता, लवकर धातुपात होणें, झोपेंत धातुपात होणें वगैरे सर्व विकारांवर फारच उपयोगी कि० २५ गोळ्यांस १ रु.

गरमी ( उपदंश ) वर गोळ्या—चट्टे, सुज, वद, पुरळ वगैरे सर्व विकार कितीही दिवसांचे असले तरी ह्या गोळ्यांनीं खात्रीनें बरे होतात. ह्यांत अपायकारक रसायनी औषध बिलकूल नाहीं. पथ्य विशेष नाहीं कि० ३० गो. रु. २

परम्यावर औषध— लघवीची जळजळ, तिडीक इ० २४ तासांत बरें होतात. कि० रु. १॥

चाळीत रोगावर औषध— हें अनुभवशीर खात्रीचें औषध आहे. कि० ३० गो. रु. ५

बालामृत— संग्रहणी, पंडु, अशक्तता, खोकला इ० विकारांवर मुलांना फार उपयोगी. कि० दर बा. ·॥·

हिवताप व पानथरी यांवर औषधें—प्रत्येक औषधास कि० १ रु.

भस्में, मात्रा, पाक, आसव वगैरे सर्व शास्त्रोक्त औषधें तयार आहेत त्यां पैकीं मुख्यः—

| | |
|---|---|
| अभ्रक भस्म– क्षय, खोकला, इ० | कि० दर तो. रु. १५ |
| लोहभस्म ( शतपुटी ) पंडु, अशक्तता इ० | ,, ,, रु. ३ |
| मधुमंडूर– वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| प्रवाळ भस्म नं. २ जीर्णज्वर, धातुविकार इ० | ,, ,, रु. १ |
| प्रवाळ भस्म नं० १ वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| सूत शेखर– पित्तविकार, भोंवळ इ० | ,, ,, रु. ४ |
| खोकल्यावर गोळ्या–खोकला दमा | ,, ,, ·॥· |
| सुवर्णमाक्षिक–धातुविकार जीर्णज्वर इ० | ,, ,, रु. २ |
| मंडूर भस्म–पंडु, संग्रहणी इ० | ,, ,, रु. १ |
| हेमगर्भ मात्रा– वात कफ इ० | ,, ,, रु. १८ |
| चंद्रप्रभा– मेह, मुरलेली गरमी इ० | ,, ,, रु. १॥ |
| सु० मा० वसंत–जीर्णज्वर, अग्निमांद्य इ० | ,, ,, रु. ६ |
| महायोगराज गुग्गुळ– सर्व वात विकार | ,, ,, रु. २ |
| रेचक गोळ्या ( जुलाब होण्यास ) | ३२ गो० रु. १ |

औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. पांच रुपयांवर घेणारांस कमिशन. खुलासा पत्रद्वारें.

वैद्य वासुदेव शास्त्री गोडबोले
खामगांव ( वऱ्हाड )

# ORIENLTAL
**GOVERNMENT SECURITY**
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED.
Established 1874,
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

## TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

**IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some future period, may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*

### मुंबई बॅंकचीं सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेवितां येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवितां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मागताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिलक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिलक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

### जाहिरात

#### स्टोअर सप्लायर्स

आह्मी गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी रोड
मुंबई.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. N.4

बाहेरगांवी टपालहांशिलसह ........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ५० १
दर ओळीस.........८१ ०६
दुसरे खेपेस.... .........८१

Mofussil ... ... ... 2 ( With postag
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 8 AUGUST 1904 NO 31

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ८ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३१

### नाग, नरसे,-पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

### नोटीस

किसन वल्लद रामजी अखरे जात कुणबी राहणार कुंभारी ता० आकोले यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तूं चोरी केली ह्मणून तुजला सरकारांनीं सन १८९९ सालांत शिक्षा दिली. तुजला शिक्षा झाल्यामुळें मजला कोणी वागविणार नाहीं ह्मणून मजला तुझा भाऊ नामें सिताराम यानें आकोल्यांत दुष्काळांत आणून सोडून दिल्यामुळें मी बाबुळगांव तालुके बाळापूर येथें माझा मावस भाऊ याचे घराशेजारी दुसरे घर घेऊन राहिले त्यास अजमास ४।५ वर्षें झालीं. या चार पाच वर्षांत तुझे बापानें अगर तू माझेकडे मजला नेण्यास कोणीच पाठविलें नाहीं अजमास १२ महिन्याचे अगोदर तुझा बाप मजला नेण्यास आला असता मी त्यामला खावटीचे बद्दल कोणाचे कर्ज काढलेले रुपये २५० मागितले आणि मग मी तुमचे घरीं येते ह्मणून सांगितले, तर तुझे बापानें मजला जबाब दिला कीं मी रुपये आज देत नाहीं आणि तुजलाही नेत नाहीं. तर या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत वर मी काढलेले खावटीचे कर्ज रुपये २५० देऊन मजला घेऊन जावे या प्रमाणें न केल्यास तुझेवर दिवाणींत फिर्याद करून पैसा कोर्टखर्चा समेत भरून घेतला जाईल. आणि लग्नाचा व्यवहार तोडला जाईल ह्मणून ही नोटीस दिली असे. कळावें तारीख ३।८।०४ इसवी.

सही
पुंजी मर्द किसन कुणबी अखरे
गायगांव तालुके बाळापूर
निशानी खुद्द हातची बांगडी

### नोटीस

रा. रा. गंगासिंग सितलसिंग परदेशी कनोजीया ब्राह्मण राहणार चंडकापूर प्रगणें अडगांव तालुके आकोट यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मी तारीख १७ माहे एप्रिल सन १९०२ इसवी रोजीं तुह्मास कुलमुकत्यारपत्र रजीष्टर करून मुकत्यार नेमले होते मुकत्यारपत्र दिल्यापासून आज पावेतों तुह्मी जीं कामें केलीं त्या कामा पैकीं कांहीं कांहीं कामें माझे परवानगी शिवाय तुह्मी माझे इच्छे विरुद्ध केलीं ह्मणून मी नाराज होऊन मी आज तारखेपासून तुह्मास दिलेले कुलमुकत्यारपत्र रद्द केले आहे. तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसाचे आंत तारीख १७ माहे एप्रिल सन १९०२ इसवीपासून आज पावेतों तुह्मी ज्या ज्या रकमा माझे जवळून नेल्या व दुसरे सावकारापासून रकमा आणिल्या असतील त्याचा हिशेब तपसीलवार द्यावा व त्याच प्रमाणें माझे देणेघेणे संबंधानें जें कांहीं कागदपत्र नकला तुमचे पाशी असतील त्या सर्व आणून माझे स्वाधीन कराव्या व माझे सहीची पावती घ्यावी. ह्या प्रमाणें न केल्यास तुमच्याबद्दल मजला निराळी व्यवस्था करावी लागेल. हापुढें तुह्मी माझे नावाचा कोणताही व्यवहार पैशासंबंधीं करूं नये. केल्यास मी त्याजबद्दल जबाबदार मुळींच राहणार नाहीं. ही नोटीस दिली सही तारीख १-८-१९०४ इसवी०

सही
लक्ष्मीबाई जवजे सुरेभान लोखंडे
पाटील निशानी खुद्द.

### जाहिरात.

या जाहिरातीनें आकोट तालुक्यांतील आणि आकोले जिल्ह्यांतील व दुसरे इलाख्यांतील शेट सावकार लोकांस कळविण्यांत येते कीं माझा कुलमुकत्यार गंगासिंग सितलसिंग याचे मुकत्यारपत्र आज तारीख १।८।१९०४ इसवी पासून रद्द केले आहे. तर हापुढें त्यास माझे नावानें कोणी पैसा कर्जाऊ, माझे नावाचा लेख करून घेऊन, देऊ नये. दिल्यास तो बातल समजला जाईल. ह्मणून ही जाहिरात दिली. तारीख १।८।१९०४ इसवी०

सही
लक्ष्मीबाई जवजे सुरेभान लोखंडे
पाटील निशानी खुद्द.

### जाहिरात

या जाहीर लेखानें तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, मौजे बोरी ता० खामगांव येथील गढीवरील जागा ( १२ खांबी धाबें व अंगण ).

चतुःसीमा— पूर्वेस— हनुमता वल्लद केशव पाटील याचें धाबें.
दक्षिणेस— गढी.
पश्चिमेस—पांडू जानजी व एदू रायभान यांचीं घरें.
उत्तरेस—रस्ता.

ही जागा आह्मी आपली बहीण चिमाबाई जवजे कुकाजी हल्लीं वस्ती नायगांव हिजला काळाचे वेळीं राहण्यास दिली होती. ती ५।६ महिन्या पासून ती जागा सोडून नायगांवीं गेली आहे. तिजपासून अगर दुसरे कोणापासून वरील जागा कोणी खरेदी, गहाण अगर बक्षीस घेऊ नये. ती जागा आमच्या मालकीची आहे. या उपर कोणी घेतल्यास त्याची जोखीमदारी ज्याची त्याजवर राहील. कळावें. तारीख ५।८।०४ इसवी.

सहीची निशाणी.
मारुती वल्लद देवाजी पाटील राहणार बोरी ता. खामगांव याचे
हातची रेघ—

### नोटीस

बेशमी चिमाबाई मर्द कुकाजी पाटील हल्लीं वस्ती नायगांव ता. मेहेकर पोस्ट—घाटबोरी.
हीसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, पहिल्या काळाचे वेळीं तुह्मी माझ्या येथें ह्मणजे बोरी गांवीं माझ्या घरीं राहण्यास आला. तुह्मी माझ्या चुलत बहीण असल्या कारणानें लोभामुळें मी त्या वेळीं तुह्मांस माझी गढीवरची जागा राहण्यास दिली. तुह्मी तेव्हां पासून ७-८ वर्षें तेथेंच राहिला. आतां सुमारें ६ महिने झाले तुह्मी परत नायगांवीं राहण्यास गेला. जातेवेळीं माझी जागा खालीं करून देण्याची ती तशीच राहिली. दोन चार वेळां तुह्मांस ह्मटलें कीं, कुलूप उघडून जागा ताब्यांत द्या. तुह्मी देतो देतो असें ह्मणून चालविलें त्या सबब ही नोटीस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पोंचले पासून ८ दिवसांत जागा आमच्या ताब्यांत द्यावी. नाहींतर आह्मांस योग्य कायदेशीर तजवीज करावी लागेल. व सर्व खर्चेंच व घराची पडझड वगैरे नुकसानी तुह्मांपासून घेतली जाईल. ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावें. तारिख ६ माहे आगस्ट १९०४ इ०

सहीची निशाणी
मारुती वल्लद देवाजी पाटील
राहणार बोरी, ता. व पोस्ट
खामगांव यांचे हातची
रेघ—

### प्रपंच थाटाच्या खालील पायऱ्या चढा.

१ कोणतातरी एक पोटाचा उद्योग चांगला शिका.

२ एकाच उद्योगाला चिकटून रहा; घटकेंत हा, घटकेंत तो, असें करूं नका.

३ कामांत त्वरा ठेवा, पण धांदल करूं नका.

४ कोणतेहि काम शिस्तीनें व काळजीपूर्वक करा.

५ जें काम हातीं घेण्यालायक आहे, तें चांगल्या रीतीनें पार पाडण्यालायक आहे ह्मणून समजा.

६ आज हातीं आलेली अर्धी भाकर उद्यां मिळणाऱ्या संबंध भाकरी इतकी आहे, अशी खात्री ठेवून संतुष्ट रहा.

७ स्वतावर अवलंबून रहा. करूं कीं नको, ह्मणून ज्याला त्याला विचारित सुटूं नका.

८ कोणत्याहि कामांत ठरविलेली वेळ चुकूं देऊं नका,

९ आळस सोडा, प्रत्येक क्षण विचारांत किंवा कृतींत यांपैकीं कोणत्यातरी खात्यांत हिशोबीं पडला पाहिजे.

१० सर्वांविषयीं उदार बुद्धि ठेवा. कुत्सितपणा टाका. प्रपंचमार्गांत नुसत्या पडलेल्या नवशिक्यांनां करवेल तेवढी मदत करा.

११ एकदम श्रीमंत होण्याची बुद्धि धरूं नका. हळूहळू पण भक्कम जें काम होतें तें कायमचें होतें. शिडीवर चढणारांनीं अगदीं खालच्या पायरीपासून क्रमाक्रमानें वर गेलें पाहिजे. तसें न करतां एखादा कांहीं पायऱ्या ओलांडून जाऊं लागला, तर एखादे वेळीं तो घसरून पडण्याचा संभव असतो. हेंच उदाहरण प्रपंचांतल्या किरकोळ गोष्टीस लावून पहात असावें.

१२ आज जे मोठ्या पदाला चढलेले दिसतात. ते एका काळीं खालच्या पायरीवर होते, हें नेहमीं ध्यानांत धरा.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १२ शके १८२६

## फयाक्टरी

वऱ्हाड आणि मध्यप्रांत मिळून १९०३ च्या अखेरीला ३९१ फयाक्टरी होत्या; त्या पैकीं आमच्या प्रांतांतच २५९ फयाक्टरी असून सर्व मध्यप्रांत मिळून एकंदर १३२ फयाक्टरी आहेत. या फयाक्टऱ्यांची वर्गवारी त्यांत चालू असलेल्या निरनिराळ्या कार्यांच्या दृष्टीनें केली तर असें आढळेल कीं बहुतेक सर्व संख्या कापूस वटण्याच्या व गठे दाबण्याच्या कारखान्यांची आहे. मध्य प्रांतांत असे ११६ कारखाने असून वऱ्हाडांत २५९ कारखाने आहेत. मध्यप्रांतांतील वर्धा नागपूर व नेमाड याच भागांत कापूस पिकतो ह्मणून तेथेंच काय ते असे कारखाने आहेत. आमच्या प्रांतांत सर्वत्र कापूस होतो आणि तो विपूल पिकतो ह्मणून या लहानशा भागांतच फयाक्टरींची गर्दी झाली आहे. गेल्या तीन वर्षांतच हे कारखाने किती वाढले आहेत हें पाहिलें ह्मणजे लक्ष्यांत येईल कीं, फयाक्टरी उभारण्याचें जणूं कांहीं वेडच या प्रांतांत फार माजलें आहे. १९०१ सालीं १०१ फयाक्टरी होत्या त्या १९०२ सालीं २०५ झाल्या आणि १९०३ च्या अखेरीला हीच संख्या नवीन ५० फयाक्टऱ्यांनीं वाढली आहे. या धंद्यांत लोकांस फायदा दिसतो आणि ह्मणूनच लोक फयाक्टरी नवीन नवीन घालण्यांत आपलीं भांडवलें गुंतवितात हें उघड आहे. पण ही वाढ व वरचढ इतकीं शिखराला पोचली आहे कीं जर सर्व फयाक्टरीवाल्यांची एक जूट राहिली नाहीं तर सर्वच कारखानदार नुकसानींत येतात. कधीं कधीं असाही अनुभव येतो कीं हे इतके पुष्कळ कारखाने चार सहा महिने चालण्या इतका कापूस देखील सर्व प्रांतांत पिकत नाहीं.

वरील प्रकारच्या कारखान्याशिवाय बरोडा येथें कौलें व विटा तयार करण्याचा एक सरकारि कारखाना आहे आणि नर्सेच तेथें कोळशाच्या खाणीचा मोठा टोलजंग कारखाना आहे. देशी दारू तयार करण्याच्या दोन तीन सरकारी भट्ट्या आहेत. या खेरीज नागपूर, वर्धा, जबलपूर, बडनेरा व आकोला मिळून सुताच्या व कपड्याच्या या ८ गिरण्या चालू आहेत. एखादा आटा पिसण्याचा, कोठें तेलवाण्याचा इत्यादि किरकोळ फयाक्टरीहि आहेत. परंतु विस्तारा च्या मानानें त्यांच्या नामनिर्देशा पलिकडे त्यांचें महत्त्व नाहीं.

मध्यप्रांतांतील फ्याक्टरी मधून सुमारें २२ हजार लोकांस रोजगार मिळतो आणि वऱ्हाडांत अदमासें २०।२१ हजार लोकांची रोजी फ्याक्टरींतील कामावर चालते. हीं कामें बारमाहीचीं नसतात आणि या कामांच्या हंगमांत मात्र मजुरांचे रोज देखील दिढीनें व दुप्पटीनें वाढतात असा दरसालचा अनुभव आहे. कापसाच्या कारखान्यांत जे लोक काम करीत असतात त्यांच्या शरीर प्रकृती संबंधानें कांहीं गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. कारखान्यांतील मजुरदार लोक अल्प वयांत मृत्युमुखीं पडतात. कारखान्यांतील हवा फार दूषित होत असते. तेथील कापसाचा धुराडा नाकातोंडातून शिरतो आणि नेहमीं फुप्फुसाला नानाविध विकार जडतात. कांहीं डाक्टरांचा असाही अभिप्राय पडतो कीं, कारखान्यांतील मजुरांची संतती खुजी व अल्पायुषी होते आणि स्त्रिया रात्रींच्या रात्रीं कारखान्यांत कामें करून अधीक ह्मातान्या, तेजहीन व संसाराच्या कार्याला अपात्र अशा होतात. शेतांत कामधंदा करणाऱ्या लोकांच्या शरीराकडे पाहिलें असतां वरील ह्मणण्याची सत्यता आपोआप लक्ष्यांत येण्यासारखी आहे. फ्याक्टरींतून शुद्ध हवेचा पुरवठा चांगला मुबलक व्हावा ह्मणून कांहीं विशेष योजना करण्याचा काल आला आहे असें आह्मांस वाटतें. फ्याक्टरींतील मजुरांच्या आरोग्या संबंधानें अधीक गोष्टी करण्यांत आल्या पाहिजेत. प्रस्तुतच्या कामधंद्यानें आमच्या मजुरदार मंडळींचा शारीरिक ऱ्हास होत असतो तो फार घातुक आहे आणि त्या गोष्टीचा प्रतिकार वेळेवरच होईल तर फार चांगलें.

---

वऱ्हाड व मध्यप्रांत यांचा पुष्कळसा सुपीक भाग मिळून एकत्र घेतला तर असें आढळून येईल कीं, यांत्रिक कारखान्यांस नैसर्गिक उपसाहित्यें पुष्कळ अनुकूल आहेत. कैलासवासी टाटा यांच्या मनांतून कांहीं खनिज द्रव्यासंबंधानें इकडे कारखाने घालावयाचे होते पण त्यांचा तो हेतु फळास आला नाहीं हें फार वाईट झालें. ज्या बाबदींत कारखाने पाहिजेत, ज्या उद्योगामध्यें लोकांचीं भांडवलें खेळावयाला पाहिजेत व ज्या यांत्रिक ज्ञानाचें पाऊल पुढें पाहिजे त्या सर्व प्रकरणांत आमच्या प्रांतांतच काय पण सर्व देशांत अगदीं अंधार आहे ह्मटलें तरी चालेल. आमचा देश पुढें सरसावण्याला लोकांची प्रवृत्ती शास्त्रीय शोध व नवे उद्योगधंदे यांच्या कडे वळली पाहिजे. या प्रांतांतच केवढी तरी विस्तृत कार्यभूमी उपलब्ध आहे! पण तेथें उद्योगवृक्ष लावणारे कोणी-तरी थोर कल्पक पुरुष निर्माण होतील तर त्यांचीं अमृतफळें इंडियन लोकांस भविष्यकाळा तरी लाभण्याची आशा आहे. प्रस्तुत स्थिती मात्र या बाजूनें अगदीं असमाधानकारक आहे हें विसरतां कामा नये.

---

## मनाचा निर्धार

राष्ट्रीय सभे संबंधानें मुंबईस चांगली चळवळ सुरू आहे. चालू सालच्या बैठकीची पूर्व सिद्धता आतां पासूनच चालविली आहे. या सभेचें जें दुसरें मुख्यांग ह्मणजे प्रदर्शन त्याच्या संबंधानें देखील पुष्कळशा योजना मुंबईच्या व्यवस्थापक-मंडळींनीं हातीं घेतल्या आहेत. यंदाच्या सालीं अध्यक्षस्थानाचा बहुमान सर हेनरी कॉटन यांस द्यावा असा सर्वांचा संकेत झालेला आहे. सर कॉटन साहेब हे इंडियाचे मोठे पुरस्कर्ते आहेत तेव्हां त्यांच्या सारख्या वजनदार पेनशनदारास अध्यक्षस्थानीं विभूषित करण्यापासून आपल्या इष्ट कार्याला मोठा जोर येईल हें उघड आहे.

राष्ट्रीय सभा काय आणि औद्योगिक सभा काय त्या सर्वांच्या बुडाशीं आपली निस्सीम भक्ती पाहिजे. ज्याला त्याला असें वाटलें पाहिजे कीं मी आपल्या परीनें या संस्थेचा कार्यभाग अंशतः तरी मोठ्या मनोभावानें उचलीनच उचलीन. गेल्या सोमवारीं कलकत्यास जी औद्योगिक मंडळीची टोलेजंग सभा भरली होती त्यांत नामदार न्यायमूर्ती स्टिफन्स यांनीं तरी हाच बोध केला कीं, जर चुक्या होणार नाहींत, संकटें येणार नाहींत, आणि आपल्या इष्ट कार्याला प्रत्यवाय उत्पन्न होणार नाहींत तर आपलें कार्य चांगलेंसें होणारच नाहीं, आपली प्रगती होणार नाहीं आणि आपल्याला खरा मार्गही कळणार नाहीं. संकटें ह्मणजे आपले खरे खरे मित्र आहेत; पण असल्या कामांत मात्र आपली मनोदेवता नेहमीं आपणास पक्की प्रवर्तक पाहिजे. निर्धारानें आपण ती गोष्ट स्वीकारली पाहिजे आणि मग जितक्या चुक्या होतील तितक्या आमचा मार्ग चांगला झाडून देतील, आपल्या यशश्रीचे दरवाजे खुले करितील आणि मग सर्व ऋद्धिसिद्धि आपल्याशा होतील. हल्लींच्या संस्था मध्यें जितका अंतर्गत खेळता पाहिजे तितका तो आढळत नाहीं. कोणत्याही आक्षेपकानें स्वतांच निराळा रस्ता शोधून काढण्यास लागावें ह्मणजे त्याला समजून येईल कीं विद्यमान संस्थाच उत्तम हत्यारें होत. तीं वापरण्यासाठीं कळकळ मनांत वागली पाहिजे. ही कळकळ जर आहे तर आह्मी चुकत चुकत देखील मोठ्या खंबीरपणानें राष्ट्राची प्रगती करूं हें निर्विवाद होय.

---

## नवीन जीव ओतला

पुण्याचे नामदार प्रोफेसर गोखले हे १९ दिवसापूर्वीं कांग्रेसच्या कांहीं कार्यानिमित्त मद्रासकडे गेले होते तेव्हां तेथील मंडळींनीं ह्या राष्ट्रभक्त पुरुषाचा मोठा बहुमान व गौरव केला. ह्या समारंभास तीन हजारावर लोक जमले होते. ह्या प्रसंगीं नामदार साहेबांनीं मोठ्या कळकळीचें हें आवेशाचें संभाषण झालें. नामदारांनीं आपल्या भाषणांत राष्ट्रीय सभेसंबंधीं जो विशेष उल्लेख केला तो सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. अलीकडे अलीकडे कांग्रेस संबंधानें लोकसमूहाचे विचार व मतें हीं फार पालटत चाललीं आहेत. कांग्रेसचें नांव काढल्यां बरोबर लोकांच्या मनांत पूर्वी मोठा आदरभाव उत्पन्न होत असे पण आतां कांग्रेसच्या कर्तृत्व शक्ती संबंधानें त्यांस मोठा संशय वाटूं लागला आहे. लोकांचा मोठा आक्षेप असा आहे कीं, कांग्रेसच्या संस्थेस आज २० वर्षें होत आलीं; एवढ्या कालावधींत तिच्या कडून कांहींच मोठासा कार्यभाग घडून आला नाहीं आणि यापुढें तिच्यापासून कांहीं विशेष लाभप्राप्ती होईल अशी आशा करणें व्यर्थ होय. अशा प्रकारें आज काल लोकांच्या मनांत कांग्रेस सारख्या राजकीय संस्थे संबंधानें जें विषवल्लीचें बी प्रेरित होत आहे तें जागच्या जागीं नाहींसें करणें हें काम फारच महत्वाचें झालेलें आहे. आणि हेंच काम नामदारांनीं या वेळीं करण्याचें योजिलें ही गोष्ट फार चांगली झाली. सध्यां निराशा व निरुत्साह यांनीं वातावरण व्याप्त झालें आहे. आपणांस राजकीय हक्क मिळवावयाचे असतील, आपला देश स्वतंत्र करावयाचा असेल, आणि आपला देश जिवंत ठेवावयाचा असेल तर कांग्रेस सारख्या संस्थांच्या हातून हें कार्य होणारें नाहीं; या कार्यसिद्धीच्या वाटा फार निराळ्या आहेत. असें जे लोकांचे उद्गार बाहेर पडतात ते अंशतः खरे असतील. पण अशी निराशा वाटण्यास खरोखर कांहीं कारण नाहीं. कांग्रेस सारख्या राजकीय संस्थेचें शक्तिसामर्थ्य व त्यांचें आयुर्मान हीं एखाद्या व्यक्तीच्या मापानें मापणें ह्मणजे मोठी ढोबळ चुकी करणें होय. राजकीय संस्थेस २० वर्षें ह्मणजे खरोखरी कांहींच नाहींत. राजकीय संस्था नांवारूपास येण्यास व तिच्या हातून कांहीं महत्कार्य घडण्यास अर्धे शतकाचा किंवा शतकाचाहि काल पुरेसा नाहीं. राजकीय संस्थेचा वृक्ष वाढीस लागून, त्यास गोड फळें येऊन तीं चाखण्यास मिळण्यास अत्यंत बिकट अशा अनंत अडचणी असतात हें कोणी विसरतां कामा नये. अशा संस्था जेव्हां राजकीय झंझावात, थंडी व उन्ह हीं खाऊन तगतील तेव्हां मग कोठें त्यापासून फल-प्राप्तीची आशा करावी! अशा संस्था एकसारख्या चालू ठेवण्यांतच आपलें सध्यांच्या पिढीचें काम होय. आपण निराशेनें हात जोडून बसणें वाजवी होणार नाहीं. आपल्या संस्था भरभराटीस याव्या ह्मणून मनुष्यानें जितकें तनमनधन तत्प्रीत्यर्थ अर्पण केलें पाहिजे तितकें आपण करीत नाहीं. आपल्याच प्रयत्नांत आपण चुकत आहों. आपल्या कार्यांतील संकटाच्या मानांनीं आपले प्रयत्न किती तरी यःकश्चित आहेत हें थोडासा विचार केल्यास कोणासहि सहज कळण्या सारखें आहे. आपले प्रयत्न मोठ्या नेटाचे व दृढ निश्चयाचे पाहिजे आहेत. संकटांना भिऊन धीर सोडणें हा पुरुषार्थ नव्हे. कांग्रेसनें कांहीं केलें नाहीं असें गृहीत धरलें तरी तिनें आपणांतील परस्परांवरील प्रेम दृढ केलें, आपली एकी केली व आपणांस राष्ट्रीयत्वाची ओळख करून दिली वगैरे गोष्टी आपण फारच महत्वाच्या शिकलों आहोंत. राजकीय, औद्योगिक, सामाजिक आदि करून सर्व संस्था बद्दल सर्वांची सहानुभूती पाहिजे आहे. एकटीच औद्योगिक चळवळ किंवा राजकीय चळवळ फारसें कार्य करणार नाहीं. सर्व चळवळी एकदमच सुरू पाहिजेत. एकाच गोष्टीवर भिस्त ठेवणें बरोबर नाहीं. अशा आशयाच्या बोलण्यानें नामदारांनीं राष्ट्रीय कार्यासंबंधीं लोकांच्या अंतःकरणांत नवीन जीवच ओतला आहे यांत शंका नाहीं.

TERED No. N.4

किरकोळ अंकास..................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ह० १
दर ओळीस.........ह१ ०६
दुसरे खेपेस.... .....ह१

Single copy .................... 2 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line „ 2 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 8 AUGUST 1904 NO 31

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ८ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३१

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

### नोटीस

किसन वल्लद शामजी अखरे जात कुणबी राहणार कुंभारी ता० आकोळे यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तूं चोरी केली ह्मणून तुजला सरकारांनीं सन १८९९ सालांत शिक्षा दिली. तुजला शिक्षा झाल्यामुळें मजला कोणी वागविणार नाहीं ह्मणून मजला तुझा भाऊ नामें सिताराम यानें आकोल्यांत दुष्काळांत आणून सोडून दिल्यामुळें मी बाळूळगांव तालुके बाळापूर येथें माझा मावस भाऊ याचे घराशेजारी दुसरे घर घेऊन राहिले त्यास अजमास ४।५ वर्षें झालीं. या चार पाच वर्षांत तुझे बापानें अगर तू माझेकडे मजला नेण्यास कोणीच पाठविलें नाहीं अजमास १२ महिन्याचे अगोदर तुझा बाप मजला नेण्यास आला असता मी त्याजला खावटीचे बद्दल लोकांचे कर्ज काढलेले रुपये २५० मागितले आणि मग मी तुमचे घरीं येते ह्मणून सांगितले, तर तुझे बापानें मजला जबाब दिला कीं मी रुपये आज देत नाहीं आणि तुजलाही नेत नाहीं. तर या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत वर मी काढलेले खावटीचे कर्ज रुपये २५० देऊन मजला घेऊन जावे या प्रमाणें न केल्यास तुझेवर दिवाणींत फियाद करून पैसा कोर्टखर्चा समेत भरून घेतला जाईल. आणि लग्नाचा व्यवहार तोडला जाईल ह्मणून ही नोटीस दिली असे. कळावें तारीख ३।८।०४ इसवी.

सही
पुंजी मर्द किसन कुणबी अखरे
गायगांव तालुके बाळापूर
निशानी खुद्द हातची बांगडी

### नोटीस

रा. रा. गंगासिंग सितलसिंग परदेशी कनोजीया ब्राह्मण राहणार चंडकापूर प्रगणें अडगांव तालुके आकोट यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मी तारीख १७ माहे एप्रील सन १९०२ इसवी रोजीं तुह्मास कुलमुकत्यारपत्र रजीष्टर करून मुकत्यार नेमले होते मुकत्यारपत्र दिल्यापासून आज पावेतों तुह्मी जीं कामें केलीं त्या कामा पैकीं कांहीं कांहीं कामें माझे परवानगी शिवाय तुह्मी माझे इच्छे विरुद्ध केलीं ह्मणून मी नाराज होऊन मी आज तारखेपासून तुह्मास दिलेले कुलमुकत्यारपत्र रद्द केले आहे. तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसाचे आंत तारीख १७ माहे एप्रील सन १९०२ इसवीपासून आज पावेतों तुह्मी ज्या ज्या रकमा माझे जवळून नेल्या व दुसरे साहुकारापासून रकमा आणिल्या असतील त्याचा हिशोब तपसीलवार द्यावा व त्याच प्रमाणें माझे देवघेवी संबंधानें जें कांहीं कागदपत्र नकला तुमचे पाशी असतील त्या सर्व आणून माझे स्वाधीन कराव्या व माझे सहीची पावती घ्यावी. ह्या प्रमाणें न केल्यास तुमच्याबद्दल मजला निराळी व्यवस्था करावी लागेल. ह्यापुढें तुह्मी माझे नावाचा कोणताही व्यवहार पैशासंबंधीं करूं नये. केल्यास मी त्याजबद्दल जबाबदार मुळींच राहणार नाहीं. ही नोटीस दिली सही तारीख १–८–१९०४ इसवी०

सही
लक्ष्मीबाई जवजे सुरेभान लोखंडे
पाटील निशानी खुद्द.

### जाहिरातें.

या जाहिरातीनें आकोट तालुक्यांतील आणि आकोले जिल्ह्यांतील व दुसरे इलाख्यांतील शेट साहुकार लोकांस कळविण्यांत येते कीं माझा कुलमुकत्यार गंगासिंग सितलसिंग याचे मुकत्यारपत्र आज तारीख १।८।१९०४ इसवी पासून रद्द केले आहे. तर ह्यापुढें त्यास माझे नावानें कोणी पैसा कर्जाऊ, माझे नांवाचा लेख करून घेऊन, देऊ नये. दिल्यास तो बातल समजला जाईल. ह्मणून ही जाहिरात दिली. तारीख १।८।१९०४ इसवी०

सही
लक्ष्मीबाई जवजे सुरेभान लोखंडे
पाटील निशानी खुद्द.

### जाहिरात

या जाहीर लेखानें तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, मौजे बोरी ता० खामगांव येथील गढीवरील जागा ( १२ खांबी धाबें व अंगण ).

चतुःसीमा— पूर्वेस— हनुमता वल्लद केशव पाटील याचें धाबें.
दक्षिणेस— गल्ली.
पश्चिमेस—पांडू जानजी व एसू रायभान यांचीं घरें.
उत्तरेस—रस्ता.

ही जागा आह्मी आपली बहीण चिमाबाई जवजे कुकाजी हल्लीं वस्ती नायगांव हिजला काळाचे वेळीं राहण्यास दिली होती. ती ५।६ महिन्या पासून ती जागा सोडून नायगांवीं गेली आहे. तिजपासून अगर दुसरे कोणापासून वरील जागा कोणी खरेदी, गहाण अगर बक्षीस घेऊ नये. ती जागा आमच्या मालकीची आहे. या उपर कोणी घेतल्यास त्याची जोखीमदारी ज्याची त्याजवर राहील. कळावें. तारीख ५।८।०४ इसवी.

सहीची निशाणी.
मारुती वल्लद देवाजी पाटील राहणार बोरी ता. खामगांव याचे हातची रेघ—

### नोटीस

बेशमी चिमाबाई मर्द कुकाजी पाटील हल्लीं वस्ती नायगांव ता. मेहेकर पोस्ट—धाटबोरी. हीसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, पहिल्या काळाचे वेळीं तुह्मी माझ्या येथें ह्मणजे बोरी गांवीं माझ्या घरीं राहण्यास आला. तुह्मी माझ्या चुलत बहीण असल्या कारणानें लोभामुळें मी त्या वेळीं तुह्मांस माझी गढीवरची जागा राहण्यास दिली. तुह्मी तेव्हां पासून ७–८ वर्षें तेथेंच राहिला. आतां सुमारें ६ महिने झाले तुह्मी परत नायगांवीं राहण्यास गेला. जातेवेळीं माझी जागा खालीं करून देण्याची ती तशीच राहिली. दोन चार वेळां तुह्मांस ह्मटलें कीं, कुलूप उघडून जागा ताब्यांत द्या. तुह्मी देतो देतो असें ह्मणून चाळवितां सबब ही नोटीस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पोंचले पासून ८ दिवसांत जागा आमच्या ताब्यांत द्यावी. नाहींतर आह्मांस योग्य कायदेशीर तजवीज करावी लागेल. व सर्व खर्चवेंच व घराची पडझड वगैरे नुकसानी तुह्मांपासून घेतली जाईल. ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावें. तारिख ५ माहे आगस्ट १९०४ इ०

सहीची निशाणी
मारुती वल्लद देवाजी पाटील
राहणार बोरी, ता. व पोस्ट
खामगांव यांचे हातची
रेघ—

### प्रपंच घाटाच्या खालील पायऱ्या चढा.

१ कोणतातरी एक पोटाचा उद्योग चांगला शिका.

२ एकाच उद्योगाला चिकटून रहा; घटकेंत हा, घटकेंत तो, असें करूं नका.

३ कामांत त्वरा ठेवा, पण धांदल करूं नका.

४ कोणतेहि काम शिस्तीनें व काळजीपूर्वक करा.

५ जें काम हातीं घेण्यालायक आहे, तें चांगल्या रीतीनें पार पाडण्यालायक आहे ह्मणून समजा.

६ आज हातीं आलेली अर्धी भाकर उद्यां मिळणाऱ्या संबंध भाकरी इतकी आहे, अशी खात्री ठेवून संतुष्ट रहा.

७ स्वतावर अवलंबून रहा. करूं कीं नको, ह्मणून ज्याला त्याला विचारित सुटूं नका.

८ कोणत्याहि कामांत ठरविलेली वेळ चुकूं देऊं नका,

९ आळस सोडा, प्रत्येक क्षण विचारांत किंवा कृतींत यांपैकीं कोणत्यातरी खात्यांत हिशोबीं पडला पाहिजे.

१० सर्वांविषयीं उदार बुद्धि ठेवा. कुत्सितपणा टाका. प्रपंचमार्गांत नुसत्या पडलेल्या नवशिक्यांनां करवेल तेवढी मदत करा.

११ एकदम श्रीमंत होण्याची बुद्धि धरूं नका. हळूहळू पण भक्कम जें काम होतें तें कायमचें होतें. शिडीवर चढणारांनीं अगदीं खालच्या पायरीपासून क्रमाक्रमानें वर गेलें पाहिजे. तसें न करतां एखादा कांहीं पायऱ्या ओलांडून जाऊं लागला, तर एखादे वेळीं तो घसरून पडण्याचा संभव असतो. हेंच उदाहरण प्रपंचांतल्या किरकोळ गोष्टीला लावून पहात असावें.

१२ आज जे मोठ्या पदाला चढलेले दिसतात. ते एका काळीं खालच्या पायरीवर होते, हें नेहमीं ध्यानांत धरा.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य १२ शके १८२६

## फ्याक्टरी

वऱ्हाड आणि मध्यप्रांत मिळून १९०३ च्या अखेरीला ३९१ फ्याक्टरी होत्या; त्या पैकीं आमच्या प्रांतांतच २५९ फ्याक्टरी असून सर्व मध्यप्रांत मिळून एकंदर १३२ फयाक्टरी आहेत. या फयाक्टऱ्यांची वर्गवारी त्यांत चालूं असलेल्या निरनिराळ्या कार्यांच्या दृष्टीनें केली तर असें आढळेल कीं बहुतेक सर्व संख्या कापूस वटण्याच्या व गठ्ठे दाबण्याच्या कारखान्यांची आहे. मध्य प्रांतांत असे ११६ कारखाने असून वऱ्हाडांत २५९ कारखाने आहेत. मध्यप्रांतांतील वर्धा नागपूर व नेमाड याच भागांत कापूस पिकतो ह्मणून तेथेंच काय ते असे कारखाने आहेत. आमच्या प्रांतांत सर्वत्र कापूस होतो आणि तो विपूल पिकतो ह्मणून या लहानशा भागांतच फयाक्टरींची गर्दी झाली आहे. गेल्या तीन वर्षांतच हे कारखाने किती वाढले आहेत हें पाहिलें ह्मणजे लक्ष्यांत येईल कीं, फयाक्टरी उभारण्याचें जणूं कांहीं वेडच या प्रांतांत फार माजलें आहे. १९०१ सालीं १०१ फयाक्टरी होत्या त्या १९०२ सालीं २०५ झाल्या आणि १९०३ च्या अखेरीला हीच संख्या नवीन ५० फयाक्टऱ्यांनीं वाढली आहे. या धंद्यांत लोकांस फायदा दिसतो आणि ह्मणूनच लोक फयाक्टरी नवीन नवीन घालण्यांत आपलीं भांडवलें गुंतवितात हें उघड आहे. पण ही वाढ व वरचढ इतकी शिखराला पोंचली आहे कीं जर सर्व फयाक्टरीवाल्यांची एक जूट राहिली नाहीं तर सर्वच कारखानदार नुकसानींत येतात. कधीं कधीं असाही अनुभव येतो कीं हे इतके पुष्कळ कारखाने चार सहा महिने चालण्या इतका कापूस देखील सर्व प्रांतांत पिकत नाहीं.

वरील प्रकारच्या कारखान्याशिवाय बरोडा येथें कौलें व विटा तयार करण्याचा एक सरकारि कारखाना आहे आणि तसेंच तेथें कोळशाच्या खाणीचा मोठा टोलजंग कारखाना आहे. देशी दारू तयार करण्याच्या दोन तीन सरकारी भट्ट्या आहेत. या खेरीज नागपूर, वर्धा, जबलपूर, बडनेरा व आकोला मिळून सुताच्या व कपड्या या ८ गिरण्या चालूं आहेत. एखादा आटा पिसण्याचा, कोठें तेलघाण्याचा इत्यादि किरकोळ फयाक्टरीहि आहेत. परंतु विस्तारा च्या मानानें त्यांच्या नामनिर्देशा पलिकडे त्यांचें महत्व नाहीं.

मध्यप्रांतांतील फ्याक्टरी मधून सुमारें २२ हजार लोकांस रोजगार मिळतो आणि वऱ्हाडांत अदमासें २०।२१ हजार लोकांची रोजी फ्याक्टरींतील कामावर चालते. हीं कामें बारमाहीचीं नसतात आणि या कामांच्या हंगमांत मात्र मजुरांचे रोज देखील दिढीनें व दुप्पटीनें वाढतात असा दरसालचा अनुभव आहे. कापसाच्या कारखान्यांत जे लोक काम करीत असतात त्यांच्या शरीर प्रकृती संबंधानें कांहीं गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. कारखान्यांतील मजुरदार लोक अल्प वयांत मृत्युमुखीं पडतात. कारखान्यांतील हवा फार दूषित होत असते. तेथील कापसाचा धुराडा नाका तोंडातून शिरतो आणि नेहमीं फुप्फुसाला नानाविध विकार जडतात. कांहीं डाक्टरांचा असाही अभिप्राय पडतो कीं, कारखान्यांतील मजुरांची संतती खुजी व अल्पायुषी होते आणि स्त्रिया रात्रींच्या रात्रीं कारखान्यांत कामें करून अधीक ह्मातान्या, तेजहीन व संसाराच्या कार्याला अपात्र अशा होतात. शेतांत कामधंदा करणाऱ्या लोकांच्या शरीराकडे पाहिलें असतां वरील ह्मणण्याची सत्यता आपोआप लक्ष्यांत येण्यासारखी आहे. फ्याक्टरींतून शुद्ध हवेचा पुरवठा चांगला मुबलक व्हावा ह्मणून कांहीं विशेष योजना करण्याचा काल आला आहे असें आह्मांस वाटतें. फ्याक्टरींतील मजुरांच्या आरोग्या संबंधानें अधीक गोष्टी करण्यांत आल्या पाहिजेत. प्रस्तुतच्या कामधंद्यानें आमच्या मजुरदार मंडळींचा शारीरिक ऱ्हास होत असतो तो फार घातुक आहे आणि त्या गोष्टीचा प्रतिकार वेळेवरच होईल तर फार चांगलें.

वऱ्हाड व मध्यप्रांत यांचा पुष्कळसा सुपीक भाग मिळून एकत्र घेतला तर असें आढळून येईल कीं, यांत्रिक कारखान्यांस नैसर्गिक उपसाहित्यें पुष्कळ अनुकूल आहेत. कैलासवासी टाटा यांच्या मनांतून कांहीं खनिज द्रव्या संबंधानें इकडे कारखाने घालावयाचे होते पण त्यांचा तो हेतु फळास आला नाहीं हें फार वाईट झालें. ज्या बाबदींत कारखाने पाहिजेत, ज्या उद्योगामध्यें लोकांचीं भांडवलें खेळावयाला पाहिजेत व ज्या यांत्रिक ज्ञानाचें पाऊल पुढें पाहिजे त्या सर्व प्रकरणांत आमच्या प्रांतांतच काय पण सर्व देशांत अगदीं अंधार आहे ह्मटलें तरी चालेल. आमचा देश पुढें सरसावण्याला लोकांची प्रवृत्ती शास्त्रीय शोध व नवे उद्योगधंदे यांच्या कडे वळली पाहिजे. या प्रांतांतच केवढी तरी विस्तृत कार्यभूमी उपलब्ध आहे! पण तेथें उद्योगवृक्ष लावणारे कोणीतरी थोर कल्पक पुरुष निर्माण होतील तर त्यांचीं अमृतफळें इंडियन लोकांस भविष्यकाळा तरी लाभण्याची आशा आहे. प्रस्तुत स्थिती मात्र या बाजूनें अगदीं असमाधानकारक आहे हें विसरतां कामा नये.

## मनाचा निर्धार

राष्ट्रीय सभे संबंधानें मुंबईस चांगली चळवळ सुरू आहे. चालूं सालच्या बैठकीची पूर्व सिद्धता आतां पासूनच चालविली आहे. या सभेचें जें दुसरें मुख्यांग ह्मणजे प्रदर्शन त्याच्या संबंधानें देखील पुष्कळशा योजना मुंबईच्या व्यवस्थापक-मंडळींनीं हातीं घेतल्या आहेत. यंदाच्या सालीं अध्यक्षस्थानाचा बहुमान सर हेनरी कॉटन यांस द्यावा असा सर्वांचा संकेत झालेला आहे. सर कॉटन साहेब हे इंडियाचे मोठे पुरस्कर्ते आहेत तेव्हां त्यांच्या सारख्या वजनदार पेनशनदारास अध्यक्षस्थानीं विभूषित करण्यापासून आपल्या इष्ट कार्याला मोठा जोर येईल हें उघड आहे.

राष्ट्रीय सभा काय आणि औद्योगिक सभा काय त्या सर्वांच्या बुडाशीं आपली निस्सीम भक्ती पाहिजे. ज्याला त्याला असें वाटलें पाहिजे कीं मी आपल्या परीनें या संस्थेचा कार्यभाग अंशतः तरी मोठ्या मनोभावानें उचलीनच उचलीन. गेल्या सोमवारीं कलकत्यास जी औद्योगिक मंडळीची टोळेजंग सभा भरली होती त्यांत नामदार न्यायमूर्ती स्टिफन्स यांनीं तरी हाच बोध केला कीं, जर चुक्या होणार नाहींत, संकटें येणार नाहींत, आणि आपल्या इष्ट कार्याला प्रत्यवाय उत्पन्न होणार नाहींत तर आपलें कार्य चांगलेंसें होणारच नाहीं, आपली प्रगती होणार नाहीं आणि आपल्याला खरा मार्गही कळणार नाहीं. संकटें ह्मणजे आपले खरे खरे मित्र आहेत; पण असल्या कामांत मात्र आपली मनोदेवता नेहमीं आपणास पक्की प्रवर्तक पाहिजे. निर्धारानें आपण ती गोष्ट स्वीकारली पाहिजे आणि मग जितक्या चुक्या होतील तितक्या आमचा मार्ग चांगला झाडून देतील, आपल्या यशश्रीचे दरवाजे खुले करितील आणि मग सर्व ऋद्धिसिद्धि आपल्याशा होतील. हल्लींच्या संस्था मध्यें जितका अंतर्गीत खेळता पाहिजे तितका तो अढळत नाहीं. कोणत्याही आक्षेपकानें स्वतांच निराळा रस्ता शोधून काढण्यास लागावें ह्मणजे त्याला समजून येईल कीं विद्यमान संस्थाच उत्तम हत्यारें होत. तीं वापरण्यासाठीं कळकळ मनांत वागली पाहिजे. ही कळकळ जर आहे तर आह्मी चुकत चुकत देखील मोठ्या खंबीरपणानें राष्ट्राची प्रगती करूं हें निर्विवाद होय.

## नवीन जीव ओतल

पुण्याचे नामदार प्रोफेसर गोखले हे १५ दिवसापूर्वीं कांग्रेसच्या कांहीं कार्यानिमित्त मद्रासकडे गेले होते तेव्हां तेथील मंडळींनीं ह्या राष्ट्रभक्त पुरुषाचा मोठा बहुमान व गौरव केला. ह्या समारंभास तीन हजारावर लोक जमले होते. ह्या प्रसंगीं नामदार साहेबांचें मोठ्या कळवळ्याचें हें आवेशाचें संभाषण झालें. नामदारांनीं आपल्या भाषणांत राष्ट्रीय सभेसंबंधीं जो विशेष उल्लेख केला तो सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. अलीकडे अलीकडे कांग्रेस संबंधानें लोकसमूहाचे विचार व मतें हीं फार पालटत चालली आहेत. कांग्रेसचें नांव काढल्या बरोबर लोकांच्या मनांत पूर्वीं मोठा आदरभाव उत्पन्न होत असे पण आतां कांग्रेसच्या कर्तृत्व शक्ती संबंधानें त्यांस मोठा संशय वाटूं लागला आहे. लोकांचा मोठा आक्षेप असा आहे कीं, कांग्रेसच्या संस्थेस आज २० वर्षें होत आलीं; एवढ्या कालावधींत तिच्या करवीं कांहींच मोठासा कार्यभाग घडून आला नाहीं आणि यापुढें तिच्यापासून कांहीं विशेष लाभप्राप्ती होईल अशी आशा करणें व्यर्थ होय. अशा प्रकारें आज काल लोकांच्या मनांत कांग्रेस सारख्या राजकीय संस्थे संबंधानें जें विषवल्लीचें बी प्रेरित होत आहे तें जागच्या जागीं नाहींसें करणें हें काम फारच महत्वाचें झालेलें आहे. आणि हेंच काम नामदारांनीं या वेळीं करण्याचें योजिलें ही गोष्ट फार चांगली झाली. सध्यां निराशा व निरुत्साह यांनीं वातावरण व्याप्त झालें आहे. आपणांस राजकीय हक्क मिळवावयाचे असतील, आपला देश स्वतंत्र करावयाचा असेल, आणि आपला देश जिवंत ठेवावयाचा असेल तर कांग्रेस सारख्या संस्थांच्या हातून हें कार्य होणारें नाहीं; या कार्यसिद्धीच्या वाटा फार निराळ्या आहेत. असें जे लोकांचे उद्गार बाहेर पडतात ते अंशतः खरे असतील. पण अशी निराशा वाटण्यास खरोखर कांहीं कारण नाहीं. कांग्रेस सारख्या राजकीय संस्थेचें शक्तिसामर्थ्य व त्यांचें आयुर्मान हीं एखाद्या व्यक्तीच्या मापानें मापणें ह्मणजे मोठी ढोबळ चुकी करणें होय. राजकीय संस्थेस २० वर्षें ह्मणजे खरोखरी कांहींच नाहींत. राजकीय संस्था नांवारूपास येण्यास व तिच्या हातून कांहीं महत्कार्य घडण्यास अर्ध शतकाचा किंवा शतकाचाहि काल पुरेसा नाहीं. राजकीय संस्थेचा वृक्ष वाढीस लागून, त्यास गोड फळें येऊन तीं चाखण्यास मिळण्यास अत्यंत बिकट अशा अनंत अडचणी असतात हें कोणी विसरतां कामा नये. अशा संस्था जेव्हां राजकीय झुंझावात, थंडी व उन्ह हीं खाऊन तगतील तेव्हां मग कोठें त्यापासून फल-प्राप्तीची आशा करावी! अशा संस्था एकसारख्या चालूं ठेवण्याचेंच आपलें सध्यांच्या पिढीचें काम होय. आपण निराशेनें हात जोडून बसणें वाजवी होणार नाहीं. आपल्या संस्था भरभराटीस याव्या ह्मणून मनुष्यानें जितकें तनमनधन तत्प्रीत्यर्थ अर्पण केलें पाहिजे तितकें आपण करीत नाहीं. आपल्याच प्रयत्नांत आपण चुकत आहों. आपल्या कार्यांतील संकटाच्या मानानें आपले प्रयत्न किती तरी यःकश्चित आहेत हें थोडासा विचार केल्यास कोणासहि सहज कळण्या सारखें आहे. आपले प्रयत्न मोठ्या नेटाचे व दृढ निश्चयाचे पाहिजे आहेत. संकटांना भिऊन धीर सोडणें हा पुरुषार्थ नव्हे. कांग्रेसनें कांहीं केलें नाहीं असें गृहीत धरलें तरी तिनें आपणांतील परस्परांवरील प्रेम दृढ केलें, आपली एकी केली व आपणांस राष्ट्रीयत्वाची ओळख करून दिली वगैरे गोष्टी आपण फारच महत्वाच्या शिकलों आहोंत. राजकीय, औद्योगिक, सामाजिक आदि करून सर्व संस्था बद्दल सर्वांची सहानुभूती पाहिजे आहे. एकटीच औद्योगिक चळवळ किंवा राजकीय चळवळ फारसें कार्य करणार नाहीं. सर्व चळवळी एकदमच सुरू पाहिजेत. एकाच गोष्टीवर भिस्त ठेवणें बरोबर नाहीं. अशा आशयाच्या बोलण्यानें नामदारांनीं राष्ट्रीय कार्यांविषयीं लोकांच्या अंतःकरणांत नवीन जीवच ओतला आहे यांत शंका नाहीं.

## शिफारस

रा. रा. नारायण महादेव समर्थ बी. ए. एल. एल. बी. हे मुंबईस हायकोर्ट वकिलीचें काम करीत असतात. त्यांच्या मनांतून यंदां मुंबई युनिव्हर्सिटीच्या आरडीनरी फेलोच्या निवडणुकीच्या वेळीं उमेदवार ह्मणून पुढें यावयाचें आहे. आमच्या या भागांत त्यांची फारशी ओळख नाहीं "ह्मणून त्यांच्या संबंधानें आह्मी असें कळवूं इच्छितों कीं, हे गृहस्थ चांगले विद्याव्यासंगी आहेत. त्याच प्रमाणें हे वक्तेहि चांगले आहेत. राष्ट्रीय सभेच्या कामांत यांचा बराच पुढाकार असतो ही गोष्ट त्यांनीं केलेल्या भाषणा वरून पुष्कळांस माहीत असेल. वर्तमानपत्रांच्याद्वारें लोकसेवा करण्याचाहि यांस पुष्कळ नाद आहे. आणि युनिव्हर्सिटीच्या कार्यक्रमाची माहिती यांना चांगली आहे. यांचें वास्तव्य खुद्द मुंबईसच असल्या कारणानें फेलोच्या जागीं यांची निवडणूक झाल्यास ते आपलें काम मन लावून करितील अशी आशा आहे. तर वऱ्हाडांतील ग्र्याज्युएट मंडळींनीं यांच्या निवडणुकी साठीं आपलें मत द्यावें ह्मणून आह्मी ही शिफारस करीत आहों. ही निवडणूक पुढील महिन्याच्या ९ वे तारखेस होणार आहे.

---

## रणसंग्राम

रुसो-जपानी युद्धा संबंधानें गेल्या आठवड्यांत मोठीच गडबड उडाली होती. सध्यांच्या लढाईचें मोठें थोरलें तोंड ह्मणजे पोर्टआरथरचा वेढा हें होय. पोर्ट आरथर आपल्या हातून जाऊं नये ह्मणून रशियन लोक आपली पराकाष्ठा करीत आहेत पण त्यांच्याच प्रमाणें जपानी लोकांनींहि तें सर करण्याची परमावधि चालविली आहे. ६।६ दिवसांपूर्वी पोर्ट आरथर जपाननें मोठ्या शिताफीनें घेतलें व त्यांचे १४ हजार लोक मेले वगैरे अर्थाची जी एक हूल दाखविणारी बातमी प्रसिद्ध झाली होती तिनें लोकांच्या मनाची मोठी चलबिचल करून सोडली व थंडावलेल्या लढाईच्या हकीकतींत बराच जीव ओतला. पण ही बातमी खरी असल्याबद्दल अद्यापपावेतों कोठूनच चितबातमी आलेली नाहीं. अर्थात पोर्ट आरथर अद्याप सर झालेलें नाहीं. इतकी मात्र गोष्ट खरी कीं, पोर्ट आरथरच्या जवळपास मोठ्या हातघाईची व निकराची लढाई चालू आहे आणि जपानी लोकांनीं इंटिको नांवाची एक मोक्याची जागाहि हस्तगत करून घेतली आहे. यावरून जपानी योद्ध्यांच्या हातास लवकरच यश येईल असा रंग आहे.

दुसरीकडे लायोयेंग जवळील दोन तीन महत्वाचीं ठिकाणें जपाननें काबीज केलीं आहेत व रशियन लोक पळून जात आहेत. लायोयेंग जवळच रशियन जनरल क्युरोपॅटकीन यांच्या विस्तृत सैन्याचा तळ पडला आहे आणि त्याच्याशीं लढाई देण्यासाठीं जपानी जनरल ओकू यांची तयारी झाली आहे. या ठिकाणीं एक निकराची लढाई झाल्या शिवाय राहणार नाहीं असा अदमास आहे.

---

रशियांतील लोकांचीं मनें बिथरलीं आहेत, त्यांच्या पोटांत रशियाच्या राजाविषयीं अप्रेम व असंतोष वागत आहे आणि ते सध्यांच्या लढाईंत जपानी लोकांकडून पैसे खाऊन घरभेदेपणा करीत आहेत वगैरे गोष्टी आपण ऐकतो व त्या खऱ्या असल्या बद्दल आपणांस कांहीं खालील गोष्टींत प्रत्यंतरी पुरावाहि मिळतो आहे.

कौंट टालस्टाय यांनीं जपानच्या लढाईवर कोणीहि रशियनानें जाऊं नये अशा बद्दल जो लेख प्रसिद्ध केला तो लेख अर्थात् रशियाच्या दृष्टीनें बरा नव्हता. ऐन प्रसंगीं आपल्यांतीलच एक मोठा मनुष्य आपल्याच लोकांना असा घरभेदेपणाचा उपदेश करीत आहे हें पाहून झाराला अत्यंत वाईट वाटलें असेल यांत शंका नाहीं. हा उपदेश कितीहि चांगला असला तरी कालदेशवर्तमाना प्रमाणें मुत्सद्दीपणाचा बिलकुल नाहीं हें खास. हा उपदेश लढाई सुरूं होण्यापूर्वीचा आहे. आणि आतां ती उपदेशवेळा निघून गेली आहे. असो वरील लेखानें रशियांत बरीच गडबड झाली, आणि ह्मणून टालस्टाय यांस हद्दपार करण्याचा विचारहि झाला होता, पण असें करण्यानें प्रकरण जास्त चिडेल ह्मणून कांहींच करण्यांत आलें नाहीं.

प्लेव्ह नांवाच्या रशियन मंत्र्यानें टालस्टाय यांस हद्दपार करण्याचा सल्ला दिला होता. ह्मणून तो गाडींतून जात असतांना कोणी एकानें त्याच्या गाडींत बांब गोळा फेंकला व त्यामळें गाडीवान् घोडे व गाडी यांच्या चिंध्या झाल्या. व प्लेव्ह यांचे हात पाय तुटून उडून गेले. खुनी मनुष्यास पकडलें होतें पण तो मरण पावला असल्यामुळें गुप्त कटाची कांहीं बातमी लागली नाहीं.

ह्याच प्रसंगास रशियाच्या पोलंडामध्यें राज्यक्रांती होण्याचा रंग वाटत आहे ह्मणून तेथें लष्करी कायदा सुरूं करण्याविषयीं तेथील गव्हरनर झार साहेबांस कळवीत आहेत.

वरील गोष्टी रशियांतील अंतस्थ अस्वस्थता लोकांचा असंतोष, खुनी लोकांची बंडाळी व राज्यक्रांतीचे कट हे व्यक्त करीत आहेत. तरी इतक्या गोष्टीवरून सर्वच रशियांत असंतोष वादत आहे असें कोणी समजूं नये. झारवर पुष्कळांचें चांगलें प्रेम आहे व त्याजवर लोकांचा मोठा विश्वास आहे असें एका ऐरिश बातमीदाराचें खात्रीचें सांगणें आहे.

---

जपानी लोकांनीं अलिकडे एक मोठी गमतीची युक्ती लढविली आहे व त्या बद्दल रशियन लोक उगीच कुरकुर करीत आहेत. लांकडाचे थोरले ओंडे घेऊन ते हुबेहूब तोफे प्रमाणें दिसतील असा त्यास रंग देतात व तेच ओंडे तोफे प्रमाणें डागतात. हे ओंडे खऱ्या तोफा आहेत असें समजून रशियन लोक त्याच्यावरच आपल्या तोफांचा मारा करितात. पण जपानी लोकांनीं खऱ्या तोफा दुसरी कडेच रोखलेल्या असल्यामुळें अनायासें ते शत्रूचा, पराभव करून आपला बचाव करितात. बिनधुराची दारू उपयोगांत असल्यामुळें शत्रूस खरी तोफ कोठून सुटली हें कळण्याचा मार्ग नाहीं आणि यामुळें रशियन लोक चांगलेच फसतात. ही युक्तीची कर्तबगारी खरोखर नांवाजण्या सारखीच होय.

जर्मनीचे सेनाधिपती मेकेल हे कांहीं दिवस जपानच्या सैन्याचे मुख्य शिक्षक होते. त्यांनीं जपानी लोकांसंबंधानें आपला अनुभव सहज सांगितला कीं, जपानी लोक असेच विजयी होतील. ते मोठे हिय्येबाज लोक असून ते कधींहि कच खाणारे नाहींत. त्यांची युद्धाची . सामुग्रीसिद्धता उत्तम आहे. ते अचूक नेम मारणारे असून त्यांचे रणधुरंधर जनरल हे उत्तम डोक्याचे आहेत व त्यांच्या तोडीचा रशियन जनरल क्वचितच सांपडेल." जपानासंबंधानें असे हे तिऱ्हाईत लोकांचे उद्गार ऐकून जपानी लोकांबद्दल कोणास प्रेम उत्पन्न होणार नाहीं !

---

तिबेटा कडील वर्तमान ह्मणजे इंग्रज लोक एक एक पाऊल पुढेंपुढें बिनधोक सरकत आहेत हें होय. गियांटसे सोडल्यापासून इंग्रजी मिशनला तिबेटी लोकांनीं मुळींच त्रास दिला नाहीं असें ह्मटल्यास चालेल. ते लोक मिशनची फौज येण्यापूर्वीच आपलीं ठिकाणें सोडून जातात. आतां ल्हासा शहरांत इंग्रजांना पाय टेकण्यास फारसा कालावधी लागणार नाहीं. सध्यां ब्रह्मपुत्रा नदाच्या अलीकडच्या कांठावर मिशन येऊन पोहोंचलें आहे. हा नद तरून जाण्याचे उपाय सुरूं आहेत. नदाच्या पाण्यांत भोंवरे असल्यामुळें घोडीं, गाढवें व मनुष्यें वाहून मरून जातात. आमच्या मुखत्याराबरोबर तह करावा व ल्हासापर्यंत येण्याची दगदग करूं नये ह्मणून यंगहजबंड साहेबांस ल्हासाकडून खलिता आला होता परंतु साहेबांनीं उत्तर केलें कीं, जमल्यास तह करूं, पण ल्हासा येथें आल्यावांचून आतां राहणार नाहीं. असो आपल्या इंग्रजांची भीष्म प्रतिज्ञा शेवटास जात आहे ह्यांत आपणांस आनंदच आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— आश्लेशा नक्षत्राच्या पावसानें चांगली बहार केली. पिकें जोमदार आहेत. हवेंतली गर्मी मोडून थंडपणा येऊं लागला आहे. एकंदर पाणी १९ इंच झालें.

रोगराई— प्लेगाचा आजार नाहीं ह्मटलें तरी चालेल पण पटकीचा उपद्रव बहुतेक ठिकाणीं सुरूंच आहे. अलिकडे तीन चार वर्षें हा गोळीचा आजार फारसा नव्हता. पण यंदा त्याचें स्वरूप खडतर आहे. आकोल्यास मृत्यूचें दररोजचें प्रमाण ८।१० वर येऊन बसलें आहे.

रायबहादूर ईश्वरप्रसाद एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, नागपूर यांची बदली हुशंगाबादेस झाल्या अन्वयें ते तिकडे जातांना आकोल्यास उतरले होते आणि त्यांनीं येथील अध्यात्म विद्येच्या शाखेला आपल्या विचारसरणीचा चांगला लाभ करून दिला. हे गृहस्थ चांगले प्रेमळ असून अध्यात्मविद्येमध्यें त्यांची गती पुष्कळ पुढें आहे.

रा. रा. विश्वनाथ काशीनाथ काळे, वकील, उमरावती यांनीं येथील वर्षोत्सव व्याख्यानमालेला काल सायंकाळीं सुरुवात केली. संभाषणाचा विषय 'ईश्वरविषयक ज्ञानास प्रातिबंध' असा होता.

रा. रा. ब्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर हे गेल्या गुरुवारापासून रजेवर गेले. त्या दिवशीं हायकोर्टांत सर्व वकील मंडळी एकत्र जमली होती व रावबहादूर मुधोलकर यांनीं साहेब बहादुरांच्या न्यायीपणा बद्दल धन्यवाद गाऊन विलायतेची सफर प्रकृतीला चांगली आरामदायक होवो अशी आशा प्रदर्शित केली.

रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर यांच्याकडे जुडिशिअल कमिशनरचे कोर्टाचा चार्ज देण्यांत आला आहे हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो

रा. रा. चेंबरलेन असि. कमिशनर नागपुर यांस कांहीं मुदतीसाठीं उमरावतीस बदलण्यांत आलें आहे.

रा. रा. जी. सुब्बायलू नायडू एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या सहा आठवड्यांच्या रजेंत रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर तहशिलदार, दारव्हा यांस एक्स्ट्रा आसस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें. ही निवडणूक यथान्याय झाली आहे.

रा. रा. मेलोनी असिस्टंट पोलिस सुपरिनटेंडंट, उमरावती यांस आकोल्यास बदलण्यांत आलें.

येथील तुरुंगांत चोरून सांठवलेली नीळ जेल-कंत्राटदार विठ्ठलदास यानें मुंबईस विकण्यासाठीं रवाना केली असें शाबीत झाल्यावरून त्यास तीन महिने साधी कैद व २०० रुपये दंड अशी सौम्य प्रकारची शिक्षा देण्यांत आली. विठ्ठलदासाचें वयोमान, जेल-कंट्राक्टर या नात्यानें त्याचा जेलच्या अधिकाऱ्यांशीं असलेला संबंध व त्याच्या गुन्ह्याची लघुता ही लक्ष्यांत घेऊन वरील निकाल सांगण्यांत आला.

---

कि० दि. क्षा. नं. १८ मि. नं. ३/१९०४

विद्यमान सिव्हिल जड्ज्य साहेब बहादूर जिल्हा आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार—गणपत वल्लद बाळाजी बंजारी राहणार लोतखेड तालुके आकोट.

अज्ञान— मोतीराम वल्लद रामचंद्र बंजारी राहणार लोतखेड ता० आकोट.

या नोटिसीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं अज्ञान मोतीराम वल्लद रामचंद्र बंजारी राहणार लोतखेड तालुके आकोट यांचें स्वतःचें व इस्टेटीचें अशा दोन्हीचें पालनकर्ता नेमण्या बद्दल अर्जदार यानें या कोर्टास अर्ज दिल्यावरून त्याचे चौकशीची तारीख २७।८।१९०४ इसवीची नेमली आहे तरी सदर्हू अज्ञानाचे बरें व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं वरील तारखेस ज्यास पालनकर्ता नेमणें इष्ट असेल त्यास घेऊन यावें व अर्जदार यास त्याचे अर्जा प्रमाणें पालनकर्ता नेमल्यास कोणाची कांहीं हरकत असल्यास त्यांनीं आमचे समोर हजर राहावें.

आज तारीख ३ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली असे.

Sk. Ismail
सिव्हिल जड्ज्य, आकोला.

---

## वर्तमानसार.

**सुभाषितं**—मूर्ख मनुष्याचें हृदय त्याच्या तोंडांत असतें व शहाण्याचें तोंड त्याच्या हृदयांत असतें. ह्मणजे मूर्ख मनुष्य जें मनांत येईल तें विचार न करितां वाटेल त्याच्यापाशीं आपला बडबडत सुटतो पण तोच शहाणा मनुष्य दुसऱ्यापाशीं आपल्या मनांतली गोष्ट सहसा कधीं बोलून दाखवीत नाहीं.

**अत्यंत जुनें देवालय**—मद्रास इलाख्यांत उत्तर अर्काट प्रांतांत श्रीव्यंकटशाचलम् नांवाच्या टेंकडीवर वेंकटेशाचें देवालय बांधलेलें आहे त्यास सुमारें आज कमींत कमी ६००० वर्षें होत आलीं. इतकें प्राचीन देऊळ आजकाल दुसऱ्या कोठेंही नाहीं.

**पोलिसचा कानच कापला**—आंबिवली (ठाणे) येथील पाटील चोरांस सामिल असल्याविषयीं आलेल्या एका निनावी पत्रावरून त्या पाटलास पोलीस पकडून नेत असतां चोरांनीं पोलीसाचे कान कापून टाकले ह्मणतात. चोर हुशार खरे !

—जो आपलें दुकान उत्तम रीतीनें संभाळतो त्याला त्याचें दुकानही चांगल्या रीतीनें संभाळतें.

**कोण परतंत्रता ही**—नागपूरचे राजेबहादूर श्री. रघूजीराव भोसले हे थोड्या दिवसापूर्वी पुणें येथें होते तेव्हां त्यांनीं शहरांत राजचिन्हानिशीं हिंडूं नये अशी पोलिसानें इशारत दिली होती, परंतु मागाहून कलेक्टरांनीं परवानगी दिली असें प्रसिद्ध झालें आहे. राजचिन्हानीं हिंडण्याला सुद्धां आमच्या राजाला परवानगी लागूं लागली. ना !

**सिंहाच्या तोंडातून सोडविलें**—जेतपूर जवळचे एके गांवीं एक सिंह एक लहान मूल घेऊन जात असतां मुलाचे बापानें कुऱ्हाडीचे एका घावांत सिंह ठार करून आपल्या पोराची सुटका केली हें खरें शौर्य व ही खरी शिकार.

**ही परकीय वस्तु कशी सुटेल**-आमच्या घरोघर हल्लीं जे दिवे आह्मी लावीत असतो. त्या दिव्याचें तेल राशियांतून येतें. दिवा जर्मनींत तयार होतो. दिवा लावण्याचें साधन काड्याची पेटी जपान किंवा नार्वे येथून येते. कांचेची नळी वर बसविलेली ज्याला चिमणी ह्मणतात ती आस्ट्रिया येथें तयार होते. असले आह्मी दिवे लावितो ! हिंदुस्थानचा विद्वान किंवा श्रीमान कसा नखशिखांत आणि रात्रंदिवस परदेशी वस्तूनें नटतो याचें हें उत्कृष्ट उदाहरण होय.

**एका साहेबांचे उद्गार**—"जपानी लोक एकसारखे विजयी होत चालल्यामुळें हिंदु लोक धीट होत चाललेले आहेत व असें होणें हें इंग्रजांस हितावह नाहीं." इंग्रजानो चांगलें सावध रहा.

**साहेबांचा कृपाप्रसाद**—हिंदु लोक इंडियाला आपला देश आहे ह्मणून जें ह्मणतात तें अगदीं मूर्खपणाचें आहे. कारण हिंदुस्थान आतां इंग्लिशांनीं जिंकून आपल्या स्वाधीन ठेविलेला आहे तेव्हां तो आतां इंग्लिशांचा देश झाला. हिंदु लोक जे इंडियांत आज राहिलेले आहेत ते केवळ त्यांच्या कृपाप्रसादाचेंच फळ होय. वास्तविक पाहूं जातां आतां हिंदुलोकांना या देशांत पाऊल ठेवण्याचीही सत्ता राहिलेली नाहीं. आतां सर्व देश इंग्रजांचा झालेला आहे. ह्मणून मोठमोठ्या हुद्द्याच्या व सन्मानाच्या जागा इंग्रज लोकच उपभोगणार. कारकुनीच्या व त्याहून हलक्या दर्जाच्या जागा त्यांना करावयाच्या नाहींत ह्मणून ते मेहेरबानी करून त्या जागा हिंदु लोकांस देत आहेत. खरोखर या कृपा प्रसादाबद्दल आपण कसे उतराई होऊं !

**झोंप किती तास घ्यावी**—झोंप किती घ्यावी याचें उत्कृष्ट प्रमाण ह्मणजे जागें झाल्याबरोबर हुशारी वाटत असली कीं, झोंप पुरी झाली असें समजावें. जागें झाल्याबरोबर हुशारी वाटत असली तर तावडतोब उठावें; तसें न करितां आणखी झोंप घेतल्यास त्यापासून फायदा न होतां अपायच होतो, हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें.

**कुरकुऱ्या स्वभाव**—कुरकुऱ्या मनुष्याचा जितका कोणालाही कंटाळा येतो, इतका दुसऱ्या कोणाचाच येत नाहीं. हे राजश्री सदा सुतक्यासारखे असायचे. अंथरूण उकडायला लागलें, थंडी पडली, हें झालें, तें झालें, कांहीं झालें तरी कुरकूर. खरोखर कुरकुरीचें कारण पहावें तर कांहींच नसतें. हे कुरकुरे बहुतकरून आळशी असावयाचे. यांना काम करायला नको. पण कांहीं उद्योग नाहीं, ह्मणूनही हे कुरकुरत असावयाचे. यांची ही संवय काढून टाकायची ह्मणजे यांना शारीरिक किंवा मानसिक श्रम करायला लावलें पाहिजे. चांगले वेठीलाच धरायला पाहिजे. मनुष्यानें कुरकुऱ्या स्वभाव अगदीं सोडून द्यावा. जरा नेट धरावा. काम करण्याला लागावें. कांहीं तरी करावें. कशाचा तरी अभिमान धरावा. नुसतें 'आपल्या हातून काय होईल, कसें होईल, अमुक नाहीं, तमुक नाहीं,' असें करीत बसण्यापेक्षां आपल्या हातून कांहीं तरी चांगलें काम बनवावें. जगांत आपलाही पण उपयोग आहे, असें समजून जोरानें कामास लागावें.

**जपानी लोकांचा मोठा दृढ निश्चय**—एक लेखक असें ह्मणतो—एकाच कामाकडे जपानचा मनुष्य एक महिना घालवील, तितक्या मुदतींत तें काम न संपल्यास तें होईपर्यंत वर्षेंचीं वर्षें, किंबहुना सर्व आयुष्य सुद्धां खर्च करील, परंतु तें संपवील तेंव्हां राहील. मी एकदां एका चतुर कामगारास पंचरशी धातूचा गरूडपक्षी करून देण्यास सांगितलें. त्यावरून त्यानें विचारलें, 'हें काम करण्यांत त्याला द्रव्याची किंवा वेळेची अट करून द्यावी लागेल कीं काय ?' 'नाहीं, काम बरोबर झालें ह्मणजे झालें.'

तीन महिन्यांनीं मी त्याजकडे गेलों. त्यानें नुकताच एक जिवंत गरुड पक्षी संपादन करून आणला होता. त्याच्या बसण्या—उठण्याच्या ढबी व संवयी यांचें तो निरीक्षण करीत व त्याचे पंखांचें हुबेहुब चित्र रेखाटण्यांत तो चूर झाला होता. तो ह्मणाला, "हें सर्व माझे इच्छेनुरूप होण्यापूर्वीच हा पक्षी मरून जाईल व मीही ह्मातारा होईन; तथापि कांहीं हरकत नाहीं. असे पुष्कळ गरुडपक्षी मिळतील, आणि मी मेलों, तर माझा मुलगा हें काम चालवील." शाबास! याला ह्मणावें निश्चय.

—आशियामधील रेल्वेचें रिटर्न तिकीट एकदां घेतलें ह्मणजे तें ४१ वर्षें उपयोगी पडतें. आपल्याकडील रेल्वे कंपनी असाच एखादा नियम करील तर बरें होईल !

**अंधत्व आणणारीं फळें**—क्वीन्सलंडमध्यें एक प्रकारचें झाड आहे, त्याचें फळ खाल्लें असतां मनुष्य आंधळा होतो कोणाच्या वस्तूंत काय विलक्षण गुण ईश्वरानें ठेविला आहे पहा !

**कांटा बोंचलेला नाग**— मद्रासकडे एका वृद्ध ब्राह्मणाच्या स्वप्नांत एक नाग जाऊन त्यानें त्यास आपल्या फडींत बोंचलेला कांटा काढण्याविषयीं विनंती केली. दुसरे दिवशीं तो नाग आला, तेव्हां त्या ब्राह्मणानें त्याच्या फडींतील कांटा काढून टाकिला. ! खरी गोष्ट काय ?

**विचित्र संतति**— काटीयावाडांत एका बाईला एक मुलगा झाला त्याला चार कान, चार आंख व दोन तोंडें आहेत. सगळेंच विचित्र !

**प्रचंड चाकू**—सेंट लुई येथील प्रदर्शनांत एक राक्षशी चाकू मांडिला असून त्याचें पातें ३० फूट लांब आहे. तो उत्तम पोलादाचा केला आहे व त्याच्या मुठीवर कारागिरानें आपल्या कसबाची कमाल केली आहे. हा चाकू वापरण्यास आमच्याकडील मारुती बिभीषणासारखेच चिरंजीव तिकडे गेले पाहिजेत.

**मांजरावर कर**— इंग्लंडांत प्राणिदुःख निवारक मंडळी या संस्थेनें मांजरावर कर बसविण्याचा विचार चालविला आहे. दरेक मांजरांवर २॥ शिलिंग कर घेण्यास हरकत नाहीं असें या संस्थेचें मत पडलें आहे. कारण इंग्लंडांत हल्लीं एंकदर जवळ जवळ साठ लक्ष मांजरें आहेत. त्यांवर वरील कर अमलांत आल्यास बराच फायदा होईल.

**एक गूढ**—महाराज शिंदे सरकार यांनीं सार्वभौम इंग्रज सरकारच्या तैनातीस जे आपलें सैन्य ठेविलें आहे, त्यांत घोडेस्वारांची एक पलटण आणि २ पायदळ पलटणींची भर घालण्याचा त्यांचा विचार आहे. हा त्यांचा स्वतःचा आहे किंवा कोणाच्या इच्छेमुळें असें त्यांस करावें लागत आहे ?

**अनुकरणीय**—कानपूर येथील मारवाड्यांनीं आपआपसांतील तंटे बखेडे तोडण्याकरितां कोर्टांत न जातां ते आपल्या जातीच्या नेमलेल्या पंचमंडळीकडून तोडण्याचें ठरविलें आहे. यापासून पुष्कळ त्रास मिटून पैशाची विनाकारण अपव्यय होणार नाहीं.

**उत्कृष्ट उदाहरण**— मद्रास येथील हायस्कूलच्या सर्व विद्यार्थ्यांनीं एक सभा स्थापन केली असून मद्यपाननिषेध, पवित्रपणा, शाकान्न भक्षण आणि देशी कलाकौशल्याचें उत्तेजन हे विषय त्यांनीं हातीं घेतले आहेत. ह्या सभेचा सभासद होणारानें स्वदेशी माल वापरला पाहिजे असा सभेचा नियम आहे.

**मोगलाई**—खानदेशचे कलेक्टर मि. कर्टिस यांनीं तिकडे मोगलाईच सुरू केली आहे, असें दिसतें. एरंडोलचे मामलेदार मि. भाटवडेकर यांनीं, एका देवळाच्या जीर्णोद्धारास वर्गणी द्या, असा लोकांस उपदेश केला ह्मणून त्यांनीं त्यांची रँक कमी करून हेड कारकून केलें. पाचोऱ्याचे मामलेदार यांनीं कलेक्टरांस नको होता अशा उमेदवारास येऊं दिलें ह्मणून त्यांस साहेबांनीं सस्पेंड केलें आहे.

**जग हे असे आहे**— पुढील वर्षापासून ट्रान्सवालच्या कायदेकौंसिलाचे सर्व सभासद लोकनियुक्त नेमण्याचा हक्क इंग्रज सरकार तेथील वसाहतवाल्यांस देणार आहे! बोअर लोक इंग्रजाशीं लढले ह्मणून हें त्यांस बक्षीस ! आणि हिंदुस्थास राजनिष्ठ ह्मणून त्यांच्या लोकमताची पदोपदीं पायमल्ली ! !

संस्थानिकांस लागणारे कित्येक मोलवान जिन्नस त्यांनीं विलायतेंतील दुकानदारांकडून आणवावेतं, अशी खटपट कांहीं पोलिटिकल एजंट करावयास लागेल आहेत; ह्मणजे ते नुसते पो. एजंट नव्हे तर व्यापारी एजंट बनले आहेत, असें 'कॅपिटल' पत्र ह्मणतें !

**अवतारी पुरुष**— रूसो— जपानी युद्धामुळे अलताई पर्वतांचे आसपास राहणाऱ्या मोंगल लोकांत मोठी गडबड उडाली असून ईश्वर लवकरच अवतार घेऊन आपणांस रशियाचे पारतंत्र्यातून सोडविणार असें त्यांस वाटत आहे. असा एक अवतारी पुरुष आला असून तो सर्वत्र फिरत आहे व त्याचे भोंवतीं हजारों मोंगल व काळमुख अनुयायी जमत आहेत. त्यांचे सांगण्यावरून सर्व मोंगल लोक नोटा मोडून नाणीं घेत आहेत !

**अवाढव्य कामाची जबाबदारी**—पनामासंयोगीभूमींतून कालवा करून अटलांटिक व पासिफिक समुद्र जोडून टाकण्याचें काम अमेरिकन सरकारानें अंगावर घेतलें होतें. पण डा. स्टीफन नांवाच्या अमेरिकन शास्त्रज्ञानें या संयोगीभूमीची पाहणी करून असें ठरविलें आहे कीं, ह्या ४६ मैल लांबीच्या कालव्यासाठीं २० हजार मजूरांस ४६ वर्षें खपावें लागून खर्च १२ कोटी पौंड येईल ! हें जर खरें असेल तर ही कल्पना बहुतेक पार पडणार नाहीं. पण आश्चर्य हें कीं ९० मैलांचा सुवेझ कालवा ८० लक्ष पौंडांत १० वर्षांत पुरा करण्यांत आला आहे.

**जन्माचें सार्थक**- कांहींतरी पराक्रम करून नांव मिळविलें तर जन्मास आल्याचा कांहीं उपयोग. माणसानें आपल्या हातून होईल तितका उद्योग करित रहावें. उद्योगाचें फळ मिळो वा न मिळो, विचारी मनुष्य त्यासाठीं शोक करित बसत नाहीं. स्वाभिमान, धैर्य व उद्योग हीं अंगी पाहिजेत. विद्येनें, तपानें, संपत्तीनें, पराक्रमानें किंवा दुसऱ्या एखाद्या चांगल्या कर्मानें जो दुसऱ्यांना मागें टाकितो, तोच पुरुष खरा; दुसऱ्यानें तोंडांत मारलीतरी खाणारा, नेभळा, अपमान सहन करणारा तो पुरुष कसचा ? दुसऱ्यांनीं टाकिलेल्या तुकड्यावर निर्वाह करणारे, भित्रे, कोणतेंहि साहस करण्यास न धजणारे, पराक्रम करून नांव न मिळवितां रहाणारे, अशा लोकांचें जिणें खरोखर व्यर्थ ह्मटलें पाहिजे.

### शिफारस

रा. रा. नारायण महादेव समर्थ बी. ए. एल. एल. बी. हे मुंबईत हायकोर्टे वकिलीचें काम करीत असतात. त्यांच्या मनांतून यंदा मुंबई युनिव्हर्सिटीच्या आरडीनरी फेलोच्या निवडणुकीच्या वेळीं उमेदवार ह्मणून पुढें यावयाचें आहे. आमच्या या भागांत त्यांची फारशी ओळख नाहीं ह्मणून त्यांच्या संबंधानें आह्मी असें कळवूं इच्छितों कीं, हे गृहस्थ चांगले विद्याव्यासंगी आहेत. त्याच प्रमाणें हे वक्तेहि चांगले आहेत. राष्ट्रीय सभेच्या कामांत यांचा बराच पुढाकार असतो ही गोष्ट त्यांनीं केलेल्या भाषणा वरून पुष्कळांस माहीत असेल. वर्तमानपत्रांच्याद्वारें लोकसेवा करण्याचाहि यांस पुष्कळ नाद आहे. आणि युनिव्हर्सिटीच्या कार्यक्रमाची माहिती यांना चांगली आहे. यांचें वास्तव्य खुद्द मुंबईसच असल्या कारणानें फेलोच्या जागीं यांची निवडणूक झाल्यास ते आपलें काम मन लावून करितील अशी आशा आहे. तर वऱ्हाडांतील ग्र्याज्युएट मंडळींनीं यांच्या निवडणुकी साठीं आपलें मत द्यावें ह्मणून आह्मी ही शिफारस करीत आहों. ही निवडणूक पुढील महिन्याच्या ९ वे तारखेस होणार आहे.

### रणसंग्राम

रुसो-जपानी युद्धा संबंधानें गेल्या आठवड्यांत मोठीच गडबड उडाली होती. सध्यांच्या लढाईचें मोठें थोरलें तोंड ह्मणजे पोर्टआरथरचा वेढा हें होय. पोर्ट आरथर आपल्या हातून जाऊं नये ह्मणून रशियन लोक आपली पराकाष्ठा करीत आहेत पण त्यांच्याच प्रमाणें जपानी लोकांनीहि तें सर करण्याची परमावधि चालविली आहे. ९।६ दिवसांपूर्वी पोर्ट आरथर जपाननें मोठ्या शिताफीनें घेतलें व त्यांचे १४ हजार लोक मेले वगैरे अर्थाची जी एक हूल दाखविणारी बातमी प्रसिद्ध झाली होती तिनें लोकांच्या मनाची मोठी चलबिचल करून सोडली व थंडावलेल्या लढाईच्या हकीकतींत बराच जीव ओतला. पण ही बातमी खरी असल्याबद्दल अद्यापपावेतों कोठूनच विंतबातमी आलेली नाहीं. अर्थात पोर्ट आरथर अद्याप सर झालेलें नाहीं. इतकी मात्र गोष्ट खरी कीं, पोर्ट आरथरच्या जवळपास मोठ्या हातघाईची व निकराची लढाई चालू आहे आणि जपानी लोकांनीं शेकिो नांवाची एक मान्याची जागाहि हस्तगत करून घेतली आहे. यावरून जपानी योद्ध्यांच्या हातास लवकरच यश येईल असा रंग आहे.

दुसरीकडे लायोयेंग जवळील दोन तीन महत्वाची ठिकाणें जपाननें काबीज केली आहेत व रशियन लोक पळून जात आहेत. लायोयेंग जवळच रशियन जनरल कुरोपॅटकीन यांच्या विस्तृत सैन्याचा तळ पडला आहे आणि त्याच्याशीं लढाई देण्यासाठीं जपानी जनरल ओकू यांची तयारी झाली आहे. या ठिकाणीं एक निकराची लढाई झाल्या शिवाय राहणार नाहीं असा अदमास आहे.

रशियांतील लोकांचीं मनें बिघरलीं आहेत, त्यांच्या पोटांत रशियाच्या राजाविषयी अप्रेम व असंतोष वागत आहे आणि ते सध्यांच्या लढाईंत जपानी लोकांकडून पैसे खाऊन घरभेदेपणा करीत आहेत वगैरे गोष्टी आपण ऐकतो व त्या खऱ्या असल्या बद्दल आपणांस कांहीं खालील गोष्टींत प्रत्यंतरी पुरावाहि मिळतो आहे.

कौंट टाल्स्टाय यांनी जपानच्या लढाईवर कोणीहि रशियनानें जाऊं नये अशा बद्दल जो लेख प्रसिद्ध केला तो लेख अर्थात् रशियाच्या दृष्टीनें बरा नव्हता. ऐन प्रसंगीं आपल्यांतीलच एक मोठा मनुष्य आपल्याच लोकांना असा घरभेदेपणाचा उपदेश करीत आहे हें पाहून झाराला अत्यंत वाईट वाटलें असेल यांत शंका नाहीं. हा उपदेश कितीहि चांगला असला तरी कालदेशवर्तमाना प्रमाणें मुत्सद्दीपणाचा बिलकुल नाहीं हें खास. हा उपदेश लढाई सुरूं होण्यापूर्वींचा आहे. आणि आतां ती उपदेशवेला निघून गेली आहे. असो वरील लेखानें रशियांत बरीच गडबड झाली, आणि ह्मणून टाल्स्टाय यांस हद्दपार करण्याचा विचारहि झाला होता, पण असें करण्यानें प्रकरण जास्त चिडेल ह्मणून कांहींच करण्यांत आलें नाहीं.

प्लेव्ह नांवाच्या रशियन मंत्र्यानें टाल्स्टाय यांस हद्दपार करण्याचा सल्ला दिला होता. ह्मणून तो गाडींतून जात असतांना कोणी एकानें त्याच्या गाडींत बांब गोळा फेंकला व त्यामुळें गाडीवान घोडे व गाडी यांच्या चिंध्या झाल्या. व प्लेव्ह यांचे हात पाय तुटून उडून गेले. खुनी मनुष्यास पकडलें होतें पण तो मरण पावला असल्यामुळें गुप्त कटाची कांहीं बातमी लागली नाहीं.

ह्याच प्रसंगास रशियाच्या पोलंडामध्यें राज्यक्रांति होण्याचा रंग वाटत आहे ह्मणून तेथें लष्करी कायदा सुरूं करण्याविषयीं तेथील गव्हरनर झार साहेबांस कळवीत आहेत.

वरील गोष्टी रशियांतील अस्वस्थ अवस्था लोकांचा असंतोष, खुनी लोकांची बंडाळी व राज्यक्रांतीचा कट हे व्यक्त करीत आहेत. तरी इतक्या गोष्टींवरून सर्वच रशियांत असंतोष वाढत आहे असें कोणी समजूं नये. झारवर पुष्कळांचें चांगलें प्रेम आहे व त्याजवर लोकांचा मोठा विश्वास आहे असें एका ऐरिश बातमीदाराचें खात्रीचें सांगणें आहे.

जपानी लोकांनीं अलिकडे एक मोठी गमतीची युक्ती लढविली आहे व त्या बद्दल रशियन लोक उगीच कुरकुर करीत आहेत. लांकडाचे थोरले ओंडे घेऊन ते हुबेहूब तोफे प्रमाणें दिसतील असा त्यास रंग देतात व तेच ओंडे तोफे प्रमाणे डागतात. हे ओंडे खऱ्या तोफा आहेत असें समजून रशियन लोक त्यांच्यावरच आपल्या तोफांचा मारा करितात. पण जपानी लोकांनीं खऱ्या तोफा दुसरी कडेच राखलेल्या असल्यामुळें अनायासें ते शत्रूचा, पराभव करून आपला बचाव करितात. बिनधुराची दारू उपयोगांत असल्यामुळें शत्रूस खरी तोफ कोठून सुटली हें कळण्याचा मार्ग नाहीं आणि यामुळें रशियन लोक चांगलेच फसतात. ही युक्तीची कर्तबगारी खरोखर नांवाजण्या सारखीच होय.

जर्मनीचे सेनाधिपती मेकेल हे कांहीं दिवस जपानच्या सैन्याचे मुख्य शिक्षक होते. त्यांनीं जपानी लोकांसंबंधानें आपला अनुभव सहज सांगितला कीं, जपानी लोक असेच विजयी होतील. ते मोठे हिय्येबाज लोक असून ते कधींहि कच खाणारे नाहींत. त्यांची युद्धाची सामुग्रीसिद्धता उत्तम आहे. ते अचूक नेम मारणारे असून त्यांचे रणधुरंधर जनरल हे उत्तम डोक्याचे आहेत व त्यांच्या तोडीचा रशियन जनरल क्वचितच सांपडेल." जपानासंबंधानें असे हे तिऱ्हाईत लोकांचे उद्गार ऐकून जपानी लोकांबद्दल कोणास प्रेम उत्पन्न होणार नाहीं !

तिबेटा कडील वर्तमान ह्मणजे इंग्रज लोक एक एक पाऊल पुढेंपुढें बिनधोक सरकत आहेत हें होय. गियांटसे सोडल्या पासून इंग्रजी मिशनला तिबेटी लोकांनीं मुळींच त्रास दिला नाहीं असें ह्मटल्यास चालेल. ते लोक मिशनची फौज येण्यापूर्वींच आपलीं ठिकाणें सोडून जातात. आतां ल्हासा शहरांत इंग्रजांना पाय टेकण्यास फारसा कालावधी लागणार नाहीं. सध्यां ब्रह्मपुत्रा नदाच्या अलीकडच्या कांठावर मिशन येऊन पोहोंचलें आहे. हा नद तरून जाण्याचे उपाय सुरूं आहेत. नदाच्या पाण्यांत भोंवरे असल्यामुळें बोडी, गाढवें व मनुष्यें वाहून मरून जातात. आमच्या मुखत्याराबरोबर तह करावा व ल्हासापर्यंत येण्याची दगदग करूं नये ह्मणून यंगहजबंड साहेबांस ल्हासाकडून खलिता आला होता परंतु साहेबांनीं उत्तर केलें कीं, जमल्यास तह करूं, पण ल्हासा येथें आल्यावांचून आतां राहणार नाहीं. असो आपल्या इंग्रजांचो भीष्म प्रतिज्ञा शेवटास जात आहे ह्यांत आपणांस आनंदच आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— आश्लेषा नक्षत्राच्या पावसानें चांगली बहार केली. पिकें जोमदार आहेत. हवेंतली गर्मी मोडून थंडपणा येऊं लागला आहे. एकंदर पाणी १६ इंच झालें.

**रोगराई**— प्लेगाचा आजार नाहीं ह्मटलें तरी चालेल पण पटकीचा उपद्रव बहुतेक ठिकाणीं सुरूच आहे. अलिकडे तीन चार वर्षें हा गोळीचा आजार फारसा नव्हता. पण यंदा त्याचें स्वरूप खडतर आहे. आकोल्यास मृत्यूचें दररोजचें प्रमाण ८।१० वर येऊन बसलें आहे.

रायबहादुर ईश्वरप्रसाद एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, नागपूर यांची बदली हुशंगाबादेस झाल्या अन्वयें ते तिकडे जातांना आकोल्यास उतरले होते आणि त्यांनीं येथील अध्यात्म विद्येच्या शाखेला आपल्या विचारसरणीचा चांगला लाभ करून दिला. हे गृहस्थ चांगले प्रेमळ असून अध्यात्मविद्येमध्यें त्यांची गती पुष्कळ पुढें आहे.

रा. रा. विश्वनाथ काशीनाथ काळे, वकील, उमरावती यांनीं येथील वर्षोंतिल व्याख्यानमालेचा काल सायंकाळीं सुरुवात केली. संभाषणाचा विषय 'ईश्वरविषयक ज्ञानास प्रतिबंध' असा होता.

रा. रा. व्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर हे गेल्या गुरुवारापासून रजेवर गेले. त्या दिवशीं हायकोर्टांत सर्व वकील मंडळी एकत्र जमली होती व रावबहादूर मुधोलकर यांनीं साहेब बहादुरांच्या न्यायीपणा बद्दल धन्यवाद गाऊन विलायतेची सफर प्रकृतीला चांगली आरामदायक होवो अशी आशा प्रदर्शित केली.

रा. रा. रुस्तुमजी फर्दुनजी डिपुटी कमिशनर यांच्याकडे जुडिशिअल कमिशनरचे कोर्टाचा चार्ज देण्यांत आला आहे हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो

रा. रा. चेंबरलेन असि. कमिशनर नागपुर यांस कांहीं मुदतीसाठीं उमरावतीस बदलण्यांत आलें आहे.

रा. रा. जी. सुब्रायलू नायडू एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांच्या सहा आठवड्यांच्या रजेंत रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर तहशिलदार, दारव्हा यांस एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर नेमण्यांत आलें. ही निवडणूक यथान्याय झाली आहे.

रा. रा. मेलोनी असिस्टंट पोलिस सुपरिनटेंडंट, उमरावती यांस आकोल्यास बदलण्यांत आलें.

येथील तुरुंगांत चोरून सांठवलेली नीळ जेल-कंत्राटदार विठ्ठलदास यानें मुंबईस विकण्यासाठीं रवाना केली असें शाबीत झाल्यावरून त्यास तीन महिने साधी कैद व २०० रुपये दंड अशी सौम्य प्रकारची शिक्षा देण्यांत आली. विठ्ठलदासाचें वयोमान, जेल-कंट्राक्टर या नात्यानें त्याचा जेलच्या अधिकाऱ्यांशीं असलेला संबंध व त्याच्या गुन्ह्याची लघुता ही लक्ष्यांत घेऊन वरील निकाल सांगण्यांत आला.

कि० दि. क्का. नं. १८ मि. नं. ३/१९०४

विद्यमान सिव्हिल जड्ज साहेब बहादूर जिल्हा आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार—गणपत वल्लद बाळाजी वंजारी राहणार लोतखेड तालुके आकोट.

अज्ञान— मोतीराम वल्लद रामचंद्र वंजारी राहणार लोतखेड ता० आकोट.

या नोटिसीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं अज्ञान मोतीराम वल्लद रामचंद्र वंजारी राहणार लोतखेड तालुके आकोट यांचें स्वतःचें व इस्टेटीचें अशा दोन्हीचें पालनकर्ता नेमण्या बद्दल अर्जदार यानें या कोर्टास अर्ज दिल्यावरून त्याचे चौकशीची तारीख २७।८।१९०४ इसवीची नेमली आहे तरी सदर्हू अज्ञानाचे बरें व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं वरील तारखेस ज्यास पालनकर्ता नेमणें इष्ट असेल त्यास घेऊन यावें व अर्जदार यास त्याने अर्जी प्रमाणें पालनकर्ता नेमल्यास कोणाची कांहीं हरकत असल्यास त्यांनीं आमचे समोर हजर राहावें.

आज तारीख ३ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे मुद्रानिशी व कोर्टाचे शिक्कानिशी दिली असे.

Sk. Ismail
सिव्हिल जड्ज, आकोला.

### वर्तमानसार.

**सुभाषित**—मूर्ख मनुष्याचें हृदय त्याच्या तोंडांत असतें व शहाण्याचें तोंड त्याच्या हृदयांत असतें. ह्मणजे मूर्ख मनुष्य जें मनांत येईल तें विचार न करितां वाटेल त्याच्यापाशीं आपला बेहकत सुटतो पण तोच शहाणा मनुष्य दुसऱ्यापाशीं आपल्या मनांतली गोष्ट सहसा कधीं बोलून दाखवीत नाहीं.

**अत्यंत जुनें देवालय**—मद्रास इलाख्यांत उत्तर अर्काट प्रांतांत श्रीव्यंकेटशाचलप् नांवाच्या टेंकडीवर वेंकटेशाचें देवालय बांधलेलें आहे त्यास सुमारें आज कमींत कमी ५००० वर्षें होत आलीं. इतकें प्राचीन देऊळ आजकाल दुसऱ्या कोठेंही नाहीं.

**पोलिसचा कानच कापला**—आंबिवली (ठाणे) येथील पाटील चोरांस सामिल असल्याविषयीं आलेल्या एका निनावी पत्रावरून त्या पाटलास पोलीस पकडून नेत असतां चोरांनीं पोलीसाचे कान कापून टाकले ह्मणतात. चोर हुशार खरे!

—जो आपलें दुकान उत्तम रीतीनें संभाळतो त्याला त्याचें दुकानही चांगल्या रीतीनें संभाळतें.

**कोण परतंत्रता ही**—नागपूरचे राजेबहादूर श्री. रघूजीराव भोसले हे थोड्या दिवसापूर्वीं पुणें येथें होते तेव्हां त्यांनीं शहरांत राजचिन्हानिशीं हिंडू नये अशी पोलिसानें इशारत दिली होती, परंतु मागाहून कलेक्टरांनीं परवानगी दिली असें प्रसिद्ध झालें आहे. राजचिन्हानीं हिंडण्याला सुद्धां आमच्या राजाला परवानगी लागूं लागली. ना!

**सिंहाच्या तोंडातून सोडविलें**—जेतपूर जवळचे एके गांवीं एक सिंह एक लहान मूल घेऊन जात असतां मुलाचे बापानें कुऱ्हाडीचे एका घावांत सिंह ठार करून आपल्या पोराची सुटका केली हें खरें शौर्य व ही खरी शिकार.

**ही परकीय वस्तु कशी सुटेल**-आमच्या घरोघर हल्लीं जे दिवे आह्मी लावीत असतो. त्या दिव्याचें तेल रशियांतून येतें. दिवा जर्मनींत तयार होतो. दिवा लावण्याचें साधन काड्याची पेटी जपान किंवा नार्वे येथून येते. कांचेची नळी वर बसविलेली ज्याला चिमणी ह्मणतात ती आस्ट्रिया येथें तयार होते. असले आह्मी दिवे लावितो! हिंदुस्थानचा विद्वान किंवा श्रीमान कसा नखशिखांत आणि रात्रंदिवस परदेशी वस्तूनें नटतो याचें हें उत्कृष्ठ उदाहरण होय.

**एका साहेबांचे उद्गार**—"जपानी लोक एकसारखे विजयी होत चालल्यामुळें हिंदु लोक धीट होत चाललेले आहेत व असें होणें हें इंग्रजांस हितावह नाहीं." इंग्रजानो चांगलें सावध रहा.

**साहेबांचा कृपाप्रसाद**—हिंदु लोक इंडियाला आपला देश आहे ह्मणून जें ह्मणतात तें अगदीं मूर्खपणाचें आहे. कारण हिंदुस्थान आतां इंग्लिशानीं जिंकून आपल्या स्वाधीन ठेविलेला आहे तेव्हां तो आतां इंग्लिशांचा देश झाला. हिंदु लोक जे इंडियांत आज राहिलेले आहेत ते केवळ त्यांच्या कृपाप्रसादाचेंच फळ होय. वास्तविक पाहूं जातां आतां हिंदुलोकांना या देशांत पाऊल ठेवण्याचीही सत्ता राहिली नाहीं. आतां हा देश इंग्रजांचा झालेला आहे. ह्मणून मोठमोठ्या हुद्द्याच्या व सन्मानाच्या जागा इंग्रज लोकच उपभोगणार. कारकुनीच्या व त्याहून हलक्या दर्जाच्या जागा त्यांना करावयाच्या नाहींत ह्मणून ते मेहेरबानी करून त्या जागा हिंदु लोकांस देत आहेत. खरोखर या कृपा प्रसादाबद्दल आपण कसे उतराई होऊं!

**झोंप किती तास घ्यावी**—झोंप किती घ्यावी याचें उत्कृष्ट प्रमाण ह्मणजे जागें झाल्याबरोबर हुशारी वाटत असली कीं, झोंप पुरी झाली असें समजावें. जागें झाल्याबरोबर हुशारी वाटत असली तर तावडतोब उठावें; असें न करितां आणखी झोंप घेतल्यास त्यापासून फायदा न होतां अपायच होतो, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

**कुरकुऱ्या स्वभाव**—कुरकुऱ्या मनुष्याचा जितका कोणालाही कंटाळा येतो, इतका दुसऱ्या कोणाचाच येत नाहीं. हे राजश्री सदा सुतक्यासारखे असायचे. अंधक उकडायला लागलें, थंडी पडली, हें झालें, तें झालें, कांहीं झालें तरी कुरकूर. खरोखर कुरकुरीचें कारण पहावें तर कांहींच नसतें. हे कुरकुरे बहुतकरून आळशी असावयाचे. यांना काम करायला नको. पण कांहीं उद्योग नाहीं, ह्मणूनही हे कुरकुरत असावयाचे. यांची ही संवय काढून टाकायची ह्मणजे यांना शारीरिक किंवा मानसिक श्रम करायला लावलें पाहिजे. चांगले वेठीलाच धरायला पाहिजे. मनुष्यानें कुरकुऱ्या स्वभाव अगदीं सोडून द्यावा. जरा नेट धरावा. काम करण्याला लागावें. कांहीं तरी करावें. कशाचा तरी अभिमान धरावा. नुसतें 'आपल्या हातून काय होईल, कसें होईल, अमुक नाहीं, तमुक नाहीं,' असें करित बसण्यापेक्षां आपल्या हातून कांहीं तरी चांगलें काम बजवावें. जगांत आपलाही पण उपयोग आहे, असें समजून जोरानें कामास लागावें.

**जपानी लोकांचा मोठा दृढ निश्चय**—एक लेखक असें ह्मणतो—एकाच कामाकडे जपानचा मनुष्य एक महिना घालवील. तितक्या मुदतींत तें काम न संपल्यास तें होईपर्यंत वर्षांचीं वर्षें, किंबहुना सर्व आयुष्य सुद्धां खर्च करील, परंतु तें संपवील तेंव्हां राहील. मी एकदां एका चतुर कामगारास पंचरशी धातूचा गरूडपक्षी करून देण्यास सांगितलें. त्यावरून त्यानें विचारलें, 'हें काम करण्यांत त्याला द्रव्याची किंवा वेळेची अट करून द्यावी लागेल कीं काय?' 'नाहीं, काम बरोबर झालें ह्मणजे झालें.'

तीन महिन्यांनीं मी त्याजकडे गेलों. त्यानें नुकताच एक जिवंत गरुड पक्षी संपादन करून आणला होता. त्याच्या बसण्या—उठण्याच्या ढबी व संवयी याचें तो निरीक्षण करीत व त्याचे पंखांचें हुबेहुब चित्र रेखाटण्यांत तो चूर झाला होता. तो ह्मणाला, "हें सर्व माझे इच्छेनुरूप होण्यापूर्वीच हा पक्षी मरून जाईल व मीही ह्मातारा होईन; तथापि कांहीं हरकत नाहीं. असे पुष्कळ गरुडपक्षी मिळतील, आणि मी मेलों, तर माझा मुलगा हें काम चालवील." शाबास! याला ह्मणावें निश्चय.

—रशियामधील रेल्वेचें रिटर्न तिकीट एकदां घेतलें ह्मणजे तें ४९ वर्षें उपयोगी पडतें. आपल्याकडील रेल्वे कंपनी असाच एखादा नियम करील तर बरें होईल!

**अंधत्व आणणारीं फळें**—क्वीन्सलंडमध्यें एक प्रकारचें झाड आहे, त्याचें फळ खाल्लें असतां मनुष्य आंधळा होतो कोणच्या वस्तूंत काय विलक्षण गुण इश्वरानें ठेविला आहे पहा!

**कांटा बोंचलेला नाग**— मद्रासकडे एका वृद्ध ब्राह्मणाच्या स्वप्नांत एक नाग जाऊन त्यानें त्यास आपल्या फडींत बोंचलेला कांटा काढण्याविषयीं विनंती केली. दुसरे दिवशीं तो नाग आला, तेंव्हां त्या ब्राह्मणानें त्याच्या फडींतील कांटा काढून टाकिला.! खरी गोष्ट काय?

**विचित्र संतति**— काठीयावाडांत एका बाईला एक मुलगा झाला त्याला चार कान, चार आंख व दोन तोंडें आहेत. सगळेंच विचित्र!

**प्रचंड चाकू**—सेंट लुई येथील प्रदर्शनांत एक राक्षशी चाकू मांडिला असून त्याचें पातें ३० फूट लांब आहे. तो उत्तम पोलादाचा केला आहे व त्याच्या मुठीवर कारागिरानें आपल्या कसबाची कमाल केली आहे. हा चाकू वापरण्यास आमच्याकडील मारुती बिभीषणासारखेच चिरंजीव तिकडे गेले पाहिजेत.

**मांजरावर कर**— इंग्लंडांत प्राणिदुःख निवारक मंडळी या संस्थेनें मांजरावर कर बसविण्याचा विचार चालविला आहे. दरेक मांजरावर २॥ शिलिंग कर घेण्यास हरकत नाहीं असें या संस्थेचें मत पडलें आहे. कारण इंग्लंडांत हल्लीं एंकदर जवळ जवळ साठ लक्ष मांजरें आहेत. त्यांवर वरील कर अमलांत आल्यास बराच फायदा होईल.

**एक गूढ**—महाराज शिंदे सरकार यांनीं सार्वभौम इंग्रज सरकारच्या तैनातीस जे आपलें सैन्य ठेविलें आहे, त्यांत घोडेस्वारांची एक पलटण आणि २ पायदळ पलटणींची भर घालण्याचा त्यांचा विचार आहे. हा त्यांचा स्वतःचा आहे किंवा कोणाच्या इच्छेमुळें असें त्यांस करावें लागत आहे?

**अनुकरणीय**—कानपूर येथील मारवाड्यांनीं आपआपसांतील तंटे बखेडे तोडण्याकरितां कोर्टांत न जातां ते आपल्या जातीच्या नेमलेल्या पंचमंडळीकडून तोडण्याचें ठरविलें आहे. यापासून पुष्कळ त्रास मिटून पैशाची विनाकारण अपव्यय होणार नाहीं.

**उत्कृष्ट उदाहरण**— मद्रास येथील हायस्कूलच्या सर्व विद्यार्थ्यांनीं एक सभा स्थापन केली असून मद्यपाननिषेध, पवित्रपणा, शाकान्न भक्षण आणि देशी कलाकौशल्यास उत्तेजन हे विषय त्यांनीं हातीं घेतले आहेत. ह्या सभेचा सभासद होणारानें स्वदेशी माल वापरला पाहिजे असा सभेचा नियम आहे.

**मोगलाई**—खानदेशचे कलेक्टर मि. कर्टिस यांनीं तिकडे मोगलाईच सुरू केली आहे, असें दिसतें. एरंडोलचे मामलेदार मि. भाटवडेकर यांनीं, एका देवळाच्या जीर्णोद्धारास वर्गणी द्या, असा लोकांस उपदेश केला ह्मणून त्यांनीं त्यांची रँक कमी करून हेड कारकून केलें. पाचोऱ्याचे मामलेदार य.नीं कलेक्टरांस नको होता अशा उमेदवारास येऊं दिलें ह्मणून त्यांस साहेबांनीं सस्पेंड केलें आहे.

**जग हे असे आहे**— पुढील वर्षीपासून ट्रान्सवालच्या कायदेकौंसिलाचे सर्व सभासद लोकनियुक्त नेमण्याचा हक्क इंग्रज सरकार तेथील वसाहतवाल्यांस देणार आहे! बोअर लोक इंग्रजांशीं लढले ह्मणून हें त्यांस बक्षीस! आणि हिंदुस्थास राजनिष्ठ ह्मणून त्यांच्या लोकमताची पदोपदीं पायमल्ली!!

संस्थानिकांस लागणारे कित्येक मोलवान जिन्नस त्यांनीं विलायतेंतील दुकानदारांकडून आणवावेत, अशी खटपट कांहीं पोलिटिकल एजंट करावयास लागेल आहेत; ह्मणजे ते नुसते पो. एजंट नव्हे तर व्यापारी एजंट बनले आहेत, असें 'कॅपिटल' पत्र ह्मणतें!

**अवतारी पुरुष**— रूसो—जपानी युद्धामुळें अल्ताई पर्वतांचे आसपास राहणाऱ्या मोंगल लोकांत मोठी गडबड उडाली असून ईश्वर लवकरच अवतार घेऊन आपणांस रशियाचे पारतंत्र्यांतून सोडविणार असें त्यांस वाटत आहे. असा एक अवतारी पुरुष आला असून तो सर्वत्र फिरत आहे व त्याचे भोंवतीं हजारों मोंगल व काळमुख अनुयायी जमत आहेत. त्याचे सांगण्यावरून सर्व मोंगल लोक नोटा मोडून नाणीं घेत आहेत!

**अवाढव्य कामाची जबाबदारी**—पनामासंयोगीभूमींतून कालवा करून अटलांटिक व पासिफिक समुद्र जोडून टाकण्याचें काम अमेरिकन सरकारानें अंगावर घेतलें होतें. पण डा. स्टीफन नांवाच्या अमेरिकन शास्त्रज्ञानें या संयोगीभूमीची पाहणी करून असें ठरविलें आहे कीं, ह्या ४६ मैल लांबीच्या कालव्यासाठीं २० हजार मजूरांस ४६ वर्षें खपावें लागून खर्च १२ कोटी पौंड येईल! हें जर खरें असेल तर ही कल्पना बहुतेक पार पडणार नाहीं. पण आश्चर्य हें कीं ९० मैलांचा सुवेझ कालवा ८० लक्ष पौंडांत १० वर्षांत पुरा करण्यांत आला आहे.

**जन्माचें सार्थक**- कांहींतरी पराक्रम करून नांव मिळविलें तर जन्मास आल्याचा कांहीं उपयोग. माणसानें आपल्या हातून होईल तितका उद्योग करित रहावें. उद्योगाचें फळ मिळो वा न मिळो, विचारी मनुष्य त्यासाठीं शोक करित बसत नाहीं. स्वाभिमान, धैर्य व उद्योग हीं अंगी पाहिजेत. विद्येनें, तपानें, संपत्तीनें, पराक्रमानें किंवा दुसऱ्या एखाद्या चांगल्या कर्मानें जो दुसऱ्यांनां मागें टाकितो, तोच पुरुष खरा; दुसऱ्यानें तोंडांत मारलीतरी खाणारा, नेभळा, अपमान सहन करणारा तो पुरुष कसचा? दुसऱ्यांनीं टाकिलेल्या तुकड्यावर निर्वाह करणारे, भित्रे, कोणतेंहि साहस करण्यास न धजणारे, पराक्रम करून नांव न मिळवितां रहाणारे, अशा लोकांनीं निर्गे खरोखर व्यर्थ ह्मटलें पाहिजे.

GISTERED No. N.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........।१ ०६
दुसरे खेपेस.............।१

Single copy ..................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line „ 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 15 AUGUST 1904 NO 32

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १५ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३२

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

## जाहिरात
### अल्प किंमतींत मोठा लाभ

खालीं लिहिलेलीं बोधपर, मनोरंजक, मोक्षमार्गदर्शक, चित्तरंजक व अगदीं नवीन पुस्तकें छापून तयार आहेत. तरी जिज्ञासु व मुमुक्षु लोकांनीं अवश्य मागविण्याची त्वरा करावी. खालील कोणतीहि पुस्तकें एकदम एक रुपयाची घेतल्यास टपाल खर्च माफ.

| पुस्तकाचें नांव | किंमत | ट० ख० |
|---|---|---|
| आत्मबोधामृत | ०-। | ०॥ |
| श्री सद्गुरुप्रसादिक अभंग | ०= | ०॥ |
| श्री व्यंकटेशाष्टक | ०। | ०॥ |
| श्रीरामप्रासादिक जिवन्मुक्तिचे अभंग | ०= | ०॥ |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता— व्ही. बी.
हेड मास्तर मु० असलगांव
जि. आकोला वऱ्हाड.

दिवाणी मि० मु० नंबर ४
१९०४ वर्ग २२

सन १८८१ चा अक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें प्रोबेट सरटिफिकीट मिळण्या विषयीं अर्ज केल्यावरून (जाहिरनामा)

विद्यमान डिस्ट्रिक्ट जडज्य साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत

श्रीराम वल्लद बखतराम मारवाडी राहणार कसबे तळेगांव दशासर तालुके चांदूर जिल्हे उमरावती— अर्जदार.

रामधन वल्लद लछमणदास मारवाडी राहणार मौजे नाड गावंडी यांनें तारीख ७ माहे जानेवारी सन १९०४ इसवी रोजीं आपले जिनगीचें मृत्युपत्र करून ठेवल्या प्रमाणें प्रोबेट आणि अॅडमिनीस्ट्रेशन (आक्ट नंबर ५ सन १८८१) च्या कलम ६२ किंवा ६४ अन्वयें सरटीफिकीट मिळावें ह्मणून वरील अर्जदार यांनें अर्ज केला आहे. याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांनीं या जाहिरनाम्याचें द्वारें कळविण्यांत येते कीं त्यांनीं सदर्हू अर्जाची चौकशी विद्यमान दिस्ट्रिक्ट जडज्य साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचें कोर्टांत तारीख १७ माहे सपटंबर सन १९०४ इसवी रोजीं दिवसाचे अकरा ११ वाजतां उमरावती येथें केली जाईल. त्यावेळीं सदर्हू कोर्टांत हजर होऊन सरटीफिकीट मिळे पावेतों जें काम चालेल तें पाहावें.

ही नोटीस आज तारीख ९ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

D. O. Moris
डिस्ट्रिक्ट जडज्य साहेब
जिल्हे उमरावती

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, मौजे पिंपरी गौळी प्रगणें व तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें येथील स्वसंपादित स्थावर माल धाब्याचें घर खांडें १२ खांब १८ पु. प. लांब हात २० द. उ. रुंद हात ११ याचा दर्शनी भाग पुर्वेस आहे याची चतुसिमा पु. रस्ता प. चावडीत जाण्याचा रस्ता द. हुशा भोळे यांचें घर उ. चावडी येणें प्रमाणें चतुसीमापुरक घांबें मी व माझा मयत भाऊ हनवंता वल्लद आनंदा कासार या उभयतांनीं विकत घेतलें आहे. मझा भाऊ हनवंता फ्लेगनें वारल्यामुळें वर लिहिलेल्या जागेंत त्याची बायको सारजा मर्द हनवंता ही रहात आहे तिजला संतती कांहीं नाहीं. तिचे मरणनंतर ह्या जागेचा मी वारस आहे. हल्लीं तिजला या जागेंत फक्त मरेपर्यंत राहण्याचा हक्क आहे ह्मणून कळविण्यांत येतें कीं, सदर्हू घर कोणीही खरेदी, गहाण, अगर बक्षिस कोणतेंच प्रकारें घेऊं नये. घेतल्यास तें बातल आहे असें समजलें जाईल. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १९०४ इसवी०

सही
खंडू वल्लद आनंदा कासार राहणार पिंप्री गौळी प्रगणे व तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें निशाणी खुद हातची रेघ ——

## नोटीस.

मे. तसदूक हुसेन व. महमद शिकंदर अ. पा. करणार आई बनीबी मर्द महमद शिकंदर रा. पातूरशेख बाबू ता. बाळापूर.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कर्ज रुपये ५० माझेकडें असल्यामुळें मी माझा मौजे पाळराजुरे परगणें पातूर येथील शेत सर्वे नंबर १७ यातील $\frac{1}{3}$ हिस्सा तुह्मांस फेडीकरितां फसली सन १३११, १३१२, १३१३ असे तीन सालाकरितां वहितीस दिला होता. तुमचा व आमचा तोंडी ठराव चार चौघा देखत असा झाला कीं तीन वर्षें पुरीं झाल्यावर शेत माझे मला परत द्यावें. असे असून मी माझे शेत चालूं सालीं पेरण्यास सुरुवात केली असतां तुह्मी पेरूं न देतां जबरदस्तीनें तुह्मीच पेरलें हे योग्य केलें नाहीं तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत माझे शेत पीकासुद्धां माझे ताब्यांत द्यावें असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून पीकासुद्धां शेत ताब्यांत घेण्यास जो खर्च येईल तो व या नोटिशीचा खर्च असा एकंदर सर्व खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. आगाऊ सुचना केली आहे कळावें ता. १०।८।०४ इसवी.

सही
बाळकी मर्द भीमा बंजारी
राहणार बोंडला ता.
बाळापूर निशाणी खुद्द
हातची बांगडी.

## नोटीस

बेशमी विठु वल्लद सोनाजी म्हाळी वस्ती अडगांव जहागिर यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे अडगांव जहागिर ता. आकोट येथील शेत सर्वे नंबर ८३ एकर गुंठ ३८३६ आकार रुपये ८ चे शेताची लागवड आज पर्यंत सरकारी साऱ्यावर तुह्मा कडे आहे. आजपर्यंत आमचे संतोषानें तो सारा घेत होतो. त्यापेक्षां आतां आमची इच्छा जास्त घेण्याची असून पुढील सालापासून २२ रुपये घेण्याची ईच्छा आहे. तुह्मे मर्जीस वाटल्यास शेत वहितीस बावीस रुपये लागवणीची लेखी कबुलायत देऊन ठेवावी. नाहीं पेक्षा शेत सोडून द्यावें. या बद्दल खुलासा नोटीस पोहचतांच एक महिन्याचे आंत कळवावे; नाहीं तर तुमचा ताबा काढण्या विषयीं तजवीज केली जाऊन फसली सन १३१४ चे रुपये २२ बावीस व नोटीशीचा व इतर खर्च मिळून सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ९।८।१९०४ इसवी.

सही
गदाधर श्रीधर जाहगीरदार
अडगांव जाहागीर ता०
आकोट, दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा० जाणू वल्लद अमराजी सरोदे वस्ती अकोली जाहगीर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे राजूर तालुके अकोट येथील सर्व्हे नंबर १४ चे शेत गुदस्त सालीं ४०० चारशे रुपयास तुह्मास ताबेगहाण खत लिहून दिलें आहे. या गाहाणखताचे भरण्या पैकीं रुपये १०० शंभर तुमचे जवळ लागवडी करितां अनामत ठेऊन ते रुपये पूर्वी भरून पावल्याचे दस्तऐवज नोंदणाऱ्या अमलदारा समोर जबाब झाला. त्याप्रमाणें पेरणी होईपावेतों तुह्मी माझे संमतीनें माझ्या अनामत पैशातून खर्च करीत गेले. पुढें माझी पर्वा न करितां पुढील किस्तगागी तुम्ही स्वतः केली. पीक तयार झाल्यावर मी हरकत करूं लागलो असतां तुम्ही चार चवघात कबूल केलें कीं, जवारीचा माल (रास) तयार झाल्यावर पंचा समक्ष हिशेब करूं, त्याप्रमाणें तुम्ही केलें नाहीं. शिवाय ह्या सालीं तुम्ही तीं शेतें माझे विचारा खेरीज लाऊन काढलें असें ऐकतो; पण चांगले शहाणेग लोक एक सालचे स्वामीत्वाबद्दल रुपये ३०० तीनशे देण्यास तयार होते; ह्या साठीं सदर्हू नोटीस पावल्यापासून गुदस्त सालचे पिकाच्या खर्चासुद्धां हिशेब व सालमजकूरचे लागवण हीं सर्व माझे अनामत असलेल्या पैशासुद्धां तुमचे कर्जाची फेड झाली आहे व माझी शिल्लक असेल ते ८ आठ दिवसांत पंचा समक्ष अथवा नोटिसीनें कळवावें. त्याप्रमाणें तुह्मी जर केलें नाहीं तर तुमचेवर कोर्टांत दावा करून ह्या नोटीशीचे खर्चासुद्धां सर्व रकम नुकसानीसह मागणें भाग होईल. कळावे. तारीख १३ माहे आगष्ट सन १९०४ इसवी.

सही
सदु वल्लद शिवराम राहणार राजुर
दस्तुर खुद्द.

EGISTERED No. N.

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........॥ ॥
दुसरे खेपेस .... .... ....॥

advance,
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line „ 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 15 AUGUST 1904 NO 32

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १५ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३२

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

### जाहिरात
### अल्प किंमतींत मोठा लाभ

खालीं लिहिलेलीं बोधपर, मनोरंजक, मोक्षमार्गदर्शक, चित्तवेधक व अगदीं नवीन पुस्तकें छापून तयार आहेत. तरी जिज्ञासु व मुमुक्षु लोकांनीं अवश्य मागविण्याची त्वरा करावी. खालील कोणतेंहि पुस्तकें एकदम एक रुपयाचीं घेतल्यास टपाल खर्च माफ.

| पुस्तकाची नांव | किंमत ट० ख० | |
|---|---|---|
| आत्मबोधामृत | ॥-। | ॥ |
| श्री सद्गुरुप्रासादिक अभंग | ॥= | ॥ |
| श्री व्यंकटेशाष्टक | ।. | ॥ |
| श्रीरामप्रासादिक निरंजनकीर्तन अभंग | ॥= | ॥ |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता— व्ही. बी. हेड मास्तर मु० असलगांव जि. आकोला वऱ्हाड.

दिवाणी मि० मु० नंबर ४
१९०४ वर्ग २२

सन १८८१ चा अक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें प्रोबेट सरटिफिकीट मिळण्या विषयीं अर्ज केल्यावरून ( जाहिरनामा )

विद्यमान डिस्ट्रिक्ट जड्ज्य साहेब बहादूर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत

श्रीराम वल्लद बखतराम मारवाडी राहणार कसबे तळेगांव दशासर तालुके चांदूर जिल्हे उमरावती— अर्जदार.

रामधन वल्लद लक्ष्मणदास मारवाडी राहणार मौजे नाड गावंडी यांनें तारीख ७ माहे जानेवारी सन १९०४ इसवी रोजीं आपले जिनगीचें मृत्युपत्र करून ठेवल्या प्रमाणें प्रोबेट आणि ॲडमिनीस्ट्रेशन ( आक्ट नंबर ५ सन १८८१ ) च्या कलम ६९ किंवा ६४ अन्वयें सरटिफिकीट मिळावें ह्मणून वरील अर्जदार यांनें अर्ज केला आहे. याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर ज्याचा हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांनीं या जाहिरनाम्याचें द्वारें कळविण्यांत येते कीं त्यांनीं सदर्हू अर्जाची चौकशी विद्यमान डिस्ट्रिक्ट जड्ज्य साहेब बहादुर जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत तारीख १७ माहे सपटेंबर सन १९०४ इसवी रोजीं दिवसाचे अकरा ११ वाजतां उमरावती येथें केली जाईल. त्यावेळीं सदर्हू कोर्टांत हजर होऊन सरटीफिकीट मिळे पावेतों जें काम चालेल तें पाहावें.

ही नोटीस आज तारीख ९ माहे आगष्ट सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

D. O. Moris
डिस्ट्रिक्ट जड्ज्य साहेब
जिल्हे उमरावती

### जाहिरात

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, मौजे पिंपरी गौळी प्रगणें व तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें येथील स्वतंपादित स्थावर माल घ.च्याचें घर लांबी १२ खांब १८ पु. प. लांब हात २० द. उ. रुंद हात ११ याचा दर्शनी भाग पुर्वेस आहे याची चतुसिमा पु. रस्ता प. चावडीस जाण्याचा रस्ता द. हुशा पाटील याचें घर उ. चावडी येणें प्रमाणें चतुसीमापुरक घाचें मी व माझा मयत भाऊ हनवंता वल्लद आनंदा कासार या उभयतांनीं विकत घेतलें आहे. माझा भाऊ हनवंता ह्यानें वारल्या मुळें वर लिहिलेल्या जागेंत त्याची बायको सारजा मर्द हनवंता ही रहात आहे तिजला संतती कांहीं नाहीं. तिचे मरणानंतर ह्या जागेचा मी वारस आहे. हल्लीं तिजला या जागेंत फक्त मरेपर्यंत राहण्याचा हक्क आहे ह्मणून कळविण्यांत येतें कीं, सदर्हू घर कोणीही खरेदी, गहाण, अगर बक्षिस कोणतेंच प्रकारें घेऊं नये. घेतल्यास तें बातल आहे असें समजलें जाईल. कळावें. तारीख ९ माहे आगष्ट सन १९०४ इसवी०

सही
खंडू वल्लद आनंदा कासार राहणार पिंपी गौळी प्रगणे व तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणें निशाणी खुद हातची रेघ ——

### नोटीस.

मे. तसद्दुक हुसेन व. महमद शिकंदर अ. पा. करणार आई बनीबी मर्द महमद शिकंदर रा. पातूरशेख बाबू ता. बाळापूर.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कर्ज रुपये ५० माझेकडे असल्यामुळें मी माझा मौजे पाळराजुरे परगणें पातूर येथील शेत सर्वे नंबर १७ यातील $\frac{1}{3}$ हिस्सा तुह्मांस फेडीकरितां फसली सन १३११, १३१२, १३१३ असे तीन सालाकरितां वहितीस दिला होता. तुमचा व आमचा तोंडी ठराव चार चौघा देखत असा झाला कीं तीन वर्षे पुरीं झाल्यावर शेत माझें मला परत द्यावें. असे असून मी माझे शेत चालूं साली पेरण्यास सुरुवात केली असतां तुह्मी पेरूं न देतां जबरदस्तीनें तुह्मीच पेरले हे योग्य केले नाहीं तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत माझे शेत पीकासुद्धां माझे ताब्यांत द्यावें असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून पीकासुद्धां शेत ताब्यांत घेण्यास जो खर्च येईल तो व या नोटिशीचा खर्च असा एकंदर सर्व खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. आगाऊ सुचना केली आहे कळावें ता. १०।८।०४ इसवी.

सही
वालकी मर्द भीमा बंजारी राहणार बोंडला ता. बाळापूर निशाणी खुर्द हातची बांगडी.

### नोटीस

बेशमी विठु वल्लद सोनाजी म्हाळी वस्ती अडगांव जहागिर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे अडगांव जहागिर ता. आकोट येथील शेत सर्वे नंबर ८३ एकर गुंठ ३८३६ आकार रुपये ८ चे शेताची लागवड आज पर्यंत सरकारी साऱ्यावर तुह्मा कडे आहे. आजपर्यंत आमचे संतोषानें तो सारा येत होतो. त्यापेक्षां आतां आमची इच्छा जास्त घेण्याची असून पुढील साला पासून २२ रुपये घेण्याची ईच्छा आहे. तुह्मी मर्जीस वाटल्यास शेत वहितीस बावीस रुपये लागवणीची लेखी कबुलायत देऊन ठेवावी. नाहीं पेक्षा शेत सोडून द्यावें. या बद्दल खुलासा नोटीस पोहचतांच एक महिन्याचे आंत कळवावे; नाहीं तर तुमचा ताबा काढण्या विषयीं तजवीज केली जाऊन फसली सन १३१४ चे रुपये २२ बावीस व नोटीशीचा व इतर खर्च मिळून सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ९।८।१९०४ इसवी.

सही
गदाधर श्रीधर जाहगीरदार अडगांव जाहागीर ता० आकोट, दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा० जाणु वल्लद अमराजी सरोदे वस्ती अकोली जाहगीर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे राजूर तालुके अकोट येथील सर्व्हे नंबर १४ चे शेत गुदस्त सालीं ४०० चारशे रुपयास तुह्मास तारेगहाण खत लिहून दिले आहे. त्या गाहाणखताचे भरण्या पैकीं रुपये १०० शंभर तुमचे जवळ लागवडा करितां अनामत ठेऊन ते रुपये पूर्वी भरून पावल्याचे दस्तऐवज नोंदणाऱ्या अमलदारा समोर जबाब झाला. त्याप्रमाणें पेरणी होईपावेतो तुह्मी माझे संमतीनें माझ्या अनामत पैशातून खर्च करीत गेले. पुढें माझी पर्वा न करितां पुढील किस्तगारी तुम्ही स्वतः केली. पीक तयार झाल्यावर मी हरकत करूं लागलो असतां तुम्ही चार चवघात कबूल केले कीं, जवारीचा माल ( रास ) तयार झाल्यावर पंचा समक्ष हिशेब करू, त्याप्रमाणें तुम्ही केले नाहीं. शिवाय ह्या सालीं तुम्ही तीं शेतें माझे विचारा खेरीज लाऊन काढले असे ऐकतो; पण चांगले शहाणेग लोक एक सालचे स्वामीत्वाबद्दल रुपये ३०० तीनशे देण्यास तयार होते; ह्या साठीं सदर्हू नोटीस पावल्यापासून गुदस्त सालचे पिकाच्या खर्चीसुद्धां हिशेब व सालमजकूरचे लागवण हीं सर्व माझे अनामत असलेल्या पैशासुद्धां तुमचे कर्जाची फेड झाली आहे व माझी शिल्लक असेल ते ८ आठ दिवसांत पंचा समक्ष अथवा नोटिसीनें कळवावें. त्याप्रमाणें तुह्मी जर केले नाहीं तर तुमचेवर कोर्टांत दावा करून ह्या नोटीशीचे खर्चीसुद्धां सर्व रकम नुकसानीसह मागणें भाग होईल. कळावे. तारीख १३ माहे आगष्ट सन १९०४ इसवी.

सही
सदु वल्लद शिवराम राहणार राजुर दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ४ शके १८२६

## वऱ्हाड शाळाखात्यांची क्रमिक पुस्तकें

हल्लीं वऱ्हाड प्रांतांतील प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतून चालूं असणारीं क्रमिक पुस्तकें बंद करून त्यां ऐवजीं ता० १ जानेवारी सन १९०५ पासून मध्यप्रांतांतील शाळांतून चालूं असणारीं पुस्तकें सुरूं करण्यांत यावीं अशा आशयाचा हुकूम वऱ्हाड मध्यप्रांतांतील शाळाखात्याचे डायरेक्टर साहेब यांनीं नुकताच दिला असल्याचें समजतें. वऱ्हाड व मध्य प्रांत ह्या दोन्ही प्रांतांतील शाळा एकाच खात्याच्या नजरेखालीं आल्या असतां त्यांतून एक प्रकारचीं क्रमिक पुस्तकें चालूं रहावीं किंवा त्यांतील इयत्तांचें मान सारखें रहावें हें जरी इष्ट आहे तरी वऱ्हाड व मध्यप्रांत ह्यांतील निरनिराळे लोकरिवाज, रीतिभाती ह्यांस अनुसरून कमिक पुस्तकांतून व विशेषतः प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांतून क्रमिक पुस्तकांत फरक ठेवणें जरूर आहे. दोन्ही प्रांतांच्या राज्यव्यवस्थेंत मुख्य फरक हा आहे कीं वऱ्हाड प्रांतांत जमीनधाऱ्याची रयतवारी पद्धति सुरूं आहे व मध्य प्रांतांत मालगुजारी पद्धति सुरूं आहे. सबब वऱ्हाडांतील शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम रयतवारी पद्धतीचें ज्ञान करून दिलें पाहिजे व मध्यप्रांतांतील विद्यार्थ्यांनां मालगुजारी पद्धतीचें ज्ञान दिलें पाहिजे. डॉ. फिच् वगैरे पाश्चिमात्य पंडितांचें असें मत आहे कीं लहान मुलांना शिक्षण देतांना त्यांच्या आसपास किंवा त्यांच्या नेहमींच्या अवलोकनांत ज्या गोष्टी असतील त्यांचें ज्ञान त्यांस करून देण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे. ह्या तत्वास अनुसरून वऱ्हाड शाळाखात्यानें आपल्या हाताखालील मराठी शाळांच्या उपयोगा करितां मराठी तीन पुस्तकें बऱ्याच वर्षामागें तयार करविलीं व त्यांत वेळोवेळीं सुधारणा ही करविल्या; हल्लीं वऱ्हाडांत चालूं असलेल्या पहिल्या तीन पुस्तकांतून वऱ्हाडांतील मुलांना मनोरंजक होतील असे बरेच धडे लिहिले आहेत; त्या धड्यांतून वऱ्हाडांतील शेतकरी लोकांचा जीवनक्रम वऱ्हाडचा राज्यकारभार, स्थानिक स्वराज्य, म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डे वगैरे गोष्टी संबंधानें ज्ञान सुबोध रीतीनें लहान मुलांस करून देण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. तेव्हां हीं पुस्तकें उपयोगांत ठेवणें जरूर आहे. मध्यप्रांतांतील शाळांत चालूं असलेल्या क्रमिक पुस्तकांतून अशा तऱ्हेचे धडे फारसे दिसून येत नाहींत, मालगुजारी पद्धतीचें ज्ञान मात्र बालबोध चौथ्या पुस्तकांतील व मोडी तिसऱ्या पुस्तकांतील कांहीं धड्यांच्या द्वारें देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु हे धडे रयतवारी पद्धत ज्या प्रांतांत चालूं आहे त्या प्रांतांतील मुलांस शिकविणें बरेंच कष्टाचें होईल व त्यापासून विशेष फायदाही होणार नाहीं. ह्या शिवाय दोन्ही प्रांतांत चालूं असलेल्या पुस्तकांच्या भाषाशैली संबंधानें तुलना केली असतां असें आढळून येईल कीं वऱ्हाडच्या पुस्तकांतील भाषेचें महाराष्ट्रांतील भाषेशीं विशेष साम्य आहे व मध्यप्रांताच्या पुस्तकांतील भाषा बरीच दुर्बोध असून तींत उर्दु व फारशी शब्दांचें पुष्कळच प्राचुर्य दिसून येतें; व कित्येक ठिकाणीं व्याकरण विरुद्ध असे शब्द किंवा प्रयोग ह्यांचा उपयोग केलेला दिसून येतो; मासल्या करितां थोडीं उदाहरणें खालीं देतों:—

" मुद्दइलातलब करून योग्य हुकूम लावितील " " या उपर हुजूर मालिक आहेत " " फकत ता. २२ माहे डिसेंबर सन १८९८ " " दस्तुर नकलम "

" जमीन उठी करणें " " तुह्मी संत्रें पाहिलेंत आहांना ? " " गाडी माड्यांनीं घेतली " " या मुलासारखा पश्चात्ताप पावाल " " डोळ्यांची आग जळूं लागतें " " मन खट्टें करून. "

तेव्हां ह्या दृष्टीनें पहातांही वऱ्हाडांत चालूं असणारीं पुस्तकें मध्य प्रांतांतील पुस्तकांपेक्षां चांगलीं आहेत; कारण आपल्या प्रांतांत मराठी भाषा अस्तित्वांत रहावी अशी जर आपली इच्छा असेल तर तींत परक्या भाषेंतील शब्दांची भेसळ होऊं न देतां तिचें स्वरूप महाराष्ट्रांतील भाषे प्रमाणें, जितकें उज्वल ठेवतां येईल तितकें उज्वल ठेवण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें आद्य कर्तव्य होय. ह्या कारणास्तव वऱ्हाडांत मराठी शाळांतून हल्लीं चालूं असणारीं पहिलीं तीन पुस्तकेंच पुढें चालूं ठेवणें इष्ट आहे. पुढील ह्मणजे मराठी चौथें, पांचवें व सहावें ह्या पुस्तकांची मध्यप्रांतांतील चौथें, पांचवें (भाग १) पांचवें (भाग २) ह्या पुस्तकांशीं तुलना हल्लींच करण्याची अवश्यकता नाहीं; कारण वऱ्हाडांत जीं पुस्तकें चालूं आहेत तीं मुंबई इलाख्यांतील शाळांतून ही चालूं आहेत; व त्या पुस्तकांतून असलेले दोष काढून त्यांत शास्त्रीय विषयांवर धडे घालावे अशा तऱ्हेची सुधारणा त्या पुस्तकांत करण्याकरितां मुंबई इलाख्यांतील शाळाखात्यानें एक कमेटी नेमिली आहे; त्या कमेटीचें काम अजून संपलें नाहीं; तथापि हल्लींच्या स्थितींत सुद्धां, मराठी चौथ्या, पांचव्या व सहाव्या पुस्तकांतील धडे आमच्या प्रांताच्या स्थितीला अनुसरून असून त्यांची भाषाशैलीही मध्यप्रांताच्या पुस्तकांपेक्षां बरी आहे; ह्यामुळें तींच पुस्तकें प्रांतांत रहाणें इष्ट आहे. ह्याच प्रकारचें मत ज्यांचें आहे व मध्यप्रांतांतील पुस्तकें इकडे सुरूं केल्या पासून नुकसान होईल अशी ज्यांनां भीति वाटत आहे अशा अकोलेकर ४८ गृहस्थांनीं गेल्या आठवड्यांत मे. डायरेक्टर साहेब ह्यांजकडे पाठविण्याकरितां एक अर्ज तयार करून प्रांताचे इन्स्पेक्टर मे. कँडी साहेब ह्यांच्या अभिप्रायाकरितां त्यांजकडे पाठविला आहे. सदर्हु अर्जांत नमूद केलेल्या मुद्या संबंधानें असलेलें आपलें मत लिहून मे. कँडी साहेब सदर्हु अर्ज मे. डायरेक्टर साहेब ह्यांजकडे रवाना करतीलच. परंतु आमच्या प्रमाणेंच प्रांतांतील ज्या लोकांचें मत आहे त्यांनीं आपलें मत शाळा खात्यांतील वरिष्ट अधिकाऱ्यांना कळविणें हें त्यांचें कर्तव्य आहे. अशा प्रकारें लोकमताची वरिष्ट अधिकाऱ्यांनां माहती मिळाली असतां, त्याच्या विरुद्ध सदर्हु अधिकारी वागतील असें संभवत नाहीं; परंतु लोकमत काय आहे हें कळविण्याचें काम लोक नायकांचें आहे व ते ह्या कामीं दिरंगाई करणार नाहींत अशी आशा आहे.

---

अकोले येथील तुरुंगांत जी कांहीं अव्यवस्था दिसून आली तिज संबंधानें कोर्टा पुढें येणाऱ्या फौजदारी खटल्यांची चौकशी करण्याकरितां रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी ह्यांस स्पेशल माजिस्ट्रेट व मि. वाल्श साहेब बॅरिस्टर यवतमाळ ह्यांनां पब्लिक प्रासिक्युटर नेमण्यांत आलें आहे ही गोष्ट आमच्या वाचकांस विदित आहेच. सेशन पुढें येणाऱ्या महत्वाच्या ह्मणजे खुनी खटल्यांतून आरोपीतर्फें सरकाराकडून येथील वकिलांपैकीं गृहस्थ मुकर होत असून व त्यांच्या लायकी संबंधानें तक्रार कधींही ऐकण्यांत येत नसतां, हल्लींच्याच प्रसंगीं पर जिल्ह्यांतील बॅरिस्टराची नेमणूक करण्यास सरकारास कोणती जरूर पडली असावी ह्याची अटकळ आह्मांस करितां येत नाहीं. बाहेरच्या जिल्ह्यांतील मनुष्य आणाविणें झाल्यास त्याला वेतन ही जास्तच दिलें पाहिजे ही गोष्ट स्थानिक अधिकाऱ्यांच्या ध्यानांत आली असलीच पाहिजे. असो. एवढ्या खर्चाचें स्पेशल म्याजिस्ट्रेटचें कोर्ट व बॅरिस्टर ह्या खटल्यांची चौकशी करण्या करितां सरकारानें नेमलें असल्यामुळें सदर्हू खटल्यांचा निकाल लवकर होईल असें सहज वाटण्याचा संभव आहे परंतु अचंबा वाटण्या जोगी गोष्ट एवढीच आहे कीं ह्या खटल्याच्या पोलीस कडील चौकशीस प्रारंभ होऊन आज जरी तीन महिन्यावर अवधि झाला आहे तरी कोर्टा पुढें आज पावेतों जे दोनच खटले चौकशीला आले आहेत ते नीळ व जेलची आग ह्या संबधाचे होत; व दुसऱ्या खटल्यांतील सर्व साक्षिदार कोर्टापुढें एकदम हजर होण्या सारखे नसल्यामुळें, कधीं कधीं एक एक दोन दोन ह्या प्रमाणें साक्षिदारांच्या जबान्या अलिकडे होत आहेत. तेव्हां अशा स्थितींत सरकारच्या पैशाचा विनियोग किती व्यवस्थित रीतीनें होत आहे हें पहाण्याचें काम वरीष्ट अधिकाऱ्यांचें आहे. त्याच प्रमाणें जेल प्रकरणाची चौकशी करण्या करितां जे मॅजिस्ट्रेट नेमिलें आहेत. त्यांजकडे इतर मॅजिस्ट्रेटांकडे चालणाऱ्या खटल्यांची चौकशी वेळोवेळीं देण्यांत येते हें आह्मांस थोडेंसें चमत्कारिक दिसतें. मे. क्रे साहेब हे येथील नेहेमीचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट असून, ते आपल्या कामांत चांगले निष्णात आहेत व इंडिअन सिव्हिल सर्व्हिस सारखी महत्वाची परीक्षा ते पसार झाले असल्यामुळें, त्यांच्या योग्यते संबंधानें शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं. त्यांच्यावर कामाचा बोजा फार पडत असेल असें ह्मणावें तर तसेंही ह्मणण्यास कारण नाहीं, तेव्हां अशा स्थितींत जीं कामें खरोखर रीतीनें पाहिलें असतां त्यांजकडेच चालणें न्याय्य आहे, तीं कामें स्पेशल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टाकडून करविण्यानें सरकारच्या पैशाचा योग्य विनियोग होत नाहीं असें आमचें नम्रतापूर्वक मत आहे; व विशेषें करून असें केल्यापासून जेल संबंधीं निघणाऱ्या खटल्यांच्या चौकशीची दिरंगाई होण्याचा संभव आहे त्या अर्थी आमच्या ह्मणण्यास बळकटी येते ही गोष्ट निर्विवाद होय.

---

## हास्पिटल असिस्टंट

हास्पिटल असिस्टंट तयार करण्याची एक शाळा आहे. ही शाळा आमच्या प्रांतासाठीं हैद्राबादेस होती परंतु स्थानिक सरकार बदलल्या पासून ज्या नवीन गोष्टी या बाबदींत अमलांत आल्या आहेत त्या फार महत्वाच्या असून त्यांचें धोरण इतरत्रही स्वीकारण्या सारखें आहे. हास्पिटल असिस्टंटच्या शाळेंत ज्यांस जावयाचें असेल ते मध्यप्रांताचे किंवा वऱ्हाडचे नेटिव पाहिजेत. उमेदवाराचें वय १७ वर्षांपेक्षा कमी उपयोगाचें नाहीं आणि २० वीस वर्षांपेक्षां अधिकही नको. उमेदवार अबूदार व नीतिमान असावयाला पाहिजे. तसाच तो सुदृढ, सशक्त, व निरोगी असा पाहिजे. उमेदवाराची म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरलेली पाहिजे मध्य प्रांताला १० उमेदवार व वऱ्हाडाला ३ असे एकंदर १३ उमेदवार हास्पिटल असिस्टंटाच्या वर्गासाठीं दरसाल निवडून घेण्यांत येतील. शाळा खात्याचे डायरेक्टर साहेब ही निवड करितील आणि ह्मणूनच त्यांच्याकडे दरसाल जून १ ले तारखेच्या अगोदर उमेदवारांनीं आपले अर्ज व इतर दाखले पाठवावेत. वर प्रमाणें पसंत केलेल्या विद्यार्थ्यांस हास्पिटल असिस्टंटाच्या शाळेंत जाण्या पूर्वी एक वर्ष भर एखाद्या सरकारी दवाखान्यांत प्रथम उमेदवारी करावी लागेल. या उमेदवारीच्या वर्षांत विद्यार्थ्याला फक्त ६ रुपये दरमहा प्रमाणें पगार देण्यांत येईल. या रितीनें पहिले वर्षाची उमेदवारी पुरी झाली ह्मणजे त्या विद्यार्थ्याला पाटना येथील सरकारी वैद्यक शाळेंत चार वर्षें पर्यंत वैद्यकाचा अभ्यास पुरा करावा लागतो. त्या चार वर्षांत विद्यार्थ्याचा पगार सालोसाल वाढता राहील आणि त्या पगाराचा अनुक्रम दरमहा ८, ९, १० व १२ रुपये असा निश्चित करण्यांत आला आहे. पाटणा येथील अभ्यासक्रमाला प्रारंभ १९ वे जून पासून होत असतो. येणें प्रमाणें हास्पिटल असिस्टंटाच्या शाळेची हकीकत आहे. हैदराबादेच्या वर्गापेक्षां हा अभ्यासक्रम अधीक जड वाटण्या सारखा आहे. त्या खेरीज प्रत्येक उमेदवाराला म्याट्रिक्युलेशन परीक्षेची अट घालण्यांत आली पण त्यांतल्या त्यांत एक गोष्ट बरी आहे कीं मध्यप्रांताचा किंवा वऱ्हाडचा रहिवाशी

असा उमेदवार पाहिजे. हा निर्बंध पुष्कळशा इतर खात्यास देखील अवश्य लागूं करण्या सारखा आहे. असा प्रतिबंधक धरबंद ठेवण्यांत आला ह्मणजे या प्रांतातील विद्यार्थ्यांस सहजीच अधीक उल्हास वाटण्या सारखा आहे.

## लढाईची खबर

गेल्या आठ दिवसांत रुसो-जपानी युद्धाची मनोवेधक अशी कांहीं खबर नाहीं. तरी पोर्टआरथर कडील लढाई फार जोरांत आहे. तें स्थल आह्मी कधींहि सोडणार नाहीं अशी घोर प्रतिज्ञा रशियानें केलेली आहे पण ही प्रतिज्ञा कितपतशी तडीस जाईल याची मोठीच वानवा वाटत आहे. दररोज जपानी सैन्याचा मोठ्या मान्याचा गिह्ला तेथें होत आहे. या हल्ल्यांत जपानचे २०-२५ हजार लोक धारातीर्थी पडले असेंहि ह्मणतात परंतु जपानचा पाय पुढें पुढेंच सरकत आहे. एक मैल अंतरापर्यंत जपानी लोक जाऊन धडकले आहेत व थोड्याच दिवसांत पोर्टआरथरचा किल्ला ते सर करितील अशीं चिन्हें दिसत आहेत.

म्यांचुरिया मध्यें दोन चांगल्या लढाया झाल्या टामचंग येथें एक लढाई आणि दुसरी युशन लिंगशु आणि यांग ह्मलिंग या दोन टेंकड्या जवळ लढाई झाली. दोन्हींत जपानी लोकांनीं मोठ्या निकरानें लढून रशियन लोकांस हाकलून लाविलें. या जयांत जपानी लोकांस दारुगोळा, तोफा बंदुका वगैरे पुष्कळ मिळाल्या; जपानी लोकांनीं न्युईचँग आणि हायचँग हीं दोन ठिकाणें घेतलीं असून ते लायओयँग जवळ जवळ जाऊन पोहोंचले आहेत. आतां मुकडेन आणि लायाओयँग या दोन्ही ठिकाणावर एकदम हल्ला करण्याचा ज० क्युरोकीचा बेत झाला आहे असें ह्मणतात.

हा लढाईंत आपला सर्वस्वी पराभव झाला ही गोष्ट झारच्या मनास फार लागलेसें दिसतें. लढाईचें मुख्य तोंड जें पोर्टआरथर तेंहि आपल्या हातून खास जाणार असें त्यांस वाटूं लागलें आहे. ह्या अपजयाचा वचपा आपण काढल्या खेरीज स्वस्थ बसणार नाहीं अशा आशयाचें रशियाचें मनोराज्य चालू आहे. रशियानें पुढील तीन वर्षांचा प्रोग्राम आज निश्चीत ठरविला आहे. पुढील वर्षी आधीं पोर्टआरथर घेऊन दुसऱ्या वर्षी म्यांचुरियांतून जपानी लोकांस हाकलून लावून तिसेर वर्षी थेट जपान देशावर चालून जावयाचें व जपानची पाळेंमुळें खणून काढावयाची अशा मोठ्या प्रचंड व्यूहाची रचना रशियानें मांडिली आहे.

ह्या व्यूहरचनेची गर्जना ऐकून बिचारें जपान घाबरून जाऊन हातपाय गाळील अशी रशियाची समजूत असावीसें दिसतें. नाहीं तर उगीच वल्गना करण्यांत पुरुषार्थ तो कोणचा! रशियाचें राष्ट्र सर्वतोपरी फार बलिष्ट आहे आणि जपानच्याकडून त्याच्या शक्तिसामर्थ्याची बरोबरी करवणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. तरी लढाई ह्मणजे एक प्रकारचा फाशाचा डाव होय. ऐन प्रसंगीं ज्याचा डाव पडेल त्याचा फडेल. मोठी कडेकोट तयारीहि प्रसंगीं निरुपयोगी ठरते हा अनुभव पूर्वीपारचा आहे. शिवाय जपानलाहि लढाईची तयारी करण्यास तीन वर्षांचा काल आहे. एवढ्या कालावधींत कोठें काय राज्यक्रांती होईल व लढाईचें बस्तान कसें बसेल हें कोणी सांगावें?

हा भावी घनघोर संग्रामाकरितां हार्बिन ही मुख्य छावणी रशियानें ठरविली आहे आणि तेथेंच सर्व सैन्यभार एकवटण्याचा त्याचा विचार आहे. विजयश्री आज जपानला प्रसन्न आहे, कदाचित पुढील वर्षी ती पाठमोरी फिरेल आणि आपली माला रशियाच्या कंठांतही घालील! ही मनाची कातरता जपानची व रशियाशीं तुलना करितांना दृढच होते. मनुष्याचा, पैशाचा, व दारू गोळ्याचा जम रशियासारखा जपानचा नाहीं; रशियाशीं झुंझ घेण्याला जपान जवळ इतकें मनुष्यबल व द्रव्यबल नाहीं. लढाईमुळें जपानच्या व्यापारास खो बसण्याचाहि संभव आहे. आज तागाईत जपानची सरशीच आहे पण जर कां एखादा अपजयाचा मोठासा वाटा त्याच्या नशिबीं आला तर तो कितपत जीव धरून राहील याची शंका आहे. शिवाय इतकेंही करून म्यांचुरिया काबीज केला तरी रशियाच्या आ पसरलेल्या दाढेंतून तो सुरक्षित ठेवणें हें काम फारच कठीण आहे. तलवार मारून देश काबीज करून सोपें आहे पण ते देश रक्षण करणें हें फारच प्रयासाचें व कालावधीनें साध्य होणारें असें दुर्घट कार्य होय. या सर्वांचा विचार करितां जपानने जय मिळवूनहि कांहीं मोठासा लक्ष्यांश नाहीं व अखेरीस जपानच नुकसानींत येणार असें दिसतें. पण या भावी कालाच्या अंधःकारांत इतः स्ततः पडलेले आशेचे कांहीं किरण आपणास एका निराळ्याच मार्गाची वाट दाखवीत आहेत तिकडेच आपण जाऊं.

आज रशिया सारख्या सार्वभौम राज्याशीं टक्कर दिल्यानें जपानला पुष्कळच फायदा झाला आहे. त्यांस बलाबल चांगलें अजमावलें गेलें आहे. राष्ट्रास पुढें येण्यास, आपली कीर्ती गाजविण्यास, आपल्या राज्याची सीमांतरेषा वाढविण्यास इत्यादि गोष्टीस लढाई हा एकच उत्कृष्ट सोपानपंथ होय. हा सोपान चढून एकदा त्या शैलशिखरीं दृढ पाय ठेविला ह्मणजे सर्व सौख्यानंद व धनसंपदा प्राप्त होतील. असल्या गोड भावी आशाच जीवास अमृत पाजविणारे झरे होत. या आशांतंतूच्या जोरावरच राष्ट्र हें लढाई सारखें साहस करण्यास उद्युक्त होतें. ह्या धाडसी कृत्यांत आपला पाय घसरेल अशी त्या राष्ट्राच्या मनानेंच कच खाल्ली तर मात्र तें राष्ट्र जिवंत असून मेल्यांतच जमा आहे. असें मेलेलें जिवंत राहण्या पेक्षां मरणें काय वाईट आहे? थोरांच्या संघट्टनानेंच आपणांस थोरवी प्राप्त होते. थोराशींच झगडण्यांत खरी मर्दुमकी आहे. आपणांस अपयश आलें तरी धीर न सोडतां आपण पुन्हां कंबर बांधली पाहिजे. जीवनकलहामध्यें आपण आपलीं शस्त्रास्त्रें चालविलींच पाहिजेत. राष्ट्रें हीं पिसाळलेल्या वाघा प्रमाणें होत. एकमेकास गट्ट करण्याचा त्यांचा उपजत धर्म होय व हा उपजत स्वभाव या मृत्युलोकीं जों पर्यंत त्यांचें वास्तव्य आहे तों पर्यंत नाहींसा होणार नाहीं. सर्व राष्ट्रें हीं एकमेकास पाण्यांतच पाहात असतात. राष्ट्राराष्ट्राची दोस्ती ह्मणजे निवळ भ्रम होय. राष्ट्राचा जिवंतपणाच लढाईच्या तयारीवर अवलंबून आहे व ज्या राष्ट्रास जिवंत राहण्याची इच्छा असेल त्यानें लढाईचें अमृत सेवन करण्यास कधींहि शंका घेऊं नये. आपण पराक्रम करूं, जय मिळवूं, राज्य वाढवूं, तें रक्षण करूं, शत्रूचें निर्दालन करूं अशीच हिंमत ठेविली पाहिजे. आणि मग आपल्या हिंमती बरोबर आपलें शक्तीसामर्थ्य हजारो पटीनें वाढेल यांत संदेह नाहीं. हीच हिंमत जपान बाळगील व याच हिंमतीवर जपान आपलें संपादलेलें राज्य रक्षील असा भरंवसा वाटतो. आशा व निराशा ह्या मनाच्या पारड्यास किती तरी चमत्कारिक तऱ्हेनें वर खाल झोंके देतात पहा!

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—सध्यां चांगली उघाडी आहे. पिकें जोमावर आहेत हवा निरोगी असल्यामुळें पटकीचा रोगही पुष्कळसा शमला आहे.

मेजर हारमसजी एदलजी बनातवाला इनस्पेक्टर—जनरल, तुरुंग खातें यांस लेफटेनंट—कर्नलच्या हुद्याची बढती देण्यांत आली.

येथील सिव्हिल सर्जन लेफटेनंट जार्ज फौलर यांस क्याप्टनचा मोठा हुद्दा देण्यांत आला.

क्याप्टन फौलर सिव्हिल सर्जन आकोला यांची बदली चांदा येथें झाली असून यांच्या जागीं मेजर सदरल्यांड यांस आकोल्यास सिव्हिल सर्जन नेमण्यांत आलें.

आनररी क्याप्टन मॉंटगोमरी सिव्हिल सर्जन, वणी यांस चालूं महिन्यापासून एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आल्यामुळें रा. रा. सखाराम गणेश परांजपे यांस यवतमाळास सिव्हील सर्जन नमण्यांत आलें.

रा. रा. दत्तात्रय मोरेश्वर बर्वे नायब तहशिलदार इलिचपूर व रा. रा. यशवंत गणेश नायब तहशीलदार चिखलदरा या उभयतांस अनुक्रमें वणी व बुलढाणा या जिल्ह्यांचे डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर नेमल्यामुळें त्यांच्या जागीं अनुक्रमें रा. रा. वामन कृष्ण सहस्त्रबुद्धे व बाळदेव वामन यांस इलिचपूर व चिखलदरा येथें नायब तहशिलदार नेमण्यांत आले.

या आठवड्यापासून सेशन कचेरी आकोल्यास भरणार असून पश्चिम वऱ्हाडांतील सेशन खटले चालणार आहेत.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४= |
| सोनें २४।= | चांदी ७१॥ |
| ज्वारी ५२-५४ | जवस ८४ |
| गहूं काठे ७५ | बनशी ९०।९६ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १० रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण. |

*NOTICE*

Pleaders' Examination will be held in the Court House of the Civil and Sessions Judge Berar at Amraoti from Monday the 5th. September 1904.

The papers will be set in the following order at the time mentioned against them.

| Subject | Time | Date |
|---|---|---|
| 1. Hindù and Mahomedan Laws and the Law relating to Succession Probate and Administration. | 10 A. M. | 5th. September 1904 Monday |
| 2. Laws of Civil Procedure, Limitation and the H. A. D. Small Cause Court Law. | 2 P. M. | |
| 3. Law of Contracts and Torts. ... | 10 A. M. | 6th. September 1094 Tuesday |
| 4. Law of Specific Relief, Transfer of property. Mortgage and Trusts. | 2 P. M. | |
| 5. Criminal & Police Laws.... ... ... | 10 A. M. | 7th. September 1904 Wednesday |
| 6. Lawsof Evidence, Registration and Stamps. | 2 P. M. | |

Amraoti 13 th. August 1904 — *F. W. A. Prideaux* Civil & Sessions Judge Berar.

## वर्तमानसार.

टिळकांची अर्जी—आपणावर झालेल्या खटल्यांत आपल्याला विनाकारण खर्च पडून नुकसानी सोसावी लागली ती भरून मिळण्याबद्दल रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं सरकारमार्फत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. ब्रॉडरिक साहेब यांजकडे अर्ज पाठविला आहे.

**वीण कामाचा कारखाना**—म्हैसूरच्या महाराजांनीं येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून माळाकोळमुस या नांवांच्या आपल्या राज्यांतील गांवीं एक वीणकाम शिकविण्याची शाळा काढण्यास मंजुरी दिली आहे. या शाळेंत वीणकाम व सतरंज्या बनविण्याचें काम शिकविण्यांत येईल.

**अनुभविक गोष्ट**—घरांतले उंदीर एकदां सांपळ्यांत सांपडून निसटून गेले ह्मणजे ते पुनः कोणत्याही प्रकारच्या सांपळ्यांत सांपडत नाहींत. घुशी इतक्या सावध नसतात. त्या केव्हां तरी पुनः गुरफटल्या जातात.

**चौकस लोकांचा महती**—कित्येक लोकांस नुसत्या चौकशा करण्याची भारी उठाठेव असते. ते चारचौघांत कधीं उगे राहावयाचे नाहींत. हें कसें आहे, तें कसें आहे, याप्रमाणें त्यांचे प्रश्नावर प्रश्न चालावयाचे! अशी मंडळी संभाषणाचे वेळीं फार उपयोगी; ते तेल गाळण्याच्या नसराळ्यासारखे होत. नसराळ्याचें काम एवढेंच कीं, जें एका पात्रांत असेल तें दुसऱ्या पात्रांत नेऊन पोहोंचवावयाचें, स्वतःला ह्मणून बिलकूल संस्कार नाहीं, तशाच भासल्याची वरील मंडळी होत.

**शहाण्यांत व मूर्खांत अंतर**—शहाण्यास मूर्खाची माहिती असते; पण मूर्खास शहाण्याची असत नाहीं; असें कां? तर शहाणा पहिल्या प्रथम अज्ञानी असून त्या स्थितीचा तो अनुभव घेऊन चुकला असतो; पण मूर्ख तो आद्यंतीं मूर्खच!

पॅरिस येथील वैमानिक सॅंटो डुमास यांस जपान सरकारनें आपलें विमान घेऊन आपल्या बाजूनें युद्धास बोलाविलें होतें. या विमानांत भयंकर कुलुपी गोळे घालून ते पोर्ट आर्थरवर वरून टाकावे अशी कल्पना निघाली होती, पण रशियाविरुद्ध पिवळ्या लोकांस मदत करणें नीट नाहीं ह्मणून ती गोष्ट त्यानें नाकबूल केली.

**तंबाखूला आतां चांगले दिवस आले** आहेत असें दिसतें. एका इंग्रजी मासिकांत असें ह्मटलें आहे कीं तंबाखूच्या धुरानें कालरा, प्लेग व इतर कित्येक रोगांचे जंतु मरण पावतात, यामुळें तंबाखू ओढणारास त्या रोगाची भीति उरतच नाहीं.

**खुजा उंट**—बर्लीन येथील प्रदर्शनांत ठेवण्याकरितां इराणच्या बादशहानें एक अगदीं खुजा उंट पाठविला आहे. त्याची उंची फक्त २७ इंच आहे. त्याचें वजन ६१ पौंड आहे. व त्याचा रंग पांढरा आहे.

**चिनाला भलतीच सुधारणा नको**—चिनी लोकांत बायकांचे पाय बांधून बारीक करण्याची जी चाल आहे ती वाईट आहे किंवा चांगली आहे, यांचप्रमाणें चिनी लोकांनीं आपल्या शेंड्यांच्या लांबलचक वेण्या घालाव्या किंवा नाहीं अशा प्रकारच्या सुधारणासंबंधीं चीनी लोक विचार करूं लागले आहेत. पण चीन देशांतील सैन्यांत काय सुधारणा केली पाहिजे, आरमार अगदीं पहिल्या प्रतीचें करण्यास काय उपाय केले पाहिजेत इत्यादि अशा प्रकारच्या सुधारणाकडे जर चीनी लोक लक्ष देतील तर चीन देश ह्मणजे आशियाखंडाचें लवकरच एक भूषण होऊन बसेल. आमच्यासारख्या गुलाम बनलेल्या लोकांनीं स्त्रियांच्या विवाहासंबंधानें आणि मुलींच्या मुंजीसंबंधानें विचार करीत बसावें पण चीनसारख्या स्वतंत्र राष्ट्रानेंही फक्त अशाच प्रकारच्या गोष्टींत आपला वेळ व्यर्थ घालवावा हें चांगलें नाहीं.

**बरें झालें**—इंदूर दरबारची मराठी भाषा काढून हिंदी भाषा चालूं करण्याचा प्रयत्न झाला होता त्यास सरकारनें संमती दिली नाहीं. सदैव मराठी भाषेचें!

**धार्मिक शिक्षण**—अजमीर कॉलेजचे प्रिन्सिपाल यांणीं असें सांगितलें आहे कीं कॉलेजामध्यें शिकणाऱ्या राजकुमारांनीं आपापल्या खाजगी व फुरसतीच्या वेळीं धर्मशिक्षणाकडे रोज कांहीं तरी लक्ष द्यावें. शिवाय प्रत्येकानें रोज देवदर्शन घेण्याकरितां देवळांत गेलेंच पाहिजे. एक शास्त्रीहि सहा महिन्यांच्या मुदतीनें राजकुमारांना खाजगी रितीनें धर्मशिक्षण देण्याकरितां कॉलेजमध्यें ठेविला आहे असें समजतें.

**गोवधाची मनाई**—गोंडळच्या ठाकोर साहेबांनीं आपल्या राज्यांत गोवध करण्याची मनाई केल्यावरून त्यांच्या राज्यांतील धोराजी गांवच्या मुसलमानांनीं तेथून निघून नवागड येथें जाण्याचा विचार ठरविला आहे. पण तेथेंही त्यांस गोवधाची मनाई करण्यांत आल्याशिवाय राहणार नाहीं असें त्यांस समजल्यावरून त्यांचा विचार डळमळीत झाला आहे.

**झोंप आणणारा तकिया**—लंडनमध्यें एक तकिया नवीनच तयार केला आहे. तेथील कंपनीनें या तकियाची किंमत ६ शिलींग ठेवली आहे. त्यावर लेटलें असतां निद्रा येते.

(शिकले पाहिजे)

१. हसावें कसें हें पुष्कळांना समजत नाहीं. तें त्यांना शिकलें पाहिजे. हसणें हें पक्वान्नांपेक्षांहि अधिक गुणकारक आहे.

२. एका कामालाच चिकटून रहाणें हें पुष्कळांना साधत नाहीं. आज हें कर, उद्यां तें टाकून देऊन दुसरेंच हातीं घे. याप्रमाणें एकदा घर मारामर 'चिंध्या' होऊन त्यांना कोणत्याच कामांत यश येत नाहीं, त्यांनीं एकाच कामांत सगळें लक्ष घालण्यास शिकलें पाहिजे.

३. गोष्ट सांगण्यास शिकलें पाहिजे. उत्तम भाषण ही एक देणगी असते. ती देण्यास आपलें कांहीं वेचत नाहीं; परंतु ते ऐकणारांची तृप्ति करतें. लोकांत प्रिय होण्याला हें एक सुलभ साधन आहे.

४. आपली कर्मकथा आपल्याच मनांत ठेवण्यास शिकलें पाहिजे. कित्येकांचीं तोंडें फुटक्या मांड्यासारखीं असतात. त्यांच्यांतून सगळें गळत रहातें. तुमची कर्मकहाणी ऐकण्याचें लोकांचें काय अडलें आहे? या गोष्टीचा विचार करून स्वताचीं दुःखें उगीच वाटेल त्याच्यापाशीं सांगत फिरूं नये.

५. जग दुष्ट आहे ह्मणून त्याचा तिरस्कार किंवा द्वेश न करतां त्याच्यावर प्रेम करण्यास शिकलें पाहिजे. आपण जगांतच आहों! केव्हां जग जर दुष्ट आहे तर त्या दुष्टपणाचा थोडाफार वांटा आपल्याकडेहि येत असेल असा विचार करावा आणि दुसऱ्यांवर प्रेम करूं लागावें.

**मुलास रंजविणारें यंत्र**—विलायतेंत एका कल्पक मनुष्यानें एक विलक्षण यंत्र तयार केलें आहे. तें घरांत असलें ह्मणजे मुलांना सांभाळण्याचें बरेंच काम वांचेल. तें यंत्र मुलाच्या पाळण्यास लावावयाचें. मूल रडूं लागल्यास त्या हवेच्या आघातांचें कार्य त्या यंत्रावर होऊन त्यांत असलेला फोनोग्राफ एक गाणें ह्मणतो व दुसरीकडे असलेल्या एका कळेस गती मिळून त्यानें पाळण्यास झोंके दिले जातात. मुलाचें रडणें बंद झालें ह्मणजे हळूहळू या यंत्राचे व्यापारहि बंद होतात.

**अमोल दातृत्व**—क्युबा बेटांतील एक रहिवाशी अलीकडे पारिस शहरांत रहात होते. त्यानें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें कीं, आपल्या पश्चात् आपली अर्धी जिनगी मिसेस आनी बिझांटबाईंस सेंट्रल हिंदु कालेजकरितां व बाकीची अर्धी कर्नल ऑलकॉट यांस थिऑसफीच्या लायब्ररीकरितां देण्यांत यावी. पुढें ते गृहस्थ वारले. मृत्युपत्राप्रमाणें त्यांच्या जिंदगीची व्यवस्था लवकरच होणार आहे. एकंदर जिंदगी सुमारें ४ लाखांची आहे असा अंदाज आहे. मा. म.

---

### नोटीस

रा. पामू वलद जानजी मुन्हे राहणार निमगांव तालुके मलकापूर, पोष्ट–नांदुरा यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं आपण तारीख २८ जुलै १९०४ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली ती पावली. आह्मी मारवड्यापासून शेतें घेतलीं ही गोष्ट खरी पण ती तुह्मास आह्मी दिली नाहींत. आह्मी ती घरींच वाहत आहों. तारीख १६ एप्रिल १९०४ रोजीं तुह्मी आह्मांस कर्जरोखा रुपये ७१ चा करून दिला. रुपये तुह्मी गायीं घेतले आणि नंतर दस्तैवज करून दिला आहे. आतां तुमच्या मनांत कांहीं बेमानकी आली आहे असें दिसतें आणि ह्मणून तुह्मी वरील खोटीच बनावटी नोटीस देऊन आह्मी कर्जरोखा खोटाच फसवून करून घेतला असा त्यांत मजकूर घातला आहे. या बद्दल तुमच्या वर फौजदारी करण्याचा आमचा विचार आहे. लबाड लोकांच्या चिथावणीस लागून अशी नोटीस दिल्यानें कर्जरोखा खोटा होत नसतो व रुपये सुटत नसतात हें पक्कें ध्यानांत ठेवावें. शिवाय तुमच्या गैरवर्तनामुळें आह्मास सरकारदरबार करावें लागणार ह्मणून त्याचा खर्च तुह्मांवर पडेल. कळावें तारीख १३ आगष्ट १९०४ इ०

सहीची निशाणी
भोनाजी वलद मारुती गावंडे
पाटील राहणार पिंपराळे
तालुके पोष्ट खामगांव,
यांचे हातची रेघ.—

---

### नोटीस

मे. अबदुलला वलद मुजाफरखा मुसलमान राहणार रेल ता. आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं उस्मान रमतुल्ला कच्छी रा. आकोट यानकडे आमचे रुपये होते त्यापैकीं बारशें १२०० रुपयांचा हवाला तुह्मी घेतला होता. त्या पैकीं वसूल १००० रुपये वजा जातां बाकी मुद्दल रुपये २०० सालीम रकमेचें व्याज शेकडा १ रुपया प्रमाणें २१२ दोनशे बारा एकूण रुपये ४१२ चारशें बारा ही नोटास पावतांच पाठवून द्यावे; असें न केल्यास मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून सालीम रुपये कोर्ट खर्चसुद्धां व नोटीशीचे खर्चा सुद्धा भरून घेईन. विशेष खर्च तुह्माला लागूं नये ह्मणून अगाऊ सुचना केली आहे कळावें. तारीख ११।८।०४ इ.

सही
साहेबराम मोतीराम मालक
रामरतन साहेबराम तर्फे
मुखत्यार चैनीराम हणमंत
राम दुकान पनज ता.
आकोट. दस्तुर खुद्द

---

### नोटीस

वेशमी बनाई मर्द तुकाराम ठाकरे राहणार कळंब खुर्द ता. बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मा जवळ जी स्थावर जंगम जिनगी व सावकारीची रकम आहे त्या सर्व इस्टेटीचा उपभोग तुह्मी घ्यावा पण आतां असें कळतें कीं दुसऱ्या कांहीं आप्तांच्या व इतर लोकांच्या नादीं लागून तुह्मी इस्टेटीची वाताहत मांडली आहे तसें करण्याचा अधिकार तुह्माला नाहीं. कैलासवासी तुकाराम यांच्या वेळीं किंवा त्यांच्या पश्चात त्याचा मुलगा गोविंदा याच्या वेळीं इस्टेटीस कर्ज वगैरे कांहीं नव्हतें, सध्यांही कोणतेंच कोणाचेंही कर्ज नाहीं. तुह्माला पोटापाण्याला कांहीं कपताई नाहीं इत्यादि सर्व कारणें लक्षांत घेतां स्पष्ट दिसून येईल कीं तुह्माला जिनगीची अफरातफर करण्याचें काडीमात्र प्रयोजन नाहीं. या उपर जो कोणी तुमच्याशी व्यवहार करील तो फसेल इतकेंच नाहीं तर तुमच्या पश्चात् आमच्या कडे वारसाच्या नात्यानें येणाऱ्या जिनगीवर कोणताच बोजा दुसऱ्याचा बसणार नाहीं. ह्मणून या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी मृत्युपत्र, खरेदी, गहाण वगैरे व्यवहार इस्टेटी संबंधाचा करूं नये. कळावें १२ आगष्ट १९०४ इसवी०

सही
१ देसोजी वलद नथराम पाटील
कळंब खुर्द निशानी खुद.
१ मारोतु वलद एकोजी राहणार
मौजे कळंब खुर्द दस्तुर खुद.
१ संपत सखाराम पाटील मौजे
कळंब खुर्द दस्तुर खुद

असा उमेदवार पाहिजे. हा निर्बंध पुष्कळशा इतर खात्यास देखील अवश्य लागूं करण्या सारखा आहे. असा प्रतिरोधक धरबंद ठेवण्यांत आला ह्मणजे या प्रांतांतील विद्यार्थ्यांस सहजीच अधीक उल्हास वाटण्या सारखा आहे.

---

## लढाईची खबर

---

गेल्या आठ दिवसांत रुसो-जपानी युद्धाची मनोवेधक अशी कांहीं खबर नाहीं. तरी पोर्टआरथर कडील लढाई फार जोरांत आहे. तें स्थल आह्मी कधींहि सोडणार नाहीं अशी धीट प्रतिज्ञा रशियानें केलेली आहे पण ही प्रतिज्ञा किंपत्तशी तडीस जाईल याची मोठीच वानवा वाटत आहे. दररोज जपानी सैन्याचा मोठ्या मारयाचा शिड्डा तेथें होत आहे. या हल्लयांत जपानचे २०-२५ हजार लोक धारातीर्थी पडले असेंहि ह्मणतात परंतु जपानचा पाय पुढें पुढेंच सरकत आहे. एक मैल अंतरापर्यंत जपानी लोक जाऊन थडकले आहेत व थोड्याच दिवसांत पोर्टआरथरचा किल्ला ते सर करितील अशीं चिन्हें दिसत आहेत.

म्यांचुरिया मध्यें दोन चांगल्या लढाया झाल्या टामचंग येथें एक लढाई आणि दुसरी युशन लिंगझु आणि यांग झुलिंग या दोन टेंकड्या जवळ लढाई झाली. दोन्हींत जपानी लोकांनीं मोठ्या निकरानें लढून रशियन लोकांस हाकलून लाविलें. या जयांत जपानी लोकास दारुगोळा, तोफा बंदुका वगैरे मिळाल्या, जपानी लोकांनी न्युईचँग आणि हायचँग हीं दोन ठिकाणें घेतलीं असून ते लावओयँग जवळ जवळ जाऊन पोहोंचले आहेत. आतां युकेडेन आणि लायाओयँग या दोन्हीं ठिकाणावर एकदम हल्ला करण्याचा ज॰ कुरोकिनचा बेत झाला आहे असें ह्मणतात.

हा लढाईंत आपला सर्वथैव पराभव झाला ही गोष्ट झारांच्या मनास फार लागलीसें दिसतें. लढाईचें मुख्य ठाणें जें पोर्टआरथर तेंहि आपल्या हातून खास जाणार असें त्यांस वाटूं लागलें आहे. ह्या अपजयाचा वचपा आपण काढल्या शिवाय स्वस्थ बसणार नाहीं अशा आशयाचें रशियाचें मनोराज्य चालू आहे. रशियानें पुढील तीन वर्षांचा प्रोग्राम आज मितीस ठरविला आहे. पुढील वर्षी आधीं पोर्टआरथर घेऊन दुसऱ्या वर्षी म्यांचुरियांतून जपानी लोकांस हाकलून लावून तिसरे वर्षी थेट जपान देशावर चालून जाण्याचें व मानाची पाळीं मुळी खणून काढावयाची अशा मोठ्या प्रचंड व्यूहाची रचना रशियानें मांडिली आहे.

ह्या व्यूहरचनेची गर्जना ऐकून विचारें जपान घाबरून जाऊन हातपाय गाळील अशी रशियाची समजूत असावीसें दिसतें. नाहीं तर उगीच वल्गना करण्यांत पुरुषार्थ तो कोणचा! रशियाचें राष्ट्र सर्वतोपरी फार बलिष्ट आहे आणि जपानच्याकडून त्याच्या शक्तिसामर्थ्याची बरोबरी करवणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. तरी हल्लीं ह्मणजे एक प्रकारचा फाशाचा डाव होय. ऐन प्रसंगीं ज्याचा डाव पडेल त्याचा पडेल. मोठी कडेकोट तयारीहि प्रसंगीं निरुपयोगी ठरते हा अनुभव पूर्वापारचा आहे. शिवाय जपानलाहि लढाईची तयारी करण्यास तीन वर्षांचा काल आहे. एवढ्या कालावधींत कोठें काय राज्यक्रांती होईल व लढाईचें बस्तान कसें बसेल हें कोणी सांगावें!

ह्या भावी घनघोर संग्रामाकरितां हार्बिन हें मुख्य छावणी रशियानें ठरविली आहे आणि तेथेंच सर्व सैन्यभार एकवटण्याचा त्याचा विचार आहे. विजयश्री आज जपानला प्रसन्न आहे, कदाचित पुढील वर्षी ती पाठमोरी फिरेल आणि आपली माला रशियाच्या कंठांतही घालील! ही मनाची कातरता जपानची व रशियाशीं तुलना करितांना दृढच होते. मनुष्याचा, पैशाचा, व दारू गोळ्याचा जम रशियासारखा जपानचा नाहीं; रशियाशीं झुंज घेण्याला जपान जवळ इतकें मनुष्यबल व द्रव्यबल नाहीं. लढाईमुळें जपानच्या व्यापारास खो बसण्याचाहि संभव आहे. आज तागाईत जपानची सरशीच आहे पण जर कां एखादा अपजयाचा मोठासा बाटा त्याच्या नशिबीं आला तर तो कितपत जीव धरून राहील याची शंका आहे. शिवाय इतकेंही करून म्यांचुरिया काबीज केला तरी रशियाच्या आ पसरलेल्या दाढेंतून तो सुरक्षित ठेवणें हें काम फारच कठीण आहे. तलवार मारून देश काबीज करून सोपें आहे पण ते देश रक्षण करणें हें फारच प्रयासाचें व कालावधीनें साध्य होणारें असें दुर्घट कार्य होय. या सर्वांचा विचार करितां जपानानें जय मिळवूनहि कांहीं मोठासा लक्ष्यांश नाहीं व अखेरीस जपानच नुकसानींत येणार असें दिसतें. पण या भावी कालाच्या अंधःकारांत इतःस्ततः पडलेले आशेचे कांहीं किरण आपणास एका निराळ्याच मार्गाची वाट दाखवीत आहेत तिकडेच आपण जाऊं.

आज रशिया सारख्या सार्वभौम राज्याशीं टक्कर दिल्यानें जपानला पुष्कळच फायदा झाला आहे. त्याचें बलाबल चांगलें अजमाविलें गेलें आहे. राष्ट्रास पुढें येण्यास, आपली कीर्ती गाजविण्यास, आपल्या राज्याची सीमांतरेषा वाढविण्यास इत्यादि गोष्टीस लढाई हा एकच उत्कृष्ट सोपान होय. हा सोपान चढून एकदा त्या शैलशिखरीं पाय ठेविला ह्मणजे सर्व सौख्यानंद व धनसंपदा प्राप्त होतील. असल्या गोड भावी आशाच जीवास अमृत पाजविणारे झरे होत. या आशातंतूच्या जोरावरच राष्ट्र हें लढाई सारखें साहस करण्यास उद्युक्त होतें. हा धाडसी कृत्यांत आपला पाय घसरेल अशी त्या राष्ट्राच्या मनानेंच कच खाल्ली तर मात्र तें राष्ट्र जिवंत असून मेल्यांतच जमा आहे. असें मेलेलें जिवंत राहण्या पेक्षां मरणें काय वाईट आहे! धीरांच्या संघटनानेंच आपणांस थोरवी प्राप्त होते. धीराशींच झगडण्यांत खरी मर्दुमकी आहे. आपणांस अपयश आलें तरी धीर न सोडतां आपण पुन्हां कंबर बांधली पाहिजे. जीवनकलहामध्यें आपण आपलीं शस्त्रास्त्रें चालविलींच पाहिजेत. राष्ट्रें हीं पिसाळलेल्या श्वाना प्रमाणें होत. एकमेकास गट्ट करण्याचा त्यांचा उपजत धर्म होय व हा उपजत स्वभाव या मृत्युलोकीं जों पर्यंत त्यांचें वास्तव्य आहे तों पर्यंत नाहींसा होणार नाहीं. सर्व राष्ट्रें हीं एकमेकास पाण्यांतच पाहात असतात. राष्ट्राराष्ट्राची दोस्ती ह्मणजे निवळ भ्रम होय. राष्ट्राचा जिवंतपणाच लढाईच्या तयारीवर अवलंबून आहे व ज्या राष्ट्रास जिवंत राहण्याची इच्छा असेल त्यानें लढाईचें अमृत सेवन करण्यास कधींहि शंका घेऊं नये. आपण पराक्रम करूं, जय मिळवूं, राज्य वाढवूं, तें रक्षण करूं, शत्रूंचें निर्दालन करूं अशीच हिंमत ठेविली पाहिजे. आणि मग आपल्या हिंमती बरोबर आपलें शक्तीसामर्थ्य हजारो पटीनें वाढेल यांत संदेह नाहीं. हीच हिंमत जपान बाळगील व याच हिंमती वर जपान आपलें संपादलेलें राज्य राखील असा भरंवसा वाटतो. आशा व निराशा ह्या मनाच्या पारड्यास किती तरी चमत्कारिक तऱ्हेनें वर खाली झोंके देतात पहा!

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान—सध्यां चांगली उघाडी आहे. पिकें जोमावर आहेत हवा निरोगी असल्यामुळें पटकीचा रोगही पुष्कळसा शमला आहे.

---

मेजर हारमसजी एदलजी बनातवाला इनस्पेक्टर—जनरल, तुरुंग खातें यांस लेफटेनंट—कर्नलच्या हुद्यांची बढती देण्यांत आली.

---

येथील सिव्हिल सर्जन लेफटेनंट जार्ज फौलर यांस क्याप्टनचा मोठा हुद्दा देण्यांत आला.

---

क्याप्टन फौलर सिव्हिल सर्जन आकोला यांची बदली चांदा येथें झाली असून यांच्या जागीं मेजर सदरल्यांड यांस आकोल्यास सिव्हिल सर्जन नेमण्यांत आलें.

आनररी क्याप्टन मॉंटगोमरी सिव्हिल सर्जन, वणी यांस चालू महिन्यापासून एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आल्यामुळें रा. रा. सखाराम गणेश परांजपे यांस यवतमाळास सिव्हील सर्जन नेमण्यांत आलें.

---

रा. रा. दत्तात्रय मोरेश्वर बर्वे नायब तहशिलदार इलिचपूर व रा. रा. यशवंत गणेश नायब तहशीलदार चिखलदरा या उभयतांस अनुक्रमें वणी व बुलढाणा या जिल्हांचे डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर नेमल्यामुळें त्यांच्या जागीं अनुक्रमें रा. रा. वामन कृष्ण सहस्त्रबुद्धे व वासुदेव वामन यांस इलिचपूर व चिखलदरा येथें नायब तहशिलदार नेमण्यांत आलें.

या आठवड्यापासून सेशन कचेरी आकोल्यास भरणार असून पश्चिम वऱ्हाडांतील सेशन खटले चालणार आहेत.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८= |
| सोनें २४।= | चांदी ७१॥ |
| ज्वारी ६३-६४ | कपास ८४ |
| गहू काठे ७५ | बनशी ९०।९५ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १० रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |

---

### *NOTICE*

Pleaders' Examination will be held in the Court House of the Civil and Sessions Judge Berar at Amraoti from Monday the 5th. September 1904.

The papers will be set in the following order at the time mentioned against them.

| Paper | Time | Date |
|---|---|---|
| 1. Hindu and Mahomedan Laws and the Law relating to Succession Probate and Administration. | 10 A.M. | 5th. September 1904 Monday |
| 2. Laws of Civil Procedure, Limitation and the H. A. D. Small Cause Court Law | 2 P.M. | |
| 3. Law of Contracts and Torts... | 10 A.M. | 6th. September 1904 Tuesday |
| 4. Law of Specific Relief, Transfer of property, Mortgage and Trusts. | 2 P.M. | |
| 5. Criminal & Police Laws... | 10 A.M. | 7th. September 1904 Wednesday |
| 6. Law of Evidence, Registration and Stamps. | 2 P.M. | |

Amraoti 13 th. August 1904 } F. W. A. Prideaux Civil & Sessions Judge Berar.

---

## वर्तमानसार.

टिळकांची अर्जी—आपणावर झालेल्या खटल्यांत आपल्याला विनाकारण त्रास पडून नुकसानी सोसावी लागली ती भरून मिळण्याबद्दल रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनी सरकारमार्फत हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी मि. ब्रॉडरिक साहेब यांजकडे अर्ज पाठविला आहे.

**वीण कामाचा कारखाना**—म्हैसुरच्या महाराजांनीं येत्या महिन्याच्या पहिल्या तारिखेपासून माल्लाकोलमुस या नांवांच्या आपल्या राज्यांतील गांवीं एक वीणकाम शिकविण्याची शाळा काढण्यास मंजुरी दिली आहे. या शाळेंत वीणकाम व सतरंज्या बनविण्याचें काम शिकविण्यांत येईल.

**अनुभविक गोष्ट**— घरांतले उंदीर एकदां सांपळ्यांत सांपडून निसटून गेले ह्मणजे ते पुनः कोणत्याही प्रकारच्या सांपळ्यांत सांपडत नाहींत. घुशी इतक्या सावध नसतात. त्या केंव्हां तरी पुनः गुरफटल्या जातात.

**चौकस लोकांचो महती**— कित्येक लोकांस नुसत्या चौकशा करण्याची भारी सठाठेव असेत. ते चारचौघांत कधीं उगे राहावयाचे नाहींत. हें कसें आहे, तें कसें आहे, याप्रमाणें त्यांचे प्रश्नावर प्रश्न चालावयाचे! अशी मंडळी संभाषणाचे वेळीं फार उपयोगीं ते तेल गाळण्याच्या गसराळयास रखे होत. गसराळयाचें काम एवढेंच कीं, जें एका पात्रांत असेल तें दुसऱ्या पात्रांत नेऊन पोहोंचवावयाचें, स्वतःला ह्मणून बिलकूल संस्कार नाहीं, तशाच मासल्याची वरील मंडळी होत.

**शहाण्यांत व मूर्खांत अंतर**— शहाण्यास मूर्खाची माहिती असते; पण मूर्खास शहाण्याची असत नाहीं; असें कां? तर शहाणा पहिल्या प्रथम अज्ञानी असून त्या स्थितीचा तो अनुभव घेऊन चुकला असतो; पण मूर्ख तो आद्यंतीं मूर्खच!

पॅरिस येथील वैमानिक सँटो डुमास यांस जपान सरकारनें आपलें विमान घेऊन आपल्या बाजूनें युद्धास बोलाविलें होतें. या विमानांत भयंकर कुलुपी गोळे घालून ते पोर्ट आर्थरवर वरून टाकावे अशी कल्पना निघाली होती, पण रशिया विरुद्ध तिथल्या लोकांस मदत करणें नीट नाहीं ह्मणून ती गोष्ट त्यानें नाकबूल केली.

तंबाखूला आतां चांगले दिवस आले आहेत असें दिसतें. एका इंग्रजी मासिकात असें छापलें आहे कीं तंबाखूच्या धुरानें कालरा, प्लेग व इतर कित्येक रोगाचे जंतु मरण पावतात, यामुळें तंबाखू ओढणारास त्या रोगाची भीति उरतच नाहीं.

**खुजा उंट**— बर्लीन येथील प्रदर्शनांत ठेवण्याकरितां इराणच्या बादशहानें एक अगदीं खुजा उंट पाठविला आहे. त्याची उंची फक्त २७ इंच आहे. त्याचें वजन ६१ पौंड आहे. व त्याचा रंग पांढरा आहे.

**चिनाला मतलीच सुधारणा नको**—चिनी लोकांत बायकांचे पाय बांधून बारीक करण्याची जी चाल आहे ती वाईट आहे किंवा चांगली आहे, यांचप्रमाणें चिनी लोकांनीं आपल्या शेंड्यांच्या लांबलचक वेण्या घालाव्या किंवा नाहीं अशा प्रकारच्या सुधारणासंबंधीं चीनी लोक विचार करूं लागले आहेत. पण चीन देशांतील सैन्यांत काय सुधारणा केली पाहिजे, आरमार अगदीं पहिल्या प्रतीचें करण्यास काय उपाय केले पाहिजेत इत्यादि अशा प्रकारच्या सुधारणाकडे जर चीनी लोक लक्ष देतील तर चीन देश ह्मणजे आशियाखंडाचें लवकरच एक भूषण होऊन बसेल. आमच्यासारख्या गुलाम बनलेल्या लोकांनीं विधवांच्या विवाहासंबंधानें आणि मुलींच्या मुंजीसंबंधानें विचार करित बसावें पण चीन सारख्या स्वतंत्र राष्ट्रानेंही फक्त अशाच प्रकारच्या गोष्टींत आपला वेळ व्यर्थ घालवावा हें चांगलें नाहीं.

**बरें झालें**— इंदूर दरबारची मराठी भाषा काढुन हिंदी भाषा चालूं करण्याचा प्रयत्न झाला होता त्यास सरकारनें संमती दिली नाहीं. सुदैव मराठी भाषेचें!

**धार्मिक शिक्षण**— अजमीर कॉलेजचे प्रिन्सिपाल यांणीं असें सांगितलें आहे कीं कॉलेजामध्यें शिकणाऱ्या राजकुमारांनीं आपापल्या खाजगी व फुरसतीच्या वेळीं धर्मशिक्षणाकडे रोज कांहीं तरी लक्ष द्यावें. शिवाय प्रत्येकानें रोज देवदर्शन घेण्याकरितां देवळांत गेलेंच पाहिजे. एक शास्त्रीहि सहा महिन्याच्या मुदतीनें राजकुमारांना खाजगी रितीनें धर्मशिक्षण देण्याकरितां कॉलेजमध्यें ठेविला आहे ह्मणतात.

**गोवधाची मनाई**— गोंडळच्या ठाकोर साहेबांनीं आपल्या राज्यांत गोवध करण्याची मनाई केल्यावरून त्यांच्या राज्यांतील धोराजी गांवच्या मुसलमानांनीं तेथून निघून नवागड येथें जाण्याचा विचार ठरविला आहे. पण तेथेंही त्यास गोवधाची मनाई करण्यांत आल्याशिवाय राहणार नाहीं असें त्यांस समजल्यावरून त्यांचा विचार डळमळीत झाला आहे.

**झोंप आणणारा तकिया**— लंडनमध्यें एक तकिया नवीनच तयार केला आहे. तेथील कंपनीनें त्या तकियाची किंमत ६ शिलींग ठेवली आहे. त्यावर लेटलें असतां निद्रा येते.

(शिकले पाहिजे)

१. हसावें कसें हें पुष्कळांनां समजत नाहीं. तें त्यांना शिकलें पाहिजे. हसणें हें पुष्कळा औषधांपेक्षांहि अधिक गुणकारक आहे.

२. एका कामालाच चिकटून रहाणें हें पुष्कळांना साधत नाहीं. आज हें कर, उद्यां तें टाकून घेऊन दुसरेंच हातीं घे. याप्रमाणें एकना धड भाराभर चिंधया 'होऊन त्यांना कोणत्याच कामांत यश येत नाहीं, त्यांनीं एकाच कामांत सगळें लक्ष घालण्यास शिकलें पाहिजे.

३. गोष्ट सांगण्यास शिकलें पाहिजे. उत्तम भाषण ही एक मेजवानी असते. ती देण्यास आपलें कांहीं वेचत नाहीं; परंतु ते ऐकणारांची तृप्ति करतें. लोकांत प्रिय होण्याला हें एक सुलभ साधन आहे.

४. आपली कर्मकथा आपल्याच मनांत ठेवण्यास शिकलें पाहिजे. कित्येकांचीं तोंडें फुटक्या मांड्यासारखीं असतात. त्यांच्यांतून सगळें गळत रहातें. तुमची कर्मकहाणी ऐकण्याचें लोकांचें काय अडलें आहे? या गोष्टीचा विचार करून स्वताचीं दुःखें उगीच वाटेल त्याच्यापाशीं सांगत फिरूं नये.

५. जग दुष्ट आहे ह्मणून त्याचा तिरस्कार किंवा द्वेश न करतां त्याच्यावर प्रेम करण्यास शिकलें पाहिजे. आपण जगांतच आहों! तेंव्हां जग जर दुष्ट आहे तर त्या दुष्टपणाचा थोडाफार वांटा आपल्याकडेहि येत असेल असा विचार करावा आणि दुसऱ्यांवर प्रेम करूं लागावें.

**मुलास रंजविणारें यंत्र**—विलायतेंत एका कल्पक मनुष्यानें एक विलक्षण यंत्र तयार केलें आहे. तें घरांत असलें ह्मणजे मुलांनां सांभाळण्याचें बरेंच काम वांचेल. तें यंत्र मुलाच्या पाळण्यास लावावयाचें. मूल रडूं लागल्यास त्या हवेच्या आघातांचें कार्य त्या यंत्रावर होऊन त्यांत असलेला फोनोग्राफ एक गाणें ह्मणतो व दुसरीकडे असलेल्या एका कळेस गती मिळून त्यानें पाळण्यास झोंके दिले जातात. मुलाचें रडणें बंद झालें ह्मणजे हळूहळू त्या यंत्राचे व्यापारहि बंद होतात.

**अमोल दातृत्व**— क्युबा बेटांतील एक रहिवाशी अलीकडे पारिस शहरांत रहात होते. त्यानें मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें कीं, आपल्या पश्चात् आपली अर्धी जिनगी मिसेस ऍनी बिझांटबाईंस सेंट्रल हिंदु कालेजकरितां व बाकीची अर्धी कर्नल ऑलकॉट यांस थिऑसफीच्या लायब्ररीकरितां देण्यांत यावी. पुढें ते गृहस्थ वारले. मृत्युपत्राप्रमाणें त्यांच्या जिंदगीची व्यवस्था लवकरच होणार आहे. एकंदर जिंदगी सुमारें ४ लाखांची आहे असा अंदाज आहे. मा. म.

---

### नोटीस

रा. पामू वल्लद जानजी मुन्हे राहणार निमगांव तालुके मलकापूर, पोष्ट–नांदुरा यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं आपण तारीख २८ जुलै १९०४ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांतून नोटीस दिली ती पावली. आह्मी मारवाड्यापासून शेतें घेतलीं ही गोष्ट खरी पण ती तुह्मास आह्मी दिली नाहींत. आह्मी ती बरोबर वाहत आहों. तारीख १६ एप्रिल १९०४ रोजीं तुह्मी आह्मांस कर्जरोखा रुपये ७५ चा करून दिला. रुपये तुह्मी आर्धी घेतले आणि नंतर दस्तैवज करून दिला आहे. आतां तुमच्या मनांत कांहीं बेमानकी आली आहे असें दिसतें आणि ह्मणून तुह्मी वरील खोटीच बनावटी नोटीस देऊन आह्मी कर्ज रोखा खोटाच फसवून करून घेतला असा त्यांत मजकूर घातला आहे. या बदल तुमच्यावर फौजदारी करण्याचा आमचा विचार आहे. लबाड लोकांच्या चिथावणीस लागून अशी नोटीस दिल्यानें कर्जरोखा खोटा होत नसतो व रुपये सुटत नसतात हें पक्कें ध्यानांत ठेवावें. शिवाय तुमच्या गैरवर्तनामुळें आह्मास सरकारदरबार करावें लागणार ह्मणून त्याचा खर्च तुह्मांवर पडेल. कळावें तारीख ११ आगष्ट १९०४ इ०

सहीची निशाणी
भोनाजी वल्लद मारुती गावंडे
पाटील राहणार पिंपराळे
तालुके पोष्ट खामगांव,
यांचे हातची रेघ.—

---

### नोटीस

मे. अबदुलखा वल्लद मुजाफरखा मुसलमान राहणार रेल ता. आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं उसमान रमतुल्ला कच्छी रा. आकोट याजकडे आमचे रुपये होते त्यापैकीं बाराशें १२०० रुपयांचा हवाला तुह्मी घेतला होता. त्या पैकीं वसूल १००० रुपये वजा जातां बाकी मुद्दल रुपये २०० सालीम रकमेचे व्याज शेकडा १ रुपया प्रमाणें २१२ दोनशे बारा एकूण रुपये ४१२ चारशें बारा ही नोटीस पावतांच पाठवून द्यावे; असें न केल्यास मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून सालीम रुपये कोर्ट खर्चासुद्धां व नोटीशीचे खर्चा सुद्धा भरून घेईन. विशेष खर्च तुह्माला लागूं नये ह्मणून अगाऊ सुचना केली आहे कळावें. तारीख ११।८।०४ इ.

सही
साहेबराम मोतीराम मालक
रामरतन साहेबराम तर्फे
मुकत्यार चैनोराम हणमंत
राम दुकान पनज ता.
आकोट. दस्तुर खुद्द

---

### नोटीस

बेशमी बनाई मर्द तुकाराम ठाकेर राहणार कळम्ब खुर्द ता. बाळापुर यांसः–

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मा जवळ जी स्थावर जंगम जिनगी व सावकारीची रकम आहे त्या सर्व इस्टेटीचा उपभोग तुह्मी घ्यावा पण आतां असें कळते कीं दुसऱ्या कांहीं आप्तांच्या व इतर लोकांच्या नादीं लागून तुह्मी इस्टेटीची वाताहत मांडली आहे तसें करण्याचा अधिकार तुह्माला नाहीं. कैलासवासी तुकाराम यांच्या वेळीं किंवा त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा गोविंदा याच्या वेळीं इस्टेटीस कर्ज वगैरे कांहीं नव्हतें, सध्यांही कोणतेंच कोणाचेंही कर्ज नाहीं. तुह्माला पोटापाण्याला कांहीं कमताई नाहीं इत्यादि सर्व कारणें लक्षांत घेतां स्पष्ट दिसून येईल कीं तुह्माला जिनगीची अफरातफर करण्याचें कांहींमात्र प्रयोजन नाहीं. या उपर जो कोणी तुमच्याशी व्यवहार करील तो फसेल इतकेंच नाहीं तर तुमच्या पश्चात् आमच्या कडे वारसाहक्कानें येणाऱ्या जिनगीवर कोणताच बोजा दुसऱ्याचा बसणार नाहीं. ह्मणून या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी मृत्युपत्र, खरेदी, गहाण वगैरे व्यवहार इस्टेटी संबंधाचा करूं नये. कळावें १२ आगष्ट १९०४ इसवी०

सही
१ देवोजी वल्लद नथराम पाटील
कळंब खुर्द निशाणी खुद्द.
१ महादु वल्लद एकोजी राहणार
मौजे कळंब खुर्द दस्तुर खुद्द.
१ संपत सखाराम पाटील मौजे
कळंब खुर्द दस्तुर खुद्द

REGISTERED No. N.

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

advance.
Single copy ..................... 2 as
*Advertisement*
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

**VOL XXXVIII AKOLA MONDAY 22 AUGUST 1904 NO 33**

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २२ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३३


# NOTICE

Notice under Section 150 of the Berar Municipal Law 1886.

The Akola Municipal Committee proposes to make the following rules to regulate the vehicles and animals plying for hire within the Akola Municipality.

The draft will be taken into consideration after the 1st of or September 1904 and objections suggestions in respect thereof should be forwarded in writing to the Secretary Municipal Committee Akola, before that date.

Dated Akola 13-8-1904 } *N, K Date* Vice — Chairman M. Committee *Akola.*

*Draft rules.*

The following rules relating to licenses for proprietors of vehicles and animals plying for hire within the limits of the Akola Municipality and to the rates for the hire of such vehicles and animals and to the loads to be carried by them have been made under sub—sections (1),—*(a)*, (1—*(b)* and (2) of section 116 of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting of the Municipal Committee etc.

1. The proprietor of every vehicle or animal plying for hire within the limits of the Akola Municipality shall provide himself with the necessary license from the Municipal Committee or from such person as the Municipal Committee may authorize in this behalf. The license shall be obtained by the proprietor on payment in advance of the fees prescribed below.

| Description | For a year or a portion of a year exceeding six months | For six months or less |
|---|---|---|
| | Rupees. | Rs. as. p. |
| Licensed to carry passengers. | | |
| Four wheeled cart ........... ......... | 8 | 4 0 0 |
| Two wheeled cart ..................... | 5 | 2 8 0 |
| Per animal ............................ | 1 | 0 8 0 |
| Licensed to carry goods | | |
| Four wheeled cart... ... ... | 8 | 4 0 |
| Two wheeled cart ... ... ... | 5 | 2 8 |
| Per animal ... ... ... ... | 1 | 0 8 |

Note:—Vehicles and animals thus licensed shall, during the period covered by the license be exempt form the tax on vehicles and animals assessed under the section 41 (1) [A] [c] of the Berar Municipal Law 1886.

2, The maximum load to be carried by any vehicle licensed to carry Passengers shall be as follows:—

| | |
|---|---|
| An ordinary Khandesh Damani or tanga...... | 4 Passengers |
| A large do | 6 ,, |
| A two horse carriage | 4 ,, |
| A one horse do | 3 ,, |
| A four — wheeled large sized carriage or omnibus | 8 |

*Exclusive of the driver*

3. The maximum load of any vehicle licensed to carry goods shall not exceed 14 maunds. One maund being equivalent to 40 Seers and one seer equivvalent to 80 tolas.

Provided that any such vehicle which may occasionally be used to carry passengers shall not carry more than six persons, exclusive of the driver.

4 No person shall drive a licensed vehicle unless be is licensed as competent to do so.

5. As regards the forms of licenses &c. to be issued and the register to be maintained the Municipal Committee shall follow the procedure laid down in rules 135 and 136 of the Municipal Account Rules published in Residency Orders Notification No 278 dated the 22nd. August 1896 and confirmed by the Resident in Residency Orders Notification No. 106 dated the 29th *March* 1897.

6. Licenses shall be issued yearly and half—yearly the year being reckoned from the 1st April to the 31st March both inclusive and the first half of the year being reckoned from the 1st April to the 30th September both days inclusive and the second half from the 1st October to the 31st March both days inclusive No license shall be issued for periods other than those specified.

7 Licenses may be taken out or renewed at any time on application to the Municipal Committee. The first application under these rules shall be made within one month from the date on which they come into operation.

8 Every proprietor or person in charge of a vehicle or animal shall produce his license for inspection when called upon to do so by any Magistrate by the Police or by any officer or servant of the Municipality duly authorized in this behalf.

9. When a lecense is defaced, torn or lost a duplicate copy of it may be obtained on payment of a fee of Rs. 0—8—0 in respect of a license pertaining to a vehicle and Rs. 0—2—0 in respect of a license pertaining to an animal.

10 Every driver shall keep to his left and every vehicle shall be provided with a light between sun set and day—break.

11 All vehicles & animals plying for hire shall be presented in the months of March and September of each year at the Municipal office for inspection by a Sub—committee composed of three Municipal members and appointed by the General Committee. No vehicle or animal shall be licensed or have the license for it renewed unless it is considered fit for plying.

12 The license of any license who breaks any of these rules may, for reasons to be recorded in writing, be suspended by the Municipal Secretary for a period not exceeding six months any may be subsequently cancelled by the Municipal Committee if the cause for its suspension continues to exist at the end of that period. The license of any licensee whose vehicle or animal becomes unfit for plying may also be similarly suspended by the Municipal Secretary until the vehicle or animal is replaced or has otherwise become fit for plying.

Any vehicle or animal of which the license is suspened shall during period of such suspension be considered as without license, and the proprietor of such vehicle or animal shall be liable to prosecution and conviction under rule 13 if he plies for hire during such suspension and any licensee repeatedly infringing any of these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs. 20.

13 Any person plying a vehicle or animal for hire within the limits of the Akola Municipality without obtaining a license as provided for in these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs. 20.

14. The Municipal Committee may at its discretion grant or refuse a license to any licensee who has been repeatedly convicted under rules 12 and 13 or whose license has been repeatedly suspended under rule 12.

15. Licenses are not transferable without the previous permission of the Municipal Committee or of such person as the Municipal Committee may authorize in that behalf; but when the ownership of a licensed vehicle or animal is transfered during the currency of that license, notice shall be given in writing by the transferee, within one week of the transfer, to the Municipal Secretary who will then, on payment of a fee of Rs. 0—8—0 in the case of a vehicle and of Rs 0—2—0 in the case of an animal make the necessary alteration in the register and license. If such notice be not given within seven days as required above, the new proprietor shall, if the vehicle or animal plies, for hire within the Municipal limits, be liable to pay the yearly license fee and shall also be liable to be prosecuted and convicted under rule 13.

16 The following shall be the maximum rates of hire to be charged within Municipal limits in the absence of an express contract:—

| | From the Railway—station to any place in the Town | | | From the Railway—station to any place in the Peith | | |
|---|---|---|---|---|---|---|
| For passengers per seat... .. | 0 | 1 | 6 | 0 | 1 | 0 |
| Rates of hire for a whole cart For a vehicle drawn by bullocks and carrying four passengers | 0 | 4 | 0 | 0 | 3 | 0 |
| Bullock cart carrying six passengers | 0 | 5 | 0 | 0 | 4 | 0 |
| Horse cart drawn by one horse... | 0 | 5 | 0 | 0 | 4 | 0 |
| Horse cart drawn by two horses... | 0 | 6 | 0 | 0 | 5 | 0 |

| | |
|---|---|
| Rates of hire for a whole cart for any time within and not exceeding one hour | 0—8—0 |
| Do. for every hour beyond... | 0—8—0 per hour |
| Do. for a whole day of 6 hours | 3 Rs |

The rates for carrying goods may be settled between themselves by the owner or driver of a cart and the person hiring it.

17 Nothing contained in these rules shall prevent the proprietor of a licensed cart from entering into a private contract for the hire of such cart by the day or a month.

18 Every owners or driver of animal shall be bound at all times to make his licensed vehicle or animal or both available to persons requiring the same provided the requisite hire is paid or agreed to be paid by the hirer.

—:0:—

## टोळधाड व ता निवारण्याचे उपाय.

हें सरासरी चाळीस पानाचें पुस्तक रा. रा. कृष्णाजी गणेश सहस्रबुद्धे यांनीं स्वानुभवावरून व इतर बऱ्याच त्रोटक लेखांचे आधारें लिहिलें आहे. टोळांपासून पिकाची हानी कशी होते या बद्दल व टोळांचा नाश करण्याच्या अनेक युक्त्या बद्दल यांत पूर्ण विवेचन आहे. टोळनाशाच्या कामावरील अधिकाऱ्यानां व वहितदारानां हें पुस्तक वेच्यालायक असून किंमत अवघी चार आणे ठेविली आहे. प्रती वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अगर रा. कृ. ग. सहस्रबुद्धे, डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर आफ ॲग्रिकल्चर, आकोला यांजकडे विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८२६

## संमेलन

वऱ्हाडच्या कारभाराच्या शाखा व मध्य प्रांतांतील कारभाराच्या शाखा हळूहळू एक जीव होत चालल्या आहेत. शाळाखातें पोलिसखातें, तुरुंगखातें, अपकारीखाते मेडिकल खातें इत्यादि खाती अगदीं एकवटून गेली आहेत. आतां मध्यप्रांतांतील अधिकारी व वऱ्हाडांतील अधिकारी यांच्या बदल्या इतस्ततः होऊं लागतील आणि त्यामुळें आमच्या कडील अधिकाऱ्यांचा दृष्टिक्षेप फार लांबवर पसरत जाईल हें उघड आहे. आमच्या लहानशा प्रांतांतील अधिकाऱ्यांची एकजूट इतकी रहात असे कीं जो तो परस्परांस उचलून धरीत असे. आतां मध्यप्रांतांशीं संबंध जडल्यामुळें ही जूट राहणार नाहीं हें खरें तथापि अधिकारी एकाच स्थळीं राहिल्यामुळें जे अनिष्टपरिणाम घडतात ते तसे या पुढें दृष्टीस पडण्याचा संभव कमी कमी होत जाईल. त्या शिवाय उभय प्रांतांतील नेमणूक एकत्र होत गेल्यानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस परस्परांच्या मुलाखतीचा व अनुभवाचा लाभ होत जाईल. आमच्या प्रांतांतील अधिकाऱ्यांस पुष्कळ गोष्टी मध्यप्रांतांतील अधिकाऱ्या पासुन शिकण्या सारख्या आढळतील आणि मध्यप्रांतांतील कारभाऱ्यांस देखील या प्रांतांतील कारभाराच्या कांहीं विशिष्ट पद्धतींचा लाभ आपोआप मिळत जाईल. उभय प्रांतांतील अधिकाऱ्यांवर या संमेलनाचा संस्कार मोठा फायदेशीर होण्याचा संभव आहे. नवीन अमलाच्या देखरेखी खालीं या प्रांताची संकोचित दृष्टी नाहींशी होऊन कित्येक अव्यवस्था लयास जातील.

मुलकी खात्याचा अझून संयोग करण्यांत आलेला नाहीं आणि न्यायखातेंही अद्याप स्वतंत्रच ठेविलेलें आहे. मुलकी खात्याचा मिलाफ येत्या आक्टोबर पासून होणार आहे असें सांगतात; आणि न्यायखात्याचा मिलाफ होण्याला निदान एक दोन वर्षांचा काल लागण्याचा संभव दिसतो. आमच्या प्रांतांतील मुलकीखातें मध्यप्रांतांतील खात्यापेक्षां विशेष चांगलें आहे. इकडे जसे पगार मोठे आहेत तसे तिकडे नाहींत. त्या खेरीज आमच्या प्रांतांत तहशिलदाराचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर करून त्यांस न्यायखात्यांत बढतीवर घेण्याची वहिवाट आहे; आणि या रितीनें मुलकीखातें व न्यायखातें यांचा परस्पर संबंध अगदीं निकटचा आहे. असा हा पूर्वापार संबंध मध्यप्रांताच्या वहिवाटींत कायम राहील किंवा तो बदलला जाईल हें अद्याप कांहीं सांगवत नाहीं. मुंबई इलाख्या प्रमाणें मुलकी खात्या पासून न्यायखातें अगदीं स्वतंत्र करण्यांत येईल तर ती व्यवस्था विशेष सुखावह होईल. या रितीनें मुलकी कडील अंमलदारास त्यांच्याच खात्यांत बढती मिळत जाईल आणि न्यायखात्यांतील लोकांस स्वतंत्रपणें त्यांच्याच खात्यांत बढती मिळत जाईल. मुलकीपासून न्यायखातें स्वतंत्र ठेवण्यांत यावें असा इकडील सर्व लोकांचा अभिप्राय आहे. पण आमच्या नव्या स्थानिक सरकाराचा अभिप्राय अजून बाहेर पडलेला नाहीं. मध्यप्रांताच्या विद्यमान व्यवस्थेंत मुलकी अधिकारी व न्यायखात्याचे अधिकारी यांच्या जागा फारशा स्वतंत्र नाहींत आणि तीच पद्धती चालू ठेविल्यास आमच्या कडील अधिकाऱ्यांच्या भावी बढतीला पुष्कळ अडचणी येतील असा सुमार आहे. तिकडील अधिकाऱ्यांच्या नामावळींत वऱ्हाडाचे अधिकारी घालून एकत्र करण्यांत आले तर कित्येकांच्या बढतीला मोठा प्रत्यवाय येण्याचा रंग दिसतो.

## पायगाडी

बायसिकल ह्मणजे पायगाडी. हें सचक्र वहन पायानें चालवावयाचें असतें. गेल्या दहा बारा वर्षांत या पायगाड्यांचा प्रसार फार मोठा झाला आहे. गांवोगांव ही यांत्रिक गाडी आतां दृष्टीस पडते आणि उत्तरोत्तर तिचा खप असाच वाढत जाईल तर कांहीं थोड्या वर्षांत ही कळेची गाडी फार स्वल्प किंमतीला मिळूं लागेल आणि लोक तिचा उपयोग अधिकाधिक करूं लागतील. या गाडीच्या नाना तऱ्हा आतां प्रचारांत आल्या आहेत आणि त्यांच्या किंमती देखील शंभर पाऊणशें रुपया पासून वाढत्या दराच्या आहेत. यांत्रिक रचना जितकी अवघड व नाजूक तितकी त्या गाडीला किंमत अधिक पडते. स्थलान्तर करण्यास ही पायगाडी फार उपयोगी पडते. मनुष्य माणसाला आगगाडीच्या वेगा इतकी ही गाडी चालवितां येते. हा यांत्रिक घोडा फार उपयागाचा असून कमी खर्चांत वापरावयाला सांपडतो.

सध्यां ही पायगाडी धनिक लोकांच्या चैनीच्या साधनांपैकीं एक साधन आहे; आणि साहेब लोकांच्या ऐटीचें अनुकरण करणाऱ्या सर्व लोकांनीं या गाडीला उदार आश्रय दिलेला आहे.

पण ही पायगाडी ह्मणजे आमचा पैसा बाह्य राष्ट्रामध्यें नेण्याला मोठी प्रचंड गाडी निघाली आहे. या पायगाडीचे मोठमोठे कारखाने आहेत आणि या सर्वांची चलती व श्रीमंती आमच्या देशांतील पैशावर पुष्कळच मोठ्या प्रमाणावर उभारली जाण्याचा रंग दिसत आहे. ही यांत्रिक पायगाडी ह्मणजे आमच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेल्या सर्व गोष्टींचा नवा मासला होय. इंग्रजी हुन्नरानें नव्या नव्या मौल्यवान वस्तु निर्माण होत असतात आणि त्या वस्तूंचे मोठें गिऱ्हाईक आमचेच लोक होत. विलायतेला नाना वस्तु तयार होतात आणि त्या वस्तूंला इंडियाचा बाजार ह्मटला ह्मणजे मोठ्या लाभाची दुकानदारी होय. पायगाडीच्या प्रसारा संबंधानें जितका आपणांस आनंद वाटतो त्याच्या उलट प्रकार विचाराच्या तंत्रींत घडतो. पराकाष्ठेच्या विषादाची गोष्ट म्हणजे विलायती वस्तूंची चहा होय.

आमच्या देशांत कांहींच कारखाने नसावेत हे मोठेंच दुर्भाग्य होय! विचाराच्या दृष्टीनें असें वाटूं लागतें कीं हे कारखाने निघे पर्यंत आह्मी विलायती पायगाड्या वापरूंच नये. असा निर्धार होईल आणि सत्संकल्पानें या पायगाड्या बनविण्याच्याच मागें आमची औद्योगिक कारखानेवाली मंडळी लागतील तर देशाचा खरोखर मोठा फायदा होईल. पण हल्लींचा उपक्रम असाच चालू राहील तर मात्र बुडत्याचा पाय जसा खोल खोल जात असतो तशी आमची दुर्दशा अधिक झपाट्यानें होत जाईल.

देशी वस्तु वापरण्या संबंधाचा कृत संकल्प पाहिजे. देशी वस्तू शिवाय इतर वस्तु आपण त्याज्य मानल्या पाहिजेत. हा तिरस्कारभाव नेहमीं जागृत पाहिजे. आपलेपणाचा बाणा आपण राखला पाहिजे आणि दृढ निश्चयानें तो आपलेपणा सिद्धीस नेण्यांतच सर्व देशाभिमान भरलेला आहे. देशाभिमान ह्मणून कांहीं निराळा नसतो. आपला देश औद्योगिक गोष्टींत फार मागें आहे तेव्हां आपण सुधारलेल्या राष्ट्रांतील चीजवस्तु वापरण्याला अपात्र आहों असें आह्मी समजतों. हल्लींच्या विद्या आह्मांस औद्योगिक स्पर्धेमध्यें टिकाव धरण्यास शिकवीत नाहींत ह्मणून आपण सध्यांच्या क्रमिक विद्या सोडून औद्योगिक विद्यांचाच व्यासंग दृढतेनें चालविला पाहिजे. बंगाल्यांत जी औद्योगिक मंडळी निघाली तिचा मुख्य हेतु इंडियाचा नष्ट झालेला इंडियनपणा परत आणण्याचा आहे आणि हा हेतु सफल करण्यासाठींच औद्योगिक शाला, यांत्रिक व शास्त्रीय विद्याप्रसार आणि देशी कारखाने यांच्या प्रस्थापनेसाठीं सर्व उद्योग चालू आहेत. बंगाल्यांत जो दांडगा प्रयत्न चालू आहे त्याचें अनुकरण सर्वत्र सुरू झालें पाहिजे. सांप्रतच्या स्थितींत मोठीच उलथापालथ झाल्या शिवाय आमचें पाऊल पुढें सरणार नाहीं. आपण देशी वस्तु उपलब्ध होईपर्यंत आपल्या बहुविध गरजास पुष्कळसा संक्षेप देण्यास शिकलें पाहिजे. हाच देशाभिमानाचा पहिला श्रीगणेशा आहे. आणि या धड्याचा पाठ चांगला अंगवळणीं पडे पर्यंत आपला मार्ग जरा बिकट आहे. विलायती वस्तूंचा मोह सोडणें मोठें कठिण काम आहे आणि तो सुटण्या ऐवजीं पायगाडी सारख्या विलायती गोष्टींनीं आह्मी अगदीं विलायतीच बनत चाललों आहों ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

## सेशन खटले

वाशिम जिल्ह्यांतील तुळशी मर्द मारुती इजवर खुनाचा आरोप होता. चंद्रा नांवाचा सहा वर्षांचा मुलगा विहिरींत पडून बुडून मेला. त्याच्या प्रेताचा पंचनामा केला तेव्हां असें निष्पन्न झालें कीं त्याच दिवशीं दोन प्रहरीं मोठा सोसाट्याचा वारा सुटला होता, आणि तो इतका प्रचंड होता कीं पुष्कळ झाडें पडलीं, घरें कांहीं उडालीं व अशीच सर्वत्र दाणादाण झाली; तेव्हां त्या वाऱ्याच्या झपाट्यांत हा मुलगा विहिरींत उडून पडला असावा असा पंचाचा तर्क झाला. विहिरीची वरवंडी अगदीं जमिनी बरोबरच होती त्या मुळें असा अपघात होण्याचा संभव विशेष होता. परंतु या पंचनाम्यानें पोलिसांचा संशय दूर झाला नाहीं. त्यांची समजूत अशी कीं तुळशीनें खुनशीपणानें मुलाला दिवसा ढवळ्या विहिरींत लोटलें असलें पाहिजे. तुळशी आपल्या बहिणीच्या घरीं रहात होती. तिच्या बहिणीचा नवरा रामजी पाटील हा कारभारी पाटील आहे. चंद्रा हा त्याचा पुतण्या होय घरांत बायकामध्यें कुरबूर होत असे व भांडण तंटा नेहमीं होई. तुळशीला घरांतल्या इतर बाया हिणावीत कीं तूं पाटलीण होण्याला व वतनदारीण होण्याला आमच्या घरीं आली आहेत कीं काय ! या सर्व छळाचा सूड घेण्यासाठीं तुळशीनें चंद्राला विहिरींत लोटून दिलें असें सांगण्यासाठींच रामजी पाटलाचा सात आठ वर्षांचा मुलगा शंकऱ्या हा साक्षीदार सरकारतर्फेचा होता. त्यांच्या तोंडून कांहींच गोष्ट बरोबर बाहेर निघत नसे. अशा सारख्या साक्षीदाराच्या बोलण्या वर विश्वास बिलकूल बसला नाहीं आणि आरोपीला निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आलें. हा खटला सेशनापुढें आला नसतां तरी चाललें असतें.

वाशिम तालुक्यांतील मानोरा पोलिस स्टेशनामधील सोमठाणें येथें गेल्या नोवेंबरच्या २३ वे तारखेला खून झाल्या संबंधाचा दुसरा सेशन खटला होता. सय्यद बाबा अतार, त्याचा बंधु सय्यद भोलू, भाचा दावल व एक नोकर हुसेन असे चौघे आरोपी आहेत. या चौघा आरोपींनीं गंगाराम माळी याचा खून केला असा आरोप आहे. खुनाची गोष्ट अशी कीं गंगाराम माळी हा दोन तीन वर्षां पासून सय्यद बाबा अतारा पाशीं नोकर आहे. हा गंगाराम खुनाच्या दिवशीं रात्रीं आपल्या धन्याची पुतणी कुमारिका हशमतबी इजबरोबर रममाण होतांना रात्रीं दोन तीन वाजतां दृष्टीस पडला. सरकारी

किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळी.चे आत ८० १
दर ओळीस........६१ ८६
दुसरे खेपेस........ ....६१

Single copy .......................... 2 as
*Advertisement*
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

**VOL XXXVIII AKOLA MONDAY 22 AUGUST 1904 NO 33**

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २२ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३३

## NOTICE

Notice under Section 150 of the Berar Municipal Law 1886.

The Akola Municipal Committee proposes to make the following rules to regulate the vehicles and animals plying for hire within the Akola Municipality.

The draft will be taken into consideration after the 1st of or September 1904 and objections suggestions in respect thereof should be forwarded in writing to the Secretary Municipal Committee Akola, before that date.

Dated Akola 13—8—1904 } N, K Date Vice — Chairman M, Committee *Akola.*

*Draft rules.*

The following rules relating to licenses for proprietors of vehicles and animals plying for hire within the limits of the Akola Municipality and to the rates for the hire of such vehicles and animals and to the loads to be carried by them have been made under sub—sections (1),—(*a*), (1)—(*b*) and (2) of section 156 of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting of the Municipal Committee etc.

1. The proprietor of every vehicle or animal plying for hire within the limits of the Akola Municipality shall provide himself with the necessary license from the Municipal Committee or from such person as the Municipal Committee may authorize in this behalf. The license shall be obtained by the proprietor on payment in advance of the fees prescribed below.

| Description | For a year or a portion of a year exceeding six months | For six months or less |
|---|---|---|
| | Rupees. | Rs. as. P. |
| Licensed to carry passengers. | | |
| Four wheeled cart ........................ | 8 | 4 0 |
| Two wheeled cart ........................ | 5 | 2 8 |
| Per animal ........................ | 1 | 0 8 |
| Licensed to carry goods | | |
| Four wheeled cart... ... ... | 8 | 4 0 |
| Two wheeled cart ... ... ... | 5 | 2 8 |
| Per animal ... ... ... | 1 | 0 8 |

Note:—Vehicles and animals thus licensed shall, during the period covered by the license be exempt form the tax on vehicles and animals assessed under the section 41 (1) [A] [C] of the Berar Municipal Law 1886.

2, The maximum load to be carried by any vehicle licensed to carry Passengers shall be as follows:—

| | |
|---|---|
| An ordinary Khandesh Damani or tanga...... | 4 Passengers |
| A large do | 6 ,, |
| A two horse carriage | 4 ,, |
| A one horse do | 3 ,, |
| A four — wheeled large sized carriage or omnibus | 8 |

*Exclusive of the driver*

3. The maximum load of any vehicle licensed to carry goods shall not exceed 14 maunds. One maund being equivalent to 40 Seers and one seer equivalent to 80 tolas.

Provided that any such vehicle which may occasionally be used to carry passengers shall not carry more than six persons, exclusive of the driver.

4 No person shall drive a licensed vehicle unless he is licensed as competent to do so.

5. As regards the forms of licenses &ca. to be issued and the register to be maintained the Municipal Committee shall follow the procedure laid down in rules 135 and 136 of the Municipal Accout Rules published in Residency Orders Notification No 278 dated the 22nd. August, 1896 and confirmed by the Resident in Residency Orders Notification No. 106 dated the 29th March 1897.

6. Licenses shall be issued yearly and half—yearly the year being reckoned from the 1st April to the 31st March both inclusive and the first half of the year being reckoned from the 1st April to the 30th September both days inclusive and the second half from the 1st October to the 31st March both days inclusive No license shall be issued for periods other than those specified.

7 Licenses may be taken out or renewed at any time on application to the Municipal Committee. The first application under these rules shall be made within one month from the date on which they come into operation.

8 Every proprietor or person in charge of a vehicle or animal shall produce his license for inspection when called upon to do so by any Magistrate by the Police or by any officer or servant of the Municipality duly authorized in this behalf.

9. When a license is defaced, torn or lost a duplicate copy of it may be obtained on payment of a fee of Rs. 0—8—0 in respect of a license pertaining to a vehicle and Rs. 0—2—0 in respect of a license pertaining to an animal.

10 Every driver shall keep to his left and every vehicle shall be provided with a light between sun set and day—break.

11 All vehicles & animals plying for hire shall be presented in the months of March and September of each year at the Municipal office for inspection by a Sub—committee composed of three Municipal members and appointed by the General Committee. No vehicle or animal shall be licensed or have the license for it renewed unless it is considered fit for plying.

12 The license of any license who breaks any of these rules may, for reasons to be recorded in writing, be suspended by the Municipal Secretary for a period not exceeding six months any may be subsequently cancelled by the Municipal Committee if the cause for its suspension continues to exist at the end of that period. The license of any licensee whose vehicle or animal becomes unfit for plying may also be similarly suspended by the Municipal Secretary until the vehicle or animal is replaced or has otherwise become fit for plying.

Any vehicle or animal of which the license is suspened shall during period of such suspension be considered as without license, and the proprietor of such vehicle or animal shall be liable to prosecution and conviction under rule 13 if he plies for hire during such suspension and any licensee repeatedly infringing any of these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs. 20.

13 Any person plying a vehicle or animal for hire within the limits of the Akola Municipality without obtaining a license as provided for in these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs. 20.

14. The Municipal Committee may at its discretion grant or refuse a license to any licensee who has been repeatedly convicted under rules 12 and 13 or whose license has been repeatedly suspended under rule 12.

15. Licenses are not transferable without the previous permission of the Municipal Committee or of such person as the Municipal Committee may authorize in that behalf; but when the ownership of a licensed vehicle or animal is transfered during the currency of that license, notice shall be given in writing by the transferee, within one week of the transfer, to the Municipal Secretary who will then, on payment of a fee of Rs. 0—8—0 in the case of a vehicle and of Rs 0—2—0 in the case of an animal make the necessary alteration in the register and license. If such notice be not given within seven days as required above, the new proprietor shall, if the vehicle or animal plies for hire within the Municipal limits, be liable to pay the yearly license fee and shall also be liable to be prosecuted and convicted under rule 13.

16 The following shall be the maximum rates of hire to be charged within Municipal limits in the absence of an express contract:—

| | From the Railway—station to any place in the Town | | | From the Railway—station to any place in the Peith | | |
|---|---|---|---|---|---|---|
| For passengers per seat... .. | 0 | 1 | 6 | 0 | 1 | 0 |
| Rates of hire for a whole cart For a vehicle drawn by bullocks and carrying four passengers | 0 | 4 | 0 | 0 | 3 | 0 |
| Bullock cart carrying six passengers | 0 | 5 | 0 | 0 | 4 | 0 |
| Horse cart drawn by one horse... | 0 | 5 | 0 | 0 | 4 | 0 |
| Horse cart drawn by two horses... | 0 | 6 | 0 | 0 | 5 | 0 |

Rates of hire for a whole cart for any time within and not exceeding one hour } 0—8—0

Do. for every hour beyond...0—8—0 per hour

Do. for a whole day of 6 hours 3 Rs

The rates for carrying goods may be settled between themselves by the owner or driver of a cart and the person hiring it.

17 Nothing contained in these rules shall prevent the proprietor of a licensed cart from entering into a private contract for the hire of such cart by the day or a month.

18 Every owners or driver of animal shall be bound at all times to make his licensed vehicle or animal or both available to persons requiring the same provided the requisite hire is paid or agreed to be paid by the hirer.

—:0:—

## टोळधाड

व

## ता निवारण्याचे उपाय.

हें सरासरी चाळीस पानाचें पुस्तक रा. रा. कृष्णाजी गणेश सहस्त्रबुद्धे यांनीं स्वानुभवावरून व इतर बऱ्याच त्रोटक लेखांचे आधारें लिहिलें आहे. टोळांपासून पिकाची हानी कशी होते या बद्दल व टोळांचा नाश करण्याच्या अनेक युक्त्या बद्दल यांत पूर्ण विवेचन आहे. टोळनाशाच्या कामावरील अधिकाऱ्यानां व वहितदारानां हें पुस्तक बोधपालायक असून किंमत अवघी चार आणे ठेविली आहे. प्रती वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अगर रा. कृ. ग. सहस्त्रबुद्धे, डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर आफ ॲग्रिकल्चर, आकोला यांजकडे विकत मिळतील.

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८२६

## संमेलन

वऱ्हाडच्या कारभाराच्या शाखा व मध्य प्रांतांतील कारभाराच्या शाखा हळूहळू एक जीव होत चालल्या आहेत. शाळाखातें पोलिसखातें, तुरुंगखातें, अपकारीखाते मेडिकल खातें इत्यादि खातीं अगदीं एकवटून गेलेलीं आहेत. आतां मध्यप्रांतांतील अधिकारी व वऱ्हाडांतील अधिकारी यांच्या बदल्या इतस्ततः होऊं लागतील आणि त्यामुळें आमच्या कडील अधिकाऱ्यांचा दृष्टिक्षेप फार लांबवर पसरत जाईल हें उघड आहे. आमच्या लहानशा प्रांतांतील अधिकाऱ्यांची एकजूट इतकी रहात असे कीं जो तो परस्परांस उचलून धरीत असे. आतां मध्यप्रांतांशीं संबंध जडल्यामुळें ही जूट राहणार नाहीं हें खरें तथापि अधिकारी एकाच स्थळीं राहिल्यामुळें जे अनिष्ट परिणाम घडतात ते तसे या पुढें दृष्टीस पडण्याचा संभव कमी कमी होत जाईल. त्या शिवाय उभय प्रांतांतील नेमणूक एकत्र होत गेल्यानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस परस्परांच्या मुलाखतीचा व अनुभवाचा लाभ होत जाईल. आमच्या प्रांतांतील अधिकाऱ्यांस पुष्कळ गोष्टी मध्यप्रांतांतील अधिकाऱ्या पासून शिकण्या सारख्या आढळतील आणि मध्यप्रांतांतील कारभाऱ्यांस देखील या प्रांतांतील कारभाराच्या कांहीं विशिष्ट पद्धतींचा लाभ आपोआप मिळत जाईल. उभय प्रांतांतील अधिकाऱ्यांवर या संमेलनाचा संस्कार मोठा फायदेशीर होण्याचा संभव आहे. नवीन अमलाच्या देखरेखी खालीं या प्रांताची संकोचित दृष्टी नाहींशी होऊन कित्येक अव्यवस्था लयास जातील.

मुलकी खात्याचा अजून संयोग करण्यांत आलेला नाहीं आणि न्यायखातेंही अद्याप स्वतंत्रच ठेविलेलें आहे. मुलकी खात्याचा मिलाफ येत्या आक्टोबर पासून होणार आहे असें सांगतात; आणि न्यायखात्याचा मिलाफ होण्याला निदान एक दोन वर्षांचा काल लागण्याचा संभव दिसतो. आमच्या प्रांतांतील मुलकीखातें मध्यप्रांतांतील खात्यापेक्षां विशेष चांगलें आहे. इकडे जसे पगार मोठ आहेत तसे तिकडे नाहींत. त्या खेरीज आमच्या प्रांतांत तहशिलदाराचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर करून त्यांस न्यायखात्यांत बढतीवर घेण्याची वहिवाट आहे; आणि या रितीनें मुलकीखातें व न्यायखातें यांचा परस्पर संबंध अगदीं निकटचा आहे. असा हा पूर्वीपार संबंध मध्यप्रांताच्या वहिवाटींत कायम राहील किंवा तो बदलला जाईल हें अद्याप कांहीं सांगवत नाहीं. मुंबई इलाख्या प्रमाणें मुलकी खात्या पासून न्यायखातें अगदीं स्वतंत्र करण्यांत येईल तर ती व्यवस्था विशेष सुखावह होईल. या रितीनें मुलकी कडील अंमलदारास त्यांच्याच खात्यांत बढती मिळत जाईल आणि न्यायखात्यांतील लोकांस स्वतंत्रपणें त्यांच्याच खात्यांत बढती मिळत जाईल. मुलकीपासून न्यायखातें स्वतंत्र ठेवण्यांत यावें असा इकडील सर्व लोकांचा अभिप्राय आहे. पण आमच्या नव्या स्थानिक सरकाराचा अभिप्राय अजून बाहेर पडलेला नाहीं. मध्यप्रांताच्या विद्यमान व्यवस्थेंत मुलकी अधिकारी व न्यायखात्याचे अधिकारी यांच्या जागा फारशा स्वतंत्र नाहींत आणि तीच पद्धती चालूं ठेविल्यास आमच्या कडील अधिकाऱ्यांच्या भावी बढतीला पुष्कळ अडचणी येतील असा सुमार आहे. तिकडील अधिकाऱ्यांच्या नामावळींत वऱ्हाडाचे अधिकारी घालून एकत्र करण्यांत आले तर कित्येकांच्या बढतीला मोठा प्रत्यवाय येण्याचा रंग दिसतो.

## पायगाडी

बायसिकल ह्मणजे पायगाडी. हें सचक्र वहन पायानें चालवावयाचें असतें. गेल्या दहा बारा वर्षांत या पायगाड्यांचा प्रसार फार मोठा झाला आहे. गांवोगांव ही यांत्रिक गाडी आतां दृष्टीस पडते आणि उत्तरोत्तर तिचा खप असाच वाढत जाईल तर कांहीं थोड्या वर्षांत ही कळेची गाडी फार स्वस्त किंमतीला विकूं लागेल आणि लोक तिचा उपयोग अधिकाधिक करूं लागतील. या गाडीच्या नाना तऱ्हा आतां प्रचारांत आल्या आहेत आणि त्यांच्या किंमती देखील शंभर पाऊणशें रुपया पासून वाढत्या दराच्या आहेत. यांत्रिक रचना जितकी अवघड व नाजूक तितकी त्या गाडीला किंमत अधिक पडते. स्थलान्तर करण्यास ही पायगाडी फार उपयोगी पडते. मध्यम माणसाला आगगाडीच्या वेगा इतकी ही गाडी चालवितां येते. हा यांत्रिक घोडा फार उपयोगाचा असून कमी खर्चात वापरावयाला सांपडतो.

सध्यां ही पायगाडी धनिक लोकांच्या चैनीच्या साधनांपैकीं एक साधन आहे; आणि साहेब लोकांच्या ऐटीचें अनुकरण करणाऱ्या सर्व लोकांनीं या गाडीला उदार आश्रय दिलेला आहे.

पण ही पायगाडी ह्मणजे आमचा पैसा बाह्य राष्ट्रामध्यें नेण्याला मोठी प्रचंड गाडी निघाली आहे. या पायगाडीचे मोठमोठे कारखाने आहेत आणि या सर्वांची चलती व श्रीमंती आमच्या देशांतील पैशावर पुष्कळच मोठ्या प्रमाणावर उभारली जाण्याचा रंग दिसत आहे. ही यांत्रिक पायगाडी ह्मणजे आमच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेल्या सर्व गोष्टींचा नवा मासला होय. इंग्रजी हुन्नरानें नव्या नव्या मौल्यवान वस्तु निर्माण होत असतात आणि त्या वस्तूंचे मोठे गिऱ्हाईक आमचेच लोक होत. विलायतेला नाना वस्तु तयार होतात आणि त्या वस्तूंला इंडियाचा बाजार ह्मटला ह्मणजे मोठ्या लाभाची दुकानदारी होय. पायगाडीच्या प्रसारा संबंधानें जितका आपणांस आनंद वाटतो त्याच्या उलट प्रकार विचाराच्या तंद्रींत घडतो. पराकाष्टेच्या विषादाची गोष्ट म्हणजे विलायती वस्तूंची चहा होय.

आमच्या देशांत कांहींच कारखाने नसावेत हे मोठेंच दुर्भाग्य होय! विचाराच्या दृष्टीनें असें वाटूं लागतें कीं हे कारखाने निघे पर्यंत आह्मी विलायती पायगाड्या वापरूंच नये. असा निर्धार होईल आणि सत्संकल्पानें या पायगाड्या बनविण्याच्याच मागें आमची औद्योगिक कारखानेवाली मंडळी लागतील तर देशाचा खरोखर मोठा फायदा होईल. पण हल्लींचा उपक्रम असाच चालूं राहील तर मात्र बुडत्याचा पाय जसा खोल खोल जात असतो तशी आमची दुर्दशा अधिक झपाट्यानें होत जाईल.

देशी वस्तु वापरण्या संबंधाचा कृत संकल्प पाहिजे. देशी वस्तू शिवाय इतर वस्तु आपण त्याज्य मानल्या पाहिजेत. हा तिरस्कारभाव नेहमीं जागृत पाहिजे. आपलेपणाचा बाणा आपण राखला पाहिजे आणि दृढ निश्चयानें तो आपलेपणा सिद्धीस नेण्यांतच सर्व देशाभिमान भरलेला आहे. देशाभिमान ह्मणून कांहीं निराळा नसतो. आपला देश औद्योगिक गोष्टींत फार मागें आहे तेव्हां आपण सुधारलेल्या राष्ट्रांतील चीजवस्तु वापरण्याला अपात्र आहों असें आह्मी समजतों. हल्लींच्या विद्या आह्मांस औद्योगिक स्पर्धेमध्यें टिकाव धरण्यास शिकवीत नाहींत ह्मणून आपण सध्यांच्या क्रमिक विद्या सोडून औद्योगिक विद्यांचाच व्यासंग दृढतेनें चालविला पाहिजे. बंगाल्यांत जी औद्योगिक मंडळी निघाली तिचा मुख्य हेतु इंडियाचा नष्ट झालेला इंडियनपणा परत आणण्याचा आहे आणि हा हेतु सफल करण्यासाठींच औद्योगिक शाला, यांत्रिक व शास्त्रीय विद्याप्रसार आणि देशी कारखाने यांच्या प्रस्थापनेसाठीं सर्व उद्योग चालू आहेत. बंगाल्यांत जो दांडगा प्रयत्न चालूं आहे त्याचें अनुकरण सर्वत्र सुरू झालें पाहिजे. सांप्रतच्या स्थितींत मोठीच उलथापालथ झाल्या शिवाय आमचें पाऊल पुढें सरणार नाहीं. आपण देशी वस्तु उपलब्ध होईपर्यंत आपल्या बहुविध गरजास पुष्कळसा संक्षेप देण्यास शिकलें पाहिजे. हाच देशाभिमानाचा पहिला श्रीगणेशा आहे. आणि या धड्याचा पाठ चांगला अंगवळणीं पडे पर्यंत आपला मार्ग जरा बिकट आहे. विलायती वस्तूंचा मोह सोडणें मोठें कठिण काम आहे आणि तो सुटण्या ऐवजीं पायगाडी सारख्या विलायती गोष्टींनीं आह्मी अगदीं विलायतीच बनत चाललों आहों ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

## सेशन खटलें

वाशीम जिल्ह्यांतील तुळशी मर्द मारुती इजवर खुनाचा आरोप होता. चंद्रा नांवाचा सहा वर्षांचा मुलगा विहिरींत पडून बुडून मेला. त्याच्या प्रेताचा पंचनामा केला तेव्हां असें निष्पन्न झालें कीं त्याच दिवशीं दोन प्रहरीं मोठा सोसाट्याचा वारा सुटला होता, आणि तो इतका प्रचंड होता कीं पुष्कळ झाडें पडलीं, घरें कांहीं उडालीं व अशीच सर्वत्र दाणादाण झाली; तेव्हां त्या वाऱ्याच्या झपाट्यांत हा मुलगा विहिरींत उडून पडला असावा असा पंचाचा तर्क झाला. विहिरीची वरवंडी अगदीं जमिनी बरोबरच होती त्या मुळें असा अपघात होण्याचा संभव विशेष होता. परंतु या पंचनाम्यानें पोलिसांचा संशय दूर झाला नाहीं. त्यांची समजूत अशी कीं तुळशीनें खुनशीपणानें मुलाला दिवसा ढवळ्या विहिरींत लोटलें असलें पाहिजे. तुळशी आपल्या बहिणीच्या घरीं रहात होती. तिच्या बहिणीचा नवरा रामजी पाटील हा कारभारि पाटील आहे. चंद्रा हा त्याचा पुतण्या होय घरांत घायकामध्यें कुरबूर होत असे व भांडण तंटा नेहमीं होई. तुळशीला घरांतल्या इतर बाया हिणावीत कीं तूं पाटलीण होण्याला व घरनदारीण होण्याला आमच्या घरीं आली आहेस कीं काय! या सर्व छळाचा सूड घेण्यासाठीं तुळशीनें चंद्राला विहिरींत लोटून दिलें असें सांगण्यासाठींच रामजी पाटलाचा सात आठ वर्षांचा मुलगा शंकऱ्या हा साक्षीदार सरकारतर्फेचा होता. त्यांच्या तोंडून कांहींच गोष्ट बरोबर बाहेर निघत नसे. अशा सारख्या साक्षीदाराच्या बोलण्यावर विश्वास बिलकूल बसला नाहीं आणि आरोपीला निर्दोषी म्हणुन सोडून देण्यांत आलें. हा खटला सेशनापुढें आला नसतां तरी चाललें असतें.

वाशिम तालुक्यांतील मानोरा पोलिस स्टेशनामधील सोमठाणें येथें गेल्या नोवेंबरच्या २३ वे तारखेला खून झाल्या संबंधाचा दुसरा सेशन खटला होता. सय्यद बाबा अतार, त्याचा बंधु सय्यद मौलू, भाचा दावल व एक नोकर हुसेन असे चौघे आरोपी आहेत. या चौघा आरोपींनीं गंगाराम माळी याचा खून केला असा आरोप आहे. खुनाची गोष्ट अशी कीं गंगाराम माळी हा दोन तीन वर्षां पासून सय्यद बाबा अतारा पाशीं नोकर आहे. हा गंगाराम खुनाच्या दिवशीं रात्रीं आपल्या धन्याची पुतणी कुमारिका हशमतबी इजबरोबर रममाण होतांना रात्रीं दोन तीन वाजतां दृष्टीस पडला. सरकारी

तर्फेचें ह्मणणें असें कीं आरोपी दावल आणखी दोघेजण हे बाहेर गांवाहून रात्रीं परत आले. आणि टिनाच्या ओसरींत गाडीचें सामानसुमान ठेवणार होते इतक्यांत तेथें त्यांस गंगाराम व हशमतवी हीं दोघीं एका जागीं असतांना दृष्टीस पडलीं लागलींच आरोपीनीं गंगाराम याला इतकें बेदम मारलें कीं तो मरण पावला. रात्रींच्या रात्रींच त्याला कापसाच्या गाडींत घालून शेतांत नेलें व एका त्याला गुडांत जाळून टाकलें. अशा रीतीनें गंगारामाचा बेमालूम खून झाला असें पोलिसांचें ह्मणणें आहे. आरोपी दावल व हाशमत वी यांचें लग्न व्हावयाचें ठरलेलें होतें. त्या खूनाच्या दिवसापासून गंगारामाचा कोठें पत्ता नाहीं हें पाहून गांवांतील खूनाचा गुणगूणीच्या आधारें कोणी एकानें एक निनांवी गुम अर्ज डिपुटी कमिशनराकडे चार सहा महिन्यांनीं पाठविला. त्या अर्जाची चौकशी होतां होतां हशमतवीनें आपल्याला गंगारामाच्या सानिध्यांत पकडल्याची गोष्ट माजिस्ट्रेटासमोर कबूल केली. तिचें ह्मणणें कीं सय्यद दाबानें मला लागलीच थापड मारून घराच्या आंत घालविलें आणि त्यापुढें गंगारामाला कोणी मारलें किंवा कसें याबद्दल मला कांहीं माहित नाहीं. आरोपी हुसेन यानेंही आपला कबूली जबाब देऊन सर्व गोष्टीचा खराखुरा उलगडा केला. शेजारी रणूजी आंध व त्याची बायको सनी यांनीं साक्ष दिली आहे कीं दोन्ही घरामधील भींत पडली होती व तेथें जो तव्या उभा केलेला होता. त्या तव्याच्या फटींतून गंगारामाला मारतांनां आह्मी पाहिलें. या शिवाय इतर अवान्तर पुरावाही देण्यांत आलेला आहे. सेशनांत हाशमतवी व हुसेन यांनीं आपले पूर्वीचा जबाब पालटून टाकले आहेत. निकाल अझून व्हावयाचा आहे.

---

## ज्ञानप्रकाश.

( अन्हिक वर्तमानपत्र )

मराठी भाषेमध्यें जीं वजनदार व लौकिकवान वृत्तपत्रें आहेत त्यांमध्यें 'ज्ञानप्रकाश' हें एक श्रेष्ट वर्तमानपत्र असून अत्यंत जुनें आहे. हल्लीं या पत्राला ६७ व्वें वर्ष चालूं आहे. गेल्या सोमवार पासून या सुंदर पत्राची भेट दररोजच्या दररोज होऊं लागली आहे. 'ज्ञानप्रकाश' हे अन्हिक वर्तमानपत्राच्या वर्गांत आलें आहे ही गोष्ट विशेष अभिनंदनीय होय आणि ह्या उन्नत स्थितीबद्दल आह्मी त्या पत्राचे चालक रा० रा० हरी नारायण गोखले आणि हरीनारायण आपटे या उभयतांची विशेष तारीफ करितों. या प्रत्याहिक पत्राची वर्गणी सालीना ५ रुपये आणि टपाल मूल्य ४ रुपये मिळून ९ रुपयांत आज हा ज्ञानप्रकाशाचा मिळणारा लाभ फारच मोठा होय. यांतील लेखांची भाषा गोड व रमणीय असून विचारसरणी चांगलीच तात्विक व सर्वमान्य असते. तेव्हां या प्रत्याहिक संस्थेच्या जबाबदारीच्या व महत्वाच्या कार्यांत चांगलें सुयश येवो आणि हल्लींच्या चालकांचा हा कृतसंकल्प चांगला सफळ होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

## युद्धाचें वर्तमान

पोर्ट आरथरचा वेढा अद्यापहि कायम आहे व जपानी लोकांच्या तोफांचा जोराचा भडिमार चालूं आहे. तेथील रशियन लोकांचें आरमार जपानचा डोळा चुकवून पळून गेलें होतें त्याचा जपाननें पाठलाग करून कांहीं जहाजें पुन्हां बंदरांत घातलीं आणि कांहीं गलबतें निसटून परकीय राष्ट्राच्या बंदरांत गेल्यामुळें रशियास निरुपयोगी झालीं आहेत. येणें प्रमाणें समुद्रावरील लढाई संबंधानें रशिया अगदीं हतवीर्य झाला आहे. किल्ल्यांतील लोकांनीं आह्मांस शरण यावें अशाबद्दल जपानी लोकांनीं निरोप पाठविला आहे. पण ते लोक शरण येतील असें दिसत नाहीं. अर्थात् आणखी ८।१५ दिवस निकराचें युद्ध होऊन त्यांत जपान विजयी होणार असें अनुमान आहे. म्यांचुरियांत लायोयंगकडे रशियन जनरल क्युरोपॅटकिन यास जपानी सैन्यानें वेढलें आहे व तो स्वसंरक्षणा पलीकडे कांहींच करण्यास समर्थ नाहीं.

हें रुसो— जपानी युद्ध आणखी बरींच वर्षें चालणार आहे. पुढील तीन चार वर्षांच्या अवधींत, आपल्या कीर्तीस सध्यांच्या पराभवापुळें जी कालिमा लागली आहे ती धुऊन काढण्याची आपल्या मनोरम मनोराज्यांची कहाणी रशियानें सांगितली आहे पण ह्या मनोराज्याचा सुदिवस, आज जो रशियाचा पाय जपानच्या जाळ्यांत गुंतला आहे तो सुटेल तेव्हां दिसणार आहे.

तिबेटाकडे पाठविलेल्या मिशनचें एकदांचें साफल्य झालें. ल्हासा राजनगरींत इंग्रजी मिशनचे पाय लागले व आतां संधान व धोरण पाहून तह ठरेल आणि तिबेट खालसा करावें किंवा तेथें रेसिडेंट नेमावा याचा विचार करून त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस बिलकूल नाहीं आणि तो लवकरच यावयाला पाहिजे. खरिपाचीं पिकें चांगल्या स्थितींत आहेत. हवेचा उपद्रव सर्वत्र कमी झाला आहे आाण इतर रोगराईही कोणतीच नाहीं.

मृत्यु— रा. रा. सय्यद फकरुद्दीन वल्लद सय्यद इमामुद्दीन काजी बारशीटाकळी यांस हवेच्या उपद्रवानें गेल्या १४ व्या तारखेला देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. हे गृहस्थ जिल्हाबोर्डाचे सभासद असून आपल्या गांवांत सार्वजनिक कामांत पुढें असत आणि तेथील लोकांसही ते फार आवडत असत.

व्याख्यान— रा. रा. शिवराम हरी गोखले एम. ए. ट्रेनिंग कालेजचे प्रिन्सिपाल यांनीं काल सायंकाळीं मंगळा विषयीं फार उपयुक्त व मनोवेधक माहिती सांगितली. ज्योतिषशास्त्राचा विषय यांस फार आवडतो आणि दरवर्षी हे आपल्या व्यासंगाचा प्रसाद व्याख्यानाच्या रूपानें लोकसमुहास देत असतात. संभाषण शास्त्रीय विषया वरील असूनही फार सोप्या शब्दांत सुबोध रितीनें झालें.

रा. रा. एच. जे स्टानियन सी. आय. इ. आडिशनल जुडिशिअल कमिशनर, मध्यप्रांत यांस वऱ्हाडांतील जुडिशिअल कमिशनरचे जागीं नेमण्यांत आलें आहे. हे गृहस्थ फार चांगले न्यायाधीश असुन सुस्वभावी आहेत असा यांचा लौकिक आहे.

रा. रा. स्टानियन साहेब यांनीं चार्ज घेतल्या नंतर रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी आफि० जुडिशीअल कमिशनर हे पुनः आपल्या स्पेशल ड्युटीच्या कार्याकडे परत येतील.

रा. रा. आर. म्यागिल पोलीस सुपरिन्टेंडट, वणी यांस १ महिन्याची रजा देण्यांत आली असून त्या रजेंत रा. रा. प्रल्हाद भगवंत पोलीस इन्स्पेक्टर यांस सुपरिनटेंडंट नेमण्यांत आलें. हें कळविण्यास फार आनंद वाटतो.

रा. रा. दत्तात्रय अंबादास नायबतहशिलदार यवतमाळ यांस दोन महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली.

रा. रा. मीर अलम डिपुटी क्लार्क आफ कोर्ट, वाशिम यांस आकोल्याच्या स्माल काज कोर्टाच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं बदली देण्यांत आली.

रा. रा. नीळकंठ गोविंद देशपांडे अंजनसिंगीकर यांस वाशिमास परत डिपुटी क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं बदलण्यांत आलें.

रा. रा. विनायक कृष्ण सहस्त्रबुद्धे क्लार्क आफ कोर्ट, खामगांव यांस उमरावतीच्या स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आलें आणि तेथील रा. रा. पुरुषोत्तम व्यंकटेश यांस खामगांवस क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

उमरावतीस ब्रह्मविद्या मंदिराचा वास्तुसमारंभ गेल्या शुक्रवारीं मोठ्या थाटानें करण्यांत आला.

रा. रा. जे. टी. चेंबरलेन आय. सी. एस. असि० कमिशनर, उमरावती यांस १ ले वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. गंगाधर नारायण घाटे बी. ए. हे पूर्वी येथील हायस्कुलांत मास्तर होते. पुढें ते मध्यप्रांतांत मुलकी खात्यांत मुनसफीच्या जागेवर गेले आणि हल्लीं त्यांस तहशिलदार वर्ग ४ च्या हुद्यावर विलासपूर जिल्ह्यांतील द्रुग तहशिलीवर कायम करण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. बाळकृष्ण बंधूजी चौबळ बी. ए. तहशिलदार, मंगरूळपीर यांस २ रे वर्ग माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

संकीर्तन— वे. शा. सं. रा० रा० विनायक केशव साने नाशिककर यांनीं येथील श्री विठ्ठल मंदिरांत चार कीर्तनें केलीं. यांचा ब्रह्मनिरूपणाचा क्रम फार सुगम व सुबोध आहे. कथेच्या पूर्व रंगांतील प्रतिपादन फार चांगलें होत असून विचार पद्धती अगदीं शास्त्रशुद्ध आहे. यांचीं कीर्तनें या सप्तकांत होणार आहेत तर लोकांनीं ब्रह्मविद्येचा लाभ करून घेऊन आपल्या उदार हस्तानें कीर्तनकारांची संभावना करण्यास विसरूं नये.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४= |
| सोनें २४।= | चांदी ७१॥ |
| ज्वारी ९२-९४ | जवस ८० |
| गहू काठे ७५ | बनशी ९०।९५ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १० रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण. |

---

## ऋक् श्रावणी

ब्रह्मकर्मांपैकीं श्रावणीचा समारंभ अलीकडे अगदीं लोपत चालला आहे आणि त्यांतील कांहीं महत्वाच्या प्रक्रिया तर अगदीं निमित्तशेषच उरल्या आहेत. ह्मणून यंदाची श्रावणी आह्मी सप्रयोग करविणार आहों. ऋत्विजाचें कृत्य वे. शा. सं. रा. रा. विश्वनाथ भट लक्ष्मणभट भानू वांईकर हे चालविणार आहेत. या ब्रह्मकृत्याच्या संपूर्णते साठीं आह्मी मुद्दाम आमच्या डाबकी रस्त्यावरील बंगल्यांत सर्व सोयी केल्या आहेत. ज्यांची मनिषा असेल त्यांनीं अवश्य येण्याची कृपा करावी.

नारायण खंडेराव फडके.

---

## वर्तमानसार.

चार चांगल्या गोष्टी— देशकार्यास उपयोगी पडण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं मुख्यतः चार गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे त्यांनीं आपल्या कामाची उत्तम शिस्त ठेवावी, दुसऱ्या विषयीं मत देतांना आपल्या उदात्त विचारावर ध्यान असूं द्यावें, हातीं घेतलेल्या कामाविषयींच रात्रंदिवस ध्यास लागूं द्यावा आणि आपल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवावा. आमच्या पुढाऱ्यांनीं नामदार साहेबांचें हें भाषण अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे असें आह्मांस वाटतें.

वयाप. डब्ल्यु एच केनरीक, आय. एम. एस. ह्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला ह्मणजे मेजर डब्ल्यु. डी. सदरल्यांड, आय. एम. एस. सि. तर्फे. हुशंगाबाद यांस आकोला येथें अफि. सिविल सर्जन नेमलें.

गंगाधर नारायण घाटे, आफि. तह. यांस तह. फोर्थ ग्रेड केलें.

**स्त्रिया आडव्या आल्या**— खारकाफ येथील राशियन सोलजर १३ जुलई रोजीं जपानी लढाईवर येण्यास निघाले असतां शेंकडों बायका येऊन आगगाडीच्या रुळांवर आडव्या पडल्या; आणि आम्ही उपासमार होईल, ह्यास्तव आमच्या नवऱ्यांस लढाईवर पाठवूं नका असें सांगून त्यांनीं आगगाडीस प्रतिबंध केला.

**विहिरींतून पाणी काढण्याचें यंत्र** वऱ्हाड प्रांतांतील रा. कृष्णराव भलेकर या नांवाच्या गृहस्थांनीं विहिरींतून पाणी वर काढण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. या यंत्रापासून कितीही खोल विहीर असली तरी ३२ फूट पर्यंत वर पाणी येतें. या यंत्राचें पेटंट मिळविण्याची सदर भलेकर यांची खटपट चालली आहे.

**पोपईचा स्वच्छ करण्याचा गुण**— पोपईची हिरवी पानें किंवा हिरव्या फळाच्या कापी, मळक्या व डाग पडलेल्या वस्त्रांवर चोळल्यानें कपडा अगदीं स्वच्छ होतो. पोपयांत डाग काढण्याचा गुण असल्यामुळें त्यांचें नांव स्वच्छ करणारें ठेवून असें पडलें आहे. पोपयांचीं पानें किंवा फळांचा तुकडा पाण्यांत भिजत घालतात व अशा तऱ्हेनें तयार केलेलें पाणी रंगविलेले विशेषेंकरून काळे कपडे धुण्याचे कामीं फार उपयोगी पडतें.

**मुत्सद्दीपणाचा हुकूम**— गायकवाड सरकारच्या परवानगीशिवाय त्यांच्या राज्यांत कोणत्याहि परदेशी मनुष्यानें स्थावर मिळकत खरेदी केल्यास तो गुन्हेगार समजला जाईल असा महाराजांनीं हुकूम प्रसिद्ध केला आहे ह्मणतात. प्रजाकल्याणाचें श्रेय श्री गायकवाड सरकार घेतील तितकें थोडेंच आहे!

**चीनचा हुकूम**— चीनांतील एका गव्हरनरनें आपल्या हद्दींत असा हुकूम फर्माविला आहे कीं रशियाच्या रेल्वेहमाल विनी मजूर काम करण्यास गेल्यास त्यास देहांत शिक्षा दिली जाईल. जपान युद्धांत चीनलाहि त्वेष आल्यासारखा दिसतो. चीन जपानच्या साह्यास गेलें तर रशियाची अतिशयच त्रेधा उडेल ह्मणतात.

**ब्राह्मणाचा लिंगाईत झाला**— कुरुंदवाड संस्थानांतील मेदरंगी येथील संस्थानच्या नोकरीपैकीं एका देशस्थ ब्राह्मणानें आपलें ब्राह्मणत्व सोडून लिंगाईत धर्माची दीक्षा घेतली. शिखासूत्राचा त्यानें त्याग केला आहे. लिंगायतांच्या हातचें अन्नउदक त्यानें ग्रहण केलें आहे. वेदसूत्राचा त्याग करून लिंग धारण केलें आहे.

**भयंकर दुष्काळ**— बंगाल्यांत बरद्वान जिल्ह्यापैकीं सदर व करवा या दोन तालुक्यांत भयंकर दुष्काळ पडल्याची बातमी आहे. एक आणा रोजावर देखील तिकडचे लोक मजूरी करण्यांत तयार आहेत.

**कापराचें तेल**— कापराचें तेल काढावयाचें झाल्यास कापराचे बारीक तुकडे करून घ्यावे. त्यांतून ६ तोळे तुकडे एका कांचेच्या बरणींत ठेऊन त्यांत कडत केलेलें १०० तोळे तेल ओतावें व लागलीच घट्ट बूच मारावें पंधरा दिवसांनीं उत्तम तेल तयार होतें.

**रेल्वेनें केलली सुधारणा**—जी. आय. पी. रेल्वे कंपनीनें पार्लर व रेस्टरंट या नांवाच्या गाड्या तयार केल्या असून त्यांत पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील उतारूंची फार चांगली सोय केलेली आहे. ह्मणजे गाड्यांतच एक दारूचें दुकान ठेविलेलें असून वाटेल तो जिन्नस मागविण्याकरितां विजेची घंटा लाविलेली आहे असें कळतें.

**निमकहरामपणा**— जपान देशांतील नागासाकी प्रांतांत एक श्रीमंत व्यापारी राहत असतो त्यानें रशियापासून प्रत्येक बातमी बद्दल ३०० येन व जेणें करून जपानचें लढाऊ गलबत नाश पावेल अशा दरएक बातमी बद्दल २० हजार येन घेण्याचा करार करून जपानच्या गुप्त बातम्या बिनताराच्या यंत्रानें नागासाकी येथें त्याची एक रखाऊ होती तिच्या घराकडे तो पाठवीत असे. व तेथून त्या बातम्या रशियन लोक शांघाई मार्गानें पोर्ट आर्थर मध्यें पाठवीत. नागासाकी येथील येथील त्या व्यापाऱ्याच्या अवातीच्या घरीं रशियन लोकांची वारंवार गर्दी फार होत असे. या गोष्टीवरून संशय उत्पन्न होऊन ही गोष्ट उघडकीस आली व तो व्यापारी व ती रखाऊ या उभयतांस कैद करण्यांत आलें आहे. व त्या व्यापाऱ्याची सर्व मालमत्ता जपानी लोकांनीं नाश करून टाकली आहे.

## नोटीस.

रा. मन्नू रूपचंद परदेशी दाळवाले राहणार देऊळगांवराजा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मांस तारीख १९ नोव्हेंबर १८९९ रोजीं करून दिलेल्या गहाणखतावरून तुमचेंकडे झालेले रुपयात पूर्वीचा वसूल जातां चैत्र वद्य ८ शके १८२६ रोजीं ५० रुपये वसूल दिला. त्यावेळीं कांहीं रुपये कमी करून सालबंदीचा दस्तऐवज करून द्या; ह्मणून तुह्मी विनंती केल्यावरून रुपये ३७५ चा ५० रुपये सालबंदीचा गहाण रोखा ज्या शर्तीवर करून घेण्याचें कबूल करून तुह्मांस २० रुपयाची पावती दिली त्या शर्ती पाळण्यांत तुह्मी आमच्याशी दगलबाजी केली. व दस्तऐवज साक्ष टाकण्यास ह्मणून नेला तो अद्याप आणून रजिष्टर करून दिला नाहीं सबब तुह्मास नोटिशीनें कळविण्यात येतें कीं नोटीस पावल्या पासून ४ दिवसाचें आंत कबूल केलेल्या शर्तीचा दस्तऐवज रजिष्टर करून आणून द्यावा. नाहीं तर तुमच्याशी कबूल केलेल्या शर्ती प्रमाणें न वागण्याची जबाबदारी मजवर न राहून उलट तुमचेवर दगलबाजी बद्दल फौजदारी व सन १८९९ चे दस्तऐवजा प्रमाणें दिवाणी केली जाईल मग तुमची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं. नोटिसीचा खर्चही तुमचेवर पडेल. कळवे. तारीख १७।८।०४

सही

कोंडु गोविंद तेलंगी
राहणार देऊळगांवराजा
दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी. उदेभान वल्लद लुकाजी डोबाळे मयत वारस पुत्र गंगाराम वल्लद उदेभान अज्ञान पालन करणार अभिमान वल्लद लुकाजी आणि [२] अभिमान वल्लद लुकाजी राहणार तानतापूर ता. व पोस्ट आकोट यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं तारीख १७।२।१८८९ इ रोजीं अभिमान आणि मयत उदेभान या दोघा भावांनीं २०० रुपयांच्या तारणासाठीं गहाणखत लिहून दिलें. हे पैसे करारशीर दिले नाहींत. आणि मागितले असतां उलट्या गोष्टी सांगतात. सबब ह्या नोटिशीनें असें कळवितों कीं ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसात आमचे रुपये आणून द्यावे. जो न केल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज केली जाईल आणि त्याबद्दलचा अखेर निकालापर्यंतचा सर्व खर्च या नोटिशीच्या खर्चासह तुह्मांवर पडेल. ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावें. तारीख १९ आगस्ट १९०४ इसवी०

सही

'जयसीराम जगरामदास' या दुकानचे मालक जगरामदास आणि 'शिवजीराम जयपीराम' दुकानचे मालक जयपीराम तर्फे मुख्त्यार रघुनाथदास बिरदीचंद साहू राहणार आकोट—दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी जगु वल्लद नरसाजी गणेश पाटील राहणार शेगांव यांसः—

खालीं सही इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी माझ्याशी संसारही केला पण आतां गेल्या बरा महिन्या पासून तुमची वृत्ती फार बिघडली आहे. तुह्मी मला फार वाईट रितीनें वागविलें, माझी अप्रेष्टा व अप्रतिष्ठा केली आणि मला माझ्या बापाच्या घरीं नेऊन पोचती केली. मी तुमच्या घरीं येण्याचा पुष्कळ वेळा प्रयत्न केला पण मला तुमचा व तुमच्या इतर संबंधी मंडळीचा नीटसा भरंवसा येत नाहीं. व तुह्मी मला वागवीतही नाहीं. मी आतां बापाच्या घरीं राहूं इच्छित नाहीं. मी तुमच्या तेथें येऊन सुखानें नांदण्याला कबूल आहे. मी संसार करण्याला तयार आहे असें असून देखील तुह्मी माझ्या बापाजवळ शंभर दोनशें रुपये मागत आहां, आणि पैसे घेऊन फारकत देतो असें ह्मणता. पण मला ही गोष्ट कबूल नाहीं. तुह्मी माझी गैरत विनाकारण केली याबद्दल तुह्मांस जबाब द्यावा लागेल आणि तुह्मा नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत जर तुह्मी मला नेणार नाहीं तर मी तुह्मांवर दिवाणींत फिर्याद करीन आणि नंतर पोटगीचा व इतर खर्च तुह्मांवर पडेल. कळवे १४ आगष्ट १९०४ इसवी.

सही

यशोदा मर्द जगू पाटलीण निशाणी
बांगडी दस्तुर माधो मोवाजी
पाटील राहणार कलमी खुर्द
तालुके बाळापूर

की. का. २१ मि. नंबर २
१९०४

मा। सिव्हिल जडज्य साहेब बहादुर जिल्हे आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— हरी सदाशीव सिरसेकर राहणार आकोला.

या नोटिसीनें सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं वरील अर्जदार यानें मयत अन्नपूर्णा भर्ते दामोदर हिचें लोकांकडून येणें असलेलें कर्ज रुपये २०० वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावे ह्मणून तारीख १७-६-१९०४इसवी रोजीं अर्ज दिला असतां त्या अर्जाचे चौकशीची तारीख ३० माहे आगष्ट सन १९०४ इसवीची नेमिली आहे. तरी अर्जदार यांस त्याचे अर्जाप्रमाणें सरटीफिकीट देण्यास ज्यांची हरकत असेल त्यांनीं वरील तारखेस दावा करतां आमचे समक्ष त्यांचे जवळ असलेले लेखी अगर तोंडी पुराव्यासह हजर रहावें. कळावे तारीख ३-८-१९०४ इसवी०

आमचे सहीनिशीं कोर्टाचे शिक्यानिशीं दिले असे.

Sk. Ismail

सिव्हिल जडज्य आकोला.


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्रांचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

वाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

तर्फेचें ह्मणणें असें कीं आरोपी दावल आणखी दोघेजण हे बाहेर गांवाहून रात्रीं परत आले. आणि टिनाच्या ओसरींत गाडीचें सामानसुमान ठेवणार होते इतक्यांत तेथें त्यांस गंगाराम व हशमतवी हीं दोघीं एका जागीं असतांना दृष्टीस पडली लागलींच आरोपींनीं गंगाराम याला इतकें बेदम मारलें कीं तो मरण पावला. रात्रींच्या रात्रींच त्याला कापसाच्या गाडींत घालून शेतांत नेलें व एका त्याला गुडांत जाळून टाकलें. अशा रितीनें गंगारामाचा बेमालूम खून झाला असें पोलिसाचें ह्मणणें आहे. आरोपी दावल व हाशमत वी यांचें लग्न व्हावयाचें ठरलेलें होतें. त्या खुनाच्या दिवसापासून गंगारामाचा कोठें पत्ता नाहीं हें पाहून गांवांतील खुनाचा गुणगुणीच्या आधारें कोणी एकानें एक निनांवी गुम अर्ज डिपुटी कमिशनराकडे चार सहा महिन्यांनीं पाठविला. त्या अर्जाची चौकशी होतां होतां हशमतवीनें आपल्याला गंगारामाच्या सानिध्यांत पकडल्याची गोष्ट माजिस्ट्रेटासमोर कबूल केली. तिचें ह्मणणें कीं सय्यद दाबानें मला लागलीच थापड मारून घराच्या आंत घालविलें आणि त्यापुढें गंगारामाला कोणी मारलें किंवा कसें याबद्दल मला कांहीं माहित नाहीं. आरोपी हुसेन यानेंही आपला कबुली जबाब देऊन सर्व गोष्टीचा बराचसा उलगडा केला. शेजारी रणूजी आंध व त्याची बायको सोनी यांनीं साक्ष दिली आहे कीं दोन्ही घरामधील भींत पडली होती व तेथें जो तट्या उभा केलेला होता. त्या तट्याच्या फटींतून गंगारामाला मारतांना आह्मी पाहिलें. या शिवाय इतर अवान्तर पुरावाही देण्यांत आलेला आहे. सेशनांत हाशमतवी व हुसेन यांनीं आपले पूर्वीचा जबाब पालटून टाकले आहेत. निकाल अजून व्हावयाचा आहे.

---

## ज्ञानप्रकाश.

( अन्हिक वर्तमानपत्र )

मराठी भाषेमध्यें जीं वजनदार व लौकिकवान वृत्तपत्रें आहेत त्यांमध्यें 'ज्ञानप्रकाश' हें एक श्रेष्ट वर्तमानपत्र असून अत्यंत जुनें आहे. हल्लीं या पत्राला ६७ वें वर्ष चालूं आहे. गेल्या सोमवार पासून या सुंदर पत्राची भेट दररोजच्या दररोज होऊं लागली आहे. 'ज्ञानप्रकाश' ह अन्हिक वर्तमानपत्राच्या वर्गांत आलें आहे ही गोष्ट विशेष अभिनंदनीय होय आणि ह्या उन्नत स्थितीबद्दल आह्मी त्या पत्राचे चालक रा० रा० हरी नारायण गोखले आणि हरीनारायण आपटे या उभयतांची विशेष तारीफ करितों. या प्रत्याहिक पत्राची वर्गणी सालीना ५ रुपये आणि टपाल मूल्य ४ रुपये मिळून ९ रुपयांत आज हा ज्ञानप्रकाशाचा मिळणारा लाभ फारच मोठा होय. यांतील लेखांची भाषा गोड व रमणीय असून विचारसरणी चांगलीच तात्विक व सर्वमान्य असते. तेव्हां या प्रत्याहिक संस्थेच्या जबाबदारीच्या व महत्वाच्या कार्यांत चांगलें सुयश येवो आणि हल्लींच्या चालकांचा हा स्तुत्यसंकल्प चांगला सफल होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

## युद्धाचें वर्तमान

पोर्ट आरथरचा वेढा अद्यापहि कायम आहे व जपानी लोकांच्या तोफांचा जोराचा भडिमार चालूं आहे. तेथील रशियन लोकांचें आरमार जपानचा डोळा चुकवून पळून गेलें होतें त्याचा जपाननें पाठलाग करून कांहीं जहाजें पुन्हां बंदरांत घातलीं आणि कांहीं गलबतें निसटून परकीय राष्ट्राच्या बंदरांत गेल्यामुळें रशियास निरुपयोगी झालीं आहेत. येणें प्रमाणें समुद्रावरील लढाई संबंधानें रशिया अगदीं हतवीर्य झाला आहे. किल्ल्यांतील लोकांनीं आह्मांस शरण यावें अशाबद्दल जपानी लोकांनीं निरोप पाठविला आहे. पण ते लोक शरण येतील असें दिसत नाहीं. अर्थात् आणखी ८।१५ दिवस निकराचें युद्ध होऊन त्यांत जपान विजयी होणार असें अनुमान आहे. म्यांचुरियांत लायोयंगकडे रशियन जनरल क्युरोपेटकिन यास जपानी सैन्यानें वेढलें आहे व तो स्वसंरक्षणा पलीकडे कांहींच करण्यास समर्थ नाहीं.

हें रुसो— जपानी युद्ध आणखी वरीच वर्षें चालणार आहे. पुढील तीन चार वर्षांच्या अवधींत, आपल्या कीर्तीस सध्यांच्या पराभवामुळें जी कालिमा लागली आहे ती धुऊन काढण्याची आपल्या मनोरम मनोराज्याची कहाणी रशियानें सांगितली आहे पण ह्या मनोराज्याचा सुदिवस, आज जो रशियाचा पाय जपानच्या जाळ्यांत गुंतला आहे तो सुटेल तेव्हां दिसणार आहे.

तिबेटाकडे पाठविलेल्या मिशनचें एकदाचें साफल्य झालें. ल्हासा राजनगरींत इंग्रजी मिशनचे पाय लागले व आतां संधान व धोरण पाहून तह ठरेल आणि तिबेट खालसा करावें किंवा तेथें रेसिडेंट नेमावा याचा विचार करून त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस बिलकूल नाहीं आणि तो लवकरच यावयाला पाहिजे. खरिपाचीं पिकें चांगल्या स्थितींत आहेत. हवेचा उपद्रव सर्वत्र कमी झाला आहे आणि इतर रोगराईही कोणतीच नाहीं.

मृत्यु— रा. रा. सय्यद फकरुद्दीन वल्लद सय्यद इमामुद्दीन काजी कारंजीटाकळी यांस हवेच्या उपद्रवानें गेल्या १४ व्या तारखेला देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. हे गृहस्थ जिल्हाबोर्डाचे सभासद असून आपल्या गांवांत सार्वजनिक कामांत पुढें असत आणि तेथील लोकांसही ते फार आवडत असत.

व्याख्यान—रा. रा. शिवराम हरी गोखले एम. ए. ट्रेनिंग कालेजचे प्रिन्सिपाल यांनीं काल सायंकाळीं मंगळा विषयीं फार उपयुक्त व मनोवेधक माहिती सांगितली. ज्योतिषशास्त्राचा विषय यांस फार आवडतो आणि दरवर्षीं हे आपल्या व्यासंगाचा प्रसाद व्याख्यानाच्या रूपानें लोकसमुहास देत असतात. संभाषण शास्त्रीय विषया वरील असूनही फार सोप्या शब्दांत सुबोध रितीनें झालें.

रा. रा. एच. जे स्टानियन सी. आय. इ. आडिशनल जुडिशिअल कमिशनर, मध्यप्रांत यांस वऱ्हाडांतील जुडिशिअल कमिशनरचे जागीं नेमण्यांत आलें आहे. हे गृहस्थ फार चांगले न्यायाधीश असून सुस्वभावी आहेत असा यांचा लौकिक आहे.

रा. रा. स्टानियन साहेब यांनीं चार्ज घेतल्या नंतर रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी आफि० जुडिशीअल कमिशनर हे पुनः आपल्या स्पेशल ड्युटीच्या कार्याकडे परत येतील.

रा. रा. आर. म्यागिल पोलीस सुपरिनटेंडंट, वणी यांस १ महिन्याची रजा देण्यांत आली असून त्या रजेंत रा. रा. मल्हाद भगवंत पोलीस इन्स्पेक्टर यांस सुपरिनटेंडंट नेमण्यांत आलें. हें कळविण्यास फार आनंद वाटतो.

रा. रा. दत्तात्रय अंबादास नायबतहशिलदार यवतमाळ यांस दोन महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली.

रा. रा. मीर अलम डिपुटी क्लार्क आफ कोर्ट, वाशिम यांस आकोल्याच्या स्माल काज कोर्टाच्या क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं बढती देण्यांत आली.

रा. रा. नीळकंठ गोविंद देशपांडे अंजनसिंगीकर यांस वाशिमास परत डिपुटी क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं बदलण्यांत आलें.

रा. रा. विनायक कृष्ण सहस्त्रबुद्धे क्लार्क आफ कोर्ट, खामगांव यांस उमरावतीच्या स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आलें आणि तेथील रा. रा. पुरुषोत्तम व्यंकटेश यांस खामगांवस क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

उमरावतीस ब्रह्मविद्या मंदिराचा वास्तुसमारंभ गेल्या शुक्रवारीं मोठ्या थाटानें करण्यांत आला.

रा. रा. जे. टी. चेंबरलेन आय. सी. एस. आसि० कमिशनर, उमरावती यांस १ ले वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. गंगाधर नारायण वाटे बी. ए. हे पूर्वी येथील हायस्कुलांत मास्तर होते. पुढें ते मध्यप्रांतांत मुलकी खात्यांत मुनसफीच्या जागेवर गेले आणि हल्लीं त्यांस तहशिलदार वर्ग ४ च्या हुद्यावर विलासपूर जिल्ह्यांतील द्रुग तहशिलीवर कायम करण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. बाळकृष्ण बंधूजी चौबळ बी. ए. तहशिलदार, मंगरूळपीर यांस २ रे वर्ग माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

संकीर्तन— वे. शा. सं. रा० रा० विनायक केशव साने नाशिककर यांनीं येथील श्री विठ्ठल मंदिरांत चार किर्तीनें केलीं. यांचा ब्रह्मनिरूपणाचा क्रम फार सुगम व सुबोध आहे. कथेच्या पूर्व रंगांतील प्रतिपादन फार चांगलें होत असून विचार पद्धती अगदीं शास्त्रशुद्ध आहे. यांचीं कीर्तनें या सप्तकांत होणार आहेत तर लोकांनीं ब्रह्मविद्येचा लाभ करून घेऊन आपल्या उदार हस्तानें कीर्तनकारांची संभावना करण्यास विसरूं नये.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४= |
| सोनें २४।- | चांदी ७१॥ |
| ज्वारी ९२-९४ | ज्वस ८० |
| गहू काठे ७५ | बनशी ९०।९५ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ रु. मण |
| तूप | १० रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |

---

## ऋक् श्रावणी

ब्रह्मकर्मापैकीं श्रावणीचा समारंभ अलीकडे अगदीं लोपत चालला आहे आणि त्यांतील कांहीं महत्वाच्या प्रक्रिया तर अगदीं निमित्तशेषच उरल्या आहेत. ह्मणून यंदाची श्रावणी आह्मी सप्रयोग करविणार आहों. ऋत्विजाचें कृत्य वे. शा. सं. रा. रा. विश्वनाथ भट लक्ष्मणभट भानू वाईकर हे चालविणार आहेत. या ब्रह्मकृत्याच्या संपूर्णते साठीं आह्मी मुद्दाम आमच्या डाबकी रस्त्यावरिल बंगल्यांत सर्व सोयी केल्या आहेत. ज्यांची मनिषा असेल त्यांनीं अवश्य येण्याची कृपा करावी.

नारायण खंडेराव फडके.

---

## वर्तमानसार.

चार चांगल्या गोष्टी— देशकार्यास उपयोगी पडण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं मुख्यतः चार गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे त्यांनीं आपल्या कामाची उत्तम शिस्त ठेवावी, दुसऱ्या विषयीं मत देतांना आपल्या उदात्त विचारावर ध्यान असूं द्यावें, हातीं घेतलेल्या कामाविषयींच रात्रंदिवस ध्यास लागूं द्यावा आणि आपल्या प्रयत्नांवर विश्वास ठेवावा. आमच्या पुढाऱ्यांनीं नामदार साहेबांचें हें भाषण अवश्य लक्षांत ठेविलें पाहिजे असें आह्मांस वाटतें.

बयाप. डब्ल्यु एच केनरोक, आय. एम. एस. ह्यांनीं आपल्या वाभाचा चार्ज घेतला ह्मणजे मेजर डब्ल्यु. डी. सदरल्यांड, आय. एम. एस. सि. तर्फे. हुशंगाबाद यांस आकोला येथें अ. फि. सिविल सर्जन नेमलें.

गंगाधर नारायण बोरे, आफि. तह. यांस तह. फोर्थ ग्रड केलें.

**स्त्रिया आडव्या आल्या**— खारकाफ येथील राशियन सोल्जर १३ जुलई रोजीं जपानी लढाईवर येण्यास निघाले असतां शेंकडों बायका येऊन आगगाडीच्या रुळांवर आडव्या पडल्या; आणि आपण उपासमार होईल, ह्यास्तव आपल्या नवऱ्यांस लढाईवर पाठवूं नका असें सांगून त्यांणीं आगगाडीस प्रतिबंध केला.

**विहिरींतून पाणी काढण्याचें यंत्र** वऱ्हाड प्रांतांतील रा. कृष्णराव भालेकर या नांवाच्या गृहस्थांनीं विहिरींतून पाणी वर काढण्याचें एक यंत्र तयार केलें आहे. या यंत्रापासून कितीही खोल विहीर असली तरी ३२ फूट पर्यंत वर पाणी येतें. या यंत्राचें पेटंट मिळविण्याची सदर भालेकर यांची खटपट चालली आहे.

**पोपईचा स्वच्छ करण्याचा गुण**— पोपईची हिरवी पानें किंवा हिरव्या फळाच्या फाकी, मळक्या व डाग पडलेल्या वस्त्रांवर चोळल्यानें कपडा अगदीं स्वच्छ होतो. पोपयांत डाग काढण्याचा गुण असल्यामुळें त्यांचे नांव साफ करणारें साबूत असें पडलें आहे. पोपयांची पानें किंवा फळांचा तुकडा पाण्यांत भिजत घालतात व अशा तऱ्हेनें तयार केलेलें पाणी रंगविलेले विशेषेंकरून काळे कपडे धुण्याचे कामीं फार उपयोगी पडतें.

**मुत्सद्दी पणाचा हुकूम**— गायकवाड सरकारच्या परवानगीशिवाय त्यांच्या राज्यांत कोणत्याहि परदेशी मनुष्यानें स्थावर मिळकत खरेदी केल्यास तो गुन्हेगार गणला जाईल असा महाराजांनीं हुकूम प्रसिद्ध केला आहे ह्मणतात. प्रजाकल्याणाचें श्रेय श्री गायकवाड सरकार घेतील तितकें थोडेंच आहे!

**चीनचा हुकूम**— चीनांतील एका गव्हरनरनें आपल्या हद्दींत असा हुकूम फर्माविला आहे कीं राशियाच्या रेल्वेकामात चिनी मजूर काम करण्यास गेल्यास त्यास देहांत शिक्षा दिली जाईल. जपान युद्धांत चीनलाहि त्वेष आल्यासारखा दिसतो. चीन जपानच्या साह्यास गेलें तर राशियाची अतिशयच त्रेधा उडेल ह्मणतात.

**ब्राह्मणाचा लिंगाईत झाला**— कुरुंदवाड संस्थानांतील मैदरगी येथील संस्थानच्या नोकरांपैकीं एका देशस्थ ब्राह्मणानें आपलें ब्राह्मणत्व सोडून लिंगाईत धर्माची दीक्षा घेतली. शिखासूत्राचा त्यानें त्याग केला आहे. लिंगायताच्या हातचें अन्नउदक त्यानें ग्रहण केलें आहे. वेदधर्माचा त्याग करून लिंग धारण केलें आहे.

**भयंकर दुष्काळ**— बंगाल्यांत बरद्वान जिल्ह्यापैकीं सदर व करवा या दोन तालुक्यांत भयंकर दुष्काळ पडल्याची बातमी आहे. एक आणा रोजावर देखील तिकडचे लोक मजुरी करण्यांत तयार आहेत.

**कापराचें तेल**—कापराचें तेल काढावयाचें झाल्यास कापराचे बारिक तुकडे करून घ्यावे. त्यांतून ६ तोळे तुकडे एका कांचेच्या बरणींत ठेऊन त्यांत कढत केलेलें १०० तोळे तेल ओतावें व लागलीच घट्ट बूच मारावें पंधरा दिवसांनीं उत्तम तेल तयार होतें.

**रेल्वेनें केलली सुधारणा**—जी. आय. पी. रेल्वे कंपनीनें पार्लर व रेस्टोरंट या नांवाच्या गाड्या तयार केल्या असून त्यांत पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील उतारूंची फार चांगली सोय केलेली आहे ह्मणतात. गाड्यांतच एक दारूचें दुकान ठेविलेले असून वाटेल तो जिन्नस मागविण्याकरितां विजेची घंटा लाविलेली आहे असें कळतें.

**निमकहरामपणा**— जपान देशांतील नागासाकी प्रांतांत एक श्रीमंत व्यापारी राहत असतो. त्यानें रशियापासून प्रत्येक बातमी बद्दल ३०० येन घेऊन जपानचें लढाऊ गलबत नाश पावेल अशा दरएक बातमी बद्दल २० हजार येन घेण्याचा करार करून जपानच्या गुप्त बातम्या बिनताराच्या यंत्रानें नागासाकी येथें त्याची एक रखेली होती तिच्या घराकडे तो पाठवीत असे. व तेथून त्या बातम्या रशियन लोक शांघाई मार्गानें पोर्ट आर्थर मध्यें पाठवीत. नागासाकी येथील येथील त्या व्यापाऱ्याच्या अवतीभोंवतीं रशियन लोकांची वारंवार गर्दी फार होत असे. या गोष्टीवरून संशय उत्पन्न होऊन ही गोष्ट उघडकीस आली व तो व्यापारी व ती रखेली या उभयतांस कैद करण्यांत आलें आहे. व त्या व्यापाऱ्याची सर्व मालमत्ता जपानी लोकांनीं नाश करून टाकली आहे.

## नोटीस.

रा. मन्नू रुपचंद परदेशी दाळवाले राहणार देऊळगांवराजा यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मांस तारीख १९ नोवेंबर १८९६ रोजीं करून दिलेल्या गहाणखतावरून तुमचेंकडे झालेले रुपयात पूर्वीचा वसूल जातां चैत्र वद्य ८ शके १८२६ रोजीं ५० रुपये वसूल दिला. त्यावेळीं कांहीं रुपये कमी करून सालबंदीचा दस्तऐवज करून द्या; ह्मणून तुह्मी विनंती केल्यावरून रुपये ३७५ चा ५० रुपये सालबंदीचा गहाण रोखा ज्या शर्तीवर करून देण्याचें कबूल करून तुह्मांस २० रुपयाची पावती दिली त्या शर्ती पाळण्यांत तुह्मी आमच्याशीं दगलबाजी केली. व दस्तऐवज साक्ष टाकण्यास ह्मणून नेला तो अद्याप आणून रजिस्टर करून दिला नाहीं सबब तुह्मास नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या पासून ४ दिवसाचें आंत कबूल केलेल्या शर्तीचा दस्तऐवज रजिस्टर करून आणून द्यावा. नाहीं तर तुमच्याशीं कबूल केलेल्या शर्ती प्रमाणें न वागण्याची जबाबदारी मजवर न राहून उलट तुम्हावर दगलबाजी बद्दल फौजदारी व सन १८९६ चे दस्तऐवजा प्रमाणें दिवाणी केली जाईल मग तुमची कोणतीही तक्रार एकली जाणार नाहीं. नोटिसीचा खर्चही तुम्हावर पडेल. कळावें. तारीख १७।८।०४

सही
कोंडु गोविंद तेलंगी
राहणार देऊळगांवराजा
दस्तूर खुद्द.

## नोटीस

वेशमी. उदेभान वल्लद लुकाजी डोबाळे मयत वारस पुत्र गंगाराम वल्लद उदेभान अज्ञान पालन करणार अभिमान वल्लद लुकाजी आणि [२] अभिमान वल्लद लुकाजी राहणार तानतापूर ता. व पोस्ट आकोट यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं तारीख १७।३।१८८९ इ रोजीं अभिमान आणि मयत उदेभान या दोघां भवानीं २०० रुपयांच्या तारणासाठीं गहाणखत लिहून दिलें. हे पैसे करारशीर दिले नाहींत. आणि मागितले असतां उलट्या गोष्टी सांगतात. सबब ह्या नोटिशीनें असे कळवितों कीं ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांत आमचे रुपये आणून द्यावे. जो न केल्यास कोर्ट मार्फत योग्य तजवीज केली जाईल आणि त्याबद्दलचा अखेर निकालापर्यंतचा सर्व खर्च या नोटिशीच्या खर्चासह तुम्हांवर पडेल. ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावें. तारीख १९ आगस्ट १९०४ इसवी०

सही
'जयसीराम जगरामदास' या दुकानचे
मालक जगरामदास आणि
'शिवनेराम जयसीराम'
दुकानचे मालक जयसीराम
तर्फे मुखत्यार रघुनाथदास
बिरदीचंद साहु राहणार
आकोट—दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी जगु वल्लद नरसाजी गणेश पाटील राहणार शेगांव यांस:—

खालीं सही इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी माझ्याशी संसारही केला पण आतां गेल्या बारा महिन्या पासून तुमची वृत्ती फार बिघडली आहे. तुह्मी मला फार वाईट रितीनें वागविलें, मला अपेष्टा व अप्रतिष्टा केली आणि मला माझ्या बापाच्या घरीं नेऊन पोंचती केली. मी तुमच्या घरीं येण्याचा पुष्कळ वेळां प्रयत्न केला पण मला तुमचा व तुमच्या इतर संबंधी मंडळीचा नीटसा भांवसा येत नाहीं. व तुह्मी मला वागवीतही नाहीं. मी आतां बापाच्या घरीं राहूं इच्छित नाहीं. मी तुमच्या तर्थे येऊन तुह्मानें नांदण्याला कबूल आहे. मी संसार करण्याला तयार आहे असें असून देखील तुह्मी माझ्या बापाजवळ शंभर दोनशें रुपये मागत आहां, आणि पैसे घेऊन फारकत देतो असें ह्मणतां. पण मला ही गोष्ट कबूल नाहीं. तुह्मी माझी गैबत विनाकारण केली याबद्दल तुह्माला जबाब द्यावा लागेल आणि तुह्मा नोटीस पोचल्या तारखेपासुन आठ दिवसाच्या आंत जर तुह्मी मला नेणार नाहीं तर मी तुह्मावर दिवाणींत फिर्याद करीन आणि नंतर पोटगीचा व इतर खर्च तुह्मावर पडेल. कळावें १४ आगष्ट १९०४ इसवी.

सही
यशोदा मर्द जनू पाटलीण निशाणी
बांगडी दस्तुर माधो भोवाजी
पाटील राहणार कळमखेड
तालुके बाळापूर

फौ. क्या. २१ मि. नंबर २
१९०४

त्री सिव्हिल जजसाहेब बहादुर जिल्हे आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— हरी सदाशीव शिरोडकर राहणार आकोला.

या नोटिसीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार यानें मयत अन्नपूर्णा भ्रतार दामोदर हिचे लोकांकडून येणें असलेले कर्ज रुपये २०० वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावे ह्मणून तारीख १७-६-१९०४ इसवी रोजीं अर्ज दिला असतां त्या अर्जाचे चौकशीची तारीख ३० माहे आगष्ट सन १९०४ इसवीची नेमिली आहे. तरी अर्जदार यांस त्याचे अर्जाप्रमाणें सरटीफिकीट देण्यास ज्यांची हरकत असेल यांनीं वरील तारखेस दाहा वाजता आमचे समक्ष त्यांचे जवळ असलेले लेखी अगर तोंडी पुराव्यासह हजर राहावें. कळावे तारीख ३-८-१९०४ इसवी०

आमचे सहीनिशी कोर्टाचे शिक्यानिशीं दिले असे.

Sk. Ismail

सिव्हिल जजकप आकोला.


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

REGISTERED No. N.

बाहेरगांवी टपालहांशीलासह........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस.... ........ ०१

Mofussil ... ... ... 2 ( With postag
All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line :2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 29 AUGUST 1904 NO 34

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २९ माहे आगस्ट सन १९०४ इ० अंक ३४

श्रीमद्भागवत दशमस्कंध
श्रीशिवकल्याणाच्या प्राकृत
आर्वीवर्द टं.केसहित
१
कृष्णजन्म
( प्रथम पंचाध्यायी )

किंमत एक रुपया ट. ख. दोन आणे.

ही पंचाध्यायी निर्णयसागर छापखान्यांत उत्तम मोहोरेदार कागदावर छापून तयार झाली आहे. छपाई व बांधणी निर्णयसागरची आहे इतकें सांगितल्यावर ती उत्तम होईल हें निराळें सांगावयास नकोच. पृष्ठसंख्या अष्टपत्री साच्याची सुमारें २५० पृष्टे. पूर्व संकेताप्रमाणें पुस्तकें गणेश चतुर्थीस तयार होतील. श्रीशिवकल्याणाची टीका म्हणजे मूळ श्लोकांचें रसभरित निरूपण असून तें इतकें चित्तकर्षक आहे कीं, त्याची माधुरी प्रत्यक्ष चाखल्याशिवाय कळणारी नाहीं. प्राचीन भागवत ग्रंथ रमणीय, त्यांत दशमस्कंद रमणीयतर, त्यांत श्रीकृष्ण जन्म अतिमोहक आणि त्याला अवगुंठन श्रीशिवकल्याणाच्या वाग्रसाचें !

पुस्तकें पंढरपूर येथें आमचेकडे अथवा खालीं दिलेल्या पत्त्यावर विकत मिळतील.

डा० द० कृ० कोलटकर, आकोला ( वऱ्हाड )
रा० रा० रा० गो० मै.डक लायब्रेरिअन, कोल्हापूर
प्रो० नि० बा० रानडे बी. ए. सिताराम बिल्डिंग, फोर्ट मुंबई.
'महाराष्ट्र कवि' ऑफिस, ठाणें.'
स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी, नागपूर ( अथवा असतील तेथें )

हायस्कूल, पंढरपूर ता. २४।८।१९०४ } गणेश बळवंत मोडक संपादक.

---

### नोटीस

जानकी मर्द शामराव राहणार शिरल नेमाने तालुके बाळापूर इस—

या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझे मालकीची सर्व स्थावर व जंगम इस्टेट भगवान वल्लद रंगाजी राहणार शिरळ नेमाने तालुके बाळापूर यांस तो वारस असल्यामुळें त्याचे स्वाधीन वारस पत्र करून देऊन दिली आहे व यानें तुझे व माझे उभयतांच्या हयाती पावेतों अन्नवस्त्र देऊन प्रतिपाळ करण्याचे कबूल केलें आहे. तर तूं त्याचे ताब्यांत दिलेली स्थावर जंगम इस्टेट तूं कोणासही विकूं नये व त्या इस्टेटीवर कोणतही प्रकारचा लेख करून देऊं नये कारण तुजला कोणतेही प्रकारचा अधिकार नाहीं. व दिल्यास तो रद्द समजला जाईल. ही जाहीर नोटीस दिली कळावें सही. तारीख २२ माहे आगस्ट सन १९०४ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी गिरजी मर्दे तुकाराम राहणार शिरळ नेमाने पोस्ट लाखनवाडा तालुके बाळापूर

---

### नोटीस

नोटीस बेशमी किसन वल्लद गंगाराम जात गोंदळी राहणार मौजे येरंड प्रगणे बार्शीटाकळी तालुका आकोला जिल्हा आकोला यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाच भ्रतार असुन गेल्या सात वर्षा पसून मी आपले माहेरीं आहे. नेण्याकरिता तुम्ही कधींच आलें नाहीं. व दोन चार वेळां पंच मार्फत आपले कडून मी तुमच्या घरीं आली. तेव्हां मला तुम्ही बरोबर वागविलें नाहीं. व मजला मारहाण करून घरांतुन हाणून लाविलें. आतां तुम्ही मोहतीराची दुसरी बायको करून आपले संसारास लागलें व माझा कांहींच निकाल केला नाहीं. मी कर्ज काढून आपले बापाचे घरीं निर्वाह केला, आतां मजला कोणी कर्ज देत नाहीं. मजला २५० रुपये देणें झालें आहे. तेव्हां ही नोटीस पावल्या पासुन १५ दिवसाचे आंत कर्जाची आदाई करून शिवाय मजला घेऊन जावें. मी तुमचे येथें नांदण्यास तयार आहे. सदरहू मुदतींत तों न कराल तर हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा कोणताही हक्क राहणार नाहीं. कळावें. तारीख २४ माहे आगष्ट सन १९०४ इ. दातुर लक्षण सोनबा गोंधळी

सही

बायजी मर्द किसन गोंदळी राहणार हातगांव हिचे हातची बांगडी असे

---

### नोटीस

रा. महादेव वासुदेव फडके राहणार मौजे धारण पोस्ट—पांढरकवडा तालुके वणी यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, धारण ता. वणी या गांवांतील $\frac{1}{8}$ हिस्सा तुमचे चुलते रा. गोपाळ नारायण फडके यांनीं आम्हांस सन १८७१ सालीं विकला आहे. व त्याबद्दल यांनीं दस्तैवज करून तो नोंदून दिला आहे. व त्यावर तुमचे वडील रा. वासुदेव नारायण फडके यांची साक्ष आहे. तो धारण गांव त्र्यंबकू वा अहकू धांडे याला आबादी साठां सन १८६७ पासून सन १८९४ पावेतों दिला होता. व तो मुदत पुरी झाल्यावर तो गांव तुमचे चुलते रा. गोपाळराव फडके यांचे ताब्यांत येऊन आमचा हिस्सा आम्हाला मिळावयाचा होता. अशी या दस्तैवजांत शर्त होती. त्या प्रमाणें त्र्यंकू वा अहकू धांडे यांची मुदत संपून तो गांव तुमचेकडे आला आहे. परंतु आमचा हिस्सा मात्र तुम्ही आम्हांस दिला नाहीं. या बद्दल आम्ही तुम्हांस बरेच वेळ खाजगी रितीनें लिहीले परंतु तुम्ही अद्याप कोणतेच प्रकारचा उलगडा केला नाहीं. करितां आतां कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत आमचा धारण गावांतील $\frac{1}{8}$ हिस्सा आमचे ताब्यांत देऊन आमची पावती घेऊन जावी तसें न केल्यास आम्हाला दिवाणी कोर्ट मार्फत फिर्याद करून या नोटिशीच्या खर्चासुद्धा तावा घ्यावा लागेल कळावें. ता० २४ माहे आगष्ट १९०४ इ.

सही

गणेश जनार्दन नातू आकोला

---

### वृत्तपत्रांची सद्यःस्थिती

( मि. मलबारी यांचें मत )

हल्लींची पत्रें मागल्या पिढीच्या मानानें फार चांगलीं, जोरदार, आणि सुंदर भाषेंत लिहिलेली असतात. पण विचारांत उदात्तता कमी आणि गतानुगतिकत्व अधिक असते हल्लीं पत्रांची एकंदर संख्या वाढती आहे. पण चांगल्या भारदस्त पत्रांची कमी झाली आहे. एक दोनच पण जोरानें चालविलेला त्रांचे जागीं पांच सहा, पण अगदीं निरुपयोगीं अशीं पत्रें निघतात. बहुतेक जाहिरातीवरच यांचें जीवन अवलंबून असतें खरें लोकमत दर्शविणारें पत्र काढणारा दादा सगळ्या देशांत एकटाच निघाला असता तरी सुद्धां काम होतें. आपल्या समाजाची किंबहुना देशाची, खरी स्थिती या एका गोष्टीवरून व्यक्त होईल. चांगले लेखक ठेविले, नेमस्त टिका केली सर्वांनीं वाहवा झटलें, तरी अखेर त्या पत्राचा प्रसार फारसा नसतो. वर्गणीदारांपैकीं कांहीं फुकटे, कांहीं पैसे बुडविणारे, कांहीं भिडेपाडेनें कांहीं दिवस पत्र घेऊन पुढें तें बंद करणारे आणि कित्येक तर असे खमंग असतात कीं, वर्षभर पत्र घेऊन वर्षअखेर बिल आलें म्हणजे मालक सापडत नाहीं, किंवा घेत नाहीं असा शेरा मारून अंक परत करतात! देशाभिमानी आणि ढोंगी यांच्यांतला भेद ओळखणें आपल्या देशांत फार कठीण झालें आहे.

---

### मराठीची संपन्नता

काव्यवाङ्मयासंबंधानें मराठीची संपत्ती अत्यंत परिपुष्ट भाषांच्या संपत्तीस फारशी हार जाणार नाहीं. भौतिक सृष्टीलाच अनुलक्षून केलेली इंग्रजी कविता सोडून दिल्यास इंग्रजी काव्यवाङ्मयाच्या बाजूस आमचें काव्यवाङ्मय ठेवल्यास त्यास फारसें वैगुण्य दिसणार नाहीं. मन निर्मळ करणारे, अध्यात्मिक शुद्धता देणारे, पापग्रासांतून आमच्या मनास सोडविणारे, संसाराच्या कर्दमांतून क्षणभर अलिप्त करून अत्यंत उदात्त विचारांत बुडविणारे, आणि श्रमलेल्यांस, भिगभिगलेल्यांस, वैतागलेल्यांस, निवास विटून गेलेल्यांस समाधान देऊन त्यांच्या अंतःकरणातील नैराश्यास पिटाळून लावणारे, मनाचें स्वाभाविक स्वास्थ्य परत आणणारे, उपाधीच्या लेपापासून मुक्त झालेल्या आत्म्याची सच्चिदानंदी तंद्री लावणारे आणि सर्व भेदभाव क्षणभर नष्ट करून केवळ एकमवाद्वितीय तत्त्वाची भावना निर्मिणारे प्रसन्न, प्रतिभासंपन्न आणि भक्तिरसानें आर्द्र झालेले काव्यभाग मराठी इतके दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयांत सापडतील अशी खात्री देतां येणार नाहीं. भक्तिरसाचा परिपाक मराठी वाङ्मयाचा विशेष आहे. मानवाला मानव ठेवून त्याच्या कायावाचामनाच्या व्यापारांस अत्यंत उन्नत करणें, विशेषतः सौंदर्य नीतिभाव आणि बुद्धिविषय. या विषयींचे मानवी अनुभव चढतील तितक्या उंच पदास चढवणें हा इंग्रजी वाङ्मयाचा विशेष आहे. परंतु स्व-भाव विसरून आत्मार्पण करणाऱ्या भक्तीच्या उचंबळलेल्या सागरांत पोहणारे कवि हिंदुस्थानास—त्यांतही महाराष्ट्रासच विशेषतः लाभले. 'मन रामीं रंगलें, अवघें मनच राम झालें' ही अंतकरणाची वृत्ति, हा मानस' शास्त्रीय चमत्कार आमच्या काव्यवाङ्मयांत जितका जागोजाग आढळतो, तितका इंग्रजी वाङ्मयांत आढळत नाहीं—निदान आढळेल कीं नाहीं याची शंका वाटते.

शिवाय मराठी वाङ्मयांत मराठी मनाची अत्यंत उंच उडी मारलेली असून मराठी मनाच्या नैराश्याचीं, वैराग्याचीं, राष्ट्रीय चळवळींचीं आशाआकांक्षांचीं आणि सर्व मनोव्यापारांचीं प्रतिबिंबें हवीं तितकीं आहेत. ज्ञा. प्र.

---

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ४ शके १८२६

## पोलिसखातें

पोलिसखातें म्हटलें म्हणजे राज्यकारभाराची एक मुख्य संस्था आहे. या खात्याच्या मुख्यव्यवस्थेवर बंदोबस्ताचीं पुष्कळशींच कामें अवलंबून असतात आणि लोकांचें जीवित व वित्त यांचें संरक्षण उत्कृष्ट होण्याला या खात्याची कार्यशक्ती निर्भेळ व सोज्वळ स्वरुपाची असावयाला पाहिजे. या खात्यांत दोष फार आहेत आणि प्रामाणिक, वजनदार, व बरेंडीत लोक या खात्यांत फारसे शिरत नाहींत म्हणून कांहीं निराळीच सुधारणा करावी या हेतूनें एक सरकारी कमिशनाचा मुद्देसूद रिपोर्ट इंडिया सरकारा पुढें आहे पण कोणतीच सुधारणा त्या रिपोर्टांतील कागदी सूचने पलिकडील प्रांत अजून पहात नाहीं. कांहीं कांहीं सूचना अशाहि आहेत कीं पोलिस खात्यांतील मुख्य मुख्य जागा युरोपियनांच्याच हातीं ठेवण्यासाठीं सर्व युक्त्या प्रयुक्त्या योजण्यांत यावयाच्या आहेत.

१९०३ सालचा मध्यप्रांतांतील पोलिस खात्याचा वार्षिक रिपोर्ट स्थानिक सरकारा समोर गेला तेव्हां नामदार चीफ कमिशनर यांनीं आपला अभिप्राय चांगल्या खुलाशानें दिलेला आहे. या अभिप्रायांत वऱ्हाडांतील पोलिस खात्या विषयींही उल्लेख केलेला आहे. वऱ्हाडाचें पोलिस खातें गेल्या नोवेंबर पासून मध्य प्रांताच्या पोलिस खात्यांत समाविष्ट झालें तथापि १९०३ सालच्या रिपोर्टांत वऱ्हाडाच्या आंकड्याची नोंद पृथक् ठेविली आहे. चालू सालापासून या प्रांता संबंधाचे आंकडे पृथक्पणानें ठेवण्यांत येणार नाहींत.

एकंदरीनें पाहतां गुदस्ताच्या सालीं पोलिस खात्याची स्थिती चांगली समाधानकारक होती. गुन्ह्यांची संख्या फारच उतरली आहे. केरकचऱ्या संबंधाचे छोटे छोटे गुन्हे हिशोबांत घेतले नाहींत तर असें आढळेल कीं, पोलिसाच्या अंमलांतील गुन्ह्यांची संख्या मध्यप्रांतासाठीं १६६३२ होती. इतकी कमी संख्या कधींच दृष्टीस पडली नव्हती; पण १८९८ सालीं गुन्हे फार कमी झाले तरी देखील वरील संख्ये पेक्षां सरासरीनें दीड हजार गुन्हे अधीक घडले होते. वऱ्हाडांतही गुन्ह्यांची संख्या फारच कमी म्हणजे ३०२६ आहे. असें हें अल्प प्रमाण लोकांच्या सुस्थितीचें द्योतक आहे खरें, तथापि त्याचा अर्थ जर कोणी असा घेईल कीं लोक चांगले संपन्न, श्रीमान, व सुखी आहेत तर ती मात्र मोठी चुकी होईल. गुन्हा करण्या इतकें दारिद्य १९०३ सालीं नव्हतें आणि लोकांस पोटा पुरती मजुरी मिळत होती एवढाच गुदस्ताच्या अवादानीचा भावार्थ निघतो; पण त्या पासून लोकांची स्थिती कांहीं सुधारली आहे किंवा लोकांपाशीं एखाद्या दुष्काळा बरोबर झगडण्या इतका धनधान्य संचय जमला आहे असा कांहीं बोध होत नाहीं. गुदस्ता नागपूरच्या आसमंतांतील भागांत महर्गता होती पण लोकांस मुबलक मिळाल्या मुळें ती इतकी जाणवली नाहीं. रायपूर जिल्ह्यांत दुष्काळाचीं कामें काढावीं लागलीं होतीं. मध्यप्रांतांत एकंदरीनें गुन्हे कमी झाले पण खुनाची संख्या १३१ पर्यंत वाढली होती आणि त्यापैकीं फक्त रायपूर जिल्ह्यांतच २१ खून होते.

चोरी, डाका, रांजणी वगैरे गुन्ह्या संबंधानें उल्लेख करितांना चीफ कमिशनर साहेब म्हणतात कीं, वऱ्हाडांत हे गुन्हे गेल्या पांच वर्षांत फार वाढले आहेत आणि त्यांची संख्या मध्यप्रांतांतील गुन्ह्यांच्या दुप्पट इतकी आहे. सार्वजनिक वित्ताला हा धोका विशेष असण्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं हा प्रांत साधारणपणें सधन व सुखी आहे व त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील पुष्कळसे लोक या भागांत उतरतात व ते आपला चरितार्थ दरवडे घालून चालवितात. या गुन्ह्यांच्या बाबतींत पोलिसांची कामगिरी अगदीं ढिलाईची दिसते व पुष्कळसे गुन्हे पत्त्यांतच येत नाहींत. नामदार चीफ कमिशनर म्हणतात कीं इकडील गांवच्या अंमलदार–मंडळीस गुन्हेगारा संबंधानें शोध तपास नीट ठेवितां येत नाहीं. गांवोगांवच्या लोकांनीं कोणी नवखा मनुष्य वस्तीला आला तर त्याच्या संबंधानें अधिक काळजी घेण्याला शिकले पाहिजे, त्या शिवाय वऱ्हाडांत मोठमोठ्या हमरस्त्यावरहि रात्रीं डाके पडतात त्यांचा कांहींच मागमूस लागत नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट होय.

वऱ्हाडांतील पोलिस अंमलदार किरकोळ केरकचऱ्याच्या मोकदम्याबद्दल नको इतकी काळजी घेतात आणि तसेंच दहा रुपयाहून कमी किंमतीच्या मालाच्या चोरी संबंधानें फार चौकशा चालवितात असें दृष्टीस पडलें आहे. वऱ्हाडाच्या पोलिसास त्यांची खरी कामगिरी समजून देण्याचा प्रयत्न स्थानिक सरकारानें अशा रीतीनें मुद्दाम केला आहे.

उडाण टप्पू लोकांविषयीं नामदार चीफ कमिशनर यांचा अभिप्राय असा आहे कीं हे लोक बेरोजगारी असतात आणि गुन्हे करणें हाच त्यांचा धंदा होय. लुटालूट चालविणाऱ्या या लोकांकडून सद्वर्तनाबद्दल जामीन घेण्याचा उपाय अधिकाधीक अमलांत आला पाहिजे. या बाबतींत माजिस्ट्रेट मंडळी पोलिसाच्या पुराव्याविषयीं मोठी अश्रद्धा दाखवितात आणि साधारणपणें जामीन घेण्याची जरूर दिसली तरी देखील उडाण टप्पू इसमाला यच्चावत देखील सोडून देतात ही मोठी चूक होय. सामान्य चोरणानें अशा खटल्याचा निकाल केला पाहिजे. ज्याला आपल्या आयुष्याच्या क्रमाचा बरोबर हिशोब देतां येत नाहीं, ज्याच्या पाशीं उपजीविकेचें साधन नाहीं आणि जो गुन्हा करणार नाहीं. अशी खात्री वाटत नाहीं अशा इसमापासून सद्वर्तनाबद्दल जामीन घेणें अन्यायाचें काम होणार नाहीं. अशा गुन्हेगारांच्या टोळी विरुद्ध जेव्हां खटले करण्यांत येतात तेव्हां त्यांचा निकाल ताबडतोब करण्याविषयीं माजिस्ट्रेटांनीं विशेष खबरदारी घेतली पाहिजे. फौजदारी खटला लांबणीवर पडला म्हणजे गुन्हेगाराला साक्षीदार उलटविण्याची संधी मिळते, साक्षिदारांच्या जबान्यांचा तात्कालिक परिणाम नाहींसा होतो आणि न्यायाच्या मार्गांतच अन्याय होण्याचे संभव पुष्कळ वाढतात; या साठीं फौजदारी काम फार लवकर निकालास लागेल अशा विषयीं माजिस्ट्रेटाला मुख्य काळजी असली पाहिजे.

पोलिस खात्यांतील कानस्टेबलास सरकारी पगार थोडा मिळतो आणि त्याला त्या पगारापेक्षां बाहेरील रोजीच अधीक पडते असा पुष्कळदां अनुभव येतो, या स्थितीमुळें पोलिसाची चाकरी करण्याला कानस्टेबल पुरेसे मिळत नाहींत, ही अडचण दूर व्हावी म्हणून कानस्टेबलास निराळा अलाउन्स देण्याचा विचार सरकाराच्या मनांत आलेला आहे. पोलिस कमिशनाच्या रिपोर्टाचा निकाल जेव्हां कांहीं होईल तेव्हां या बाबतींत सरकाराला हात घालण्याला जोर येण्याचा संभव आहे.

## हरण काळजी

धंद्यानें पाऊस पाण्याचें मान पुष्कळशाच ठिकाणीं बरें नाहीं. आज कित्तीस ठिक ठिकाणीं दर वर्षीस जितका पाऊस पडतो त्याच्या निमे इतकाहि पाऊस झाला नाहीं. दररोज दिवसास उन्ह चांगलें तीव्र पडतें व उष्मा फार होतो, सायंकाळीं व सकाळीं थंडगार वारा सुटतो आणि रात्रीं स्वच्छ चांदणें पडतें. जणू काय हे दिवस श्रावण महिन्याचे नसून भे महिन्याचेच आहेत! रोजच्या रोज मनुष्य आकाशाकडे पाहतो व मध्यंतरीं जे ढग इतःस्ततः खेळतांना त्याच्या दृष्टीस पडतात त्यामुळें त्यास मोठी आशा वाटते कीं, आज उद्यां इतक्यांत पाऊस खात्रीनें पडेल; पण नियशः त्याची निराशा वाढती आहे. पाऊस न पडला तर कसें होईल ही हरण काळजी त्याच्या हृदयास झोंबत आहे. गेल्या दुष्काळाच्या दिवसांचें विस्मरण त्यास अद्याप झालेलें नाहीं. दुष्काळाच्या भीतीनें कोणाचें अंतःकरण विदीर्ण होणार नाहीं! ह्या एका गोष्टीनें मनुष्याचे मनास तात्काळ व्यग्रता प्राप्त होते. भाकरीच्या काळजीनें इतर सर्व व्यवसाय बाजूला पडतात. मनुष्यास आनंदाचें व विश्रामाचें स्थळ सांपडत नाहींसें होतें व त्याच्या मनःप्रवृत्ती विमार्गाकडे ओढ घेतात! दुष्काळच्या वेळचीं जनसमुदायाची स्थिती पाहून कोणा पाषाणास द्रव फुटणार नाहीं! असो. पाऊस पाणी आणि आबादानी होईल अशी आशा करण्या पलिकडे आपल्या हातांत कांहींच नाहीं. पोटाची आग फार तीव्र होय. ह्या आगीनें राज्याचीं राज्यें जाळून खाक केलीं आहेत. दुष्काळ म्हणजे राष्ट्रावर ओढवलेलें एक दैविक महा अरिष्ट होय. लढाईच्या मुळें होणारा रक्तपात मुद्धां या दुष्काळा पुढें कांहींच नाहीं. असा हा दुर्धर प्रसंग राष्ट्रावर येणें व वारंवार त्याची पुनरावृत्ती होण्याची भीति असणें ही गोष्ट त्या राष्ट्राच्या जीवितास धोका देणारी होय. आणि याचा योग्यतो प्रतिकार थोर पुरुषांनीं वेळींच करणें अवश्य होय. ईश्वर करो आणि असला आपत्काल आपल्या शत्रूवरही न येवो!

## खरी दुःस्थिती

ज्या प्रमाणें एखादा अल्लड पोहोणारा जवान मर्द महा पुरांत मोठ्या धिटाईनें छाती वर करून पोहत जात असतां एकाएकीं नक्रानें त्याचा पाय धरून त्यास आंत आंत ओढावें व त्यानें 'मला वांचवा मी बुडतो' असा आक्रोश करावा तरी लोकांत त्याची ती सहज लीला आहे असेंच वाटावें व वांचविण्याचा प्रयत्न कोणीहि करूं नये त्या प्रमाणें आपल्या हिंदुस्थानची स्थिती झालेली आहे. हिंदुस्थान देश हा पूर्वीचा मोठा संपन्न खरा पण दिवसानुदिवस तो दारिद्र्य समुद्राचा खोलवरचा तळ शोधीत आहे व 'ममत्व कोणी हात द्या' म्हणून आक्रोश करित आहे तरी ती हाक कोणी ऐकत नाहीं व त्यास वर काढण्याचा प्रयत्न कोणी करीत नाहीं! इतकेंच नव्हे तर तो बुडत आहे ही गोष्टच खोटी म्हणून आमचें सरकार आम्हांस एक सारखें समजावीत आहेत. आम्ही निष्कांचन व निर्बल होत आहोंत आमचें केव्हांच देहावसान होऊन जाईल. अशी आमची भीति दृढावत आहे. आमच्या हृदयांत सलत असलेल्या शल्याच्या दुःखाची जाणीव दुसऱ्यास कितपतशी येणार! आपण सुखरूप आहों व श्रीमान होत आहों इत्यादि गोष्टी आपणास आपलें सरकार मोठ्या कळकळीनें सांगत असते. तरी त्या खऱ्या वाटत नाहींत, कारण आपल्या दुःखाचा बोध आपणास एक सारखी बोंचीत आहे व आपल्या दुःखाचें विस्मरणच पडूं देत नाहीं. तरी मुद्धां आपण आपल्या राष्ट्रास भडकेलेल्या वड्रोगावर कांहींच औषधोपचारी योजना करीत नाहीं यास काय म्हणावें! कुठेंतुन प्राण गाहे पर्यंत आपल्या प्रयत्नांत खळ पडतां कामा नये. आणि आपण हिंमतीनें वागलों नाहीं तर आपण सुस्थितीस कधीं तरी येऊं ही आशा व्यर्थ होय!

आपली विपन्नावस्था आपल्याच लोकांच्या दृष्टोत्पत्तीस चांगली येत नाहीं ही एक मोठी दुःखाची गोष्ट होय. बाह्य स्वरुपाच्या रमणीय देखाव्यानें भुलून जाऊन आपण अंतर्गत कीडीस लागलेले हृदयाचे भाग बरोबर निरीक्षण करीत नाहीं. मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं तात्कालिक सौख्या पलीकडे तो पर्वा करीत नाहीं. इतकेंच नाहीं तर दुःखाचा काळ फसातरी पार पडल्यावर सुखाच्या आनंदांत तो तें पूर्वगत दुःख इतकें विसरतो कीं, आगामी दुःखाचा परिहार करण्याचे त्याच्या मनीमानसींहि नसतें. पण या मनाच्या समजुतीनें पुढचें दुःख कांहीं कमी जाचणार नाहीं. राष्ट्रीय ऱ्हासाचीं कटु फळें आपण आज चाखलीं नाहींत तरी तीं आपल्या भावी पिढीस फार भोंवतील आणि म्हणूनच त्याची

प्रतिकार सध्यां वेळ आहे तोंच आपण केला पाहिजे. आपलें सध्यांचें आयुष्य किती कष्टमय आहे याची खात्रीकरून घेण्यास फारसें दूर जाणें नको. दोन चार वर्षांच्या पूर्वीचे दुष्काळाची नुसती आठवण पुरी आहे. आपले लोक अन्नवस्त्रा वांचून अनाथ पाहतांना व हजारों लोक मृत्युगत होतांना पाहणें हीच गोष्ट आपल्या खऱ्या खऱ्या आपत्कालाचें चित्र रंगवीत आहे. आपण भिकारी मजूरदार आहोंत. आपल्या जवळ वित्त नाहीं, कौशल्य नाहीं, वा शौर्य नाहीं. आपण दीन, दुबळे व परवश आहोंत! याच स्थितींत राहणें आपणांस बरें वाटूं नये. आपण श्रम केले पाहिजेत. कांहीं महत्वाकांक्षा धरली पाहिजे. पैसा मिळविला पाहिजे. कांहीं हर हुन्नर कला कमावली पाहिजे. कांहीं धाडसाचीं कृत्यें केलीं पाहिजेत. नुसतें पोटभरू हमाल आपण नाहीं तर आपण कांहीं पाणीदार लोक आहोंत अशी मनांत ईर्षा धरून आपण एक निष्ठपणें उद्योगास आरंभ केला पाहिजे हें निराळें सांगणें नको. आम्ही तर असें म्हणतों कीं जर कोणी निश्चय करील आणि देशी कपडाच वापरीत राहील तरी देखील देशाचें कल्याण होईल. प्रत्येकानें आपापल्या परीनें थोडा तरी प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न म्हणजे आपलेपणाचा बाणा होय. हा बाणा जर पक्का अंतःस्थ बिंबेल तरच देशाचा कांहीं लाभ होईल.

---

## आत्मसंयमन

आपण निरुद्योगीच राहूं आणि आपल्या दुःखद स्थितीनें आपल्या डोळ्यास पाणी आलें नाहीं व आपल्या अंतःकरणांत पीळ पडला नाहीं तर आपलें राष्ट्र नामशेष होईल. आपल्या देशासाठीं, आपल्या पूर्वजांच्या नांवासाठीं, आणि आपल्या मुलाबाळासाठीं आपण कायावाचामनानें स्वराष्ट्रहिताची गोष्ट केली पाहिजे. प्रत्येक जण जर आपला रोजचा क्रम पाहील व आपण आपल्या राष्ट्राच्या हितास कोणचें आत्मसंयमन केलें याचा विचार करील तर आपलें पाऊल पुढें पडेल. आपण नुसते उदरंभरी लोक झालों आहोंत व आपणांत कांहींच कर्तबगारी नाहीं ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन आपण आपापल्या परीनें उद्योग करून बाहेरून स्वदेशांत पैसा आणला पाहिजे. आपला पैसा परदेशीं होतां होईल तों न जाऊं देण्याची विशेष काळजी घेतला पाहिजे. देशी वस्तूंवर प्रेम केलें पाहिजे. परकीय वस्तू दूर टेविल्या पाहिजेत. आणि हा एकच राजमार्ग आपलें राष्ट्रहीत साधण्याचा आपल्या हातीं आहे. हजारों कायद्यांनीं, ठरावांनीं, लेखांनीं, सभांनीं वा व्याख्यानांनीं जी गोष्ट होणार नाहीं ती एका मनाच्या निग्रहानें होणार आहे. शक्य असेल तितक्या रीतीनें मी आपल्या गरजा कमी करीन व त्या सर्व स्वदेशच्याच वस्तूंवर भागवीन हीच मनशीं गांठ बांधून आपण उद्योगास लागावें. आणि अशी एका आत्मसंयमनाची किंमत प्रत्येकाच्या [illegible] होय.

आपणांस आपल्या खऱ्या स्वहिताचा मार्ग दिसला तरी तो जरा कठीण आहे ह्मणून आपण त्याचा अवलंब करीत नाहीं हा गोष्ट आपल्या नित्याच्या व्यवहारांतली होय. आपल्यास खरी तातडी लागल्या खेरीज आणि अंतःकरणांत चांगलें हालल्या खेरीज मनाची सुखप्रवृत्ती तिकडे होणार नाहीं. गोष्टींचें स्वरूप उमजल्यावरही आपण डोळ्यावर कातडें ओढतो ही गोष्ट बरी नव्हे. आपल्या हयगयीमुळें आपल्या स्वराज्याचा, व स्वातंत्र्यांचा नाश होत आहे ही गोष्ट कोणी विसरूं नये.

---

## लढाईची खबर

रुसो-जपानी युद्ध चांगलेंसें जोरांत नाहीं, तरी पोर्ट आरथरचा किल्ला सर करण्याचे जपानचे महा प्रयत्न चालूंच आहेत. दररोज जपानचा पाय थोडा थोडा पुढेंच सरकत आहे. रशियन लोक तो किल्ला अखेर पर्यंत सोडतीलसें दिसत नाहीं आणि जपान तर तें स्थळ काबीज केल्या खेरीज स्वस्थ राहणार नाहीं. पोर्ट आरथर जवळील टेकड्यावर जपाननें मोठमोठ्या तोफा डागल्या आहेत व त्या तोफांच्या भडिमारांत हें पोर्ट चांगलें आलें आहे. सध्यांच्या निकराच्या संग्रामांत जपानलाहि कित्येक प्रसंगीं मावार खावी लागते. ‘रशियन झेंडा फडकत राहूं द्या’ असा झारानें मुद्दाम निरोप पाठविला आहे व रशियाचे लोक हें ठिकाण जपानास मिळूं द्यावयाचें नाहीं अशा प्रतिज्ञेवर मोठ्या शौर्यानें लढत आहेत; तरी पण जपानचाच डाव होईल असा रंग आहे.

म्यांचुरियाकडील रशियन जनरल क्युरोपाटकीन यांनीं हैचंग सोडलें म्हणून रशियन लोक फार निराश झाले आहेत. प्रत्यक्ष जनरल साहेबांनीं हें हात पाय गाळल्याचें वर्तमान झारास कळविलें तें त्यास पसंत पडलें नाहीं. व लागलींच झारानें ‘हैचंग सोडूं नका.’ असा सक्तीचा निरोप पाठविला. झाराची हिंमत व कळकळ खरोखर अवर्णनीय आहे!

रशियाच्या क्रूरपणाची एक हकीकत प्रसिद्ध झाली आहे कीं, जे जपानी लोक रशियाच्या हातीं पडले त्यांचा त्यांनीं जीव घेतला आणि त्यांचे अवयव छिन्नविछिन्न करून टाकले. हा अमानुष क्रूरपणा ऐकून अंगावर कांटाच उभा राहतो. रशिया असले प्रकार न करील तर त्याजबद्दल इतर राष्ट्रास विशेष सहानुभूती वाटेल. असलीं चीड आणणारीं कृत्यें कधींही कोणी करूं नयेत.

तिबेटांतील इंग्रज मिशनचा जम बरा बसत चालला आहे. लौकरच तह ठरेल असा अदमास आहे. नेपाळ, भूतान आणि तिबेट हीं एक दिलानें इंग्रजाशीं दोस्ती करीतील अशीं चिन्हें दिसत आहेत. तिबेटांत हा जसा इंग्रजांचा चांगला पेगम बसला तसा अफगाणिस्थानांत आणि इराणांत बसला ह्मणजे एक मोठें थोरलें राजकारस्थान सिद्धीस गेलें ह्मणावयाचें.

---

## शरीर शुद्धी

[ आमच्या मित्रा कडून ]

नुकतीच श्रावणी झाली. श्रावणींत शरीरशुद्धीचा जो उपक्रम सांगितला आहे तो अवश्य ध्यानांत धरण्यासारखा आहे. श्रावणीच्याच वेळीं भस्मस्नान, गोमयस्नान, मृत्तिकास्नान इत्यादि गोष्टी कराव्या आणि त्या देखील अगदीं तांत्रिक रीतीनें ह्मणजे भस्म, गोमय किंवा मृत्तिका यांचा स्पर्श व लेपन अंगाला न होईल अशा रीतीनें कराव्या ही मोठी अदूरदृष्टी होय. वरील स्नानांच्या प्रयोगाची उपयुक्तता आपणांस माहित नाहीं आणि ह्मणूनच आपण आपल्या जुन्या शरीर शुद्धीच्या मार्गाचा त्याग करितो आणि अज्ञानानें विलायती गोष्टींचा अंगिकार करितो. विलायती मूल्यवान साबण फार आवडतो आणि त्याचा अंगावरून हात फिरला ह्मणजे आमच्यापैकीं पुष्कळ शहाण्या व सुधारलेल्या मंडळीस शरीराची पवित्रता वाटते आणि त्यांच्या मतें इंग्रजी विद्येविषयीं अनुगी होण्याला साबणाचा उपयोग हा एक मुख्य संस्कार होऊन बसला आहे. साबणाच्या रूपानें आह्मी सहस्त्रावधि रुपये दरसाल विलायतेला पाठवीत आहों. आणि खरोखर आमच्या देशांत या साबणा पेक्षां पुष्कळ उत्कृष्ठ द्रव्यें शरीरशुद्धीचीं आहेत. पण तीं इतकीं बाजूला पडलीं आहेत कीं घवलाकचरा, शिकेकाई किंवा तसेंच इतर पदार्थ दुकानांतून ठेवण्याची रीतच मोडण्याचा प्रसंग अगदीं समीप आला आहे. श्रावणींतील स्नानाच्या द्रव्या संबंधानें आह्मी मोठ्या अगत्यानें कळवितों कीं भस्म, गोमय, मृत्तिका इत्यादि द्रव्यें फार उत्कृष्ठ आहेत. त्यांस आपण लघु लेखितो तरीं तीं त्याज्य नाहींत. हे पदार्थ चांगले निवडून घेतले तर त्यांच्या उपयोगानें स्नानविधी शरीराला फार आरोग्यकारक, कांतिप्रद व उत्साहवर्धक होतो. या गोष्टीचा लाभ अनुभवानेंच कळण्या सारखा आहे. कांहीं जुने वैद्य आह्मांस असेंही सांगतात कीं त्वचे संबंधीं रोगाला देखील हीं श्रावणींतलि स्नानें हा एक उत्तम उपाय होय. शरीरशुद्धीचा जुनाच विधी आपण स्वतः अमलांत आणावा इतकेंच नाहीं तर होतकरू तरुण विद्यांस या बाबतींत आपण अनोळखी व अज्ञानी ठेवूं नये. श्रावणाच्या वेदोक्त संस्कारापासून स्नानविधी यथासांग आपण शिकलों तरी देखील आपला मोठा लाभ होईल.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान—सर्वांचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस येत्या सप्तकांत पडेल तरच पीकांची सुस्थिती कायम राहील. पर्जन्याची पूर्व लक्षणें एकत्र दिसत आहेत तेव्हां लवकरच पावसाचा योग जुळून येईल असा भरवंसा आहे. रोगराई संबंधाची हालहवाल समाधानकारक नाहीं. पटकीचा वांधा बहुतेक ठिकाणीं चालूं आहे. जळगांवच्या बाजूला प्लेगाची आपदा जरा जोरावरच आहे.

काल सायंकाळीं रा. रा. रामचंद्र विष्णू महाजनी बी. ए. एल. एल. बी. यांचें व्याख्यान खालील विषयावर झालें:

जीवित्व तें किती। हेंचि धरितां बरें चित्तीं ॥१॥
संत सुमनें उत्तरें। मृदु रसाळ मधुरें ॥ धृ२ ॥
विसांवतां कानीं। परिपाक घडे मनीं ३ ॥
तुका ह्मणे जोडी। हाय जतन रोकडी ॥४ ॥

---

## नोटीस

रा० रा० दत्तु वल्लद उकाजी जात कुणबी राहणार कुपट तालुके बाळापूर,

यासीः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे कुपट तालुके बाळापूर येथील सर्वे नंबर ९ एकर गुंठे १०८३४ आकार रुपये १२८ हे शेत आमचे जवळ तारीख १८।६।१९०१ इसवी पासून आठ वर्षे पावेतो पट्यांनीं असून तो पटा नोंदला आहे व शेत आमचे कबज्यांत आहे सदरहु शेत यादो वल्लद कृष्णाजी पाहाडी राहणार बाळापूर यानें सुमारे साहा महिन्या पूर्वी रुपये ९२९ ऐवजी खरिदी देण्याचा करार करून त्याजबद्दलचा रुपये २९ इसार घेतला व खरिदीखत सालीम रकम घेऊन करून देण्याचा करार केला आहे सदरील शेत आमचे कबज्यांत आहे व सदरील शेताबद्दल आमचा खरिदीचा करार झाला असे तुह्माला माहीत असून सदरील शेत तुह्मी रुपये ६०० ला खरिदी घेतले तरी तुमचा खरिदीचा व्यवहार निरुपयोगि आहे व तुह्मांस खरिदीवरून कबज्या मिळणें नाहीं. कळावे ही नोटीस दिली ता. २०।८ ०४ इसवी.

सही

शेख यासीन वल्लद शेख इमाम
पिंजारी निशानी खुद.

---

## नोटीस

रा० रा० यादो वल्लद कृष्णाजी राहणार बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मजला आज सुमारें सहा महिने झाले मौजे कुपट ता० बाळापूर येथील शेत सर्व्हे नंबर ९ चे शेत रुपये ९२९ ऐवजी खरेदी देण्याचा करार केला. व त्याजबद्दल रुपये २९ इसारा घेऊन बाकीचे रुपये ९०० आह्मी गोपालदास नारायणदास गुजराथी याचे दुकानावर ठेविले होते तेव्हां तुह्मी घेऊन जाऊन आमचे खरेदीचा व्यवहार पुरा करून दिला नाहीं. हल्लीं ते शेत तुह्मी दत्तु वल्लद उकाजी माळी याजला रुपये ६०० ऐवजी आमचे खरेदीचा व्यवहार तुह्मा उभयतांस ठाऊक असून खरेदी दिले असें आम्हांस समजले आहे. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन जाऊन आमची खरेदी पुरी करून द्यावी. तसें न केल्यास तुह्मां उभयतावर फिर्याद करून घेतली जाईल. व कोर्ट खर्च भरून घेतला जाईल. कळावें ता० २०।८।१९०४ इ०

(सही)

शेख याशीन वल्लद शेख इमाम
पिंजारी निशाणी
खुद हातची.

---

## वर्तमानसार.

**सुभाषितं**— दुष्ट मनांत शिरलेला कुविचार हा निवडुंगाच्या फडासारखा असतो. तो जेथें पडेल तेथें आपली संतति वाढवावयाचाच.

**उत्कृष्ट नमुना**—जपानानें इंग्लंडांतली बोर्डस्कूलें, अमेरिकेतलीं हायस्कूलें, फ्रान्स मधलीं ट्रेनिंगस्कूलें आणि जर्मनींतल्या युनिव्हार्सिट्या हीं आपल्यापुढें नमुना ह्मणून ठेवून त्या त्या संस्था तशा तशा बनविल्या. या मुळें शिक्षणाच्या कामीं जें काय उत्तम तें त्यांस सांपडून सर्व कार्य उत्तम तऱ्हेनें साध्य झालें.

**अत्यंत उपयोगी झाड**— ब्राझिल मध्यें कोनीहुबा नांवाचें झाड आहे. कित्येक दिवस पाऊस पडला नाहीं, किंवा त्याला पाणी मिळालें नाहीं, तरी तें कोमेजत नाहीं, इतकेंच नाहीं. तर हिरवेंगार राहून जीवात असतें. याचीं पानें औषधाच्या कामीं येतात. याच्या खोडाचे जे तंतु निघतात, ते हलके पण बळकट असतात व त्याच्यावर उत्तम तजेला असतो. शिवाय लोंढें बहालें, वांसे, दोर वगैरेंच्याही कामीं येतात. शिवाय त्या खोडाचीं लांकडें वाढें, पाण्याचे पन्हळ वगैरे करण्याचे कामीं येतात व आंतल्या भागाचीं चांगलीं बुचें होतात. झाडाच्या रसापासून दारू व विनिगर तयार करतात. याच्या रसापासून साखरही तयार करतां येते व साबूदाण्यासारखे जिन्नसही करतां येतात.

फार दिवस पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडला असतां गरीब लोकांचा या झाडावर चांगला निर्वाह होतो. त्याच्यापासून पौष्टिक असें खाद्य यांना काढतां येतें. त्याचीं फळें गुरांना खायाला घालतात. त्या त्या फळांत जो गीर असतो, तो चांगला रुचकर असतो. यांतील बियांचा तिकडील लोक काफीसारखा उपयोग करतात.

**ईश्वर प्रार्थनेचीं यंत्रें**—जपानी लोकांत ८० लक्ष देव मानितात. या सर्वांची प्रार्थना करणें नेहेंच आयासाचें व काळाचें काम आहे, पण या कल्पक लोकांनीं अशी युक्ती काढिली आहे कीं त्यामुळें हा श्रास सहजी चुकतो. त्या देशांत जागोजाग यंत्रें ठेविलीं आहेत, यांत एक पैसा टाकिला कीं एक मळी मोठी छापील प्रार्थना लिहिलेला कागद बाहेर पडूं लागतो. अर्थात हा कागद काढून घेतला कीं त्या मनुष्यानें प्रार्थना केली असें लोक समजतात. आपल्या देशांत ब्राह्मणद्वारां कित्येक धर्मकर्में करण्याची पद्धती आहे, पण तींत असें चातुर्य दिसत नाहीं.

**भिकाऱ्यांची संपत्ती**—लिस्बन येथें एका ह्मातारया भिकाऱ्याजवळ सुमारें तेहतीस हजार रुपये असल्याचें तेथील पोलिसास आढळलें. ही केवळ त्याच्या इतक्या दिवसांच्या भिक्षेची मिळकत ! हा धंदा मोठा उत्कृष्ट दिसतो!

**नशिबाची कहाणी**—ट्रान्सवालाचे प्रसिद्ध सेनापती जनरल क्रांजि यांस सध्यां फारच वाईट स्थिति आली असून ते केवळ उदरनिर्वाहाकरितां एका नाटक कंपनींत गेले आहेत. ज्यांनीं ट्रान्सवालच्या समरभूमीवर अतुल पराक्रम करून सर्व जगास थक्क करून सोडलें त्यांस आज रंगभूमीवर खोट्या लढायांची वतवणी करण्याचा प्रसंग आलेला पाहून कोणाही सहृदय मनुष्यास खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं.

**बंदुकीनें अपघात**—कऱ्हाड येथें पब्लिक वर्क्स खात्यांतील ओव्हरसिअर मि. डिसोझा यांचा एक नोकर गैरमाहितीनें त्यांची भरलेली बंदूक साफ करीत असतां एकाएकीं गोळी उडून जवळच असलेला ए. मराठ्याचा १२-१३ वर्षांचा मुलगा ठार झाला.

**धर्म शिक्षण**— काठेवाडांतील जुनागड संस्थान हें मुसलमानी संस्थान आहे, परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं तेथील नवाब साहेब आपल्या हिंदु प्रजेच्या धर्मोन्नतीविषयीं फार काळजी घेतात. आपल्या पुत्रांस धर्म शिक्षण देऊं नये, असा राजपुतान्यांतील कांहीं संस्थानिकांनीं नुकताच ठराव केला आहे आणि इकडे जुनागडचे नवाब साहेब जुनागड येथील हायस्कुलांतील ब्राह्मण विद्यार्थ्यांस संध्येचीं पुस्तकें फुकट देऊन त्यांस त्रिकाळ संध्या शिकविण्यासाठीं दोन नवे शिक्षक नेमीत आहेत.

**झाराचा हुकूम**— आपणास मुलगा झाला याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठीं, या पुढें कैदी व हद्दपार केलेले लोक यांस फटक्याची शिक्षा केव्हांही करूं नये, असा हुकूम जाहिरनाम्यानें झार प्रसिद्ध करणार आहे ह्मणतात.

**आकस्मिक घाला**—इतालींतील एर्बारेटी नांवाच्या खेड्यांत तरुण पुरुष व स्त्रिया शेतांत कामास गेल्या असतां एकदम पावसाचे ढग येऊन गांवावर वीज पडून ती एक घर पेटलें त्याचा भडका होऊन सर्व घरांनीं पेट घेतला. गांवांत ह्मातारीं माणसें व मुलें या खेरीज कोणी नव्हतें. शेतांतून मंडळी परत येतात तों सर्व घरें व बहुतेक माणसें मरून गेलीं होतीं.

**गमतीचे शोध** — गवई लोकांचे केस पगळ शाबूद राहतात. तंतु वाद्यें वाजविणाऱ्यांचे केस लांब होतात व तोंडानें फुंकून वाद्यें वाजविणाऱ्याचे केस गळून पडून त्यांच्या डोक्यास टक्कल पडतें असें एका चतुर खोशोधकानें शोधून काढिलें आहे.

**डिटेक्टिव्ह स्त्रिया**— लढाईतील गुप्त बातम्या काढण्याचें नाजूक काम हल्लीं युरोपांतील स्त्रिया करूं लागल्या आहेत असें समजतें. रशियन स्त्रिया जपानाकडील गुप्त बातमी काढण्याचें काम हल्लींच्या लढाईत करित आहेत.

**दीर्घायुषी करणारा वृक्ष**— सायबेरियांत गोमाती नांवाच्या गृहस्थानें एका नवीन प्रकारच्या झाडाचा शोध लाविला असून याचीं पानें भक्षण केलीं असतां आयुष्याची वृद्धि होते असें ह्मणतात. लंडन मध्यें या झाडाची लागवड करण्याचा सदर्हू इसम यांचा विचार असून या पानांची किंमत १०० पासून ५०० पौंड पर्यंत ठेवणार असल्याचें कळतें.

**औदार्य**— रुसो— जपानी युद्धांत मरण पावणाऱ्या जपानी लोकांच्या अनाथ विधवा स्त्रिया व मुलेंबाळें यांच्या मदती करितां जो फंड उभारण्यांत आला आहे त्यास बंगाल मधील मैमनसिंग येथील महाराज साहेबांनीं रुपये ५००० ची रक्कम दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे. या योग्य कृत्याबद्दल बंगाल मधील वर्तमानपत्रांनीं यांची बरीच तारीफ चालविली आहे.

**स्त्रियांचा विलक्षण क्लब**— एक तरुण स्पॅनिश मुलगी मध्य रात्रीच्या समारास रस्त्यांतून घाबऱ्या घाबऱ्या धांवत जात असलेली पोलिसांनीं पाहिली. त्यावरून त्यांनीं तीस पकडून तिची एकंदर हकीकत विचारतां, तिनें असें सांगितलें कीं, येथें एक स्त्रियांचा भयंकर क्लब आहे. यांत मोठमोठ्या खानदान घराण्यांतील स्त्रिया सभासद असून त्यांमध्यें वरचेवर सोडती काढण्यांत येतात. व त्या सोडतींत ज्या ज्या स्त्रीचा नंबर येईल तिनें आत्महत्या केलीच पाहिजे असा नियम ठरलेला आहे याच क्लबामध्यें मी एक सभासद आहे व आज माझा नंबर सोडतींत आल्या मुळें मला नियमाप्रमाणें आत्महत्या केली पाहिजे. पण तसें करण्यास माझा धीर होत नाहीं. ह्मणून मी घाबरून क्लबांतून पळून जात आहे. पोलिसास याप्रमाणें खबर लागतांच त्यांनीं तो संबंध क्लब पकडून त्याची एकंदर चौकशी चालविली आहे.

**मुली पांच फूट उडी मारतात**— जपानात मुलांप्रमाणें मुलींसही शारीरिक शिक्षण देण्याची वहिवाट असल्यामुळें, ऐन तारुण्यापर्यंत पुरुषा प्रमाणें स्त्रियांचीही वाढ मोठ्या जोमानें होत असते. तरुण मुली व्यायाम करीत असतां पांच फूट उंचाचें कुंपण सहज उडून जातात.

**सूड घेतला**—फरीदकोट येथील स्टेशन मास्तर आर्यसमाजाच फारच मोठे अभिमानी होते. ते नेहमी आर्य समाजाची मतें लोकास व्याख्यान रूपानें समजावून सांगत. ह्या उपायानें त्यांनीं कांहीं लोकांस आपल्या मतास वळवून आर्य समाजाची दीक्षा घेण्यास लाविलें. हें तेथील कांहीं उपद्व्यापि मंडळीस खपलें नाहीं; परंतु मास्तर चांगले सशक्त असल्यामुळें यांनवर उघड हल्ला करण्यास ते धजले नाहींत. शेवटीं एके दिवशीं हे उपदेशक मास्तर रात्रीच्या वेळीं रस्त्यानें चालले असतां एकानें मिरच्यांची पूड त्याच्या डोळ्यांत फेंकली आणि भोंसकून याचा प्राण घेतला.

---

## नोटीस

बेशमी— रा. रा. गोविंदा वलद मानसींग कोळी राहणार मौजे मुटी प्रगणे चांदुर तालुके मलकापूर यांसः—

तानी वलद मारोती कोळीण राहणार मौजे बोदवड पेटा येदलाबाद ता० भुसावळ जि० खानदेश इजकडून कळविण्यांत येतें कीं तुझाशीं माझे लग्न होण्यास अदमासें १६ वर्षें झालीं तेव्हां पासून तुह्मी मला जगाचे रितीप्रमाणें न नेतां लोकांचे लेकी बाई जसें नांदतात तसें नांदविलें नाहीं. जणू काय लग्नच झालें नाहीं असें वाटतें. अद्याप पावेतों मी तुमचे नांवावर बसलें. मला आई व बाप दोन्हीही नाहींत माझा गरीब चुलता माधो यानें मला आवरून इज्जत घेऊन बसला. त्यानीं मला कर्ज काढून व कांहीं जवळचे पैसे खर्च करून माझे अन्नवस्त्राची व्यवस्था केली सरासरी दरमहा ४।४॥ रुपये खर्च लागला. त्यानें आजे खुषीनें ५।६ वर्षें खावटीची माफी देऊन १० वर्षांचे रुपये ५०० माझे चुलत्यास तुह्मी देऊन त्याचे सहीची पावती पंचा समक्ष द्यावी आणि मला हल्लींही घेऊन जावें मी आपले जीवें जाळीत बसत नाहीं. तसें न केल्यास १९ दिवसांची चांगली लांबची मुदत तुह्मास मी देतें इतक्या मुदतींत न नेल्यास होच फारकती. मग मजवर तुमचा नवरेपणाचा मुळींच हक्क न राहतां मी सरकारची व पंचाची गुन्हेगार राहणार नाहीं. तुह्मी मजवर या मुदतीनंतर कोणत्याही प्रकारे फिर्याद केल्यास ती बातल असे. मी अशराफाची मुलगी अद्याप पावेतों तुमचे नांवावर बसली. आतां बसत नाहीं.

वर लिहिल्या प्रमाणें जाहीरात सर्वत्र लोकांस जाहिर होण्यास दिली आहे. या प्रमाणें न केल्यास की, प्रो. कोड कलम ४८८ प्रमाणें अन्नवस्त्राचा खर्च रुपये ५०० तुमचे पासून भरून घेतले जातील मग मजवर तुमचा कोणत्याच प्रकारें हक्क न राहतां होच फारकती असे. लेकी बाई सर्वांचे पंटी आहेत. या पूर्वीही पोस्ट मार्फत तुह्मास नोटीस दिली होती ही जाहीरात दिली असे. कळावें. तारीख २६-८-०४ इ० दस्तुर छोटे साहेब अर्जनवीस मलकापूर.

(सही) तानी बाप मारोती कोळी
राहणार बोदवड हल्लीं
मलकापूर नि. खुद्द.

---


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

## आर्यौषधालय

( खामगांव- नलालपुरा )

आमच्या औषधालयांत ( दवाखान्यांत ) नाडी परीक्षा वगैरे अष्टविध परीक्षेनें रोगाचें निदान करून औषध योजना केली जाते. बाहेर गांवच्या रोग्यांनीं खुलासेवार प्रकृतिमान कळविल्यास त्यावरूनही अनुभवशीर गुणकारक औषधें पाठवूं. सर्व रोगांवर खात्रीचीं औषधें तयार आहेत; त्यां पैकीं मुख्य खालीं लिहिल्या प्रमाणें:—

सार्सापरिला— रक्तशुद्धि करणाऱ्या देशी व विलायती वनस्पतीं पासून हें औषध तयार केलेलें आहे. गरमी ( उपदंश ) पासून सर्वांगावर पुरूळ उठणें किंवा काळे डाग पडणें, कच्चें रसायन अंगावर फुटणें किंवा त्यापासून सांधे दुखणें, सुजणें यावर हें अगदीं खात्रीचें औषध आहे. गरमी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणानीं रक्त बिघडणें, कोरडी खरूज, वंडू, पुरूळ, गळ्याच्या वगैरे गाठीं सुजणें, संधिवात, ( सांधे दुखणें व सुजणें ) शरीराचा कोणताहि भाग दुखणें व जुना खोकला, गंडमाळा यांवरही ह्याचा उत्तम उपयोग होतो. किं० लहान बाटली १। रु. मोठी बाटली २॥ रु. पोस्टेज अनुक्रमें ।= व ॥-

धातुवर्धकगुटि—कामोद्दीपक गोळ्यापेक्षां ह्या गुटिका गुणांनीं फारच श्रेष्ठ आहेत; कारण कामोद्दीपक गोळ्यांनीं सप्त धातु न वाढतां विषय वासना मात्र वाढते; व त्यामुळें धातुचा फाजील व्यय होऊन त्या पासून धातु क्षीणता, धातुपातळ होणें वगैरे वाईट परिणाम होतात तसे ह्या गुटिकांनीं न होता सप्त धातु वाढून कामोद्दीपन ( विषयवासना ) होते. कोणत्याहि कारणानें आलेलें नपुंसकत्व अशक्तता, लवकर धातुपात होणें, शौचेंत धातुपात होणें वगैरे सर्व विकारांवर फारच उपयोगी किं० २९ गोळ्यास १ रु.

गरमी ( उपदंश ) वर गोळ्या—चट्टे, सुज, बद, पुरळी वगैरे सर्व विकार कितीही दिवसांचे असले तरी ह्या गोळ्यांनीं खात्रीनें बरे होतात. ह्यांत अपायकारक रसायनी औषध बिलकूल नाहीं. पथ्य विशेष नाहीं किं० ३० गो. रु. २

पऱ्यावर औषध— लघवीची जळजळ, तिडीक इ० २४ तासांत बरें होतात. किं० रु. १॥

बाळंत रोगावर औषध— हें अनुभवशीर खात्रीचें औषध आहे. किं० ३० गो. रु. ९

बालामृत— संग्रहणी, पंडु, अशक्तता, खोकला इ० विकारांवर मुलांना उपयोगी. किं० दर बा. -॥-

हिवताप व पानथरी यांवर औषधें-- प्रत्येक औषधास किं० १ रु.

भस्में, मात्रा, पाक, आसव वगैरे सर्व शास्त्रोक्त औषधें तयार आहेत त्यां पैकीं मुख्य:—

| | |
|---|---|
| अभ्रक भस्म- क्षय, खोकला, इ० | किं० दर तो. रु. १९ |
| लोहभस्म ( शतपुटी ) पंडु, अशक्तता इ० | ,, ,, रु. ३ |
| मंडूर भस्म-पंडु, संग्रहणी इ० | ,, ,, रु. १ |
| मधुमंडूर- वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| प्रवाळ भस्म नं. २ जीर्णज्वर, धातुविकार इ० | ,, ,, रु. १ |
| प्रवाळ भस्म नं० १ वरच्याहून जास्त गुणकारी | ,, ,, रु. २ |
| सुत शेखर- पित्तविकार, मोंवळ इ० | ,, ,, रु. ४ |
| खोकल्यावर गोळ्या-खोकल्या दमा | ,, ,, -॥- |
| सुवर्णमाक्षिक-धातु विकार जीर्णज्वर इ० | ,, ,, रु. ९ |
| हेमगर्भ मात्रा- वात कफ इ० | ,, ,, रु. १८ |
| चंद्रप्रभा- मेह, मुरलेली गरमी इ० | ,, ,, रु. १॥ |
| सु० मा० वसंत-जीर्णज्वर, अग्निमांद्य इ० | ,, ,, रु. ६ |
| महायोगराज गुग्गुळ- सर्व वात विकार | ,, ,, रु. २ |
| रेचक गोळ्या ( जुलाब होण्यास ) | ३२ गो० रु. १ |

औषधें गोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. पांच रुपयावर घेणारांस कमिशन. खुलासा पत्रद्वारें.

वैद्य वासुदेव शास्त्री गोडबोले
खामगांव ( वऱ्हाड )

---

# ORIENLTAL
## GOVERNMENT SECURITY
LIFE ASSURANCE COMPANY, LIMITED,
Established 1874,
Head Office—**BOMBAY**
*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
FUNDS EXCEED

# TWO CRORES AND TEN LAKHS
Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

## IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amonut due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the " Oriental " keep well before them, and act up to treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's Funds amount to given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

THE Funds of the " Oriental " are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

GOVERNMENT Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

CREDITORS who expect the repayment of debts at some uture period, may protect themselves from loss by the failure of ife in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

NO man can be sure how long he will live; and although he may save money, yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance, is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the ' Oriental ' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. FOR TERMS PLEASE APPLY TO UNDER—SIGNED.

Prospectuses, forms, and any further information, can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AGENT
*for C. P. Berar and Khandesh,*

---

## मुंबई बँकची सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षांत १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

---

## जाहिरात

## स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी रोड
मुंबई.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस

रा. बुधोदास चुन्नीलाल मारवाडी दुकान बोरगांव यांसः—

खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुम्ही तारीख २३।६।१९०४ रोजीं आमचे दुकानीं आकोट येथें येऊन आकोट दुकानचा व मौजे वडाळी प्रगणें पनज तालुके आकोट या दुकानचा असे दोन्हीं दुकानचा तुम्ही आपल्या खात्याचा हिशोब करून आमची बाकी रुपये ८९७॥= घेणे निघाली ती तुम्ही देणें कबूल करून हजू वहीवर तिकीट लावून सही करून दिली आणि सदरहु रकम एका महिन्यानीं अदाई करून देऊं असें तुम्ही बोलले असून या प्रमाणें आज पर्यंत तुम्ही रकम दिली नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसां आंत आमच्या रकमेची मुद्दल व व्याज या सुद्धां फेड करावी असें तुम्ही न केल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून कोर्ट खर्चा-सुद्धां व नोटीशीच्या खर्चा सुद्धां रकम वेतली जाईल. कळावें. तारीख २९।८।०४ इ.

सही

ठाकुरदास खेमराज शीरदार

कन्हैयालाल मोतीलाल मेरारी

दुकान आकोट

---

## नोटीस

बेशमो जान्या वल्द झांगो तायडे महार राहणार खंडाळे ता. बाळापूर यांसः—

खालीं सही करणार या लेखानें कळविते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास १०।१२ वर्षें झालीं. मी आपल्या बापाच्याच घरीं राहात आले. शहाणी झाले तरी तूं मला नांदविलें नाहींस. तूं फार वाईट वर्तनाचा मनुष्य आहेस व तुला १ महिन्याची सजाही झाली होती. तूं अगदीं नंगा मनुष्य आहेस व माझें पोट भरण्यासहि तूं समर्थ नाहीं. मी तुज बरोबर संसार करण्यास नाखूष आहे. तर तूं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत लेखी फारकती द्यावी. असें न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मला योग्य दिसेल तसें करीन कळावें. तारीख २१।८।०४ इ.

सहीची निशाणी

कौतिकी मर्द जान्या महार

राहणार टाकळी निमकर्दे

ता. बाळापूर

हिची बांगडी

---

मराठी भाषेंतील सर्वोत्कृष्ट पुस्तक.

झांशी संस्थानच्या महाराणी

# लक्ष्मीबाई साहेब त्यांचें चरित्र.

इ० स० १८५७ च्या बंडामध्यें अद्वितिय शौर्य गाजवून प्रसिद्धीस आलेल्या ह्या स्त्रीरत्नाचें सविस्तर व साधार चरित्र. हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय होऊन त्याचीं गुजराथी, बंगाली, कानडी, हिंदी वगैरे भाषां-मधून भाषांतरें झालीं आहेत. इ. स. १८५७ च्या बंडासंबंधाचा मनोरंजक इतिहास ह्या पुस्तकाप्रमाणें मराठींत दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत आजपर्यंत आलेला नाहीं. पुस्तकाची छपाई व बांधणी सुंदर असून त्यांत झांशीच्या राणीचें चित्र व इतर चित्रें घातलीं आहेत. पुस्तकाची किंमत रु० २॥८; ट० ह० व व्ही० पी० खर्च ८४

पत्ताः— डो. बी. पारसनीस,

[ सातारा. ]

---

## जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा विडीचा व्यापार पुष्कळ वर्षांपासून चालू आहे, परंतु आमच्या व्यापारास कमीपणा आणण्याकरितां व माल लोकांस नापसंत होण्याकरितां कांहीं दुष्ट बुद्धीच्या लोकांनीं बऱ्याच खटपटी केल्या त्यापैकीं झीनाभाई बेचरदास मुक्काम मलकापूर प्रांत वऱ्हाड यांनीं आमच्या नांवाची खोटी लेबलें खोट्या मालावर लावून आमचे नांवानें माल विक्री करून बरेच दिवस आपला उदर-निर्वाह केला. परंतु आम्ही त्यास सुमारें सोळा महिन्यापूर्वीं मलकापूर येथें धरून त्याजवर सदर कृत्याबद्दल फौजदारी खटला केला. या कामांत त्यास कैद व दंड या प्रमाणें शिक्षा झाली असून त्याच इसमानें पुन्हां तसेंच खोटें काम गेल्या कार्तीक महिन्यापासून सुरू करून माल विक्री करीत होता. करितां त्यास पुन्हां आम्ही मलकापूर येथें पकडून त्याजवर फौजदारी खटला केला त्यात त्यास तारीख २८ माहे जून सन १९०४ इ० रोजीं सहा महिने सक्त-मजूरी व २०० रुपये दंड याप्रमाणें शिक्षा झाली तरी अशीं खोटीं कामें करून माल-विक्री करणारांनीं व आपल्या नांवाचा खोटा माल घेणारांनीं सावध रहावें. तरी आमचे नावाचा माल घेणारे ठोक व्यापारी लोक यांनीं व किरकोळ घेणारे इसम यांनीं सदर ट्रेडमार्क रजिस्टर नंबर व आमचे नांव पाहून माल घेत जाणें.

सही—बाळाराम पुलया द० खु०

सही— गुंडाप्पा नसाप्पा दस्तु.

येलप्पा नरसप्पा

शुक्रवारपेठ कामाट पुरा,—पुणे सिटी.

---

## कापडाचें दुकान

( एक भाव व माफक दर )

आमच्या दुकानीं सर्व प्रकारचा रेशमी व सुती माल विक्रीस आहे. आमच्यर कापडाचे भाव फारच थोडा नफा घेऊन आकारलेले आहेत. बाहेर गांवीं व्हाल्यु-पेबलनें माल पाठविण्याची सोय केली आहे. एक वेळ आमच्या दुकानचा माल पडताळून दुकानाच्या सचोटीचा अनुभव अवश्य घ्यावा.

शा० नागसी भाई लध्धा

ठिकाणा— कॉटन मार्केटा समोर

कच्छी बाजार, आकोला.

---

ॐनमःश्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं-कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खर जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयींनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें, पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जठराग्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्ची सोबत राखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ गो० | १ रु० | ७१ गो० | २ रु० |
| ११९ गो० | ३ रु० | १६१ गो० | ४ रु० |
| २७१ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—— अलिकडे २।३ वर्षें आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कार्पी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनि आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी

---

## जाहिरात

लक्ष लावून एक वेळ वाचा ! वाचा !!

### एम. एम्. ॲन्ड सन्स

फोटोग्राफर रबर स्टांप मेकर वॉच रीपेरर आणि स्टेशनरी मरचंट आकोला [ वऱ्हाड ]

आज पर्यंत कोणत्याही कंपनींनी इमी-टेशन रासकोप अथवा या नांवाचे थोड्या किंमतींत विकली नसेल ती आम्ही रुपये ९ मध्यें ग्यारंटी वर्षें ९ ची देतो आहे. तर त्वरा करावी आणि घड्याळाबरोबर काच, चमान, पेटी आणि यांचे बरोबर घड्याळें घेणाराचे नांवाचे रबरी पेनपेनसील स्टाप तयार करून पाठवूं आणि तीन घड्याळें घेणारांस व्ही. पी. खर्च माफ. व एक डझन घेणारास एक घड्याळ बक्षिस देऊं हे घड्याळ एक वेळ घेतलें तर पुनः १० वर्षें पर्यंत व्यावयास नको. आणि दुसरे हर एक जातीचें घड्याळ किंवा हर एक जातीचें स्टेशनरी सामान माफक दरानें व सचोटीनें खात्री लायक पाठवूं. या शिवाय रबराचे छाप नांवानें हर एक जातीचें करून देऊं. आणि रबर स्टांपाच्या नमुन्याकरितां अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवावें म्हणजे नमुना फुकट पाठवूं. आणि फोटो काढून घेण्याची इच्छा असेल त्यांनीं येथें यावें. नाहीं पेक्षां आम्हांस बोलावावें. म्हणजे आम्ही येऊं. आणि २५ रुपया पेक्षां जास्त माल घेणारास दर रुपयास ८॥ अर्धा आण्या प्रमाणें कमिशन देऊं. आणि या शिवाय कांहीं विचारावयाचें असेल तर पत्र व्यवहार करावें म्हणजे उत्तर देऊं. नाहींपेक्षां समक्ष येऊन भेटावें म्हणजे समजेल. आणि कोणास वाचसिकटवर वाजयाला शिकणें असेल त्यांनीं यावें. शिकविण्या बद्दल फी रुपये १० पडेल रबरस्टांप करितां हर एक गांवास एजंट पाहिजेत. कमिशन भरपूर मिळेल. या सर्व कामाची व सामानाची मागणी करावी म्हणजे खात्री होईल.

एम. एम. ॲन्ड सन्स आकोला.

---

## जाहिरात

### अल्प किंमतींत मोठा लाभ

खालीं लिहिलेलीं बोधपर, मनोरंजक, मोक्षमार्गदर्शक, चित्तवेधक व अगदीं नवीन पुस्तकें छापून तयार आहेत. तरी जिज्ञासू व मुमुक्षु लोकांनीं अवश्य मागविण्याची त्वरा करावी. खालील कोणतींहि पुस्तकें एकदम एक रुपयाची घेतल्यास टपाल खर्च माफ.

| पुस्तकाची नांव | किंमत | ट० ख० |
|---|---|---|
| आनंदबोधामृत | ८—। | ८॥ |
| श्री सद्गुरुप्रासादिक अभंग | ८= | ८ः |
| श्री व्यंकटेशाष्टक | ८। | ८॥ |
| श्रीरामप्रासादिक भिक्षुमुक्तीचे अभंग | ८= | ८॥ |

पुस्तकें मिळण्याचा पत्ता—, व्ही. बी. हेड मास्तर मु० असलगांव जि. आकोला वऱ्हाड.